**(सभापतीस्थानी माननीय सभापती.)**

**पृ.शी./मु.शी.**:तोंडी उत्तरे.

**पळसखेड (ता.आटपाडी) येथे सावकारांच्या धमक्यांना घाबरुन**
**एका इसमाने आत्महत्या केल्याबाबत**

**(१) * १२९८१ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी तालुक्यातील पळसखेड येथील भाऊसाहेब करे या इसमाने सावकारांच्या धमक्यांना घाबरुन आत्महत्या केल्याचे व या घटनेची तक्रार नोंद करुन घेण्यास स्थानिक पोलीसांनी विलंब केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास त्यानुसार दोषी आढळलेल्या सावकारावर आणि पोलीसांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता.**: (१) होय. परंतु स्थानिक पोलीसांनी तक्रार नोंद करुन घेण्यास विलंब केलेला नाही.

(२) व (३) सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्वरीत कारवाई व तपासकार्य सुरु केलेले आहे. सदर घटनेबाबत आटपाडी पोलीस ठाणे येथे संबंधित सावकाराविरुध्द गु.र.नं. ४/०६ भा.दं.वि.सं. कलम ३०६,३४ मुंबई सावकारी अधिनियम कलम ३३ (अ), (ब), (क) प्रमाणे नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालु आहे. तसेच सदर घटनेची तक्रार नोंद करुन घेण्यास स्थानिक पोलीसांनी विलंब केला नसल्याने पोलीसांविरुध्द कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, "सदर घटनेबाबत आटपाडी पोलीस ठाणे येथे संबंधित सावकाराविरुध्द गु.र.नं. 4/06 भा.दं.वि.सं. कलम 306,34 मुंबई सावकारी अधिनियम कलम 33 (अ), (ब), (क) प्रमाणे नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे," असे लेखी उत्तर शासनातर्फे देण्यात आले आहे. भाऊसाहेब करे या शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्याचा वडिलांनी पाच सावकारांच्या विरोधात तक्रार केली आहे, हे खरे आहे काय ? असल्यास, या पाच सावकारांच्या विरूध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ? सांगली जिल्हयातील आटपाडी, कवठेमहाकाळ, जत हे तालुके दुष्काळी आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षापासून या तालुक्यांमध्ये सावकारांनी धुमाकूळ घातला आहे. दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना लुबाडून त्यांना आत्महत्या

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12981..

प्रा.शरद पाटील...

करण्यास प्रवृत्त करणाऱ्या घटना वारंवार घडत आहे. जत तालुक्यातील गिरगाव या गावामध्ये श्री.शामराव चव्हाण या व्यक्तीने 5 शेतकऱ्यांच्या 5 लाख रुपयासाठी 60 लाख रुपये किंमतीच्या जमिनी स्वत:च्या नावावर करून घेतल्या आहेत. तसेच, श्री.तानाजी पाटील या सांगली जिल्हा परिषदेच्या सदस्याने सावकाराच्या माध्यमातून श्री.माळी या शेतकऱ्याची जमीन हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा घटना सांगली जिल्हयामध्ये घडत आहेत. तेव्हा या सगळया घटनेची चौकशी करून सावकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर पिळवणूक करणाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कै.भाऊसाहेब करे याने सावकाराच्या धमक्यांना घाबरून आत्महत्या केल्यामुळे त्यांच्या वडिलांच्या तक्रार पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आली. या तक्रारीनुसार 5 जणांविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. यापैकी काही जणांनी अटकपूर्व जामीन मिळविलेला आहे. तरी सुध्दा दोन आरोपींना दुसऱ्या केसमध्ये अटक करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य प्रा.पाटील यांनी, आटपाडी, कवठेमहाकाळ, जत या सांगली जिल्हयातील तालुक्यात सावकारीचा व्यवसाय सुरू आहे असे सांगितले आहे. त्या घटनेची चौकशी करून संबंधितांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : कै.भाऊसाहेब करे या शेतकऱ्याने आत्महत्या केव्हा केली आहे व आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी कोणत्या तारखेला गुन्हा दाखल केला आहे ? कै.करे या शेतकऱ्याने आत्महत्या केल्यामुळे त्याच्या कुटुंबियाला शासन आर्थिक मदत करणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कै.भाऊसाहेब करे या शेतकऱ्याने 2 तारखेला विषारी औषध प्राशन केल्यानंतर त्यास सांगली येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्यानंतर 7 तारखेला तो मयत झाला. त्यानंतर सांगलीच्या पोलीस ठाण्यामध्ये 5 जणांविरूध्द 8 तारखेला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत शेतकरी कै.भाऊसाहेब करे याच्या कुटुंबियाला शासनाकडून कोणतीही मदत करण्यात आलेली नाही.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A 3

BGO/ MAP/ KGS/ 11:00

ता.प्र.क्र.12981...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सावकाराने शेतकऱ्याला दिलेल्या धमक्याबाबतचा हा प्रश्न आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सावकारी प्रथा नष्ट करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले होते. तेव्हा आज पर्यंत शेतकऱ्यांकडून सक्तीने पैसे वसूल करणाऱ्या किती सावकारांविरूध्द शासनाने कारवाई केली आहे ?

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12981....

डॉ.दीपक सावंत.....

आणि अशा प्रकारचे किती गुन्हे नोंदविले गेले आहेत ? राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले होते की, खाजगी सावकार वाटेल त्याप्रमाणे शेतकऱ्यांकडून कर्जे वसूल करीत आहेत म्हणून, खाजगी सावकारी राज्यातून संपूर्णपणे नष्ट करावयाची आहे. त्यामुळे आतापर्यंत महाराष्ट्रात एकूण किती सावकारांवर गुन्हे दाखल झाले आहेत ? तसेच ते गुन्हे कोणत्या कलमान्वये दाखल झाले आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, अकोला जिल्हयामध्ये सावकारांवर 42 केसेस दाखल केल्या होत्या, त्यामध्ये 70 व्यक्तींना अटक करण्यात आली. अमरावतीमध्ये 76 केसेस दाखल झाल्या असून, 101 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्यात सावकारांच्या विरोधात डिसेंबर-2005 पर्यंत एकूण 830 केसेस रजिस्टर केल्या असून, 1281 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आटपाडी तालुक्यात भाऊसाहेब करे या इसमाने सावकारांच्या धमक्यांना घाबरुन आत्महत्या केल्यामुळे हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. त्यामुळे शासनाकडून सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत अचूक माहिती सदनासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर आपल्याकडे सध्या अचूक माहिती नसेल तर ती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपण सांगितल्यानुसार माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, या प्रश्नातील मुख्य प्रश्नाला उत्तर आलेले नाही. सावकारांच्या धमक्यातून हे प्रकरण घडलेले आहे हे उघड आहे. त्यामुळे सावकारांविरुध्द पोलिसांनी गुन्हे देखील दाखल केलेले आहेत. परंतु माझा मुख्य प्रश्न असा आहे की, आत्महत्या करणाऱ्या भाऊसाहेब करे या इसमाच्या कुटुंबियाला शासनाने काही मदत केली आहे काय ? जर केली नसेल तर ती करण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, भाऊसाहेब करे या इसमाच्या कुटुंबियाला शासनाने कोणतीही मदत केलेली नाही. परंतु शासनाच्या नियमानुसार त्या इसमाच्या कुटुंबियाला जी काही मदत करता येईल ती केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांना धन्यवाद देतो. खरे म्हणजे आज शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या चर्चेमध्ये हा विषय येणार आहे. राज्याचे गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी स्टेटमेंट केले होते की, खाजगी सावकारांना भरचौकात फरफटत आणून त्यांना कोपरापासून, ढोपरापर्यंत सोलून काढले पाहिजे. त्यामुळे फरफटत आणण्याचा कार्यक्रम मी स्वत:च अधिकृतरित्या जाहीर करणार होतो. कारण आपल्याला सावकारांना फरफटत आणण्याचे आदेश हे राज्याच्या गृहमंत्र्यांचेच होते. परंतु राज्यात घडत असलेल्या अनेक प्रकरणांवरुन हा प्रश्न किती बेदरकारपणे हाताळला जात आहे त्याचे दर्शन या प्रश्नातून होत आहे. आताच माननीय राज्यमंत्री महोदयांनी 830 सावकारांवर गुन्हे रजिस्टर केले असे सांगितले आहे. तसेच माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये गेल्या वर्षभरात सुमारे 940 सावकारांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा उल्लेख आहे. हा आकडा काहीही असला तरी तो मुद्दा निराळा आहे. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास जबाबदार असणाऱ्या सावकारांवर कारवाई करण्याचे हे शासन केवळ नाटक करीत आहे असा आमचा आक्षेप आहे. ज्या शेतकऱ्यांची भांडी आणि जमीन या खाजगी सावकारांनी जप्त केली आहे त्या शेतकऱ्यांना त्यांची भांडी आणि जमीन ताबडतोब देण्यात येईल असे माननीय गृहमंत्री महोदयांनी सांगितले होते. शेतकऱ्यांनी तारणापोटी आपली जी काही भांडीकुंडी वा जमीन खाजगी सावकारांकडे गहाण ठेवली असेल त्या शेतकऱ्यांना ती परत केली जाणार आहे काय ? तसेच किती दिवसांत ती देणार आहात ? कारण खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांचे जे काही हडप केलेले आहे ते त्यांना तातडीने देण्याची घोषणा शासनानेच केलेली होती.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 12981 ....**

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, शासनाने घोषणा केली असेल तर ....

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवरच मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्रीमहोदय आपणच शासन आहात. आपण असे कसे काय बोलत आहात ? आपल्याला काढून टाकले आहे का ?

**सभापती** : माननीय मंत्रीमहोदय आपण कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रीमहोदय आपल्याकडे आपसात जे चालले असेल ते आपण विसरुन जावे. आपण येथे एक मंत्री या नात्याने उभे आहात. माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी घोषणा केलेली आहे की, " शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना भर चौकात फरफटत आणून ढोपरापासून कोपरापर्यंत सोलून काढू. त्यांच्या कागदामध्ये असलेली शेतकऱ्यांची भांडीकुंडी, गहाण ठेवलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्यात येतील. " तरी, मला माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, त्यांनी या संदर्भात कोणता निर्णय घेतलेला आहे ? आणि घेतला नसेल तर, आपण त्या संदर्भात किती दिवसांत निर्णय घेणार आहात ?

( माननीय उप मुख्यमंत्री यांचे सभागृहात आगमन )

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा प्रश्न विचारला आहे की, सावकारी पाशाविरुध्द गृहमंत्री व उप मुख्यमंत्री म्हणून आपण काही ठाम निर्णय घेतला आहे का ? तसेच खाजगी सावकारांच्या पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी सरकार काही ठाम निर्णय घेईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात सरकारने असा निर्णय घेतलेला आहे की, ज्या सावकारांचे रजिस्ट्रेशन नाही, ज्या खाजगी सावकरांनी कोणत्याही नोंदी सरकारकडे केलेल्या नाहीत, तसेच ज्यांचे लायसन्स नाही अशा खाजगी सावकारांनी दिलेल्या कर्जाची परतफेड करण्याची आवश्यकता नाही आणि जर खाजगी सावकारांनी लोकांकडे पैसे मागितले तर त्यांच्याविरुध्द पोलीस कम्प्लेन्ट करावी. सभापती महोदय, आम्ही या संदर्भात सगळीकडे कारवाई सुरु केलेली आहे. आतापर्यंत 940 सावकारांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. सावकारांनी

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 12981 ....</u>**

श्री. आर.आर.पाटील ....

कोऱ्या स्टँप पेपरवर, चेकवर सही घेतली आहे अशी तक्रार जर केली तर धाड टाकण्याचेही आम्ही काम सुरु केलेले आहे. सही घेतलेले कोरे स्टँप पेपर्स व चेक्स जप्त करण्यात आले आहेत. सभापती महोदय, अवैध सावकारीविरुध्द शासनाने एक मोहिम हाती घेतलेली आहे. अगोदर या मोहिमेस जनतेकडून प्रतिसाद मिळाला नाही. परंतु नंतर प्रतिसाद मिळायला लागला. सुरुवातीला शेतकरी खाजगी सावकारांविरुध्द तक्रार करत नव्हते. परंतु आता खाजगी सावकारांविरुध्द मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात येत आहे. सभापती महोदय, जेथे ज्या सावकारांविरुध्द तक्रारी येतील तेथे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी केलेल्या वक्तव्यामुळे मी असे बोललो. आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी 940 सावकारांविरुध्द कारवाई केली असल्याचे सांगितले आहे. परंतु सभापती महोदय, हे दृश्य उभे राहणे महत्वाचे आहे. हा विषय राजकारणाचा नाही. तुम्ही करत असाल तर आम्ही नक्कीच त्याविषयी समर्थनासाठी उभे राहू. हा आत्महत्यांचा विषय आहे. आपण 940 सावकारांकडून जमीन गहाणवटीचे पेपर्स परत घेऊन शेतकऱ्यांना दिले आहेत, असे दृश्य निर्माण झाले पाहिजे. याबाबत जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला पाहिजे. ठीक आहे, आता 940 सावकारांना आपण पकडल्याचा विषय बाजूला राहिला. पण त्या खाजगी सावकारांनी ज्या शेतकऱ्यांचे जमिनींचे कागद, त्यांचे सामान जप्त केले आहे, ते त्यांना परत मिळणार आहे का ? आणि त्या संदर्भात आपण किती दिवसांत कार्यवाही कराल ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सावकारांनी शेतकऱ्यांची घेतलेली भांडीकुंडी, जमिनी गहाणवट ठेवल्याची कागदपत्रे शेतकऱ्यांना परत करण्याची भूमिका सरकारने पार पाडलेली आहे. 940 सावकारांना सरकारने प्रत्यक्षात पकडलेले आहे, हे सावकारांच्या लक्षात आल्यानंतर खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांशी फार मोठ्या प्रमाणात तोडी केलेल्या आहेत. व्याज देऊ नका, तीन वर्षांत मुद्दल द्या, अशाप्रकारे तोडी चालल्या आहेत. सभापती महोदय, 940 शेतकऱ्यांना पकडण्यात आलेले आहे. परंतु 7 टक्क्यांच्या आतील व्याजावर कर्जे देणाऱ्या सावकारांना अजुनही पकडलेले नाही. जेथे पिळवणूक झालेली आहे, अशाच ठिकाणी लोकांनी तक्रारी केल्या आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12981...

श्री. आर.आर.पाटील...

आपण सावकारांचा पैसा घेतला आहे, तो पैसा परत दिला पाहिजे, असे गरीब माणसांचे धोरण आहे. त्यांचा पैसा बुडवावा असे गरीब माणसाला वाटत नाही. पैसा बुडविणारी ती माणसे नाहीत. जे सावकार बँकांच्या व्याज दरापेक्षा जास्त पैसे घेत असतील त्यांच्यावर सरकारने कारवाई केलेली आहे. 940 व्यतिरिक्त आणखी काही सावकारांनी मालमत्ता किंवा भांडीकुडी जप्त केली असेल तर त्यांच्या मालमत्ता शेतकऱ्यांना परत करण्याची कार्यवाही शासनातर्फे हाती घेण्यात आलेली आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील जत, आटपाडी व कवठेमहांकाळ या तालुक्यांमध्ये तांत्रिकदृष्टया सावकारांकडे परवाने असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी व इतर मालमत्ता ताब्यात घेतलेल्या आहेत, त्यांच्याकडे सावकारीचे लायसन्स् असल्यामुळे त्यांनी ही कारवाई केलेली आहे. ज्यांच्याकडे सुरुवातीला 5 एकर जमीन होती त्यांच्याकडे आता 200 ते 250 एकर जमीन झालेली आहे अशा सावकारांची चौकशी करुन त्या जमिनी तांत्रिकदृष्टया कायदेशीर आहेत पण त्या अवैघ मार्गाने मिळविलेल्या आहेत त्या मूळ मालकांना परत करण्याची कार्यवाही शासनातर्फे करण्यात येणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : ज्या सावकारांकडे अवैध संपत्ती वाढलेली आहे, व जे सावकार बँक रेटपेक्षा जास्त व्याज घेत असतील अशा सावकारांची पोलिसांमार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर घटनेमध्ये आटपाडी येथील सावकारांनी किती शेतकऱ्यांना कर्ज दिलेले आहे, व त्या सावकारांकडे लायसन्स् होते काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर घटनेमधील सावकाराकडे लायसन्स् नव्हते, व त्यांनी दोन लोकांना कर्ज दिलेले आहे.

--------------

......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील बावा इंटरनॅशनल हॉटेल मधील अ‍ॅव्हलॉन पब मध्ये**
**दक्षिण आफ्रिकन मॉडेलवर करण्यात आलेला बलात्कार**

**(२) * १४५२३ श्रीमती संजीवनी रायकर , श्रीमती कांता नलावडे , श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बावा इंटरनॅशनल हॉटेलमधील अ‍ॅव्हलॉन पब मध्ये दक्षिण आफ्रिकन मॉडेलवर दिनांक २७ डिसेंबर,२००५ रोजी वा त्या सुमारास बलात्कार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मॉडेलवर बलात्कार करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बलात्कार करणाऱ्या तिघांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर. आर. पाटील यांच्याकरिता**: (१) होय.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी विलेपार्ले पोलीस ठाणे येथे भा.द.वि.स. कलम ३२८,३४२,३५४,३६५,३७६ (१) (ग), ३२३,३२४,२९२, व ३४ अन्वये गुन्हा क्रमांक ०४/२००६ दाखल करण्यात आला आहे. सदर महिला मॉडेल वर बलात्कार केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोन आरोपिंना अटक करुन त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये थोडी सुधारणा आहे. मुंबईतील बाबा इंटरनॅशनल हॉटेल मधून सदर मॉडेलला राज महल हॉटेल कल्याण येथे घेऊन जातांना कारमध्ये व नंतर राज महल हॉटेल येथे बलात्कार झाला हे खरे आहे असे वाचावे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, आज भगतसिंग, राजगुरु व सुकदेव या तिघांच्या बलिदानाला ७५ वर्षे झालेली आहे या देशभक्तांनी भारत मातेच्या चरणावरती जीवन पुष्प वाहिले, आणि कोठे हे तिघे बलात्कार करणारे तरुण....

**सभापती** : श्रीमती संजीवनीताई मी यासाठी आपणास परवानगी दिलेली नाही. प्रश्नोतराच्या तासानंतर मीच ते मांडणार आहे.

.....३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१४५२३....

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मी त्या तिघांची तुलना करीत होते. ज्या तीन लोकांनी बलात्कार केलेला आहे. हे कशा तऱ्हेचे लोक आहेत. बलात्कारीत स्त्री ही कोठल्याही धर्माची, पंथांची असली तरी तिच्यावर बलात्कार करणारे हे गुन्हेगारच ठरतात यासंदर्भात बरीच चर्चा झालेली आहे. ही तरुणी दक्षिण आफ्रिकन होती. ही भारताची अपकिर्ती संबंध भारताबाहेर पसरलेली आहे. ही तरुणी बाहेर गेलेली असतांना तिच्या शीतपेयामध्ये औषध टाकून तिला बेशुध्द केलेले आहे हॉटेल मालक म्हणतात की येथे बलात्कार झालेला नाही. बाहेर जाऊन तिच्यावर बलात्कार केलेला असेल. हॉटेल मालक सुध्दा दोषी आहे, तेव्हा जे दोषी असतील त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

**सभापती** : आपण नेमका प्रश्न विचारावयास पाहिजे ? आता सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी प्रश्न विचारावा ?

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, या बावा हॉटेलमध्ये दक्षिण आफ्रिकन मॉडेलवर जो बलात्कार झालेला आहे, ती पबमध्ये गेल्यानंतर तिच्या शीतपेयामध्ये औषध टाकून तिला बाहेर नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आलेला आहे. तिच्या शीतपेयामध्ये जे अंमली पदार्थ मिसळले ते पब मध्ये मिसळले आहेत, तर तेथील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हे झालेले आहे काय ?

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.14523...</u>**

श्रीमती कांता नलावडे ...

माझा असा प्रश्न आहे की, त्या महिलेला पेय देणारे कर्मचारी सुध्दा दोषी असल्यामुळे, ते कर्मचारी कोण आहेत, अशाप्रकारे बावा इंटरनॅशनल हॉटेलमध्ये घटना घडलेली असल्यामुळे त्या हॉटेलचे मालक सुध्दा या प्रकारास जबाबदार असल्यामुळे त्यांची चौकशी करणार आहात काय ? पूर्वीही असे अनेक बलात्कार झालेले असतील, पण त्यांनी तक्रारी सुध्दा केलेल्या नसतील. म्हणून या हॉटेलमध्ये या प्रकरणाबाबतचे काही रॅकेट आहे काय ? या महिलेला ज्या कर्मचा-यांनी पेय दिले होते त्यांच्यावर कारवाई केली आहे काय ?

श्री.आर.आर. पाटील : या महिलेच्या मागणीप्रमाणे तिला अंमली पदार्थ दिलेला आहे, या महिलेने स्वत: दारु प्यायली असल्याचे मान्य केलेले आहे. या महिलेने ज्या दोघांची नावे घेतलेली आहेत, त्यांचा शोध घेण्यात येऊन त्यांना अटक करण्यात आली आहे. तरी सुध्दा या संपूर्ण घटनेमध्ये हॉटेल मालकाचा काही दोष आहे किंवा नाही याबाबत दुस-या विभागाच्या ॲडिशनल सीपींकडून ही केस पुन्हा एकदा तपासण्यात येईल व कोणी दोषी आढळून आल्यास त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : बाबा इंटरनॅशनल हे नोटॉरिअस हॉटेल आहे. याबाबत पोलिसांनी तपास केल्यास या हॉटेलमध्ये वारंवार असे प्रकार घडत असल्याचे आढळून येईल. ज्या ज्यावेळी हॉटेलमध्ये असे प्रकार घडतात, त्यावेळी ही सर्व प्रकरणे हॉटेलच्या संगनमताने होत असतात. या प्रकरणाची चौकशी करत असताना हॉटेलचे मालक किंवा व्यवस्थापन यांचा काही या प्रकरणाशी संबंध आहे काय, याबाबत चौकशी केली आहे काय ? असल्यास त्या बाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वी या हॉटेलमध्ये असे प्रकार केव्हा केव्हा घडलेले आहेत, याबाबत तपास केलेला आहे काय ?

श्री.आर.आर. पाटील : या हॉटेलमध्ये बलात्कार झालेला नसल्याबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी यापूर्वीच सांगितलेले आहे. या हॉटेलमधील पबमध्ये दारु प्यायल्यानंतर तिच्याबरोबर नाचणा-या दोन तरुणांनी त्या महिलेला फूस लावून बाहेर नेले त्यावेळी तिच्यावर दारुचा अंमल होता. तिच्यावर कल्याणच्या हॉटेलमध्ये आणि टॅक्सीमध्ये बलात्कार करण्यात आला. या आरोपींना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 11:20

**ता.प्र.क्र.14523...**

श्री.आर.आर. पाटील ...

तपासण्यात आले आहे. ही महिला बाबा इंटरनॅशनल हॉटेलमध्ये का गेली, या तरुणीला कोणी बोलावले होते, तेथे काही अनुचित प्रकार घडला आहे काय, मी याबाबत अगोदरच उत्तर दिलेले आहे. या हॉटेलमध्ये काही आयएएस व आयपीएस दर्जाचे अधिकारी सातत्य ठेऊन जात असल्याची माझ्याकडे माहिती प्राप्त झाली आहे. याबाबत दुस-या विभागाच्या ॲडिशनल सीपींकडून या हॉटेलची, हॉटेलच्या मालकांची व तेथे घडण-या अनुचित प्रकाराची संपूर्ण चौकशी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : ही घटना 1 जानेवारी, 2006 च्या दरम्यान घडलेली आहे. माननीय गृहमंत्री या ठिकाणी जी माहिती देत आहे ती सर्व वर्तमानपत्रामध्ये येऊन गेली आहे. याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याकडे कार्यक्षमता असल्यामुळे आज जी घोषणा होत आहे, ती आधीच होणे आवश्यक होते. विलेपार्ले पोलीस स्टेशन पासून किती अंतरावर हे हॉटेल आहे, मी त्या ठिकाणी राहतो. तसेच या पॅव्हेलियन पबकडे परफॉरमन्स व आवश्यक ते सर्व लायसेन्स कार्यरत आहेत काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, ती महिला खूप दारु प्यायली असल्यामुळे सर्व दोष तिचाच असल्याचे माननीय मंत्रिमहोदयांचे वक्तव्य होते. तसेच मी काही पबच्या विरोधात नाही असे माननीय गृहमंत्र्यांनी केलेले वक्तव्य एनएनएसला आलेले आहे. यापुढे भविष्यात अशा प्रकारच्या दूर्घटना घडणार नाहीत यासाठी निर्बंध घालण्यासाठी शासन काही विचार करणार आहे काय ?

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14523 ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या पबमध्ये मुलींना नेऊन बलात्कारासारखे प्रकार घडणार असतील तर ज्या पबमध्ये हे प्रकार घडतात अशा पबचा परवाना प्रसंगी रद्द करण्याचाही निर्णय घेण्यात येईल. तसेच या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय घेतल्याचे मी अगोदरच सांगितले आहे आणि हा निर्णयही या अगोदरच आपण केलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पब संबंधात प्रश्न विचारला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या मुंबई शहरामध्ये ज्यांना अधिकृतरित्या परवाने दिलेले आहेत असे पब चालतातच पण या शिवायही अनधिकृत असे जवळपास 500 पबस् या मुंबई शहरामध्ये चालताहेत याची जाणीव शासनाला आहे काय ?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, असे 500 पब्स चालत असतील तर त्याची माहिती शासनाकडे नाही पण आपण यादी दिली तर त्याबाबत निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्याची माहिती द्यायला मी तयार आहे आपण त्याबाबत चौकशी करून कारवाई कराल का ?

श्री. आर.आर.पाटील : अगदी कडक कारवाई करू. सभापती महोदय, या संबंधात जी माहिती मला मिळाली आहे त्यामध्ये मोठमोठ्या व्यक्तींचे हे पब्स आहेत पण ते त्यांच्या नावावर नसल्याने, बेनामी असल्यामुळे त्यांची नावे देखील आपण घेऊ शकत नाही. पण असे पब्स बंद पाडण्याची कारवाईसुद्धा शासनाने प्रसंगी केलेली आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पण ज्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही असे या घटनेमध्ये आणखी काही आरोपी आहेत का ? तसेच या बावा हॉटेलच्या मालकांनी या मॉडेलला निमंत्रण दिलेले होते हे खरे आहे का ? असेल तर त्यांनी हे निमंत्रण तिला कशासाठी दिले होते आणि हे पब्स रात्री किती वाजे पर्यंत चालू असतात ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये दोनच आरोपी आहेत आणि त्या दोघांनाही अटक करून त्यांचेवर गुन्हा दाखल केलेला आहे. या हॉटेलचे मालक श्री.बावा यांची आणि या मॉडेलची या अगोदर भेट झालेली होती, फिल्म्समधील कामासंबंधात त्यावेळी त्यांची

...... एफ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. म्हेत्रे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.14523 ...

बोलणी झाली होती आणि त्याच संदर्भात त्यांनी तिला बावा हॉटेलमध्ये येण्याचे निमंत्रण दिले होते हे खरे आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या हॉटेलच्या मालकाने या तरूणीला तेथे निमंत्रित केले होते आणि त्या मालकाची अशा बाबतीत ख्याती आहे. दुसरे असे की, आताच माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले आहे की, त्या हॉटेलमध्ये आयएएस आणि आयपीएस अधिकारी नेहमी जात येत असतात अशी त्यांची माहिती आहे. पण मी त्या हॉटेलपासून जवळच रहात असल्या कारणाने आपले आयएएस आणि आयपीएस अधिकारी तेथे कशा अवस्थेत येतात आणि तेथून कोणत्या अवस्थेमध्ये परत जातात हे स्वत: पाहिलेले आहे. तर या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या हॉटेल मालकाची योग्य ती चौकशी करून, खरे म्हणजे या प्रकरणात ते स्वत: दोषी असतानाही त्यांचेवर कारवाई करण्यात आली नाही, तर ही कारवाई करण्यात येईल काय ? आणखी एक गोष्ट म्हणजे यामध्ये आपण आरोपींविरूद्ध कलम 292 लावण्यात आलेले आहे. खरे तर हे कलम अशा प्रकारच्या घटना असतील तर त्यामध्ये लागत नाही. अश्लील सीडी आणि पुस्तकांची विक्री करण्यासंबंधातील हे कलम आहे. म्हणजे अनावश्यक अशी कलमे लावून या प्रकरणाला कोठे तरी दुसरीकडे नेले जाते, ही पोलिसांची नेहमीचीच कार्यपद्धती आहे. तेव्हा अशा प्रकारे चुकीची कलमे लावणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण कारवाई करणार काय ? खरे म्हणजे ज्या हॉटेल्समध्ये अशा प्रकारच्या घटना घडतात त्यांची चौकशी करून, त्यामध्ये ती हॉटेल्स दोषी असतील तर ती हॉटेल्स सील झाली पाहिजेत. तेव्हा तशा पद्धतीची कारवाई आपण या हॉटेलच्याबाबतीत करणार का ? तसेच जी चुकीची कलमे लावण्यात आली आहेत ती रद्द करून, चुकीची कलमे लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आलेली आहे आणि त्यामध्ये जी नावे आहेत ती माजी अधिकाऱ्यांची आहेत आणि ...

ॲड. अनिल परब : यामध्ये 90 दिवसात चार्जशीट ठेवली गेली पाहिजे आणि एकदा चार्जशीट ठेवल्यानंतर आपण काही करू शकणार नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांचेकडे असतील ती नावे द्यावीत त्याही बाबतीत चौकशी करण्यात येईल आणि 292 कलम का लावण्यात आले आहे याचाही मी स्वत: तपास करीन.

..... एफ 3 ..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14523 ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सदरहू पब किंवा हॉटेलवर गेल्या 8-15 दिवसापूर्वी धाड टाकली गेली होती काय ? आणि त्यातून काही कारवाई केलेली आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या धाडीची माहिती माझ्याकडे नाही. ती माहिती घेऊन त्याप्रमाणे कारवाई करू.

( यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14523...

श्री. मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, सद्या मुंबई शहरामध्ये बलात्काराचे गुन्हे मोठया प्रमाणात होत आहेत. बावा हॉटेलमध्ये असा प्रकार घडल्यानंतर सुध्दा मुंबईमध्ये रात्री तीन ते चार वाजेपर्यंत ही हॉटेल्स चालतात हे खरे आहे काय? खरे असेल तर ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील हॉटेल्स चालतात त्या पोलीस ठाण्याच्या इनचार्ज अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पबना रात्री दीड वाजेपर्यंत परवानगी असते. काही तीन स्टार, पाच स्टारना रात्री तीन वाजेपर्यंत परवानगी असते. त्या व्यतिरिक्त जर कुणी रात्री उशिरापर्यंत हॉटेल्स चालवीत असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच, संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या इनचार्ज पोलीस अधिकाऱ्यांवर देखील कारवाई केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंधेरी येथे पत्रकारांना पोलीस व अधिकाऱ्यांनी मारहाण केल्याबाबत**

**(३) * १३०६० श्री. रामनाथ मोते , श्री. प्रतापराव सोनवणे , डॉ. अशोक मोडक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जानेवारी, २००६ शेवटच्या आठवडयात अंधेरी येथे वृत्तसंकलनासाठी आलेले पत्रकार श्री.विजय सिंग व प्रसाद कोले यांना पोलीस अधिकाऱ्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे हे खरे आहे काय,

(२) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे,

(४) दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरीता :** (१) होय. अंधेरी-कोंडीविटा येथील ॲम्रोड कोर्ट सोसायटीमध्ये अशी घटना घडली आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी वरीष्ठ पोलीस निरीक्षक एम.आय.डी.सी. यांनी केलेल्या चौकशीत पत्रकारांचा सदर सोसायटीत जाण्यामागील हेतू केवळ बातमी घेणे हाच होता. मात्र पोलीस निरीक्षक यांनी पत्रकारांची ओळख न पटल्याने व सोसायटीत दु:खाचे वातावरण असतांना कोणी आगंतुक प्रवेश केल्याचे वाटल्याने सदरचा प्रकार घडलेला असल्याचे स्पष्ट झाले आहे. दोन्ही पक्षाच्या परस्परविरोधी तक्रारीबाबत अदखलपात्र गु.र.क्र. ३६७/०६ कलम ३२३, ५०४ भा.दं.वि. व अदखलपात्र गु.र.क्र. ३६८/०६ कलम ५०४ भा.दं.वि. अन्वये एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आले असून चौकशी चालू आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ समजले जाणारे पत्रकार बंधू त्या ठिकाणी घडलेल्या घटनेची माहिती घेण्यासाठी गेले असतांना दोन पत्रकारांना शिवीगाळ करुन मारहाण करण्यात आली. शासनाने लेखी उत्तरामध्ये तसे मान्यही केले आहे. प्रश्न असा आहे की, या दोन पत्रकारांनी दाखल केलेल्या तक्रारीचे स्वरुप काय आहे? उत्तरामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "पोलीस निरीक्षक यांनी पत्रकारांची ओळख न पटल्याने व सोसायटीत दु:खाचे वातावरण असतांना कोणी आगंतुक प्रवेश केल्याचे वाटल्याने सदरचा प्रकार घडलेला असल्याचे स्पष्ट झाले आहे". या दोन पत्रकारांनी आपले ओळखपत्र दाखवून प्रवेश घेतला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

२३-०३-२००६ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) G ३

DGS/ KGS/ MAP/ ११:३०

**ताप्रक्र १३०६० ...**

श्री. रामनाथ मोते...

तरीसुध्दा त्यांना शिवीगाळ करुन मारहाण करण्यात आली. तेव्हा संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई केली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पत्रकारांना मारहाण केल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर गु.र.क्र. ३२३, ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, पत्रकारांवर हल्ला होणे ही गंभीर घटना आहे. अशाप्रकारे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर हल्ला होणे ही चिंताजनक व क्लेशदायक घटना आहे. वेगवेगळया प्रकारच्या घटनांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पत्रकारांना साहस करावे लागते. प्रसंगी त्यांना धोका पत्करावा लागतो. अशा परिस्थितीत ज्यांनी त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता असते त्यांनीच पत्रकारांवर अन्याय केला आहे. याबाबत शासन तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार आहे काय? या कामी कायदे तज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकारांच्या सल्ल्याने अशाप्रकारच्या घटनांवर नेहमीकरीता नियंत्रण ठेवण्यासाठी काही धोरण ठरविण्यात येईल काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पत्रकारांनी सुध्दा नियमाचे, कायद्याचे पालन केले पाहिजे. एखाद्या घरामध्ये किंवा मालमत्तेमध्ये जातांना कुणी ट्रेस पासिंग करीत नाही. ती खबरदारी आपण घेतली पाहिजे. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. लोकशाही पध्दतीमध्ये पत्रकारीतेला चौथा स्तंभ मानतो. समाजाच्या हिताच्या दृष्टीने लोकांपर्यंत सत्य माहिती पोहोचविण्याची जबाबदारी पत्रकारांची आहे. हे कर्तव्य पार पाडीत असतांना अनेक ठिकाणी पत्रकारांनी काही माहिती विचारली तर त्यांच्यावर हल्ले होतात. काही वेळा चॅनेलवर हल्ले होतात. कॅमेरामनना व संबंधित पत्रकारांना मारले जाते. विरोधात काही लिहिल्यामुळे सुध्दा हल्ले होतात. पत्रकारांचे हे स्वातंत्र टिकले पाहिजे, त्यांच्या स्वातंत्र्यावर घाला पडता उपयोगी नाही म्हणून शासन जरुर उपाय योजना करील. सन २००४ च्या तुलनेत २००५ मध्ये पत्रकारांवर झालेले हल्ले संख्येने फार कमी असले तरी महाराष्ट्रासारख्या राज्याला ते शोभणारे नाही. म्हणून पत्रकारांवर हल्ला केल्यानंतर, किंवा त्यांना मारहाण केल्यानंतर असलेल्या शिक्षेच्या तरतुदीमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 11:35

ता.प्र.क्र.13060 (पुढे चालू....

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, साधा विषय आहे. लिफ्ट कोसळली, त्याबाबतची माहिती घेण्यासाठी पत्रकार गेले होते, त्यावेळेस पोलिसांनी त्यांना मारहाण केली आणि त्यांच्यावर गुन्हाही दाखल केला. परंतु पोलिसांनी परस्पर विरोधी तक्रार केली. पोलिसांनी केलेल्या तक्रारीची शहानिशा करण्यात आलेली आहे काय ? त्यांनी चुकीच्या पध्दतीने तक्रार केली, तेव्हा त्या पोलिसांवर कडक कारवाई करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ज्यावेळेस पत्रकार त्या सोसायटीतील घरामध्ये गेले. त्यावेळेस तेथील लोकांना असे वाटले की,सोसायटीमध्ये दु:खाचे वातावरण असताना कोणी तरी आगंतूक आलेले आहेत, पत्रकार नाहीत, वेगळेच कोणी तरी आहेत. पत्रकार असल्याचा बहाणा करत आहेत, असे तेथील लोकांनाही वाटले. तेथे आसपास कोणाच्या घरी चोरी झालेली आहे काय, हे लोकांनी पहायला सुरुवात केली . तेथील लोकांनी तक्रार केल्यावरुन केस दाखल केली.

श्री.श्रीकांत जोशी : कोणी तक्रार केली .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सोसायटीमध्ये रहाणारे श्री.बोराडे यांनी तक्रार केलेली होती.

श्री.श्रीकांत जोशी : पोलीस इन्स्पेक्टरना तक्रार करण्याचा अधिकार आहे काय ? पत्रकार हे त्या ठिकाणी माहिती घेण्यासाठी गेले होते. परंतु त्या पत्रकारांच्या विरुध्द पोलीस स्वत: तक्रार दाखल करतात, पत्रकारांनाच पोलिसां मारहाण केली जाते आणि त्यांच्याच विरुध्द पोलीस कशी काय तकार करु शकतात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तेथील सोसायटीचे अध्यक्ष आणि इतरांनी मिळून त्यांना अटक करावी म्हणून पोलिसांकडे तक्रार केलेली होती.

श्री.विनोद तावडे : आताच श्री.बोराडे यांनी तक्रार केल्याचे सांगितले आणि आता सोसायटीच्या अध्यक्षांनी तक्रार केल्याचे कसे काय सांगता ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : दोघांनी मिळून तक्रार केलेली आहे. श्री. बोराडे जे त्या सोसायटीमध्ये रहातात. त्यांनी सोसायटीच्या अध्यक्षांना कळवून विचारविनिमय केला त्या दोघांनी मिळून या अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा दाखल केला.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र.13060 (पुढे चालू....

श्री.विनोद तावडे : पोलिसांच्या अंगलट येते, असे दिसल्याबरोबर परस्पर विरुध्द तक्रार नोंदवून घेतली. अशाप्रकारे सेटलमेंट केले जाते. या प्रकरणामध्ये जाणूनबुजून पत्रकारांवर अन्याय करण्यात आलेला आहे. त्यांनी माघार घेण्यासाठी हे केलेले आहे हे खरे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्या सोयायटीचे चेअरमन श्री.गांधी आणि त्या सोसायटीमध्ये रहाणारे श्री.बोराडे यांनी तक्रार केलेली होती.

---

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**सोलापूरातील शिंदे चौकातील शिवस्मारक येथील**
**शिवशिल्पांची केलेली मोडतोड**

**(4) * 15144 श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सोलापूरातील शिंदे चौकातील शिवस्मारक येथील काही वादग्रस्त शिवशिल्पांची मोडतोड केल्याच्या आरोपावरुन आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष शिवा यशवंत सलगर यांच्यासह चार कार्यकर्त्यांना दिनांक 24 डिसेंबर, 2005 रोजी वा त्या सुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या घटनेमुळे संपूर्ण सोलापूर शहरात तणाव पसरलेला आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, अटक करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांच्या करिता** : (1) होय. दि. 25.12.2005 रोजी रात्रौ 00.45 वा. चे सुमारास शिंदे चौक सोलापूर जवळील शिवस्मारकातील काही वादग्रस्त शिल्पे तोडून नुकसान केले म्हणून आंबेडकर स्टुडंट असोसिएशनचे अध्यक्ष व इतर सात कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे.

(2) नाही.

(3) अटक इसमांविरुध्द फौजदार चावडी पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे गु.र.नं. 302/2005, भा.दं.वि.सं.क्र. 153(अ), 295(अ),143, 144,147, 148, 149, 427,448,452,120(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(4) विलंब झालेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नाही.

श्री.दिवाकर रावते : उत्तरामध्ये "शिव स्मारकातील काही वादग्रस्त शिल्पे तोडून नुकसान केले" असे म्हटलेले आहे.म्हणजे तेथे वादग्रस्त शिल्पे आहेत, असे शासनाचे मत आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15144 (पुढे सुरु...

श्री.आर.आर.पाटील : शिल्लांच्याबाबतीत वाद होता म्हणून "वादग्रस्त", असे म्हटलेले आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, शिवस्मारकातील काही वादग्रस्त शिल्पे तोडून नुकसान केले. हा प्रकार सोलापूरातील शिंदे चौकात झालेला आहे तची सोलापूरमध्ये बरीचशी चर्चा झाली. त्या ठिकाणी एक प्रकारचे प्रक्षोभक वातावरण होते. ज्यावेळेस शहरामध्ये असे वातावरण होते, त्यावेळेस त्या ठिकाणी पोलीस संरक्षण दिलेले होते काय ? दुसरा प्रश्न असा की, वादग्रस्त शिल्पे म्हणजे काय आहे याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्या ठिकाणच्या शिल्पाचे संरक्षण करण्या पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दोन हवालदारांचा 24 तास बंदोबस्त ठेवलेला होता. शिवस्मारकाच्या संदर्भात तेथील संभाजी बिग्रेडियय संघटना आणि आंबेडकर स्टुडंट असोसिएशन यांच्यामध्ये वाद होता. म्हणून "वादग्रस्त" असा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 15144........

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यामध्ये संभाजी ब्रिगेडच्या लोकांनी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशनच्या लोकांना पुढे करुन, त्यांच्या नावाचा गैरफायदा घेऊन हे सगळे कृत्य केले आहे काय ? तशी आपली माहिती आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री. सलगर हे शिल्प फोडताना सापडले ते आंबेडकर स्टुडंट असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या शिवशिल्पामध्ये दादोजी कोंडदेव यांची जी प्रतिमा आहे ती तुम्ही काढावी अशी मागणी शिवसंग्राम तसेच संभाजी ब्रिगेड आणि या असोसिएशनने केली. त्याबाबतीत आंदोलन झाले. माझी अशी माहिती आहे की, आज पुणे महानगरपालिकेत लाल महाल स्मारकातील दादोजी कोंडदेव यांच्या पुतळ्याचा विषय आलेला आहे. या विषयामध्ये कोणी तरी शिवसंग्रामवाले इतिहास तज्ज्ञ आले आहेत आणि ते म्हणतील ते व्हावयास पाहिजे आणि....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा गंभीर विषय असल्यामुळे हा विषय मांडला पाहिजे.

**सभापती** : या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्याच्या अनुषंगाने आपण आपला प्रश्न विचारावा. त्याला इलॅबोरेट करण्याचा प्रयत्न टाळावा.

श्री. विनोद तावडे : तसे असेल तर मला प्रश्न विचारता येणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वादग्रस्त शिवशिल्पाची मोडतोड झाली त्याबाबतचा प्रश्न विचारण्यामागचा हेतू हा आहे की, वेगवेगळया ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची जी स्मारके आहेत ती अमूक एका प्रकारची असली पाहिजे असा इशारा देऊन त्याची परत मोडतोड करण्याच्या संदर्भात शासनाने ठाम भूमिका घेऊन ही शिवस्मारके व्यवस्थित आहेत त्या पध्दतीने सर्वार्थाने जतन केले जातील असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 15144........

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न लक्षात आलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी प्रश्न स्पष्ट करु शकते काय ?

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगतो की, या प्रश्नाशी संबंधित असेल अशा पध्दतीने आपण प्रश्न विचारावा. प्रत्येक सन्माननीय सदस्यांने पाच पाच मिनिटे प्रश्न डेव्हलप करावयाचे म्हटले तर त्याला माझी परवानगी राहणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्या ठिकाणी एका शिवस्मारकाची झालेली मोडतोड किंवा अपघात ही फक्त एका ठिकाणची घटना नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकांमध्ये, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे जे मांडत होते त्याप्रमाणे, त्या ठिकाणी दादोजी कोंडदेव यांच्यासारखा पुतळा किंवा चित्र असेल तर ते आम्ही राहू देणार नाही आणि आम्ही स्वत:च्या हातात कायदा घेऊन ते तोडून टाकू अशा प्रकारचा इशारा काही संघटना देत असल्याचे वर्तमानपत्रातून आणि महानगरपालिकेकडे दिलेल्या निवेदनांमधून स्पष्ट होते. यामध्ये आपण कोणाला अटक केली आणि त्यासंदर्भात काय केले ? या आमच्या प्रश्नाचा मूळ हेतू हाच आहे की, शिवस्मारकाचे जतन योग्य प्रकारे झाले पाहिजे. आणि त्यामध्ये कोणी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर शासनाने आम्हाला पूर्णत: संरक्षणाची हमी दिली पाहिजे. तशी हमी शासन देणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या ठिकाणी अशा पध्दतीची छत्रपतींची स्मारके आहेत त्या ठिकाणी शासनाचे संरक्षण आहे. या ठिकाणी सुध्दा शासनाने संरक्षण दिलेले होते. तेथील जी शिवस्मारक संघटना आहे, ज्यांनी हे स्मारक उभे केले त्यांनी योग्य प्रिकॉशन घेतली नव्हती. तेथे मागच्या भिंतीवरुन चढून रात्रीच्या वेळी त्यांनी काही शिल्पे तोडलेली आहेत. सभापती महोदय, जो प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे साहेबांनी विचारण्याचा प्रयत्न केला तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, छत्रपतींच्या इतिहासाबद्दल काही संघटनांनी वादाची भूमिका घेतलेली आहे, वेगळी भूमिका घेतलेली

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

ता. प्र. क्र. 15144........ श्री. आर.आर.पाटील...

आहे. सभापती महोदय, याची जर कारणे आपण शोधत गेलो तर जेम्स लेन यांनी ज्यावेळी छत्रपतींची बदनामी केली, पहिल्यांदा गुरु म्हणून जवळ उभे केले जाते आणि त्याचे कन्व्हर्शन आणखी छत्रपतींची आणि जिजाऊमातेची बदनामी होईल इर्थपर्यंत पोहोचविले जाते. हा इतिहास सगळा चुकीचा आणि खोटा आहे, खऱ्या इतिहास संशोधकांनी पुन्हा सगळे संशोधन करुन योग्य इतिहास लिहिला पाहिजे ही त्यांची मागणी आहे. सभापती महोदय, याच्या मुळात जाण्याची आवश्यकता आहे. म्हणून आता जी स्मारके आहेत त्यांना संरक्षण देण्यात येईल..

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय अशा प्रकारे सांगत आहेत ते योग्य आहे काय ? आम्हाला विचारण्याची परवनगी दिली नाही म्हणून आम्ही खाली बसलो. माननीय मंत्रिमहोदयाचे हे म्हणणे रेकॉर्डमधून काढून टाकावे.

**सभापती** : या प्रश्नाशी संबंधित असेल तेवढेच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्रिमहोदयांनी जे म्हटले ते रेकॉर्डमधून काढले पाहिजे. यामध्ये जेम्स लेनचा काही संबंध नाही.

श्री. आर. आर. पाटील . सभापती महोदय, यामध्ये जेम्स लेनचा संबंध एवढयासाठीच येतो की, या संघटनांनी या शिल्पाच्या बाबतीत त्या वेळेपासून ऑब्जेक्शन घेण्यास सुरुवात केली.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:45

(ता.प्र.क्र.15144.... (श्री. आर.आर.पाटील...)

ही वस्तुस्थिती समजावून न घेता एक वेगळा संदेश जाईल असे उत्तर देणे चुकीचे होईल..

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : या प्रश्नाच्या संदर्भात मी एवढेच सांगेन की, या प्रश्नाच्या संदर्भात केलेली चर्चा आणि माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मी तपासून पाहतो आणि आवश्यक असेल तेवढाच मजकूर मी कार्यवृत्तात ठेवतो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:45

**मुंबईतील खार पश्चिम येथील सिटी युनियन बँकेवर पडलेला दरोडा**

**(५) * १३०७० मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खार पश्चिम येथील सिटी युनियन बँकेतून दिनांक १९ जानेवारी, २००६ रोजी दुपारी तीन सशस्त्र दरोडेखोरांनी चार लाखाची रोख रक्कम लुटून नेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या प्रकरणी पोलीसांनी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे तसेच आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,

(४) अद्याप, आरोपींना अटक करण्यात आली नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत,

(५) असल्यास, शहरात सध्या लुटमार व दरोड्याच्या गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे ह्याला आळा घालण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री आर. आर. पाटील यांच्याकरिता** : (१) सदर घटनेत ३ लक्ष ५० हजार रुपये जबरीने चोरुन नेले हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सिटी युनियन बँकेचे सहाय्यक मॅनेजर यांनी खार पोलीस ठाणे येथे फीर्याद दिली की, दि. १९.१.०६ रोजी १२.५० वाजता ३ अनोळखी इसमांनी रिव्हॉल्वरचा व चॉपरचा धाक दाखवून बँकेतील एकूण ३,५०,००० रुपये जबरीने चोरुन नेले याबाबत खार पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ३३/२००६ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास चालु असतांना सांताक्रुझ पोलीस ठाण्याच्या हद्दीत विजया बँक लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरुध्द सांताक्रुझ पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ६०/०३ अन्वये नोंदविण्यात आला आहे. त्या गुन्ह्यात अटक आरोपीची चौकशी करत असताना त्यांनी सिटी बँक लुटल्याची कबूली दिलेली आहे. सद्या सांताक्रुझ पोलीस ठाणे याबाबत तपास करत आहे. सदर तपास पुर्ण होताच मा. न्यायालयाच्या आदेशान्वये सदर आरोपीचा वॉरंटवर ताबा घेण्याची खार पोलीस ठाण्याने तजविज ठेवली आहे.

(५) मुंबई शहरामध्ये लुटमार व दरोड्याच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ॲन्टी रॉबरी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच बीट मार्शल, मोबाईल वाहने, बिट अधिकारी व बिट अंमलदार व विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या गस्ती वाढविण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे बँक व्यवस्थापक व ज्वेलर्स दुकानदारांना पत्र पाठवून हत्यारी गार्ड नेमण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

----------

श्री. विलास अवचट : प्रश्न भाग 5 च्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "मुंबई शहरामध्ये लुटमार व दरोड्यांच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी ॲण्टी रॉबरी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच बिट मार्शल, मोबाईल वाहने, बिट अधिकारी व बिट अंमलदार यांच्या गस्ती वाढविण्यात आलेल्या आहेत." खार पश्चिम येथील बँकेवर जो दरोडा पडला तो

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 13070......) (श्री. विलास अवचट....)

तेथील बिट मार्शल यांनी मस्टरवर सही केल्यानंतर काही अवधीत पडला. देना बँकेवर जो दरोडा पडला होता तो देखील बिट मार्शलने मस्टरवर सही केल्यानंतर 10 मिनिटांनी पडला. म्हणजे बिट मार्शलने मस्टरवर सही केल्यानंतर काही वेळाने हे दरोडे पडलेले आहेत. याबाबतीत विचार करण्याची गरज आहे. तसेच जर ज्वेलरी दुकानदार रिव्हाल्व्हरच्या परवान्यासाठी पुढे आले तर त्यांना परवाने देण्यात येतील काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बिट मार्शलने मस्टरवर सही केल्यानंतर हे दरोडे पडल्याचे माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु तसे काही आपल्याला म्हणता येणार नाही. स्वसंरक्षण आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी बँका तसेच ज्वेलर्स यांनी हत्त्याराचा परवाना मागितला तर त्याबाबतीत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : दरोडेखोरांनी सिटी बँक लुटल्यानंतर विजया बँकेवर दरोडा घालत असताना पोलिसांनी त्यांना पकडले. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सद्या सांताक्रुझ पोलीस ठाणे याबाबत तपास करत आहे. सदर तपास पूर्ण होताच मा. न्यायालयाच्या आदेशान्वये सदर आरोपीचा वॉरंटवर ताबा घेण्याची खार पोलीस ठाण्याने तजवीज ठेवली आहे". याचा अर्थ आरोपींना अटक झालेली नाही काय ? सदर आरोपींची नावे काय आहेत आणि त्यांना केव्हा अटक करण्यात आली ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हर्षवर्धन भगवान, रियाज जॉर्ज शेख आणि आरिफ उर्फ मोतीलाल शेख या तीन आरोपींना अटक झालेली आहे. या आरोपींना सांताक्रुझ पोलीसांनी अटक केलेली असून तपास चालू आहे. या अरोपींना जेव्हा दुस-या पोलीस स्टेशनमध्ये द्यावयाचे असते त्यावेळी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. दुस-या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हा घडल्यामुळे आरोपींना ताब्यात घेण्यासाठी खार पोलीस ठाण्याने तजवीज ठेवली आहे.

डॉ. दीपक सावंत : गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक ठिकाणी बँकावर दरोडे पडलेले आहेत. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, बिट अधिकारी, बिट अंमलदार व विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या गस्ती वाढविण्यात आलेल्या आहेत." मध्यंतरी पालघरमध्ये दरोडा पडला त्यावेळी देखील भरारी पथके केलेली होती.

...नंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 11:50

ता.प्र.क्र. 13070 पुढे सुरु ...

डॉ. दीपक सावंत..

ॲन्टी रॉबरी पथक नेमके कोणते काम करीत आहे ? त्याचप्रमाणे बीट मार्शल हे बंदोबस्तासाठी मोटारसायकलवरुन फिरत असतात त्यांचा आणि या पथकामध्ये काही समन्वय ठेवला आहे काय ? किंवा हे ॲन्टी रॉबरी पथक वेगळया प्रकारचे आहे का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, क्राईम ब्रँचने ॲन्टी रॉबरी पथक निर्माण केलेले आहे. बीट मार्शल हे फिरत असले तरी सतत या पथकाच्या संपर्कात असतात. कोणी संशयास्पद रीतीने फिरताना आढळून आले की या पथकाला कळविण्यात येते आणि लगेचच पुढील कारवाई करण्यात येते अशी ही सिस्टीम आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, ॲन्टी रॉबरी पथक स्थापन करण्यात आलेले आहे. या गुन्हयामध्ये जे आरोपी अटक करण्यात आलेले आहेत त्यांना जामीन झाला आहे काय ? जामीन मिळू नये म्हणून शासनाने कोणते प्रयत्न केले ? हे कोणत्या राज्यातील आरोपी आहेत ? ॲन्टी रॉबरी पथकामध्ये जे अधिकारी काम करतात त्यांना एन्कॉउंटर पथकामध्ये अतिरिक्त काम दिलेले आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या आरोपींना जामीन झालेला नाही. सदरहू आरोपी बिहार राज्यातील आहेत. एन्कॉउंटर पथकातील अधिकारी गुन्हयातील आरोपींना पकडत असताना जर आरोपींनी गोळीबार केला आणि त्यात पोलीस अधिकारी/कर्मचारी जखमी झाले तर प्रत्युत्तरादाखल गोळीबार करतात.

ॲड.अनिल परब : ॲन्टी रॉबरी पथकातील अधिकाऱ्यांची नांवे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,सध्या माझ्याजवळ ही माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये ॲन्टी रॉबरी पथक आहे त्याच्यामध्ये किती अधिकारी/कर्मचारी आहेत ? तसेच बीट मार्शल आहेत त्यामध्ये किती कर्मचारी आहेत ? बीट मार्शलची किती पथके आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सध्या माझ्याकडे माहिती नाही. यासंबंधातील माहिती घेऊन पटलावर ठेवतो.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13070 पुढे सुरु...

**सभापती** : माहिती उपलब्ध नसेल तर मंत्रीमहोदय ती पटलावर ठेवतील.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, गुन्हयांना आळा घालण्यासाठी या पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. पथकाची स्थापना झाल्यानंतर देखील मुंबईमध्ये निरनिराळया बँकांवर आणि दुकांनावर दरोडो पडले आहेत. गुन्हयांचा तपास लावण्यासाठी या पथकाचा कितपत उपयोग झालेला आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ॲन्टी रॉबरी पथकाचा चांगला उपयोग होत आहे. दरोडा पडल्यावर आवश्यकतेनुसार क्राईम ब्रँचकडून मनुष्यबळ पुरविण्यात येते. गुन्हयांचा शोध घेण्यासाठी आणि पाठपुरावा करण्यासाठी या पथकाचा उपयोग होतो. आवश्यकतेनुसार क्राईम ब्रँचकडून या पथकाला मनुष्यबळ पुरविले जाते. मुंबईतील दरोडो कंट्रोल करण्याच्या बाबतीत हे पथक यशस्वी ठरलेले आहे.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नवी मुंबई नेरुळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेली चोरी

**(६) * १४१७२ श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई नेरुळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी एम.टी. मोटारसायकलच्या डिकीमधुन २७ तोळ्यांचे दागिने घेऊन जाणाऱ्यास एका अज्ञात इसमाने अंगावर घाण पडल्याचे सांगून डिकीतील १ लाख ३५ हजार रुपयांचे दागिने चोरुन नेले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दुसऱ्या एका घटनेत पामबीच मार्गावरील बाळाशेट चौक येथे क्वालिस गाडीतून आलेल्या लुटारुंनी आपल्या कामगारासमवेत जाणाऱ्या श्री. राजकुमार जैस्वाल यांची कार अडवून त्यांच्या कामगारांना लाकडी दांडक्याने मारहाण करुन सोन्याची चेन, ब्रेसलेट, हिऱ्याची अंगठी असे एकूण १ लाख २२ हजार रुपयांचे दागिने लुटून नेले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनांची चौकशी करुन दरोडेखोरांना अटक करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे ,श्री. आर. आर. पाटील ,यांच्याकरिता** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) वरील दोन्ही घटनांचा तपास करण्यात आला आहे.

फिर्यादी रा. घणसोली यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नेरुळ पो.स्टे. येथे गु.र.नं. ४३९/०५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

फिर्यादी रा. वाशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नेरुळ पो.स्टे. येथे गु.र.नं. ४३७/०५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वरील दोन्ही गुन्ह्यांचा तपास कसोशीने चालु आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांनी पुन्हा एकदा पहावे. प्र.क्र.३ आणि ४ ला उत्तर देताना म्हटले आहे की वरील दोन्ही घटनांचा तपास करण्यात आला आहे आणि सगळयात शेवटी असे म्हटले आहे की, वरील दोन्ही गुन्हयांचा तपास कसोशीने चालू आहे. म्हणजे तपास चालू आहे का सुरु आहे म्हणजे पूर्णझालेला नाही. ? ९ डिसेंबर २००५ रोजी घटना घडली आहे. म्हणजे जवळजवळ ४ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. अजूनही कोणाला अटक झालेली नाही. झी न्यूज चॅनलवर सांगतात की १० आरोपींपैकी ७ आरोपी सुटतात. हा भाग वेगळा. चार महिने झाले तरी एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही हा गृहखात्याचा परफॉर्मन्स आहे काय?

यानंतर श्री. खर्चे पी..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14172.........

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, यातील एका केसचा तपास पूर्ण झाला असून दुसऱ्या केसचा तपास सुरु आहे म्हणून लेखी उत्तर असे दिलेले आहे.

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी लेखी उत्तरामध्ये शेवटचे जे वाक्य दिलेले आहे ते दोन्ही गुन्हयांचा तपास कसोशीने चालू आहे असे म्हटले आहे. पहिल्या प्रथम जे उत्तर दिले ते कलम 439 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे असे दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, 9 डिसेंबर, 2005 रोजी ही घटना घडलेली आहे. हया दोन्ही घटना एकाच दिवशी आणि एकाच पोलीस स्टेशनच्या अखत्यारित घडलेल्या आहेत. मंत्री महोदयांनी एका घटनेचा तपास झाल्याचे सांगितले आणि दुसऱ्या घटनेचा तपास सुरु असल्याचे सांगितले. आमचा प्रश्न असा आहे की, तपास पूर्ण झाला आहे तर नेमके काय केले आहे ? या दरोडयातील लोकांना अटक झालेली आहे काय ? तसेच दुसऱ्या प्रकरणाचा तपास चालू आहे म्हणजे नेमके काय चालू आहे ? गेल्या चार महिन्यांपासून यातील आरोपी सरकारला सापडत नाहीत आणि या ठिकाणी तपास पूर्ण झाला असे उत्तर देण्यात येते. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींना अटक करणे आवश्यक असते. म्हणून यामध्ये किती आरोपींना अटक केली आहे ? कारण जोपर्यंत आरोपींना अटक झालेली नाही तोपर्यंत पास पूर्ण झाला असे कसे म्हणता येईल ? म्हणून या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. अशा प्रकारचे उत्तर देणे हे कर्तव्यदक्ष आबांच्या कारकिर्दीमध्ये शोभनीय नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे. जेणेकरुन पुढील वेळी सविस्तर उत्तरे आम्ही देऊ.

**सभापती** : ठीक आहे, हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पनवेलजवळ झालेल्या अपघातात एका पोलिसांसह तीन जणांचा झालेला मृत्यू**

**(7) * 13092 श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 10 ऑक्टोबर, 2005 रोजी पनवेलजवळ झालेल्या अपघातात हवालदार गणेश शंकर सावंत यांच्यासह गाडीतील एकूण तीन जणांचा मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त घटनेचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(3) असल्यास, घटनेतील मृत पोलिसांच्या कुटुंबियांना शासनाकडून तातडीची अशी कोणती मदत देण्यात आली आहे वा देण्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, परंतु सदर अपघातात एकूण चार व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(2) होय, सदर अपघाताबाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.न. 5/2006, भादंविसंक 304 (अ), 279,337, 338, 427 व मो.वा.का.क. 184 प्रमाणे गुन्हा दाखल करुन जीप चालकाविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(3) सदर घटनेमध्ये मृत पावलेल्या दोन पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना पोलीस कल्याण निधीतून तातडीने प्रत्येकी रु. 5000/- देण्यात आले असून पोलीस कल्याण निधीच्या विमा योजनेमार्फत प्रत्येकी रु. 2,00,000/- देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, मी आपल्या परवानगीने या लेखी उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

"उत्तर क्र. 1 मध्ये "परंतु" या शब्दानंतर "दि. 11 ऑक्टोबर, 2005 रोजी" या शब्दांचा अंतर्भाव करण्यात येत आहे. बाकी उत्तर छापल्याप्रमाणे.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : महोदय, श्री. गणेश सावंत हे मृत झाले त्यावेळी डयुटीवर होते काय ? असल्यास सदर वाहन शासकीय होते की कसे ? तसेच मयत व्यक्ती जर शासकीय सेवेत असेल तर त्यांच्या कुटुंबियातील सदस्याला शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, श्री. गणेश शंकर सावंत हे कामावरच असतांना त्यांचा अपघात झाला होता. तसेच जी जीप त्यांच्याकडे होती ती शासकीय कामासाठी भाडयाने घेतलेली होती. तसेच त्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर अथवा कामावर असतांना मृत्यू आल्यामुळे त्यांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13092...........

श्री. दिवाकर रावते : महोदय, पहिला प्रश्न असा आहे की, हवालदार श्री. गणेश शंकर सावंत यांच्यासोबत तीन व्यक्ती मृत झाल्या. त्या व्यक्ती कोण होत्या ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, यामध्ये दुसरेही एक पोलीस कर्मचारी त्यांच्यासोबत होते. तसेच त्यांच्या मुलीबरोबर एक मुलगा असे तीन लोक होते. त्या मुलीचे नांव आलया नूर अहमद शेख असे होते व ती घरातून पळून सोलापूर येथे गेल्याची तक्रार आल्यानंतर त्या तपासासाठी गाडी घेऊन गेले असता त्यांच्या सोबत त्या मुलीचे काका, एक पोलीस कर्मचारी आणि गणेश सावंत हे होते. त्या मुलीला आणि मुलाला ताब्यात घेतल्यानंतर परत येत असतांना पनवेल जवळ एक्सप्रेस हायवेला जवळपास 140 च्या स्पीडने ही गाडी चालली होती. ड्रायव्हरचा गाडीवरील ताबा सुटल्यामुळे हा अपघात झाला. त्या अपघात पोलीस कर्मचारी, एक मुलगा व मुलीचा काका आणि श्री. गणेश सावंत हे चार लोक मृत्युमुखी पडले.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----------------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन.**

**सभापती** : "आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी "इन्कलाब जिंदाबाद" घोषणा देत 23 मार्च, 1931 रोजी फासावर चढून आनंदाने हौतात्म्य स्वीकारलेल्या भगतसिंग, सुखदेव, राजगुरु या भारतमातेच्या सुपूत्रांच्या बलिदानाला आता 75 वर्षे होत आहेत, त्या निमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस सभागृहाच्या वतीने मी विनम्र अभिवादन करीत आहे."

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, याच निमित्ताने मी आपल्याकडे औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता तो मांडण्यासाठी कृपया मला परवानगी देण्यात यावी.

**सभापती** : माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी देखील या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली होती. परंतु मी असा निर्णय घेतला की, सभागृहाच्या वतीने सभापती या नात्याने भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या पवित्र स्मृतील अभिवादन केले तर ते आणखी योग्य राहील.

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, मी या अनुषंगाने असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सुखदेव यांच्या भगिनीने अशी तक्रार केली होती की, भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या तिघांना फाशी झालेली नसून त्यांचा खून झालेला आहे. त्यानंतरचे ऐतिहासिक दाखले पुढे आले व त्यातील एक दाखला म्हणजे एकमेव भारतीय वंशाचे हेर श्री. दिलीप इलाहाबादी यांच्या मुलाने एक पुस्तक लिहून ठेवले असून त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, ही फाशी खरे तर 24 मार्च, 1931 रोजी ठरली होती. पण व्हाईसराय यांनी त्याची स्पेशल दखल घेऊन ती फाशी 23 मार्चच्या संध्याकाळनंतर देण्याचे ठरविले. त्यात असेही म्हटले आहे की, संध्याकाळी संपूर्ण शांतता पसरते त्या वेळी ही फाशी देण्यात आली. ही फाशी दिल्यानंतर ते तिघे फाशीमुळे गतप्राण झाले नव्हते तर त्यांचे मृतप्राय शरीर उचलून लाहोर कॅन्टोनमेंट एरियामध्ये नेण्यात आले व त्यानंतर सँडर्सच्या नातेवाईकांनी या तिघांना गोळया घालून ठार केले. त्यानंतर त्यांची प्रेते जाळण्यात आली. परंतु त्यानंतर या तिघा शहीदांच्या नातेवाईकांना जी राख देण्यात आली होती ती सुध्दा त्या तिघांची नव्हती तर त्या ठिकाणी जे प्राणी होते त्यांना जाळून त्याची राख त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आली. सभागृहाच्या माध्यमतून माझी विनंती आहे की, अशा प्रकारे मृत्युपूर्व क्रांतिकारकांबाबत अशी शंका अथवा दावा एखादया हेराने केला असेल, अथवा हेराच्या पत्रात नमूद असेल तर......

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

हे तिन्ही भारतमातेचे सुपूत्र होते. या क्रांतिवीरांसंबंधीचा प्रकार भारत सरकारला कळविला पाहिजे. ब्रिटीश सरकारने जुना ऐतिहासिक दस्तऐवज आता खुला केला आहे. भारतमातेच्या या सुपुत्रांना फाशी न देता खून करण्यात आला असेल तर त्यासंबंधी ब्रिटीश सरकारने भारताची माफी मागण्यासंबंधीचा प्रस्ताव या सदनाने एकमताने मंजूर करून तो केंद्र सरकारच्या मार्फत ब्रिटीश सरकारला पाठविला पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.सुरूपसिंग नाईक यांनी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सदर भावना केंद्र सरकारला कळवाव्यात व यासंबंधी केंद्र शासनाला जेवढे काही करणे शक्य आहे तेवढे प्रयत्न करावेत असे सांगावे. त्यासाठी ठराव मांडण्याची आवश्यकता नाही.

श्री.सुरूपसिंग नाईक : होय.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काल सभागृहामध्ये आजच्या कामकाजाबाबत चर्चा झाली होती. त्यावेळी उद्या म्हणजे आज सकाळी 11.00वाजता पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात येईल असे ठरले होते. तद्नंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक घेण्यात येईल असे ठरले होते. परंतु, आज सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरू झाली. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाला काही सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहता आले नाही. आज सकाळी 11.00 वाजता आमच्या पक्षाची महत्त्वाची बैठक होती. त्या बैठकीला हजर रहावे लागल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाला उपस्थित राहता आले नाही. सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजाच्या वेळी उपस्थित असणे हे महत्त्वाचे असते. त्यासाठी सन्माननीय सदस्य सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करीत असतात. तेव्हा माझी सदनाला विनंती आहे की, दिवसाचा जो कार्यक्रम ठरवितो, त्याप्रमाणे तो घेण्यात आला पाहिजे. म्हणजे सन्माननीय सदस्यांवर अनुपस्थित राहण्याचा प्रसंग येणार नाही.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचनेसंबंधी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नियम 93 अन्वये देण्यात येणारी सूचना नियमित सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास आधी द्यावी लागते. परंतु, आज सभागृहाचे नियमित कामकाज सकाळी 11.00 वाजता सुरू होणार आहे याची सन्माननीय सदस्यांना कल्पना नसल्यामुळे एक तास आधी कोणालाही सूचना देता आली. मी स्वत: आज सकाळी 10.30 वाजता नियम 93 अन्वये सूचना दिलेल्या आहेत. त्या स्वीकारल्या जाणार आहेत किंवा नाही, हे मला माहित नाही. तेव्हा माझी अशी विनंती आहे की, आज ज्या सन्माननीय सदस्यांनी उशिराने नियम 93 अन्वये सूचना दिल्या आहेत त्या स्वीकारण्यात याव्यात.

**सभापती** : आज नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांपैकी दोनच सूचना मी स्वीकारलेल्या आहेत. अन्य सूचना दालनात नाकारलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांना नियम 93 अन्वये एखादी सूचना देता आली नसेल तर त्यासंबंधी त्यांनी मला दालनात येऊन भेटावे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित केला आहे. आज सकाळी 11.00 वाजता पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात यावी व त्यानंतर दुपारी 1.00 वाजता नियमित बैठक घेण्यात यावी असे काल ठरले होते. पण आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये बदल करण्यात आलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा उपस्थित केला आहे. काल एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये नियम स्थगित करण्यासंबंधीची सूचना देण्यात आली होती. त्यावर काल मी माझा असा निर्णय दिला होता की, आपल्या नियमित सभागृहाची बैठक दररोज दुपारी 1.00 वाजता सुरू होते. त्याऐवजी ती आज सकाळी 11.00 वाजता घेण्यात येईल. त्याप्रमाणे आज सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरू झाली आहे. तरी सुध्दा मी याबाबत कालचे प्रोसिडींग पाहून घेतो.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

आणि त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यानी काल म.वि.प.नियम 289 अन्वये नियम स्थगित करुन, चर्चा घेण्यात यावी अशा प्रकारची मागणी केली होती. ती चर्चा आज नियम-97 अन्वये दुपारी 4.30 वाजेच्या दरम्यान घेण्यात येईल असे मी म्हटले होते. या चर्चेला एकूण 2.30 तासाचा वेळ देण्यात येईल असा माझा निर्णय होता. आपणांस आवश्यकता असल्यास 15 मिनिटांच्या आत मी कालचे प्रोसिडींग तपासून पाहतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वेळेच्या बाबतीत आमचा चुकीचा समज झाल्यामुळे सन्माननीय सदस्यांना आज नियम 93 अन्वये ज्या सूचना विहित वेळेत द्यावयास हव्या होत्या त्या देता आलेल्या नाहीत. म्हणून आमची विनंती आहे की, आपणांकडे ज्या नियम 93 अन्वये सूचना आलेल्या आहेत त्या स्वीकारण्यात याव्यात.

**सभापती** : माझ्याकडे नियम 93 अन्वये संदर्भात काही सूचना आलेल्या आहेत. त्यापैकी दोन सूचना मी स्वीकारलेल्या आहे. इतर सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत. जर कोणाच्या सूचना अनवधानाने राहिल्या असतील तर त्यांनी कृपया मला दालनात भेटावे, त्यावर मी काय करावयाचे ते ठरवेन.

आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत.**

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने अतिशय महत्वाचा असा मुद्दा मी आपल्या माध्यमातून सदनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

महोदय, भारतीय हवाई दलामध्ये "मिग विमान" हे महत्वाचे विमान मानले जात होते. मात्र या विमानाच्या माध्यमातून अनेक महाराष्ट्रीयन तरुण वैमानिक यांचा बळी जात आहे. प्रथम महाराष्ट्रातील अभिजित गाडगीळ, त्यानंतर तुषार चव्हाण आणि कार-परवा अनिकेत कोल्हे या वैमानिकाचा बळी गेला आहे. मृत्यूची परंपरा मिग विमानाने चालू ठेवली आहे. या संदर्भात अनेकदा आवाज उठवूनही तो मात्र दाबला गेला. "रंग दे बसंती" या चित्रपटामध्ये या विषयावर भाष्य करण्यात आले होते, तसेच त्या संदर्भात प्रसंग सुध्दा दाखविण्यात आला होता. मला माहीत आहे की, हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. परंतु तरी सुध्दा आज महाराष्ट्रातील तरुण वैमानिकांचा या मिग विमानामुळे बळी जात आहे ही भावना लक्षात घेऊन, आपणांस विनंती करीत आहे की, आपण आणि या मंत्रिमंडळाने या विषयाबाबत निवेदन किंवा आपले गाऱ्हाणे केंद्र सरकारपर्यंत पोहोचवावे आणि महाराष्ट्रातील तरुण आणि कुशल वैमानिकांना न्याय द्यावा.

**सभापती** : सन्माननीय सुरुपसिंग नाईक यांना सांगू इच्छितो की, राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारला याबाबतीतील सभागृहाच्या भावना कळवाव्यात. तसेच मी सदनाला सांगू इच्छितो की, मी स्वत: याबाबतीत लक्ष घालीन आणि संरक्षण मंत्र्यांकडे हा विषय माझ्या पध्दतीने मांडेन.

श्री.सुरुपसिंग नाईक : महोदय, आपण दिलेल्या सूचना विचारात घेऊन, त्याप्रमाणे केंद्र सरकारला कळविण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.विनायक मेटे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सार्वजनिक निवासी कायद्याखाली नोंदणी झालेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी काही खाटा राखून ठेवण्याबाबतचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, हा अहवाल सादर करीत असताना कृपया थोडक्यात माझे विचार व्यक्त करण्याची मला संधी द्यावी. हा अहवाल सादर करीत असताना त्यातील काही महत्वाच्या बाबींचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छितो. राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या जनतेला नामांकित रुग्णालयांमध्ये सवलतीच्या दरांत अथवा मोफत अद्यावत औषधोपचार, शस्त्रक्रिया इत्यादी मिळावे या उदात्त हेतूने राज्य सरकारने बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट-1950 च्या कलम 41 (एए) मध्ये खास तरतूद करुन, अशा रुग्णालयातील 10 टक्के खाटा सवलतीच्या दराने आणि गरीब रुग्णांना उपलब्ध करण्यासाठी राखून ठेवावयाच्या आहेत. या शिवाय महसूल विभागाच्या दिनांक 22 जून, 1990 च्या परिपत्रकानुसार रुग्णालयांना शासकीय जमीन सवलतीच्या दराने दिल्यानंतर 15 टक्के खाटा गरीब रुग्णांना विना मुल्य आणि 15 टक्के खाटा सवलतीच्या दराने आरक्षित करावयाच्या आहेत. सदरहू कायदेशीर तरतुदींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी धर्मादाय आयुक्तांवर सोपविण्यात आली आहे. तथापि, ही जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही. समितीने हा विषय छाननीसाठी घेतल्यानंतर शासनाच्या विभागांना या तरतुदीची कल्पना आली.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे ....

कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे धर्मादाय आयुक्तांना ही जबाबदारी पार पाडत आली नाही ही या मागची कारणमिमांसा समितीला पटू शकली नाही. महसूल विभागाप्रमाणेच सिडको, म्हाडा व महानगरपालिका इत्यादी विविध संस्थांनी देखील काही रुग्णालयांना भूखंडाचे वाटप केले आहे. काही भूखंडाचे वाटप विविक्षित सवलती देऊन वितरित केले आहेत. या अटींचे पालन देखील केले जात नसल्याचे समितीला आढळून आले. सदर या बाबतचे मुख्य कारण म्हणजे या योजनेचे समन्वय कोणत्याही कार्यालयातर्फे होत नाही. म्हणून या सर्व नोंदणी झालेल्या रुग्णालयातील सोयी सवलती याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाने समन्वय करावे. अशी समितीने आपल्या अहवालात आग्रहाची शिफारस केली आहे.

सध्याच्या कार्यपध्दतीप्रमाणे उत्पन्नाचा दाखला तहसीलदार कार्यालयाकडून घ्यावा लागतो आणि सवलतीच्या दराने किंवा मोफत औषधोपचार मिळण्यासाठी धर्मादाय आयुक्तालय कार्यालयाकडून प्रमाणपत्र घ्यावे लागते. वास्तविक पाहता धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना वैद्यकीय ज्ञान असू शकत नाही त्यामुळे आजारपणाबाबतचे प्रमाणपत्र सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्याने द्यावे अशी समितीने शिफारस केली आहे.

धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेल्या रुग्णालयाशी संबंधित ज्या समित्या आहेत त्यामध्ये लोकप्रिनिधींचा समावेश करण्यात येत नाही. त्या समित्यांमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याची समितीने शिफारस केली आहे.

सध्याच्या कायद्यामध्ये रुग्णालयाने कायद्याचे नियम व अटी न पाळल्याबाबत रु. 2000/- दंडाची रक्कम तरतूद आहे ही रक्कम अत्यंत अल्प असल्यामुळे दंडाची रक्कम रुपये 1 लाखांची आणि कारावासाची सुध्दा तरतूद करण्याची समितीने शिफारस केली आहे.

सदर अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

**सभापती** : अंदाज समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

..2

23-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या दिलगिरीबाबत**

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, काल प्रश्नोत्तराच्या कालावधीमध्ये काही प्रश्नाच्या अनुषगांने या ठिकाणी चर्चा होत असताना आपण मला निर्देश दिले होते. ते निर्देश देत असताना माझ्या लक्षात आले नाहीत. त्यामुळे मी आपण दिलेल्या निर्देशांचे पालन करु शकलो नाही. तरी, सभापती महोदय, आपल्या निर्देशांचा अवमान करण्याचा माझा आजिबात उद्देश नव्हता. आपला अवमान झाला असेल तर या ठिकाणी मी दिलगिरी व्यक्त करतो.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी " घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना रुपये 20/- ऐवजी 50/- रुपये मानधन देणे, विना अनुदानित कालावधीतील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरणे, जिल्हा परिषद, उच्च माध्यमिक शिक्षकांना 7225/- ची वेतनश्रेणी मान्य करणे, इत्यादीबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मोडक व इतर वि.प.स. यांनी " डी.एच.एस. कडून सर्व नियम, निकष, अटी आणि परिपत्रके धुडकावून राज्याच्या आरोग्य संचालनालयाने भरमसाठ दराने औषधे, जंतुनाशके व संसर्गरोधके यांची खरेदी करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खाजगी मालकीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो भाडेकरुंवर भाडे वाढीची टांगती कुऱ्हाड.

**मु.शी.**: खाजगी मालकीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो भाडेकरुंवर भाडे वाढीची टांगती कुऱ्हाड यासंबंधी सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. दिपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे, सर्वश्री. अनिल परब, विलास अवचट, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईसह महाराष्ट्रातील खाजगी मालकीच्या इमारतीत भाडेतत्वावर रहात असलेल्या लाखो भाडेकरुंना सध्याच्या भाड्याच्या रक्कमेमध्ये सुमारे २२ पट वाढ करण्याबाबत प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशनने घेतलेला निर्णय, त्यादृष्टीने त्यांची वाटचाल असून ती आता अगदी अंतिम टप्प्यात असल्याने ही गंभीर समस्या हाताळणारे गृहनिर्माण विभागातील अधिकारी जाणीवपूर्वक परदेश दौऱ्यावर जाणे, खाजगी मालकीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो भाडेकरुंवर २२ पट भाडे वाढीची टांगती कुऱ्हाड, अशा असह्य भाडेवाढीने भाडेकरुंची होणारी वाताहात, या निर्णयामुळे भाडेकरु रस्त्यांवर येणे, मुंबईसह महाराष्ट्रातील या ज्वलंत व गंभीर समस्येकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष व दाखविलेला ढिलेपणा, परिणामी लाखो भाडेकरुंमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व उसळलेली संतापाची लाट लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. दयानंद मस्के ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लक्षवेधी मधील प्रश्न अतिशय जिव्हाळयाचा आहे. लक्षवेधीच्या निवेदनात असे नमूद केलेले आहे की, सुरुवातीला हे प्रकरण दोन न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे होते त्यानंतर ते 3 न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे, त्यानंतर हे प्रकरण 5 न्यायधीशांच्या घटनापीठाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे त्यानंतर हे प्रकरण 7 न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे हस्तांतरी करण्यात आलेले आहे, त्यानंतर हे प्रकरण 9 न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे हस्तातंरीत करण्यात आलेले आहे यावरुनच हे प्रकरण किती गंभीर आहे यांची आपणाला कल्पना करता येते. खरे तर म्हाडाने याबाबतील लक्ष घालून कायद्यामध्ये परिवर्तन करुन भाडेकरुंना न्याय देण्याची आवश्यकता होती. शेकडो वर्षापासून हे भाडेकरु मुंबई शहरामध्ये राहत आहेत, त्यांच्या जीवनमरणाचा हा पश्न बनलेला आहे, भाडेकरुंचा हा प्रश्न सुप्रिम कोर्टात जरी असला तरी भाडेकरुंना संरक्षण देण्याचे काम महाराष्ट्र शासनाने करावयास पाहिजे. परंतु अद्यापपर्यंत शासनाने ते केलेले नाही. आपण येथे फक्त उत्तर देत आहात की, अद्याप 9 न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे हे प्रकरण गेलेले आहे त्यामुळे लवकरात लवकर सदर प्रकरणाची सुनावणी घेण्याबाबत व दरम्यानच्या कालावधीत प्रमाण भाडयाच्या 22 पट भाडेवाढ मिळण्याबाबतची विनंती मा.सर्वोच्च न्यायालयास केलेली आहे. याबाबतीत आपण विचार करुन जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत ही बाब न्यायप्रविष्ठ आहे असे समजून या भाडेकरुकडील भाडे वसूली स्थगित करण्यात येईल काय ? यदाकदाचित मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल भाडेकरुंच्या विरुध्द गेला तर कायद्यामध्ये आवश्यक ते परिवर्तन करुन सुधारणा, बदल करुन भाडेकरुंना संरक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम व सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणे हाताळण्यासाठी नामांकित वरिष्ठ विधीज्ञ ॲड.अशोक देसाई, ॲड. हरिष साळवे वाडीया गांधी ॲन्ड कंपनी, ॲड.मिलींद साठे, ॲड. पल्लव शिसोदिया,, ॲड. संजय हेगडे यांना नियुक्त केले आहे. शासनाला या प्रकरणाबाबत गांभीर्य असल्यामुळे सदर प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावण्याची विनंती न्यायालयास करण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा होता की, मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जर भाडेकरुंच्या विरोधात गेला तर सरकार कायद्यामध्ये परिवर्तन करुन भाडेकरुंना संरक्षण देण्याची भूमिका घेणार आहे काय ? .....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे यासंदर्भातील कोणाताही निर्णय आता घेणे उचित होणार नाही. भाडेकरुंच्या प्रश्नांच्या संदर्भात शासन अतिशय काळजीपूर्वक लक्ष देत असून यासंदर्भात विचार विनिमय सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड येथे International Executive workshop on Public sector reform या कार्यशाळेस मा. राज्यमंत्री (गृ.नि.), प्रधान सचिव, गृह निर्माण तथा व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि. मुख्य अभियंता, म्हाडा व वित्त नियंत्रक श्री. मालवणकर हे परदेश दौऱ्यावर गेले होते. माझा प्रश्न असा आहे की आतापर्यंत या खात्याने किती वेळा परदेश दौरे आयोजित केलेले आहेत व ते कोणत्या कारणांसाठी आयोजित करण्यात आले होते ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे दोन दौरे काढण्यात आलेले होते ते कोणकोणत्या कारणांसाठी काढण्यात आले होते ती माहिती माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे मी विचारून ती माहिती पटलावर ठेवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये गंभीर विषय असा आहे की, श्री. मालवणकर हे अधिकारी परदेश दौरे आयोजित करुन इतर अधिकाऱ्यांना सुध्दा सोबत नेतात. गृह निर्माण खात्यामध्ये ते असतांना त्यांनी दौरा आयोजित केला होता, या अधिकाऱ्यास परदेश दौरे करण्याची सवयच झालेली आहे. परदेशामध्ये शेळी-मेंढी प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी हे गेले होते. जनतेचा पैसा मोठया प्रमाणावर परदेश दौऱ्यावर खर्च करण्यात येत आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी 4 दौरे काढलेले आहेत. त्यांनी जे परदेश दौरे काढलेले आहेत त्यांतून काय फलनिष्पत्ती झ ाली त्याबाबत मंत्री महोदय माहिती देतील काय ?

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के : महोदय हे प्रकरण वर्तमानपत्रांमध्ये आले आहे. शेळया-मेढयांच्या संदर्भात पत्रकारांनी मला आपण त्यामध्ये काय काय पाहिले अशी विचारले होते. त्या ठिकाणी अनेक युनिव्हर्ससिटी इंटरनॅशनल एक्झीक्युटीव्ह वर्कशॉप इन पब्लिक सेक्टर रिफॉर्म च्या निमित्ताने त्या ठिकाणी महाराष्ट्राचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. तेथे गेल्यानंतर त्या ठिकाणी असलेल्या देशांमध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा झाली आहे, हे दाखवण्यात आले. त्यामध्ये शेळया-मेढयांचा विषय आला होता. म्हणून मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, शेळया-मेढयांच्या कारणासाठी तेथे न जाता युनिव्हर्ससिटी इंटरनॅशनल एक्झीक्युटीव्ह वर्कशॉप इन पब्लिक सेक्टर रिफॉर्म च्या निमित्ताने तेथे जाण्यात आले होते. त्या ठिकाणी गोव्याचे प्रतिनिधी श्री.नार्वेकर तसे कर्नाटक, मध्यप्रदेश व उत्तरांचलचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री.विलास अवचट : हा मुंबई शहरातील भाडेकरुंचा महत्वाचा व जिव्हाळयाचा प्रश्न आहे. महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा अस्तित्वात आल्यानंतर घरमालक संघटना कोर्टामध्ये गेल्या होत्या. न्यायालयामध्ये सुनावणीसाठी दि.12 सप्टेंबर, 2000, 29 मार्च, 2001, 20 फेब्रुवारी, 2002 या तारखा देण्यात आल्या होत्या. शासनाने दिलेल्या निवेदनामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेसंदर्भात शासनाने दि.18 मार्च, 2006 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले असून प्रकरणाचा अत्यंत काळजीपूर्वक वेळोवेळी पाठपुरावा केला जात असल्याचे नमूद केलेले आहे. या संदर्भात वर्तमानपत्रांमध्ये येत असलेल्या बातम्यांमुळे भाडेकरुंमध्ये संभ्रमाचे व भितीचे वातावरण निर्माण झाले. अशाप्रकारे शासनाने भाडेकरु नियंत्रण कायद्याला आव्हान दिलेले आहे, याबाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे ?

श्री.दयानंद मस्के : या ठिकाणी शासनाचे भाडेकरुंच्या बाजूने स्पष्ट धोरण आहे, यासाठी वकील नेमण्यात आलेले आहेत. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे या ठिकाणी त्याबाबत चर्चा करता येणार नाही.

**सभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे ही वस्तुस्थिती आहे. सुप्रीम कोर्टामध्ये जो प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे या इश्यू व्यतिरिक्त जो भाडेकरुंच्या संरक्षणाचा प्रश्न आहे, त्या अनुषंगाने सुप्रीम कोर्टामध्ये आपण हा प्रश्न चिकाटीने मांडण्यासाठी प्रयत्न करीत आहात, कायदेतज्ज्ञ देत आहात, त्याचबरोबर या भाडेकरुंचे हित जपण्याच्या दृष्टीने, संरक्षण करण्याच्या दृष्टीने आपण काय करणार आहात ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : महाराष्ट्र शासनाने न्यायालयामध्ये सादर केलेल्या शपथ पत्रामध्ये भाडेकरुंबाबत काय मागणी केली हे समजणे आवश्यक आहे.

श्री.दयानंद मस्के : या संदर्भामध्ये असलेले डाक्युमेंटस आहेत ते या हाऊसमध्ये कसे आणता येईल ? शासनाने याबाबत मान्यवर वकिलांची नेमणूक केलेली आहे, त्यांच्यावर आपल्याला शंका घेता येणार नाही. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, शासन भाडेकरुंच्या बाजूने अतिशय प्रयत्नशील आहे.

श्री.अरविंद सावंत : माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, महाराष्ट्र शासनाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. फ्लॅट ओनर्स असोसिएशनने 22 पट भाडेवाडीची मागणी केली आहे. भाडेवाढ करु देणार नाही असे शासनाचे धोरण की, कितीही पट भाडेवाढ केली तरी शासनाची हरकत नाही असे शासनाचे धोरण आहे, याबाबत मानननीय मंत्रिमहोदय खुलासा करतील का ?

श्री.दयानंद मस्के : 22 पट भाडेवाढीबाबत शासन सहमत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : शासनाने भाडेकरुंना संरक्षण देण्याची भूमिका घेतलेली आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी दिलेल्या माहितीवरुन स्पष्ट होते. या संदर्भात शासनाने प्रतिज्ञापत्र सादर केले, यासाठी चांगले वकिल दिलेले आहेत. परंतु या वकिलांना कोणती भूमिका मांडण्यास सांगण्यात आले आहे हे आम्हाला समजले तर भाडेकरुंसाठी आपला हेतू किती स्वच्छ आहे हे आम्हाला समजू शकेल. या ठिकाणी शासनाचे भाडेकरुंना संरक्षण देण्याचे धोरण आहे, 22 पट भाडेवाढ करण्याचे धोरण नाही, असे माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्ट केले तर सर्व सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, ज्याअर्थी शासनाने यासाठी एवढे नामांकित वकील दिलेले आहत याचा अर्थ शासन यामध्ये किती जागरूक आहे हे समजून येते. आता येथे प्रश्न असा आहे की, भाडेकरूंच्या बाजूने शासन आहे आणि घरमालक संघटनेने मागितलेली 22 पट भाडेवाढ शासनाला मान्य नाही आणि म्हणूनच शासन त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी सागितले की, या संदर्भात शासनाने सर्वोच्च न्यायालयात 18 मार्च 2006 ला शपथपत्र सादर केलेले आहे तसेच ही केस लढविण्यासाठी नामांकित वकील नेमले आहेत. तर मग आपण सादर केलेल्या त्या शपथपत्रात 22 पट भाडेवाढीच्या संदर्भात आपण काय भूमिका घेतलेली आहे ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, शासन 22 पट भाडेवाढीच्या विरोधात आहे आणि ही आमची ठाम भूमिका राहणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी वारंवार आणि सर्व बाजुंनी विचारल्यानंतरही मंत्री महोदय अतिशय संदीग्ध स्वरूपात उत्तर देत आहेत. ते आपल्या उत्तराच्या परिघाबाहेर जात नाहीत. म्हणून माझा या संदर्भात नेमका प्रश्न असा आहे की, घरमालकांनी 22 पट भाडेवाढ मागितली आहे आणि आपला त्याला विरोध आहे तर मग किती टक्के भाडेवाढ केली जावी या दृष्टीने शासनाने आपल्या शपथपत्रामध्ये काय प्रस्तावित केलेले आहे ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने शपथपत्रामध्ये काय म्हटले आहे वगैरे येथे काही सांगता येणार नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांनी आतापर्यंत याबाबत जी उत्तरे दिली आहेत त्यावरून आपल्याप्रमाणेच शासनाच्याही याबाबतीत भावना तीव्र आहेत हे ध्वनित झालेले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे ही वस्तुस्थिती आहे म्हणूनच मला वाटते की, या व्यतिरिक्त यावर अधिक चर्चा करणे बरोबर होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायालयीन बाबीच्या पलिकडे आम्ही जाणार नाही, जाऊ इच्छित नाही. मात्र शासनाने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगानेच मी प्रश्न विचारू इच्छितो. या निवेदनात आपण म्हटले आहे की, "... शासनाने 18.3.2006 रोजी शपथपत्र दाखल केले असून प्रकरणाचा अत्यंत काळजीपूर्वक वेळोवेळी पाठपुरावा केला आहे..." आता आपण पाठपुरावा केला आहे त्याबद्दल धन्यवाद. सभापती महोदय, हा मुंबईतील समस्त भाडेकरूंच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

..... आर 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आहे. यातील महत्त्वाचा भाग असा आहे की, हे स्वायत्त राज्य आहे आणि घटनेने निर्माण केलेल्या चौकटीत बसून जनतेने दिलेल्या अधिकारातून जनतेच्या हितासाठी म्हणून शासनाने हा कायदा केला होता. पण त्याला घरमालक संघटनेने आव्हान दिलेले आहे. एक प्रकारे राज्याच्या घटनात्मक अधिकारालाच हे आव्हान दिलेले आहे. आणि त्या बाबतीत या शासनाची बाजू प्रभावीपणे सर्वोच्च न्यायालयात मांडण्यासाठी शासनाने नामांकित वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अशोक देसाई, ॲड. हरिष साळवे, वाडीया गांधी अँड कंपनी, ॲड. मिलिंद साठे, ॲड. पल्लव शिसोदिया, ॲड. संजय हेगडे यांना नियुक्त केलेले आहे आणि त्यांना महाराष्ट्र शासनाचे सर्वोच्च न्यायालयातील सरकारी वकील सहाय्य करीत आहेत. भाडेकरूंच्या हित रक्षणासाठी शासनाने विशेष लक्ष देऊन नामांकित वकिलांची नियुक्ती केलेली आहे असे या निवेदनात आपण म्हटलेले आहे. हे सारे आम्हाला मान्य आहे. आपण या निवेदनात पुढे म्हटलेले आहे की, 'तरीसुद्धा शासनाची बाजू सर्वोच्च न्यायालयात प्रभावीपणे मांडण्यासाठी योग्य ते सर्व प्रयत्न करीत आहोत.' तेव्हा या वकिलांव्यतिरिक्त सर्व प्रयत्न कोणते आहेत ते आपण सांगू शकाल का ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, 'तरी सुद्धा ' या शब्दामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी आपल्याला या संदर्भात इतकेच सांगू इच्छितो की, आपण नेमलेले हे नामांकित वकील प्रभावीपणे शासनाची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडणार आहेत त्यामुळे प्रश्नच येत नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे सर्व गोष्टी उलगडून सांगता येणार नाहीत असे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. अगोदर हे प्रकरण 3 न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे होते, नंतर ते 5 न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे गेले, तेथेही एकमत न झाल्यामुळे 7 न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे प्रकरण गेले आणि त्यानंतर आता 9 न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे हे प्रकरण गेले आणि तेथे देखील समझोता झालेला नाही, एकमत होऊ शकलेले नाही. याचा अर्थ प्रत्येक खंडपीठापुढे आपल्या गृहनिर्माण खात्याने आपली भूमिका मांडलेली आहे. आता घरमालक यामध्ये म्हणत असतील की, आम्हाला 22 पट भाडेवाढ पाहिजे तर त्याला राज्य सरकारचा विरोध आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. पण मग राज्य सरकारने त्याबाबतीत आपली भूमिका मांडताना किती पट भाडेवाढ करण्यास सहमती होऊ शकेल असे सांगितले आहे ?

( यानंतर श्री.सरफरे ...एस 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब...

याचा अर्थ कोर्टामध्ये आपण आपली भूमिका मांडली आहे. सर्वसाधारण संकेत असा आहे की, कोर्टामध्ये आपण आपली भूमिका मांडली नसेल तर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे ती बाहेर मांडली जाऊ नये. कारण त्यापूर्वी बाहेर भूमिका मांडली तर न्यायालयीन लढाईवर तिचा परिणाम होईल. या ठिक्‌काणी खंडपीठासमोर राज्य सरकारने भूमिका मांडली आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये शासनाची भूमिका मांडायला हरकत नाही असे मला वाटते. म्हणून प्रश्न असा आहे की, घर मालकांनी ज्यावेळी 22 पट भाडे वाढवून मागितले तेव्हा राज्य सरकारने कोर्टामध्ये कोणता प्रस्ताव ठेवला?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, माननीय सदस्य पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारीत आहेत. 22 पट भाडे वाढ करु नये हीच भूमिका न्यायालयासमोर राज्य शासनाची रहाणार आहे.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, मघाशी मांडलेला विषय हा कायदा करण्याचा आपल्या अधिकारातील आहे. निवेदनामध्ये जे म्हटले आहे त्याचे स्पष्टीकरण आले पाहिजे.. "उक्त प्रकरण मा. सर्वोच्च न्यालयात 3 न्यायाधीशांपुढे सुनावणी होऊन 5 न्यायाधीशांकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय दि.12.9.2000 रोजी झाला. त्यानंतर सदर याचिकांची सुनावणी 5 न्यायाधीशांच्यापुढे होऊन 7 न्यायाधीशांकडे पुढील सुनावणीसाठी हस्तांतरीत करण्याचे आदेश दि.21. मार्च 2001 ला पारीत झाले आहेत". म्हणजे 5 न्यायाधीशांना वाटले की, या घटनात्मक विषयाचे आपण विश्लेषण करु शकणार नाही म्हणून प्रकरण 7 न्यायाधीशांपुढे नेण्यात आले. "तद्‌नंतर 7 न्यायाधीशांच्या घटनापीठाची स्थापना होऊन म्हाडा अधिनियम, 1976 च्या कलम 103 (ब) बाबतच्या सिव्हील अपिल क्र.1012/2000 व इतर याचिकांची प्रथम सुनावणी दि. 5फेब्रुवारी, ते दि. 20 फेब्रुवारी 2002 रोजी पूर्ण होऊन याही वेळी वरील प्रकरणी अंतिम निर्णय होऊ न शकल्याने उक्त प्रकरण 9 न्यायाधीशांच्या घटनापीठापुढे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला". ज्यावेळी एखादा विषय घटनापीठापुढे जातो त्यावेळी तो विषय घटनात्मक असतो, तो भाडेवाढीचा विषय नाही. हा घटनात्मक अधिकाराचा विषय आहे असे मला वाटते. तेव्हा 9 न्यायाधीशांच्या घटनापीठापुढे हा विषय हस्तांतरीत करण्यात आला आहे तो कोणता विषय आहे? तो भाडेवाढीचा आहे की घटनात्मक आहे याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की,"आता घर मालक संघटनेने मा. सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका क्र. 660/1998 मध्ये आय.ए.क्र. 92 व 93 दाखल करुन वरील प्रकरणांची लवकरात लवकर सुनावणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

घेण्याबाबत व दरम्यानच्या कालावधीत प्रमाण भाडयाच्या 22 पट भाडेवाढ मिळण्याबाबतची विनंती मा. सर्वोच्च न्यायालयास केलेली आहे" सभापती महोदय, हे काय चालले आहे? हा 22 पट भाडेवाढीचा विषय दिसत नाही. त्यामुळे आपण हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी विनंती आहे.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, निवेदन राखून ठेवण्याचा प्रश्न नाही. हे भाडेवाढीचे प्रकरण आहे.

**सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदय, सुप्रिम कोर्टामध्ये शासनातर्फे प्रतिज्ञापत्र सादर केले गेले असेल तर ते गोपनीय दस्तावेज रहाण्याचे कारण नाही. तसे असेल तर याबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली आहे हे सभागृहामध्ये सांगण्यामध्ये काय अडचण आहे?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, आपण हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कळमेश्वर (जि.नागपूर) येथील श्री. भागिरथ गिरणीमध्ये सिटू कामगार संघटनेने कामगारांना अंधारात ठेवून पुकारलेला संप.

मु.शी. : कळमेश्वर (जि.नागपूर) येथील श्री. भागिरथ गिरणीमध्ये सिटू कामगार संघटनेने कामगारांना अंधारात ठेवून पुकारलेला संप यासंबंधी प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" कळमेश्वर (जि.नागपूर) येथील श्री. भागिरथ गिरणीमध्ये स्थापन करण्यात आलेल्या सिटू कामगार संघटनेने दिनांक २२ डिसेंबर, २००५ रोजी व्यवस्थापनाशी कोणतीही चर्चा न करता कामगारांना अंधारात ठेवून संप पुकारला आणि स्थानिक कामगारांमध्ये मारझोड, दहशत निर्माण करुन गिरणीमध्ये काम करण्यास इच्छूक असलेल्या महिला व पुरुष कामगारांना जबरीने कामावर जाणाऱ्यांना अडवून जिवे मारण्याची धमकी सिटूच्या कार्यकर्त्यांनी दिल्याने कामगारांना कामापासून वंचित रहावे लागणे, जे कामगार कामावर जाण्यासाठी येतात त्यांना व्यवस्थापनाकडून कोणत्याही प्रकारचे संरक्षण देण्यात न येणे, कामगारांचा काम करण्याचा हक्क हिरावून घेण्यात येणे, व्यवस्थापनाने विरोधी संघटनेस हाताशी धरुन कामगारांवर विनाकारण संप लादण्यात येणे, इंटक संघटनेच्या कोणत्याही कार्यकर्त्यांना व सभासदांना व्यवस्थापनाकडून कोणतेही संरक्षण देण्यात न येणे, या सर्व परिस्थितीवर पोलिस यंत्रणेद्वारे कोणतीही कारवाई करण्यात न येणे, परिणामी २२ डिसेंबर, २००५ रोजी १२५ कामगार कामावर गेले असता त्यांना घरी परत जाण्यास सांगण्यात येणे, अशा प्रकारे काम करण्याची इच्छा असूनही त्यांच्या कामाचा हक्क हिरावून घेण्याचे षडयंत्र प्रशासन व सिटू कामगार संघटनेने घडवून आणणे, कामावर आल्यास कामगारांना अडवून जिवे मारण्याची धमकी देण्यात येणे, कामगारांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली असता पोलिस यंत्रणेकडून दखल घेण्यात न येणे, या गुंड प्रवृत्तीच्या संघटनेतील काही लोकांमुळे कामगारांच्या जिवास धोका निर्माण झाला असल्याने तसेच कामगारांच्या परिवारांवर आलेली उपासमारीची पाळी यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, प्रशासनाने या प्रकरणात त्वरित करावयाची कारवाई व शासनाने करावयाची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनांसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यातील मोहाली गावामध्ये भागिरथ टेक्स्टाईल मिल ही गिरणी 1996 पासून चालू आहे. 1948 च्या फॅक्टरी ॲक्टनुसार ती पंजीकृत केली आहे. ही सूती धागा निर्माण करणारी गिरणी आहे. या टेक्सटाईल मिलमध्ये एकूण 285 कामगार काम करतात. औद्योगिक संबंध कायदा, 1946 हा देखील त्यांना लागू आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे 12:40

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु....

या प्रकरणामध्ये या टेक्स्टाईल मिलमध्ये राष्ट्रीय मिल मजदूर संघ, कळमेश्वर ही प्रातिनिधिक संघटना कार्यरत आहे. या संघटनेने व्यवस्थापनाला एक समेट पत्र सादर केले. परंतु दुसरी जी अनधिकृत असलेली सिटू प्रणित भागीरथ टेक्स्टाईलमध्ये कामगार युनियन आहे, त्यांनी व्यवस्थापनाने आमच्याबरोबर चर्चा केली पाहिजे असा आग्रह धरला. पण व्यवस्थापनाने अधिकृत संघटना म्हणून राष्ट्रीय मिल मजदूर संघाबरोबर चर्चा केली. त्या विरोधामध्ये सीटू प्रणित भागीरथ टेक्स्टाईल कामगार युनियन, कळमेश्वर यांनी संप पुकारला. राष्ट्रीय मिल मजदूर संघटनेचे कामगार कामावर जात होते, त्यांना मारहाण करणे, त्यांना कामावर जाण्यापासून मज्जाव करणे असा प्रकार सीटू प्रणित भागीरथ टेक्स्टाईल कामगार युनियनने केला. या दोन संघटनेतील भांडणामुळे कामगारांना कामावर जाण्यास मज्जाव केला गेला. अनधिकृत संघटनेने बेकायदेशीर संप पुकारुन कामगारांना कामावर जाण्यापासून गदा आणली त्या संघटनेच्या विरोधात कोणती कारवाई करणार आहात ? पहिल्यापासून राष्ट्रीय मिल मजदूर संघटना ही अधिकृत संघटना आहे, त्यांच्यामध्ये आणि व्यवस्थापनामध्ये जो करारनामा झालेला आहे, त्याचे योग्य प्रकारे पालन केले जाईल काय ? दुसरे असे की, गिरणी बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला, ती पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, कामगार संगठन के खिलाफ अण्डर सेक्शन 367 के अन्तर्गत क्रिमिनल केस दाखिल की गई है. 22.12.2005 को की गई शिकायत के आधार एफ.आई.आर. नं. 9/2006 और 46/5.1.2006 के अन्तर्गत शिकायत दर्ज की गई है. 4 फरवरी, 2006 से यह मिल शुरु हो गई है. कामगारों के वेजेस के संबंध में कन्सिलिएटर का आर्बीट्रेशन शुरु है.

श्री श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझे दोन महत्वाचे प्रश्न आहेत. गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे कामगारांच्या जिवाला धोका निर्माण झालेला आहे, ही वस्तुस्थिती खरी आहे काय, खरी असेल तर एखादा उद्योग मोठ्या कष्टाने उभा केला जात असतो, असे असतांना तो उद्योग काही लोक बंद पाडत असतील तर त्यांच्या विरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करुन, कामगारांना त्रास होणार नाही या दृष्टीने त्यांना गाव बंदी, शहर बंदी केलेली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, दोन संघटना आणि व्यवस्थापन यांच्यामधील वाद मिटविण्यासाठी कामगार उपआयुक्तांनी बैठका घेतल्या आहेत काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय,मैंने पहले प्रश्न के उत्तर में ही इसका जवाब दिया है. अण्डर सेक्शन 367 के क्रिमिनल केस दाखिल गई है. उसी प्रकार से आई.पी.सी. की धारा 145,148,149,341,329 एवं 367 के अनुसार कार्रवाई की गई है. दूसरी बात यह है कि एक्ट के मुताबिक ऐसे मामले एक महीने के अन्दर पूर्ण करने चाहिए और दोनों पार्टी सहमत है तो एक साल तक आर्बीट्रेशन चल सकता है. सहायक आयुक्त एवं कन्सिलिएटर के बीच आर्बीट्रेशन शुरु है. चर्चा के दौरान 3200 रुपये मिनिमम वेज तय की गई थी. मान्यता प्राप्त युनियन की तरफ से 1000-1200 रुपये की बात आई है. कन्सिलिएटर की तरफ से आर्बीट्रेशन चल रही है. जल्दी ही इस मामले में निर्णय हो जाएगा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेब आपल्याला काही विचारावयाचे आहे काय ?

प्रा.जोगेंद्र कवाडे : मिल सुरु झालेली आहे. धन्यवाद.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, दिनांक 21.12.2005 च्या "सी" पाळीतील 90 पैकी 16 कामगार आणि दिनांक 22.12.2005 च्या "अे" पाटीतील 90 पैकी 45 कामगार तसेच दिनांक 22.12.2005 च्या "बी" पाळीतील 89 पैकी 46 कामगार आपल्या कामावर रुजू झाले होते. उर्वरित कामगार हजर होऊ शकले नाहीत. त्यांना संरक्षण देण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे ? निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, कामगार दिनांक 4.2.2006 रोजी बिनशर्त कामावर हजर झालेले आहेत. यापूर्वी जेवढे कामगार होते ते सगळे कामगार हजर झाले आहेत काय ? हजर झालेल्या कामगारांची संख्या किती आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सर्व कामगार हजर झालेले आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा बी.आय.आर. ॲक्ट अंतर्गतचा प्रश्न आहे. बी.आय.आर. ॲक्ट अंतर्गत मान्यताप्राप्त युनियन असेल तर त्यांची मान्यता तशी काढून घेता येत नाही. त्याची काही तरी पध्दत आहे. त्या ठिकाणी इंटकला मान्यता आहे असे दिसते. इंटकने संपाचा किंवा कामबंदीचा आदेश दिलेला नाही. सिटू च्या कृती समितीने संपाचा आदेश दिलेला आहे असे एकंदरीत निवेदनावरुन दिसते. सिटूचे सगळे कार्यकर्ते धमक्या देतात, कामगारांनी कामावर जाऊ नये म्हणून धमक्या देतात तसेच काही कामगार कामावर हजर झाले याची माहिती निवेदनामध्ये आहे. यामध्ये पोलिसांचा काय रोल आहे हा प्रश्न आहे. पोलिसांकडे तक्रार केली जाते तरी देखील पोलीस त्याची दखल घेत नाहीत. त्याचा परिणाम म्हणून कामगार कामावर जात नाहीत. त्यांना असुरक्षित वाटते. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कामगार कामावर गेलेले आहेत. याचा अर्थ असा होतो की, आता कामगारांना कोणीही धमक्या देत नाही. सिटूचे कार्यकर्ते ते काम करीत नाही. जोपर्यंत सिटूला मान्यता मिळत नाही तोपर्यंत यामध्ये हस्तक्षेप करणार नाही अशा प्रकारची घोषणा किंवा अंडरटेकिंग सिटूने तेथील व्यवस्थापनाला आणि कामगार आयुक्तांना दिलेले आहे काय ? जर दिले नसेल तर शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, ऐसी कोई अंडरटेकिंग नहीं दी है. सहायक आयुक्त और कामगारों के बीच हुई बैठक में निर्णय लिया गया है. 4 फरवरी,2006 से यह मिल शुरु हो गई है.

------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : मौजे कोंढाळा, ता. देसाईगंज वडसा, जि.गडचिरोली येथे बौध्द समाजातील लोकांवर झालेला हल्ला.

**मु. शी.** : मौजे कोंढाळा, ता. देसाईगंज वडसा, जि. गडचिरोली येथे बौध्द समाजातील लोकांवर झालेला हल्ला याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मौजे कोंढाळा, ता. देसाईगंज वडसा, जि. गडचिरोली येथे दिनांक 11.10.2005 रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्थनिक बुध्द विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील खुल्या जागेवर मंडप टाकण्याचे काम सुरु असताना गावातील जवळपास 1500 जातीयवादी समाजकंटकांनी त्या ठिकाणी कार्यक्रमाच्या बंदोबस्तासाठी उपस्थित असलेल्या पोलिसांसमक्ष हल्ला करुन मंडप घालत असलेल्या बौध्द समाजातील लोकांना जातीयवाचक शिवीगाळ केली आणि तेथे उभा केलेला मंडप जातीयवाद्यांनी फाडून टाकला. सदर घटनेची तक्रार देसाईगंज वडसा पोलीस स्टेशनला दिली असता, हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई न करता उलट बौध्द समाजाच्या पाच लोकांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला, ही अत्यंत संतापजनक आणि अन्यायकारक बाब आहे.

सदर प्रकरणी शासनाने लक्ष घालून कोंढाळा गावातील बौध्द समाजाच्या लोकांना संरक्षण द्यावे, हल्लेखोरांवर त्वरित कारवाई करण्यात यावी तसेच बौध्दांवर दाखल केलेले गुन्हे परत घेणेबाबत शासनाने संबंधितांना निर्देश द्यावेत अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा जसा नक्षलग्रसत आहे त्याचप्रमाणे या जिल्ह्यात दलितांवर, बौध्दांवर जे जातीय अत्याचार होत आहेत त्यामुळे हा जिल्हा जातीयग्रस्त

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

देखील आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज वडसा येथील मौजे कोंढाळी या गावातील अल्पसंख्यांक बौध्दांवर, दलितांवर झालेल्या अत्याचाराकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मौजे कोंढाळा, ता. देसाईगंज वडसा, जिल्ह गडचिरोली य गावामध्ये 11 ऑक्टोबर, 2005 रोजी या गावातील अल्पसंख्यांक बौध्द समाजाने दरवर्षीप्रमाणे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्थानिक बौध्द विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या समोरील मोकळ्या जागेवर मंडप घालण्याचे काम सुरु केले. धम्मचक्र प्रवर्तन महोत्सव साजरा करण्यासाठी त्या खुल्या जागेवर मंडप घालण्याचे काम सुरु असताना गावातील जवळपास 1500 जातीयवादी समाजकंटकांनी त्या ठिकाणी कार्यक्रमाच्या बंदोबस्तासाठी उपस्थित असलेल्या पोलिसांच्या समक्ष या अल्पसंख्याक बौध्द समाजाच्या लोकांवर हल्ला केला. मंडप घालत असलेल्या बौध्द समाजातील लोकांना जातीवाचक शिवीगाळ केली आणि घालण्यात येत असलेल्या मंडपावर हल्ला करुन तो फाडून टाकला. सदरहू घटनेची तक्रार देसाईगंज वडसा पोलीस स्टेशनला दिलेली असतानाही हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई न करता उलट अल्पसंख्यांक बौध्द समाजाच्या 5 लोकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. ही अत्यंत संतापजनक आणि अन्यायकारक बाब आहे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

सभापती महोदय, शासनाने या प्रकरणी लक्ष घालून मौजे कोंढाळा गावातील बौध्द समाजाच्या लोकांना संरक्षण द्यावे. तेथील बौध्द विहारापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापुढे जो अनिधिकृत चबुतरा उभा करण्यात आलेला आहे तो हटवून बौध्दांना न्याय द्यावा आणि निरपराध बौध्दांवर जे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते परत घेण्यासंबंधी शासनाने संबंधित विभागाला निदेश द्यावेत अशा प्रकारची विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

---

...2..

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील बोरावले पार्टेवाडी ग्रामस्थांचे पुनर्वसन होणे

**मु.शी.**: पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील बोरावले पार्टेवाडी ग्रामस्थांचे पुनर्वसन होणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रायगड जिल्हयातील बोरावले पार्टेवाडी (ता. पोलादपूर) येथे दि. 25 जुलै 2005 ते 27 जुलै 2005 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे येथील घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत. शासन यंत्रणेकडून याची पाहणी करुन रितसर पंचनामे करण्यात आले आहेत. या बेघर झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी जागेची पाहणी देखील करण्यात आली आहे. परंतु आता दुसरा पावसाळा काही महिन्यांवर येत असताना देखील पुनर्वसनाबाबत कोणतीच कार्यवाही न झाल्याने या बेघर कुटुंबांनी कोठे आसरा घ्यावयाचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी या बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न त्वरित सुटण्यासाठी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे."

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:50

**पृ.शी.**: रत्नागिरी जिल्हयातील माजी सैनिक सोयीसुविधांपासून वंचित असणे

**मु.शी.**: रत्नागिरी जिल्हयातील माजी सैनिक सोयीसुविधांपासून वंचित असणे याबाबत श्री. विनोद तावडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यात माजी सैनिकांची संख्या ही बरीच आहे. महाराष्ट्राची परंपरा आहे की, देशाच्या संरक्षणासाठी आपले आयुष्य देण्यासाठी मोठ्या संख्येने युवक हे सैनिकांत भरती होत असतात. राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील सैन्य दलात काम करणारे सैनिक अनेक आहेत. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात माजी सैनिकांची संख्याही राज्यात सर्वात जास्त आहे. हे माजी सैनिक वर्षानुवर्षे अनेक सोयीसुविधांपासून वंचित राहिले आहेत. शासनाने सन 1965 व 1971च्या युध्दात सीमांचे संरक्षण करणा-या माजी सैनिकांना घरे बांधण्यासाठी सरकारी भूखंड देण्याची योजना आखली होती. रत्नागिरी जिल्ह्यातील 19 माजी सैनिक या योजनेसाठी पात्र आहेत. या माजी सैनिकांनी रत्नागिरी तालुक्यातील पोमेंडी (खुर्द) येथील सर्वे क्र. 71 मधील 19 भूखंड माजी सैनिक गृहनिर्माण सोसायटीला मिळण्याससाठी शासनाकडे 19 नोव्हेंबर 1988 रोजी मागणी केली होती. सदर सहकारी सोसायटी सरकारी दराप्रमाणे भूखंडाची किंमत शासकीय खजिन्यात जमा करेल, असे हमी पत्रही देण्यात आले. परंतु आजतागायत या माजी सैनिकांना सदर भूखंड देण्यासंदर्भात शासनाने कारवाई केली नाही. यासंदर्भात रत्नागिरी जिल्ह्यातील माजी सैनिकांमध्ये शासनाबद्दल तीव्र असंतोषाची भावना या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी सभागृहापुढे मांडत आहे. यावर शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी इच्छा मी प्रगट करतो.

-----

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सन 1993च्या मुंबई बॉम्बस्फोटासंबंधात राज्य शासनाने मंत्रालयात स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाची आवश्यकता नसणे

**मु.शी.**: सन 1993च्या मुंबई बॉम्बस्फोटासंबंधात राज्य शासनाने मंत्रालयात स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाची आवश्यकता नसणे याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधी सूचना मांडते.

"सन 1993च्या मुंबईतील दंगलीनंतर मुंबईत अनेक ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये अनेक माणसे मृत्यूमुखी पडली व अनेक जण जक्षमी झाले होते. त्यानंतर राज्य शासनाने मंत्रालयात एका नियंत्रण कक्षाची स्थापना केली व त्यामध्ये वर्ग-1, वर्ग-2, लघुलेखक व शिपाई विभागवार नियुक्ती तीन पाळयांमध्ये करुन दररोज व सुट्टीच्या दिवशी या नियंत्रण कक्षामध्ये बोलावले जात होते. त्यानंतर तीन पाळयांऐवजी दोन पाळया करण्यात आल्या. नियंत्रण कक्षात काम केल्यानंतर या अधिकारी/कर्मचा-यांना दुस-या दिवशी रजा दिली जाते. परंतु त्यामुळे ज्या विभागात हे अधिकारी/कर्मचारी काम करीत असतात ते त्यादिवशी अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या कक्षात ज्यांचे महत्वाचे काम असते त्यांची, मंत्रालयात आल्यानंतर फेरी फुकट जाते. याशिवाय या नियंत्रण कक्षाला मुंबई महापालिका, पोलीस मुख्यालय, भाभा रुग्णालय, मुंबईतील शासकीय रुग्णालय (जी.टी. व सेंट जॉर्जेस रुग्णालय) येथील कंट्रोल रुममधून मंबई व राज्यात त्या दिवशी घडलेल्या अप्रिय घटनेबाबत माहिती पुरविली जाते व ती माहिती माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, मुख्य सचिव यांना नियंत्रण कक्षातर्फे सादर केली जाते. त्यामुळे वास्तविक पाहता एकाच

. .5..


MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कामासाठी भिन्नभिन्न ठिकाणी व्यवस्था केली जात असल्यामुळे मंत्रालयातील नियंत्रण कक्षाची आवश्यकता नाही, असे वाटते."

सन 1993च्या मुंबईतील दंगलीनंतर मंत्रालयामध्ये नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली. त्या कक्षामध्ये दररोज मंत्रालयातील विविध अधिकारी, कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येते. या नियंत्रण कक्षाकडून राज्यामध्ये घडणा-या महत्वाच्या घटनांबाबतची माहिती पोलीस महासंचालक, नियंत्रण कक्ष, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई नियंत्रण कक्ष) व बृहन्मुंबई महानगरपालिका नियंत्रण कक्षाकडून प्राप्त करुन घेऊन ती माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव व संबंधित विभागाचे सचिव यांच्याकडे पाठविली जाते. त्यामुळे मंत्रालयातील या वेगळ्या नियंत्रण कक्षची आवश्यकता नाही.

मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना नियंत्रण कक्षामध्ये दिवस व रात्र या दोन्ही पाळयांमध्ये काम करावे लागते. त्यामुळे त्याचा कार्यालयीन कामकाजावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे माननीय सदस्यांना व नागरिकांना सदर अधिकारी किंवा कर्मचारी यांची भेट होत नाही. कारण त्यांना दुस-या दिवशी सुट्टी असते. महिला कर्मचा-यांना देखील मंत्रालयीन कक्षामध्ये 12 तासाचे काम दिले जाते. महिलांना देखील रात्रौ 8.00 वाजेपर्यन्त थांबावे लागते.

तसेच मंत्रालयीन कक्ष स्थापन केल्यापासून अद्यापपर्यन्त त्याचा कितपत उपयोग झाला आहे याचेही मूल्यमापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण एकाच कामाकरिता दुहेरी यंत्रणा राबविली जात आहे.

नियंत्रण कक्षासारख्या कामामध्ये पोलीस यंत्रणा प्रशिक्षित असल्यामुळे मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांऐवजी पोलीस यंत्रणेमार्फतच त्याचे कार्य चालविले जावे. सध्या सरकारी कर्मचा-यांची नवीन भरती बंद आहे त्यामुळे  या अधिकारी आणि कर्मचा-यांवर कामाचा फार बोजा पडतो. याबाबत शासनाने विचार करावा आणि हा नियंत्रण कक्ष बंद करावा असे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास सूचवित आहे.

---

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. शिगम 12:55

**पृ.शी.**: सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यात उजनी धरणामुळे प्रकल्पग्रस्त भागातील अर्धवट कामे पूर्ण न होणे

**मु.शी.**: सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यात उजनी धरणामुळे प्रकल्पग्रस्त भागातील अर्धवट कामे पूर्ण न होणे याबाबत .श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यातील उजनी धरणामुळे प्रकल्पग्रस्त भागात झालेल्या अर्धवट कामांमुळे माहे फेब्रुवारी,2006 वा त्या सुमारापर्यंत अनेक जणांना प्राणास मुकावे लागणे,केत्तूर क्रमांक दोनवरुन केत्तूर क्रमांक एकला जाण्यासाठी कोणताही रस्ता उपलब्ध नसणे,परिणामी धोका पत्करुन लोहमार्गाच्या जवळच्या भरावावरील पायवाटेने सायकल व मोटारसायकलवरुन अनेक जण जात असणे,सदरहू पायवाटेने जात असताना प्रसंगी समोरुन रेल्वे आल्यावर घाबरुन पायवाटेने प्रवास करणारे उजनी जलाशयात उडी घेणे त्यातच त्याचा मृत्यू होणे,उपरोक्त अपघात नेहमीच होत असून शासनाकडे तक्रारी करुनही अद्यापपर्यंत कोणतीच दखल घेण्यात न येणे,यामुळे जनतेला नेहमीच मृत्यूच्या सावलीत वावरायला लागणे,याबाबत शासनाने त्वरित उपाययोजना करुन तेथील जनतेला सहकार्य करावे याकरिता ही बाब सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना देण्यात येत आहे.

----

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे जिल्हयातील तानसा,वैतरणा आणि भातसा धरणासाठी जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला न मिळणे.

**मु.शी.**: ठाणे जिल्हयातील तानसा,वैतरणा आणि भातसा धरणासाठी जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला न मिळणे याबाबत.श्री. अनंत तरे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अनंत तरे(रायगड,रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था)) सभापती महोदय,मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ठाणे जिल्हयातील तानसा,वैतरणा आणि भातसा या धरणासाठी मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या गेल्या असताना त्यांच्या पुनर्वसनासाठी आजपर्यंत ठोस उपाययोजना न केल्यामुळे या विषयासंबंधात मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

सभापती महोदय, कोयना धरणासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आज सुध्दा प्रलंबित आहे. आतापर्यंत असा एकही मुख्यमंत्री झाला नाही की ज्याच्या कार्यकाळात या प्रश्नाचा उल्लेख झालेला नाही. ठाणे जिल्हयाती तानसा,वैतरणा आणि भातसा या प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या त्यांचे पुनर्वसन झालेले नाही आणि जमिनीबद्दल मिळणारा मोबदला देखील अद्याप मिळालेला नाही. अनेक वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. या धरणांचे पाणी मुंबई शहराला दिले जाते. परंतु ठाणे जिल्हयातील ज्या शेतकऱ्यांनी या धरणांसाठी आपल्या जमिनी दिल्या त्या ठाणे जिल्हयातील शेतकऱ्यांना मात्र पाणी दिले जात नाही. प्रत्येक वेळी हा प्रश्न सदनामध्ये चर्चेला येतो. गेल्या आठवडयात हा प्रश्न चर्चेला आला असताना पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी समिती नेमली आहे असे सांगितले. समितीने सुध्दा या शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग केलेला आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी आणि घरे प्रकल्पात जातात आणि तो वाऱ्यावर राहतो. मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी आणि शेती या प्रकल्पासाठी संपादित केलेली आहे त्यांना न्याय मिळावा आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे.

....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत</u>**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या ज्या सूचना आम्ही सदनामध्ये मांडतो त्याला शासनाकडून 30 दिवसात उत्तर आले पाहिजे. गेल्या हिवाळी अधिवेशनात याबाबत चर्चाही झालेली होती. गेल्या तीन अधिवेशनात ज्या विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या त्याची उत्तरे आलेली नाहीत. याबाबत एकदा आढावा घ्यावा. विशेष उल्लेखाच्या सूचनांची उत्तरे 7-8 महिने येत नाहीत. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, यासंबंधी एकदा आढावा घेण्यात यावा.

**सभापती** : या विषयाच्या बाबतीत मी स्वत: संसदीय कार्य विभागाला सूचना दिलेल्या आहेत. तसेच संसदीय कामकाज मंत्री यांच्याबरोबर माझी याबाबत चर्चाही झालेली आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी याबाबतीत माझे लक्ष वेधले आहे. विशेष उल्लेखाच्या सूचनांना कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत शासनाकडून उत्तर आले पाहिजे. याबाबतीत आतापर्यंत कोणत्या सूचनांना उत्तरे आली नाहीत आणि कोणत्या सूचनांना उत्तरे आली याची माहिती घेतो. सदनाच्या कामकाजाच्या नियमामध्ये विशेष उल्लेखाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. हे नियम जर पाळले जात नसतील तर नियमानुसार काय करता येईल ते मी पाहतो.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 1.30 वा. पुन: भरेल.

( 12.49 ते 1.30 मध्यंतर )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. कानडे..... 13:30

**( मध्यंतरा नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होत आहे, परंतु सभागृहात संबंधित विभागांचे बरेच मंत्री महोदय उपस्थित नाहीत. त्यात काही मागण्या अशा आहेत की, त्यामध्ये धोरणात्मक बाबी येतात. म्हणून त्या त्या विभागाच्या मंत्र्यांनी येथे उपस्थित असणे आवश्यक आहे. म्हणून आमची विनंती आहे की, सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी.

**सभापती** : ज्या मंत्री महोदयांच्या आज पुरवणी मागणी या सभागृहात आहेत त्याच मंत्र्यांचे कामकाज खालच्या सभागृहात देखील आहे, अशी अडचण निर्माण झालेली आहे. म्हणून आपण चर्चा सुरु करावी. या ठिकाणी काही मंत्री महोदय त्यांच्या वतीने बसलेले आहेतच, ते त्यासंबंधीची नोंद घेतील.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्री येथे येऊन गेले. ते बाकीच्या मंत्र्यांना पाठवित आहेत. त्यामुळे मागण्यांवरील चर्चा सुरु करण्यास हरकत नाही.

**सभापती** : ठीक आहे. माननीय विरोधी पक्षनेते आता चर्चेला सुरुवात करतील.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, आज विधानसभेमध्ये नियम 293 अन्वये विजेच्या संदर्भात चर्चा आहे आणि याच काळात या सभागृहात देखील पुरवणी मागण्यांवर उर्जा विभागाची चर्चा सुरु असेल. या पुरवणी मागण्यांमध्ये 47 लाखाची एक मागणी आहे आणि दुसरी मागणी बाब क्र. 125 व 126 च्या माध्यमातून सबसिडी टू डिस्ट्रीब्युशन ॲग्रीकल्चर आणि पॉवरलूमसाठी जी सबसिडी दिलेली आहे त्यात अनुक्रमे 193 आणि 573 कोटी अशा मागण्या आहेत. मागील वर्षी जी सबसिडी शासनाच्या वतीने वितरण कंपनीला द्यावयाची होती त्यासाठी या मागणीच्या रुपाने तरतूद केली आहे. ही बाब या मागण्यांच्या रुपाने सभागृहाच्या निदर्शनास आणलेली आहे. विजेच्या संदर्भात जर सभागृहामध्ये चर्चा करावयाची असेल तर माझी हरकत नाही परंतु या निमित्ताने मी या मागण्यांबाबत थोडक्यात वस्तुस्थिती सांगितली. या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : मी सभागृहाचे आभार मानतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रावर चर्चा.

**सभापती** : माननीय सदस्यांना हे माहितच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चा आज दिनांक 23 मार्च, 2006 रोजी घ्यावयाचे ठरविले आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून, मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व उद्याकरिता असलेल्या बाकीच्या सर्व मागण्यांवरील चर्चा उद्या पूर्ण करावी लागेल.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या.**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1. गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. बी-1, बी-4, बी-5
2. महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. सी-1, सी-2, सी-3 व सी-4, सी-10,
3. ग्रामविकास विकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. एल-4, एल-5,
4. सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.सी-5.
5. परिवहन, बंदरे व विमुक्त,भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.बी-3.
6. पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. ओ-3,
7. वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.व्ही-3
8. उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.के-3, के-5, के-9

9) ऊर्जा (अपारंपारिक उर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक विभागाच्या पूरक मागण्या क्र.के-1, के-6,

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ........

10. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.आर-1, आर-2,

11. सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.एन-1, एन-4,

12. राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.बी-2.

.......4

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांबर बोलत असतांना प्रामुख्याने मी बाब क्र. 186, पृ.क्र.165 वरील मागणी क्र. व्ही-5 बाबत बोलणार आहे.

सभापती महोदय, या मागणीमध्ये कापूस उत्पादकांना सहाय्य करण्यासाठी व्याजासह भांडवल निर्मिती निधीमधून शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या निधीची रक्कम परत करण्याचे शसनाने ठरविले आहे. ही रक्कम जवळपास 768 कोटीची असून त्यापैकी फक्त 350 कोटी एवढीच रक्कम शासन देणार आहे. ज्यावेळी नागपूर येथील अधिवेशनामध्ये शासनाने पॅकेज जाहीर केले त्यावेळी शासनाने जाहीर केले होते की, ही रक्कम मार्चपूर्वी देण्यात येईल. तसेच या रकमेवर 12 टक्के व्याज देऊ असेही आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते परंतु या मागणीमध्ये व्याजाचा कुठेही उल्लेख दिसून येत नाही, यासंबंधीचा उल्लेख मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये केला तर बरे होईल. उर्वरित 418 कोटीची जी रक्कम आहे ती शासनाकडे बाकीच आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी केलेले अंदाजपत्रकीय भाषण मी ऐकले आणि वाचले परंतु त्यामध्ये या निधीबाबत कुठलाही उल्लेख नाही. याचा अर्थ अर्धी रक्कम देऊन शासन थांबणार काय ? याचाही खुलासा करणे आवश्यक आहे. आपण शेतकऱ्यांना शब्द दिलेला आहे की पूर्ण रक्कम 12 टक्के व्याजाने परत करणार आहोत पण या पुरवणी मागणीच्या रुपाने केवळ 350 कोटी एवढीच मागणी करण्यात आली व त्यात 12 टक्के व्याजाचा कुठेही समावेश दिसून येत नाही. म्हणून उर्वरित रकमेचे काय करणार आहात याचा खुलासा झाला पाहिजे.

महोदय, सन 1972 म्हणजेच कापूस एकाधिकार खरेदी योजनेसंबंधीचा कायदा ज्यावेळी आपल्या राज्यात अंमलात आला त्या वर्षापासून शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी ही कापूस एकाधिकार खरेदी योजना चालू आहे. दीड वर्षापासून या योजनेची मुदत संपलेली आहे. यापुढे सरकार ही योजना सुरु ठेवण्याबाबत काय करणार आहे ? गेल्या तीन अधिवेशनांपासून आम्ही अशी मागणी करीत आहोत की कच्चा कापूस पणन कायदयासंबंधीचे बिल या सभागृहात आणावे पण प्रत्येक अधिवेशनामध्ये शासनाकडून त्याबाबत टाळाटाळ केली जात आहे. म्हणून आम्हाला असा संशय येतो की शासन ही योजना बंद करायला निघाले की काय ? ही योजना शासनाने बंद केली आहे काय? कारण प्रत्येक वेळेस थातुरमातूर उत्तरे दिली जातात. मागील अधिवेशनात यासंबंधी विचारले असता विधि व न्याय विभागाकडे विचारणा करण्यासाठी सदर विधेय पाठविले असल्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

सांगण्यात आले होते. अद्यापही त्याबाबत खुलासा करण्यात आला नाही. गेल्या 32 वर्षांपासून सुरु असलेली व शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक असलेली योजना एकदम शासन मोडीत काढणार आणि शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार आहे काय? कारण शासन शेतकऱ्यांकडून कपात केलेली रक्कम परत करायला निघाले आहे. कारण या कायदयामध्ये असा उल्लेख आहे की, 3 टक्के रक्कम जी कपात करण्यात आलेली आहे ती कापूस एकाधिकार खरेदी योजनेसंबंधीचा कायदा चालू असेपर्यंत शेतकऱ्यांचे जमा राहतील आणि ज्यावेळी ही रक्कम शासन परत करेल त्यावेळी आम्हाला अशी शंका येते की या योजनेचे भवितव्य अंधारात आहे की काय ? अशा प्रकारे शासन राज्यातील 50 लाख शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार आहे काय याचा खुलासा उत्तरामध्ये झाला पाहिजे. तसेच या अधिवेशनामध्ये या कच्चा कापूस पणनसंबंधीचे विधेयक शासन आणणार आहे काय ? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्र.179 वर बोलणार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी एक विशेष पॅकेज डिसेंबर महिन्यामध्ये शासनाने घोषित केले. अमरावती,अकोला, वाशिम, बुलढाणा, वर्धा या सहा जिल्हयांचा समावेश या पॅकेजमध्ये केला. या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी तसेच व्याज माफ करण्यासाठी शासनाने पैसे मागितले आहेत. विदर्भातील फक्त सहा जिल्हयांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. तेव्हा उर्वरित जिल्हयांचे काय ? तेथील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत असे शासनाला म्हणावयाचे आहे काय? आज राज्यात कापूस पिकविणारे 16 जिल्हे आहेत. परंतु, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे गेल्या चार वर्षात कापूस उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्याला पैसे मिळालेले नाहीत. त्याच्या मालाला भाव मिळालेला नाही. एवढेच नव्हे तर पैशाची परतफेडसुध्दा झालेली नाही. म्हणूनच आज राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यामुळेच शासनाने कर्ज मार्फ करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय राज्यातील सर्व कापूस उत्पादक जिल्हयांना लागू होणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे. शासनाने कर्जाची पुनर्रचना करण्याचे अभिवचन दिले आहे. कर्जाचे समान हप्ते शासन पाडणार आहे. त्यावरील व्याज शासन माफ करणार आहे. शेतकऱ्याला रुपये 25000/- पर्यंतचे कर्ज राष्ट्रीय आणि सहकारी बँकेमार्फत दिले जाणार आहे. या कर्ज वितरणाला राष्ट्रीयकृत बँका किती प्रतिसाद देतात हे पहावे लागेल. राष्ट्रीयकृत बँका शासनाचा आदेश पाळणार आहे काय ? एखादा शेतकरी राष्ट्रीयकृत बँकेत कर्ज मागण्यासाठी गेला आणि त्या शेतकऱ्याच्या गावातील एखादा शेतकऱ्याने जरी कर्ज थकविले असेल तर बँक त्या गावातील कोणत्याही शेतकऱ्याला कर्ज देत नाही, हा आतापर्यंतचा अनुभव आहे. शासन कर्जाची मदत कशा प्रकारे करणार आहे ? शासन शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड देणार आहे काय ? शासन कशा पध्दतीने कर्ज देणार आहे याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. यासाठी शेतकऱ्याला पुन्हा आपली जमीन गहाण ठेवावी लागणार आहे काय ? शेतकऱ्याला विनाजामीन कर्ज देणार आहे काय ? यासंबंधी शासनातर्फे खुलासा होणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2.

श्री.पांडुरंग फुंडकर...

यानंतर मी पान क्र.148 वरील बाब क्र.167 वर बोलणार आहे. राज्यातील विविध शासकीय वैद्यक महाविद्यालयांसाठी यंत्रसामग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मागच्या अधिवेशनामध्ये नागपूर मेडिकल कॅालेज किंवा इंदिरा मेडिकल कॉलेज, नागपूर संबंधीची चर्चा उपस्थित झाली होती. त्यावेळी MIR मशीन नागपूर मधील कुठल्याही शासकीय रूग्णालयात नसल्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. विदर्भातील रूग्णांना MIR टेस्ट करावयाची असेल तर त्यासाठी त्यांना मुंबईला यावे लागते. सदर मशीन उपलब्ध करून देण्यात येईल असे शासनातर्फे सांगण्यात आले होते. परंतु, अद्यापपर्यंत ते उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. सदर मशीन शासन उपलब्ध करून देणार आहे काय ? विदर्भातील भंडाऱ्यापासून बुलढाणयापर्यंतच्या सर्व रुग्णांना MIR ची तपासणी करण्यासाठी मुंबईला यावे लागते. तेव्हा यासंबंधी मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे भाषण पूर्ण करतो.

...

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( **सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी** )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आज अनेक विभागांच्या पुरवणी मागण्या चर्चेला असल्या तरी, केवळ गृह विभागाची बाब क्र.12 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, गृह विभागाच्या बाब क्र.12 च्या अनुषंगाने पोलिसांचे गणवेष खरेदी करण्याकरिता 11 कोटी 77 लाख 74 हजार रुपये अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. महोदय, लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर गेली तीन-चार वर्षे केंद्र सरकारकडून पोलिसांच्या सोयी-सुविधांसाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तेवढीच मॅचिंग ग्रँट राज्य सरकारमार्फत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यातून आज पोलिसांना गणवेष उपलब्ध करुन दिला जातो, हत्यारे उपलब्ध करुन दिली जातात, बूट उपलब्ध करुन दिले जातात. परंतु आज पोलिसांसमोर घरांचा मोठा प्रश्न आहे. कारण आजही अनेक पोलिस कर्मचारी झ ोपडपट्टयांमध्ये राहत आहेत. एका बाजूला पोलिस विभागाकडे निधी आहे, परंतु त्या निधीचा योग्य प्रकारे वापर होताना दिसून येत नाही. त्यामुळे याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

महोदया, पोलिसांना शासनामार्फत बूट उपलब्ध करुन दिले जातात. गणवेष उपलब्ध करुन दिला जातो. परंतु या खरेदी व्यवहारामध्ये आज मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. पोलिसांना/अधिकाऱ्यांना, त्यांना मिळत असलेल्या वस्तूंबाबत विचारले असता, ते सांगतात की, आम्हाला शासनाकडून जे बूट दिले जातात ते केवळ एका वर्षाने खराब होतात, एका वर्षानंतर ते बूट टाकून देण्याच्या लायकीचे असतात. महोदय, पोलीस विभागामध्ये बूट खरेदी करीत असताना कोणत्याही प्रकारचे क्वालिटी कंट्रोल मेंटेन केले जात नाही. बूट खरेदीची ऑर्डर कोणालाही दिली जाते. लिडकॉम या संस्थेला किंवा कानपूर येथील संस्थेला सुध्दा या खरेदीची ऑर्डर दिली जाते. त्यामुळे माझी मागणी आहे की, पोलिसांना जो काही निधी निरनिराळया कामांसाठी उपलब्ध करुन दिला जातो, तो निधी खरोखरच त्या कामांवर खर्च होतो किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसून येत नाही. पूर्वी पोलिसांना हाफ पँट-शर्ट असा ड्रेस

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

असायचा. तसेच त्यांचा शर्ट इन केलेला असायचा. पोलिसांनी उघडे पाय दाखवू नयेत म्हणून, त्यांना फुलपँट देण्यात आली. परंतु मी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने शासनाला विचारु इच्छितो की, किती पोलिसांना आपण असे युनिफॉर्म दिलेले आहेत ? ते युनिफॉर्म स्वच्छ असतात काय ? कारण आजचा असा अनुभव आहे की, पोलीस कर्मचाऱ्यांचे युनिफॉर्म दोन-दोन, चार-चार दिवस धुतलेले नसतात. त्यामुळे या प्रकारामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. शासनाने गृह विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या सदनासमोर मांडल्या आहेत त्यांचे मी जरुर समर्थन करतो. परंतु त्याच बरोबर या विभागामध्ये ज्या काही उणिवा आहेत त्या शासनाने भरुन काढल्या पाहिजेत अशी मागणी करतो. या क्षेत्रामध्ये शासनाने चांगली व्यवस्था निर्माण करावयास पाहिजे असे मला वाटते. पोलीस विभागाला जो निधी मिळतो त्या निधीचा चांगल्या प्रकारे वापर झाला पाहिजे अशा प्रकारची पुन्हा एकदा मागणी करतो. आपण मला या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन, दिल्याबद्दल आपले आभार मानून, माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गृह विभागाचे मंत्री अनुपस्थित असल्याबाबत.**

श्री.अनंत तरे. : सभापती महोदया, आज सन 2005-2006 वरील पुरवणी मागण्यांवर चर्चा होत आहे. आज अतिशय महत्वाच्या विभागांवरील मागण्यांवर चर्चा होत असताना, गृह विभागाचे मंत्री अथवा राज्यमंत्री यापैकी कोणीही सदनामध्ये उपस्थित नाही. त्यामुळे या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य ज्या काही बाबी उपस्थित करतील त्यांना कोण उत्तर देणार आहे ?

( गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांचे सभागृहात आगमन होते.)

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, गृह राज्यमंत्री माननीय श्री.सिध्दाराम म्हेत्रे हे नुकतेच सदनामध्ये आलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

नंतर श्री.कांबळे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.**: सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरु ....

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, गृह खात्याच्या पृष्ठ क्रमांक 15, बाब क्रमांक 19, मंजूर अनुदानहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान यावर मी बोलत आहे. सभापती महोदय, शनिवारवाड्याच्या सुशोभिकरणासाठी 3 कोटी 61 लाख रुपये एवढा निधी वापरला जाणार आहे. सभापती महोदय, शनिवारवाड्याचे सुशोभिकरण ही अतिशय चांगली गोष्ट आहे. इतकी वर्षे याकडे झालेले दुर्लक्ष अक्षम्य आहे. मला आठवते की, दोन वर्षांपूर्वी आम्ही शिवनेरीला भेट दिली होती. त्यावेळी शिवनेरी किल्ल्याची परिस्थिती एवढी भयानक होती की, दुरुस्तीच्या कामासाठी केंद्र सरकारने 10 कोटी रुपये मंजूर केले होते. आम्ही त्यावेळी समितीवर सदस्य म्हणून असल्यामुळे त्या संदर्भात काही शिफारशी केल्या होत्या. सभापती महोदय, आपणही त्या समितीवर होता. सभापती महोदय, त्या शिफारशीनुरुपच यावर्षी 3 कोटी 61 लाख रुपये खर्च करण्यात येत आहेत. एकंदर खर्चाचा विचार केला तर हा निधी अगदीच अपुरा आहे. सभापती महोदय, शिवनेरीकडे जाणाऱ्या रस्त्यांची परिस्थिती अत्यंत भयानक आहे. तेथील रस्ते जोपर्यंत चांगले होत नाहीत तोपर्यंत तेथे जाणाऱ्या लोकांचे लोंढे वाढणार नाहीत. जोपर्यंत पर्यटक तिकडे मोठ्या संख्येने जात नाहीत तोपर्यंत ऐतिहासिक वास्तूचे महत्व वाढत नाही. दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हणजे तेथील परिसरात वनीकरण होण्याची नितांत गरज आहे. आम्ही समितीवर सदस्य असताना या कामांची जबाबदारी समितीसमोर निरनिराळ्या लोकांना बोलावून टाकली होती. परंतु प्रत्यक्षात जी चालना मिळायला पाहिजे होती, ती मिळत नाही. आता या निधीतून सुशोभिकरणाचे काम, दुरुस्तीचे काम जास्त वेगाने होईल असे वाटू लागले आहे. 3 कोटी 61 लाख रुपयांची ही तरतूद कमी असली तरी शासनाने केलेल्या तरतुदीचे मी स्वागत करतो. माझ्या मते किमान पाच कोटी रुपयांची व्यवस्था केली असती तर या गोष्टीला अजून काही तरी आकार येऊ शकला असता. दुसरी गोष्ट बाब क्रमांक 17, महागाई भत्त्या संबंधीची आहे, ती ठीक आहे. अतिरिक्त अनुदान. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 16 तुरुंग विभागाशी संबंधित आहे. सभापती महोदय, श्री. काकडे नावाच्या

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

इन्स्पेक्टरचा तुरुंगात आकस्मिक मृत्यू झाला होता. तो मृत्यू कोणत्या गोष्टीमुळे झाला ? त्या प्रकरणाची चौकशी झाली का ? त्याला कोणत्या कारणास्तव कारागृहात ठेवले ? त्यानंतर त्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली का ? याबाबतची कोणाताही खुलासा शासनाकडून करण्यात आलेला नाही. तरी, या संबंधी आता खुलासा करण्यात यावा.

सभापती महोदय, माझा पुढील विषय पृष्ठ क्रमांक 162 वरील आहे. सदर विषय कापूस एकाधिकाराच्या संदर्भात आहे. सभापती महोदय, या समितीचे पुढे काय होणार आहे ? त्यासाठी निधी उपलब्ध केला आहे. अल्प मुदतीच्या पीक कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य रुपये 55 कोटी 44 लक्ष 59 हजार रुपये या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब बोलले होते. तोच प्रश्न मला येथे उपस्थित करावयाचा आहे की, कापूस एकाधिकार कायदा संपून दोन वर्षे झाली.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अद्याप अस्तित्वात आहे अशी माहिती आहे. कापूस एकाधिकार कायदा संपल्यानंतर समिती अस्तित्वात कशी काय राहू शकते हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. ती योजना चालू ठेवलेली आहे. परंतु कायदा संपलेला आहे, कायदा संपलेला असेल तर त्यास विधिमंडळामध्ये मान्यता घ्यावयास पाहिजे ही मान्यता अद्याप शासनाने घेतलेली नाही. याचाच अर्थ सरकारला कापूस एकाधिकार समिती बंद करावयाची आहे काय ? जर बंद करावयाची असेल तर तसे स्पष्ट करावयास पाहिजे, त्यासंदर्भातील निर्णय सरकार का घेत नाही. आपण शेतकऱ्यांची दिशाभूल करीत आहोत. त्यांची दिशाभूल करुन मते मागायची व त्यांना नंतर देशोघडीला लावण्याचे काम या सरकारने केलेले आहे. हे असे करणे योग्य आहे काय ? मोफत विजेचा प्रश्न असो, कापसाचा प्रश्न असो, सरकारने निवडणुकीच्या अगोदर सांगितले होते की, आम्ही वीज मोफत देऊ, शेतकऱ्यांना कर्ज माफी देऊ, परंतु निवडणुका झाल्या व सरकार सत्तेवर आल्यानंतर दिलेली आश्वासने सरकार विसरुन गेले. पणन महासंघाच्या संदर्भात एकाधिकार समितीचा जो कायदा आहे तो संपलेला आहे तो कायदा परत पुनर्स्थापित करावयाचा असेल तर त्यासाठी सदनामध्ये स्पष्ट विधेयक आणावे लागेल. मतदारांची व शेतकऱ्यांची दिशाभूल आपण केलेली आहे ती थांबवावी. एक तर सदर योजना चालू तरी ठेवावी किंवा बंद तरी करावी, परंतु हे सांगण्याचे धाडस या शासनाने केलेले नाही, ते त्यांनी करावे. कापूस एकाधिकार समितीच्या संदर्भातील जे भाग-भांडवल होते ते 3 टक्के व्याजाने वसूल केलेले आहे त्याचा परतावा करण्यासाठी ही पुरक मागणी सादर करण्यात आलेली आहे, त्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. तरतूद करतांना जो पैसा वसूल केलेला आहे तो परत देण्याचा निर्णय ज्याअर्थी घेण्यात आलेला आहे, त्याचाच अर्थ ही योजना बंद करण्याचा शासनाचा विचार आहे काय ? याबद्दलचा खुलासा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करावा. अशा प्रकारची विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी व त्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्रमांक 15 पृष्ठ क्रमांक 14-सेक्रेटरिएट- सर्वसाधारण सेवा. गृह विभागातील पोलीस दलावर महागाई भत्त्याच्या दरात झालेली वाढ व प्रवास खर्च यासाठी तरतूद करण्यासाठी ही पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. त्यासाठी 13,76,000/- रुपयांची पूरक मागणी या विभागाने मागितलेली आहे. या बाबीला समर्थन देत असतांना गृह खात्याच्या संदर्भात काही त्रुटी आहेत त्या त्रुटीकडे आपल्या माध्यमातून संबंधित विभागाचे लक्ष वेधण्याचा माझा प्रयत्न आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 14:00

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

जे पोलीस अधिकारी असतात, त्यामध्ये आय.पी.एस. च्या नॉमिनेशनसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाच्या माध्यमातून झोन ऑफ कन्सेडरेशनमध्ये जे अधिकारी येतात त्या अधिका-यांची नावे आय.पी.एस. च्या पदोन्नतीसाठी यु.पी.एस.सी. कडे पाठवली जातात. या संदर्भामध्ये मी सांगू इच्छितो की, आपल्या महाराष्ट्रामध्ये एक मागासवर्गीय महिला पोलीस अधिकारी झोन ऑफ कन्सेडरेशनमध्ये येत असताना सुध्दा त्या महिलेचे नाव आय.पी.एस. च्या पदोन्नतीसाठी पाठवण्यात आले नाही. अशाप्रकारे केवळ मागासवर्गीय असल्यामुळे त्या महिला पोलीस अधिका-याला तिच्या हक्कापासून वंचित ठेवले असेल तर ही बाब आमच्या पुरोगामी राज्य शासनाला न शोभणारी आहे. याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 17, पान क्र,15 गृह विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, मध्यवर्ती तुरुंगासाठी रु.3,83,28,000 एवढया रकमेची तरतूद करण्यात आली आहे. तुरुंगाच्या संदर्भात काल-परवा जे प्रकरण घडले.....तुरुंगामधील आरोपी मोबाईलचा सर्रासपणे वापर करतात, यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. याबाबत अनेक प्रयत्न होऊन सुध्दा सुधारणा होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा तुरुंगामधील आरोपी .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आताच या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी तुरुंगाच्या संदर्भात काल-परवा प्रकरण घडल्याचा उल्लेख केला आहे. ते कोणते कुठले प्रकरणाबाबत माहिती देत आहेत, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे सविस्तर माहिती देत आहेत.

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

प्रा.जोगेंद्र कवाडे : बाब क्रमांक 17, पान क्र,15 गृह विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, मध्यवर्ती तुरुंगासाठी रु.3,83,28,000 एवढया रकमेची तरतूद करण्यात आली आहे. त्याचे समर्थन करीत असताना माझी अशी विनंती आहे की, अनेक तुरुंगासाठी उपाययोजना करुन सुध्दा तरुंगातील आरोपींना मोबाईलचा वापर करणे अशा अनेक प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. ही अतिशय चिंताजनक बाब आहे. असे प्रकार भविष्यात घडू नये यासाठी गृह विभागाने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे, असे मी या माध्यमातून सांगू इच्छितो.

23-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 14:00

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

बाब क्रमांक 178, पान क्र,162 सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, सन 2002-03 व 2003-04 या वर्षांमध्ये बागायती पिकांच्या देखभालीसाठी शेतक-यांनी कर्ज घेतले होते. परंतु अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे बागायती पिके पूर्णपणे नष्ट झालेली आहेत. शेतक-यांनी पिकांच्या देखभालीसाठी रासायनिक खतांसाठी, सिंचनासाठी, पेस्टीसाईडसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम प्रदान करण्याकरिता, बागाईतदार शेतक-यांच्या हितासाठी लाक्षणिक प्रकारची पुरवणी मागणी करण्यात आली याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 127, पान क्र,107 उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, मोठया व मध्यम उद्योगांना प्रोत्साहक सवलतीच्या योजनेच्या अर्थसहाय्याचा अनुशेष दूर करण्यासाठी 2,08,13,000 रुपयांची तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. यामुळे मोठया व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन मिळेल असे मला वाटते.

बाब क्रमांक 132, पान क्र,108 गृह विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई येथील कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी रु.2,00,59,000 एवढया रकमेची तरतूद करण्यात आली आहे. कामगारांना कार्यक्षम करणे, सक्षम करण्याचे काम कामगार आयुक्तांकडेच आहे. कामगारांच्या हितासाठी अनेक कायदे आहेत, यासाठी कामगार आयुक्त तसेच लेबर कोर्ट कार्यरत आहेत.

( यानंतर श्री.सुंबरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

परंतु हा संपूर्ण कामगार विभाग कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याऐवजी मालक आणि भांडवलदार वर्गाचे हित जपण्याकडे जास्त लक्ष देतो असे म्हटले जाते. त्यामुळे कामगार आयुक्त कार्यालय या पूरक मागणीमुळे जास्तीत जास्त कार्यक्षमतेने कामगार हिताच्या दृश्टीने कार्य करील अशी अपेक्षा मी येथे व्यक्त करतो.

सभापती महोदय, पृष्ठ 174, बाब क्रमांक 191 ही उच्च व तंत्रशिक्षण विभागाची पूरक मागणी आहे. 1990-91 पासून उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने पुणे विद्यापीठात महिला अभ्यास केंद्र कार्यरत आहे. हे महिला अभ्यासकेंद्र अधिक कार्यक्षम करण्यासाठी ही तरतूद या ठिकाणी करण्यात आली आहे त्यामुळे हे केंद्र यापुढे महिलांच्या प्रगतीसाठी जास्त प्रयत्न करील असे मला वाटते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य आणि विशेष सहाय्य विभागाची पृ.126 वरील बाब क्र.152 - या पूरक मागणीबद्दल मी शासनाचे विशेष अभिनंदन करीन. कारण मागासवर्गीय मुलामुलींसाठी जी शासकीय वसतिगृहे आहेत त्यांची कमतरता सातत्याने जाणवते आहे. त्यामुळे शहराच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेत असताना मागासवर्गीय मुला-मुलींना राहण्याची कोणत्याही प्रकारची सोय नसते. त्या दृष्टीकोनातून मागासवर्गीय मुला-मुलींसाठी वसतिगृहांचे बांधकाम करण्यासाठी जी पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. नासिक, अमरावती व औरंगाबाद येथे ही वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. तेव्हा या निमित्ताने माझी अशी सूचना राहील की, केवळ नासिक,अमरावती व औरंगाबाद या शहरातच नाही तर प्रत्येक जिल्हा स्तरावर अशा प्रकारची उत्कृष्ट व अद्यावत शासकीय वसतिगृहे मागासवर्गीय मुला-मुलींसाठी निर्माण केली जावीत जेणेकरून आजच्या स्पर्धायुगामध्ये ही मागासवर्गीय मुले विविध स्पर्धांमध्ये उभी राहतील, तोंड देऊ शकतील. त्यासाठी या पूरक मागणीचे मी येथे समर्थन करतो.

सभापती महोदय, पृ.157, बाब क्रमांक 174 - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज देण्यासाठी ही पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. राज्यातील पर्यावरणाच्या दृष्टीने प्रदूषण नियंत्रण मंडळ महत्त्वाचे आहे. पर्यावरणाशी संबंधित अशा ज्या ज्या बाबी आहेत, मग ते पाण्याचे प्रदूषण असेल, हवेतील प्रदूषण असेल वा अन्य कोणत्याही प्रकारचे प्रदूषण असेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम हे मंडळ करीत असते. या मंडळातील

...... डीडी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज देण्यासाठी ही तरतूद केलेली आहे ती योग्य अशीच आहे. यापुढे राज्यातील पर्यावरणाच्या दृष्टीने जास्तीत जास्त कार्यक्षमतेने हे मंडळ आणि त्यातील कर्मचारी काम करतील अशी मी अपेक्षा करतो. सध्या जे औद्योगिक प्रदूषण सुरू आहे, विशेषत: ठाणे-बेलापूर पटट्यामध्ये जे कारखाने आहेत त्यांच्याद्वारे हे प्रदूषण होते त्यावर योग्य प्रकारे नियंत्रण करण्यासाठी या मंडळाकडून प्रयत्न होतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, त्यानंतर पृष्ठ 157, बाब क्र.175 - एका अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी, महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीवरील मॅनग्रोव्हज्चे म्हणजेच तिवराचे सर्वेक्षण करण्यासाठी ही पूरक मागणी येथे करण्यात आली आहे. राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील तिवरांचे संरक्षण करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले असून त्यामध्ये या तिवरांचे तपशीलवार सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहत. महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लिकेशन सेंटर मार्फत हे सर्वेक्षण केले जावे असेही सांगितले आहे. त्यासाठी हाय रेझोल्यूशन सॅटेलाईट या सामग्रीचा वापर करून याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने या पूरक मागणीद्वारे 20 लाख रूपयांची मागणी केली आहे. त्यामुळे निश्चितपणे या तिवरांचे संरक्षण करण्यात येऊन पर्यावरणाचा तोल किमान समुद्रकिनार पट्टीमध्ये तरी सांभाळला जाईल असे वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ 139, बाब क्र.162 - मुफसल क्षेत्रात रूग्णालये आणि दवाखाने यातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात झालेली वाढ आणि थकबाकीसाठी ही तरतूद केली आहे त्याबद्दल स्वागतच केले पाहिजे.

( यानंतर श्री. सरफरे ..... इइ 1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

परंतु मुफसल क्षेत्रामध्ये, ग्रामीण भागामध्ये जी ग्रामीण रुग्णालये आहेत त्यासंबंधी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी ज्या गोष्टींचा उल्लेख केला त्याकडे मी आपले लक्ष वेधतो. सभापती महोदय, नागपूरच्या हिंगणा तालुक्यामध्ये एका अद्ययावत ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्रीमती विमल मुंदडा यांच्या उपस्थितीमध्ये केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या हस्ते करण्यात आले. त्या समारंभाच्यावेळी माननीय केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल व इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती. त्याठिकाणी अद्ययावत ग्रामीण रुग्णालय सुरु झाले असले तरी एम.आर.आय. ची सोय नाही. त्यामुळे इतकी महागडी सेवा ग्रामीण भागातील गरीब ग्रामस्थांना आज उपलब्ध होत नाही. संपूर्ण विदर्भातील कोणत्याही ग्रामीण रुग्णालयामध्ये एम.आर.आय. ची व्यवस्था नाही. एम.आर.आय. काढण्यासाठी जर खाजगी रुग्णालयामध्ये जावे लागले तर त्याचा गरीब ग्रामस्थांना भुर्दंड सोसवत नाही. त्याकरीता ग्रामीण रुग्णालयांमध्ये एम.आर.आय. ची व्यवस्था करता आली तर निश्चितपणे करावी अशाप्रकारची सूचना करतो. आणि आपण मला बोलण्याकरीता संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन या पूरक मागण्यांना माझे समर्थन देतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भाषण सुरु करावे...

श्री. मधुकर चव्हाण (बसून) : सभापती महोदय, माझे नाव आपणाकडे दिले आहे...

**उपसभापती** : आपण दिलेले नाव माझ्याकडे आलेले नाही, ते पहावे लागेल...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरीता माझ्या पक्षातर्फे ज्या माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांची नावे आपणाकडे दिली आहेत. तरीही आपण नावे दिलेली नाहीत असे आम्हाला सांगता ते बरोबर नाही. यापुढे आम्हाला प्रत्येक वेळी पत्र देतांना सह्या घ्याव्या लागतील.

**उपसभापती** : माझ्याकडून तसे होत नाही, आपला गैरसमज झाला आहे. आपण सकाळी नावे दिली असतील तर ती नियम 97 अन्वये चर्चेसाठी आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : नाही, माझ्याकडे त्या पत्राची प्रत आहे. त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाजपचे पुढील सदस्य सहभागी होऊ इच्छितात, त्यांना आपण परवानगी द्यावी. त्या पत्राची दुसरी प्रत मी आपणास देतो.

**उपसभापती** : माझ्याकडून असे कधी होत नाही, पहिल्यांदा असे झाले असेल तरीही आपणास बोलण्यासाठी परवानगी दिली जाईल. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भाषण करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्र. 23 वरील बाब क्र. 27 वर मी माझे विचार या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मांडणार आहे. पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी संपादन केलेल्या जमिनींच्या प्रदानासाठी प्रतिबिंबित तरतूद करणे यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. माननीय राज्यमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे सभागृहामध्ये उपस्थित झाले असल्यामुळे मला आनंद झाला आहे. मंत्रिमहोदयांनी मी उपस्थित केलेली बाब कृपया लिहून घ्यावी व आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये त्यासंबंधी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे. "ई" टीव्ही चॅनेलवर एक बातमी प्रसारीत करण्यात आली. ती बातमी पहात असतांना मी त्यातील मुद्दे लिहून घेऊन त्याची माहिती मागविली. ती माहिती धुळे जिल्हयातील सिंदखेड तालुक्यातील अवर्षण क्षेत्रामध्ये मोडणाऱ्या भागासंबंधीची आहे. त्या तालुक्यामधील रेवाडी, देवि, सातारे, देगाव या प्रकल्पबाधित गावातील जमीन वाडी-शेवडी प्रकल्पामध्ये जात असून काही जमीन प्रकल्पामध्ये बाधित झाली आहे. त्याठिकाणी भू मापन अधिकारी श्री. यू. बी. परदेशी यांचेमार्फत चुकीच्या पध्दतीने जमिनीची मोजणी करण्यात आली आहे. म्हणून मी त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घेतली. मला उपलब्ध झालेली माहिती मी सभागृहापुढे जाणीवपूर्वक मांडणार आहे. सभापती महोदय, त्याठिकाणी जे ॲवॉर्ड करण्यात आले त्यामधील ॲवॉर्ड क्र. 69 मध्ये श्री.सुरतसिंग गोरखसिंग गिरासे, गट क्र. 179 यांचे बुडीत क्षेत्र 6.74 हेक्टर आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

त्यांना 95,09,737 रुपये नुकसान भरपाई देण्यात आली. त्यानंतर जितेंद्रसिंग जयसिंग रावळ यांचा गट क्रमांक 31/3, जमीन 0.41 हेक्टर, यांना 9 लक्ष 14 हजार 973 रुपये दिलेले आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी)**

सौ.तारामतीबाई चंद्रकांत भामार, गट क्रमांक 49/1 मधील 0.41 हेक्टर क्षेत्र आहे. यांना 5 लाख 52 हजार 686 रुपये दिले. महत्वाचा भाग असा आहे की, बुडित क्षेत्रामध्ये येणाऱ्या जमिनीमध्ये ज्वारीचे पीक घेतले जात होते. परंतु तेथील अधिकाऱ्यांनी हात मिळवणी करुन सदरहू जमिनीमध्ये फळबाग असल्याचे दाखविलेले आहे. ही जमीन संपादन करण्याकरिता सप्टेंबर 2000 मध्ये अधिसूचना काढण्यात आली, त्यानंतर त्या जमिनीवर नवीन लागवड करता येत नाही, अशी कायद्यामध्ये तरतूद असतांना या शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यामध्ये सन 2001-2002 या हंगामामध्ये पूर्वीची ज्वारी-बाजरीच्या पिकाची लागवड असतांना अचानक फळबागाचीही नोंद झालेली आहे. अशाप्रकारे जाणूनबुजून प्रयत्न केलेला आहे. कृषि विभागाच्या मापदंडानुसार एका हेक्टरवर जास्तीत जास्त 400 झाडे लावता येतात. पण श्री.सूरजितसिंग गिरासे यांच्या 6.74 हेक्टरवर 6,740 झाडे दाखविण्यात आलेली आहेत. फळबाग त्या ठिकाणी नसतांना फळबाग असल्याबाबतचा पंचनामा करण्यात आलेला आहे. दोन हेक्टरकरिता 94-95 लाख इतकी रक्कम देण्यात आलेली आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये 2 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. त्यापैकी अर्धी रक्कम शेतकऱ्यांना दिली जात असेल तर ही गंभीर बाब आहे. ज्यांचे पूर्ण क्षेत्र बाधित नाही, काही अर्धे बाधित आहे. डोंगरावर काहींची शेती आहे, त्या ठिकाणीही बाधित म्हणून त्यांना मदत देण्यात आलेली आहे. ज्यांच्या जमिनी बाधित क्षेत्रामध्ये नाहीत, त्यांना बाधित दाखवून अनुदान देण्यात आलेले आहे. म्हणून "ई टी.व्ही."वरुन बातमी आल्यानंतर त्यासंबंधातील माहिती पदाधिकाऱ्यांकडून मागविली, त्यामध्ये नावानिशी माहिती आलेली आहे. ज्या बाबीसाठी आपण तरतूद करतो, ती रक्कम व्यवस्थित प्रकारे खर्च व्हायला पाहिजे. सर्वसामान्य जनतेच्या करातून आलेला पेसा आहे, त्या पैशाचा अशाप्रकारे दुरुपयोग होत असेल तर ही बाब गंभीर आहे, याची चौकशी करावी अशा प्रकारची आग्रहाची विनंती आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 201, पृष्ठ क्रमांक 180 यामध्ये शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदाने यामध्ये जवळजवळ 2 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. 31 तारखेपर्यंत ही रक्कम खर्च करावयाची आहे. ही मुदत आपल्याला वाढवावी लागेल. मागच्या अधिवेशनात डिसेंबर महिन्यामध्ये आपण पॅकेज जाहीर केले. त्याला दोन महिने झालेले आहेत. आपण शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नासाठी 2 कोटी रुपये देणार आहात ही आनंदाची बाब आहे. ही रक्कम खर्च झालेली आहे काय ? यामध्ये आपण एवढा निधी उपलब्ध करुन देत आहोत. स्वयंसेवी संस्था त्याचा फायदा घेणार आहे काय ? एका जोडप्याला आपण 10 हजार रुपये देणार आहात. यामध्ये जी 2 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्या रकमेची लुबाडणूक तर होणार नाही ना याची काळजी घ्यावी लागेल. हे पैसे तीन महिन्यांमध्ये संपवावयाचे आहेत. म्हणजे येत्या 31 मार्चपर्यंत हे पैसे खर्च करावयाचे आहेत. आतापर्यंत एवढा खर्च झालेला आहे काय ? हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. 31 मार्च पर्यंतच्या खर्चासाठी ही पुरवणी मागणी आहे. आकस्मिकता निधीतून पैसे घेऊन नंतर या ठिकाणी पुरवणी मागणी मंजुरीसाठी आलेली आहे. उपलब्ध झालेला निधी किती वापरला हे सभागृहाला सांगितले तर योग्य होईल. हे पैसे या मुदतीत खर्च न झाल्यास त्यासाठी मुदत वाढवून द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 177 मध्ये राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी ही पुरवणी माणगी मंजुरीसाठी आलेली आहे. द्राक्ष उत्पादकांचे जे नुकसान झालेले आहे त्याकरिता 9 कोटी 25 लाख 37 हजार रुपये एवढी नुकसानभरपाई दिलेली आहे. बाब क्रमांक 178 मध्ये बागायती पिकांच्या देखभालीसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज प्रदान करण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. याकरिता 14 कोटी 85 लाख रुपये एवढा खर्च करण्यात आला आहे. द्राक्ष बागायतदार, सर्व मोठया शेतकऱ्यांकरिता ही तरतूद करीत असताना विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर करुन सुध्दा आतापर्यंत एकही पैसा त्यांच्या हातामध्ये पडलेला नाही. हा मुद्दा महत्वाचा आहे. आपल्याला द्राक्ष उत्पादकांची जेवढी चिंता आहे तेवढी चिंता आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल नाही. त्या विषयावरील चर्चा आज

...2...

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते ......

संध्याकाळी आहे. त्यावेळी आम्ही यासंदर्भात बोलू. बाब क्रमांक 179 यामध्ये अल्प मुदतीच्या पीक कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हा सुध्दा पॅकेजमधील विषय आहे. यामध्ये 61 कोटी, 17 लाख 81 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. बाकीचे पॅकेज यामध्ये नाही. जे काही दाखविले होते तो भूलभूलैया आहे. यासंदर्भात संध्याकाळच्या चर्चेमध्ये बोलणार आहोत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

डॉ. एम. ए अझिज ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. गृह विभागाच्या बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 14 यामध्ये महागाई भत्त्यासाठी अतिरिक्त 6 लाख 92 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे आणि याबाबतचा एकंदरीत खर्च 357 कोटी, 44 लाख 97 हजार रुपये आहे. महागाई भत्त्यासाठी होणारा हा खर्च आहे. त्यानंतर बाब क्रमांक 15 यामध्ये 13 लाख 76 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे आणि एकंदरीत खर्च 9 कोटी, 83 लाख, 92 हजार रुपये आहे. ही मागणी सुध्दा महागाई भत्त्याच्या संदर्भात आलेली आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. एम.ए.अझिज...)

पोलिसांच्या संदर्भात आवश्यक त्या गोष्टी आपणाला करायला पाहिजेत याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. लेडीज बार, मनी लेंडर्स् यांच्या बाबतीत पोलिसांनी अतिशय चांगली कामगिरी केल्याचा उल्लेख माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेला आहे. ही महागाई भत्त्यासंबंधीची मागणी मान्य करायला काहीच हरकत नाही. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, पोलिसांच्या ड्रेसेससाठी तरतूद करणे आवश्यक आहे. पोलिसांना घरे नाहीत, त्यांच्या मुलांना शाळा नाहीत असेही त्यांनी सांगितले. ह्या गोष्टी पोलिसांसाठी करायला पाहिजेत. पोलिसांसाठी ह्या सर्व गोष्टी करीत असताना पोलिसांच्या पोलीस ठाण्यातील कार्यपध्दतीवर देखील तितकेच लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. पोलिसांची पोलीस ठाण्यातील काम करण्याची पध्दत ही आक्षेपार्ह आहे असे विधान मी केले तर ते वावगे ठरणार नाही. पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केल्यानंतर ती तक्रार जर क्रिमिनल स्वरुपाची असेल तर पोलीस ती सिव्हिल स्वरुपाची करतात आणि सिव्हील स्वरुपाची असेल तर ती क्रिमिनल स्वरुपाची करतात. तक्रार क्रिमिनल करायची की सिव्हील करायची हे त्या पोलीस स्टेशनमधील पीएसआयच्या हातात असते. त्याबाबतीत त्यांची ॲडजस्टमेंट असते आणि ते मी येथे बोलू इच्छित नाही. मी आपणास नागपाडा पोलीस स्टेशनचे उदाहरण देतो. नागपाडा येथील एका महिलेची बहीण अंधेरी येथे राहात होती. अंधेरी येथे राहाणा-या महिलेने तक्रार केली की, मला माझ्या घरात जायचे आहे. खरे म्हणजे त्या महिलेचा त्या घरावर कोणताही हक्क नाही. या प्रकणाचे सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. नागपाडा पोलिसांनी दुस-या महिलेला त्या घरामध्ये आणून ठेवले. जेव्हा याबाबतीत घराची मालकीण पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करण्यास गेली त्यावेळी पोलिसांनी तिला सांगितले की, हे सिव्हिल मॅटर आहे, तुम्ही कोर्टात जा. तेव्हा अशा प्रकारच्या पोलिसांच्या कार्यपध्दतीवर शासनाने लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. पोलीस ठाण्यामध्ये क्रिमिनल स्वरुपाची केस कशी सिव्हिल स्वरुपाची केली जाते याचे आणखी एक उदाहरण मी देतो. एक गृहस्थ घराचे लॉक तोडून घरात घुसला. लॉक तोडून घरात घुसणे ही क्रमिनल केस होते. यासंदर्भात पोलीस ठाण्यावर तक्रार करण्यास गेल्यानंतर, "ही क्रिमिनल केस नाही, हे घरातील भांडण असल्यामुळे तुम्ही कोर्टात जा" असे पोलिसांनी सांगितले. अशा प्रकारच्या पोलिसांच्या कार्यपध्दतीबाबत माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष घालावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

...नंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझीज ....

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पूरक मागण्यांमध्ये मागणी क्रमांक 166,पृष्ठ क्रमांक 103 यामध्ये 85 लाख रुपयांची पूरक मागणी प्रस्तावित करण्यात आली आहे. यासंबंधी मला असे सांगावयाचे आहे की, आयुर्वेद महाविद्यालय,सायन या महाविद्यालयाकरिता 37 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. मात्र युनानी कॉलेजला फक्त 12 लाख रुपये दिलेले आहेत. ही विसंगती आहे. उलट युनानी कॉलेजमध्ये एक माजून तयार करण्यासिाठी जास्त खर्च येतो. म्हणून ही विषमता दूर करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 21,मुद्दा क्रमांक 37 महसूल विभागाच्या संदर्भातील मागणी आहे. 7 कोटींची पूरक मागणी प्रस्तावित करण्यात आली आहे. महसूल विभागाने 69 लाख रुपये वक्फ बोर्डाला द्यावयाचे आहेत. वक्फ बोर्डाची जमीन महसूल खात्याने अधिग्रहित केलेली आहे त्याचा उल्लेख यामध्ये नाही. त्याशिवाय वक्फ बोर्डाचे 11 लाख रुपये द्यावयाचे आहेत याचा सुध्दा उल्लेखयामध्ये केलेला नाही. 1995 मध्ये राज्यामध्ये वक्फ कायदा लागू करण्यात आला. It is a parlimentary act. Parlimentary act always prevails state act. This is something wrong. महसूल खात्यामार्फत चॅरिटी कमिशनरला 2 टक्के टॅक्स दिला जातो. 1995 ला हा कायदा आला. कायदा अंमलात आल्यानंतर चॅरिटी कमिशनरला पैसे घेण्याचा हक्क नाही. विभागाने 1995 पासून हे पैसे वक्फ बोर्डाला परत केले पाहिजेत.

सभापती महोदय, पणन खात्याच्या पूरक मागण्यांवर बोलताना 55 कोटी 44 लाख 59 हजार रुपयांची रक्कम सबसिडी म्हणून शेतकऱ्यांना सबसिडी म्हणून उपलब्ध करुन देतो. ही रक्कम छोटया कर्जाचे रुपांतर करण्यासाठी आहे. आज कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. पणन खात्यामार्फत जी तरतूद करण्यात आली आहे ती महत्वाची बाब आहे. यासंबंधी मला सांगावयाचे आहे की, कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत आहेत याबाबत नागपूरच्या अधिवेशनात चर्चाही झाली होती. नागपूर अधिवेशन सुरु झाले त्या काळात अधिवेशनाच्या अगोदर 4-5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्याचप्रमणे अधिवेशन सुरु असताना 4-5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सभागृहात याविषयावर सारखी चर्चा होतो की शेतकरी कर्जबाजारी आहे म्हणून आत्महत्या करीत आहेत. त्यांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपयांची मदत देण्यात येते. यांसंबंधी मला असे सांगावयाचे आहे की, हे शेतकरी लहान लहान शेतकरी आहेत. अशिक्षित आहेत. या

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकऱ्यांनी दोन लाख एवढी रक्कम कधीच पाहिलेली नसते. मी स्वत: शेतकरी आहे. माझ्या गावामध्ये दोन हजार लोकवस्तीचे माझे गांव आहे. शेतकऱ्यांना विचारले आत्महत्या का करता?

यानंतर श्री. खर्चे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.अे.अजीझ .......

त्यावेळी मला एका माणसाने सांगितले की, डॉक्टर साहेब मी मेलो तर माझी बायको आणि मुलांना 2 लाख रुपये मिळतील आणि त्यात माझी दोन मुले दुकान टाकतील व माझ्या मुलीचे लग्न होईल. परंतु ज्यावेळी शासनाने कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना पैसे देणार नाही, त्यांना पॅकेज देण्यात येईल असा निर्णय घेतला त्यावेळी मात्र हया आत्महत्त्या थांबल्या. अशा प्रकारे नातेवाईकांना 2 लाख रुपये देण्यासाठी आपण प्रवृत्त तर करीत नाही ना अशी मला शंका येते. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले ) : महोदय, पुरवणी मागण्यांबाबत माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, उद्योग विभागाच्या संदर्भात मला असे सुचवावयाचे आहे कीृ, बाब क्र. 12, पृ.क्र.14 - ठाणे आणि रायगड जिल्हयाचे जे औद्योगिकीकरण झालेले आहे त्यामुळे ज्या प्रमाणात पोलीस स्टेशनमध्ये वाढ झाली त्याप्रमाणात पोलिसांची संख्या मात्र वाढलेली नाही. या औद्योगिकीकरणामुळे स्थानिक लोकवस्ती प्रचंड वाढली त्याचप्रमाणे पर राज्यातून लोक देखील व्यवसाय व नोकरीच्या निमित्ताने मोठया प्रमाणात आले म्हणून पोलिसांचा कारभार कार्यक्षम होऊ शकत नाही. कारण पोलिसांची संख्या पाहिजे त्या प्रमाणात वाढलेली नाही. परवाच झालेल्या दंगलीमध्ये पोलीस दल अपुरे असल्यामुळे हे लक्षात आले आहे. रायगड जिल्हयात 25 वर्षात वरखड नांवाचे पोलीस स्टेशन एवढेच झालेले आहे. त्यामुळे जे दरोडे पडतात त्यांचा तपास वेळेवर लागत नाही म्हणून शासनाला या माध्यमातून माझी अशी विनंती आहे पोलिसांच्या संख्येत वाढ झाली पाहिजे. याच बाबीसंबंधी बोलत असतांना मला असेही सुचवावयाचे आहे की, गेल्या जुलै महिन्याच्या अधिवेशनात चेंबूर पोलीस स्टेशनमध्ये श्री. विजय गोंधळी या तरुणाचा कोठीडीत मृत्यु झाला व त्यासंदर्भात मी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. शासनामार्फत त्यावेळी आश्वासन दिले होते की, या प्रकरणाची चौकशी करुन गुन्हेगारांना शिक्षा करण्यात येईल परंतु आठ महिन्यात अद्यापही कोणावर कारवाई झाली नाही तर चौकशी सुध्दा झालेली नाही, याचा खुलासा झाला पाहिजे.

महोदय, बाब क्र. 25, पृ.क्र.22 वन क्षेत्राला लागून असलेल्या खाजगी जमिनींवरील आरक्षण रद्द करण्याबाबत ही मागणी आलेली आहे. वन विभागाच्या वनेतर जमिनीचा वापर करण्यासाठी वन विभागाने बंधन घातलेले आहे. त्यामुळे अशी अडचण झाली की आमचा भाग हा संपूर्ण औद्योगिकीकरण झाल्यामुळे या भागात आता खाजगी जमीनच शिल्लक राहिलेली नाही. जी जमीन वन विभागाच्या जवळ शिल्लक आहे त्या ठिकाणी बांधकाम अथवा लागवड करु शकत नाही म्हणून महसूल विभागाने हे आरक्षण उठविण्याबाबत केंद्रशासनाकडे पाठपुरावा करावा अशी माझी विनंती आहे. कारण आमच्या भागात माती व दगड सुध्दा नसल्यामुळे पुणे व कोल्हापूरहून आणण्याची वेळ येणार अशी परिस्थिती आहे. त्यादृष्टीने वनेतर कामकाजासाठी जे बंधन वन विभागाने घातलेले आहे ते उठविण्याबाबत विचार व्हावा.

......3

श्री. जयंत प्र. पाटील........

त्यानंतर बाब क्र. 164, पृ.क्र.145 - वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, ज्या कॉलेजेसना 15-20 वर्षापूर्वी शासनाने परवानगी दिलेली आहे ते कॉलेजेस अकार्यक्षम रितीने चालू आहेत.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

त्यांनी युनिव्हर्सिटीच्या नॉर्म्सप्रमाणे पूर्तता केलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिकदृष्ट्या नुकसान होत आहे. सदर कॉलेजेस बंद होणार आहेत असे सांगण्यात येते. सदर कॉलेजस बंद करीत असताना त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई करून, नुकसान भरपाई वसूल करण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे. जेणेकरून विद्यार्थ्यांचे होणारे हाल वाचतील. आज या कॉलेजेसमध्ये शैक्षणिक दर्जा राहिलेला नाही. 15-16 वर्षे या कॉलेजनी पूर्तता केली नाही म्हणून त्यांची मान्यता रद्द करून त्यांच्याकडून नुकसान भरपाई कशी वसूल करता येईल याचा विचार शासनाने केले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, पान क्र.14 वरील बाब क्र.12 - पोलिसांचे गणवेष खरेदी करण्याकरिता अतिरिक्त तरतूद करणे यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे शासन कुठल्या काळात वावरत आहे हे मला कळत नाही. दहा ते अकरा हजार पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे. जानेवारी 1960 मध्ये जे निकष ठरविले आहेत, त्या निकषाच्या आधारावर शासन पोलीस भरती करणार आहे. या 1960 च्या निकषाप्रमाणे दहा हजार पोलीस कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सन 1960 साली मुंबईची लोकसंख्या ही 36 ते 37 लाखाच्या घरात होती. त्या काळात गुन्हेगारी करण्याचे प्रकार वेगळे होते. तेव्हाचे गुन्हेगारी जगत आणि आत्ताचे गुन्हागारी जगत यात जमीनआस्मानाचा फरक आहे. त्यामुळे सन 2006 मधील जी लोकसंख्या आहे, त्या आधारावर निकष तयार करणे आवश्यक आहे. 1960 च्या निकषाप्रमाणे पोलीस भरती करीत असल्यामुळे त्याचा काही दिवसांपूर्वी मुंबईमध्ये काय परिणाम झाला हे आपणास पहायला मिळाले आहे. डेन्मार्कमधील एका विकृत व्यंगचित्रकाराने मोहमंद पैगंबराचे चित्र काढले. त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर मोर्च्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आपले पोलीस दल कमकुवत पडले. याबाबत एका जबाबदार पोलीस अधिकाऱ्याने वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना सांगितले की, तीन ते चार लाखांपर्यंत लोक येतील एवढे आम्हाला वाटले नव्हते. याला कारण 1960 चे निकष आहेत. आज एका तारांकित प्रश्नाच्या वेळी उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले की, जे तीन गुन्हेगार पकडण्यात आले आहेत, ते बाहेरच्या राज्यातील आहेत. मुंबई शहरामध्ये आज 10 गुन्हे घडत असतील तर त्यातील 8 गुन्हेगार हे बाहेरच्या राज्यातील असतात हे सिध्द झालेले आहे. एखाद-दुसऱ्या घटनेमध्ये स्थानिक गुन्हेगार आढळून येतात. त्यामुळे 1960 मधील जे निकष आहेत, ते चुकीचे आहेत. सन 2006 मधील लोकसंख्येप्रमाणे पोलीस दलामध्ये भरती करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, येथे मी एक संवेदनशील विषय आपल्या समोर मांडणार आहे. आज मुंबईत हिंदू देव-देवतांची किंमत ठेवली जात नाही. अन्य धर्मियांच्या धार्मिक भावना दुखावल्यानंतर, ख्रिश्चन समाजाच्या धर्मगुरूबद्दल अनुद्गार काढले तर ते लगेच जागतिक पातळीवर निषेध करतात. परंतु, हुसेन नावाच्या एका विकृत चित्रकाराने अतिशय भयानक असे चित्र देव-देवतांचे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

काढले आहे. नुकतेच त्यांनी भारतमातेचे भयानक चित्र काढले आहे. ते पोलीस खात्याला कळलेच नाही. भारतमातेचे विकृत चित्र काढले आहे हे समजल्यावरून चित्रकार हुसेन यांच्याविरूध्द पोलीस खाते सुमोटो ॲक्शन घेणार आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

मुस्लिम धर्मियांनी जाहीर केले आहे की, जो आमच्या अल्लाची कोणत्याही प्रकारे टिंगलटवाळी करेल त्याचा शिरच्छेद करण्याबाबत आम्ही आदेश देत आहोत. महोदय, जर आमच्या हिंदू देव-देवतांची टिंगळटवाळी जर कोणी करीत असेल तर त्याचाही शिरच्छेद करण्याचा आदेश आम्ही देऊ शकतो. हुसेन या चित्रकाराचा शिरच्छेद करा असे आम्ही सांगू शकतो, परंतु आमचा हिंदू मनुष्य तसे आदेश देणार नाही. कारण त्याचे टॉलरन्स जगात सर्वात जास्त आहे. महोदय, या हुसेनने आमच्या भारतमातेचे नग्न चित्र काढल्यामुळे आणि हिंदू देवदेवतांची टिंगळटवाळी केल्यामुळे त्याच्या मुसक्या बांधून, त्याला फटके मारुन, त्याला आत टाकून, त्याच्यावर राष्ट्रदोहाचा खटला भरावयास हवा होता. परंतु तसे काहीही घडले नाही. अल्पसंख्यांक समाज आपल्याकडे उद्योग उभारण्यासाठी कर्ज मागतो. शासन त्यांना मदरसे आणि इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देते. या अल्पसंख्यांक समाजाने तर असे भाष्य केले आहे की, आम्ही भारताचा कायदा मानत नाही, संविधानातील कायदे मानत नाहीत, आयपीसी सुध्दा मानत नाही. आम्ही केवळ "कुराण" मानतो. हे खरे आहे की, प्रत्येक मुस्लिमाला कुराणाचा आदर आहे. परंतु कोणी जर धर्माची टिंगळटवाळी केली असेल तर ते गैर आहे. आज हुसेनने हिंदू देवदेवतांची टिंगळटवाळी केली त्यावेळी किती अल्पसंख्यांकांनी या गोष्टीचा निषेध केला ? किती जणांनी हुसेनला अरेस्ट करा अशी मागणी केली ? हिंदू जरी सहनशील असला तरी, जर तो उठला तर समोरच्यांना "पळता भुई कमी होईल" हे मुद्दाम सांगू इच्छितो. महोदय, हा हुसेन अतिशय विकृत असा मनुष्य आहे. त्याने हिंदूच्या देवदेवतांची टिंगळटवाळी आणि नग्न चित्रे काढल्याबद्दल त्याला शासनाने जेलमध्ये का टाकले नाही ? शासनाने सु-मोटो या प्रकरणाची दखल का घेतली नाही ? आपणास असे वाटते काय की, या घटनेचा निषेध करण्यासाठी आम्ही 10 लाख लोकांचा मोर्चा काढावयास हवा ?

अयोध्येला आमच्या अधिकारासाठी आम्ही राम मंदिर मागत आहोत. मला माहीत आहे की, त्या ठिकाणी राम मंदिर झाले म्हणून, गरीबीची समस्या सुटणार नाही, गरीबांच्या घरावरील कौले सोन्याचे होणार नाहीत, शिवाय बेरोजगारीचा प्रश्नही सुटणार नाही. परंतु पोटावरच जग चालत नाही तर भावनेवर, अस्मितेवर, स्भाभिमानावर जग चालते. जीवनातील जे संकेत वा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

भावना असतात, त्यावर माणसे जगत असतात. मला आठवत नाही की, या हुसेनने असे चित्र काढल्यामुळे त्याला अटक करण्यात यावी म्हणून कोठे अग्रलेख छापून आला, स्तंभातून लिहून आले. त्यामुळे या संपूर्ण प्रकाराबाबत पोलीस विभागाची दुर्बलता दिसून येत आहे. या प्रकरणी पोलिसांचे फेल्युअर दिसते आहे. त्यामुळे हुसेनने हिंदू देवदेवतांची टिंगळटवाळी केल्यामुळे आणि नग्न चित्रे काढल्यामुळे त्याला अटक करावी अशी या चर्चेच्या माध्यमातून मी मागणी करीत आहे.

महोदय, यानंतर मी महसूल विभागाची मागणी क्र.25, पृष्ठ क्र.23 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या मागणीच्या अनुषंगाने पुरामध्ये जे नुकसान झाले आहे त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आल्याचे म्हटलेले आहे. मुंबई शहरातील शिवडीमध्ये एक वस्ती आहे. या विभागातील गिरीजा शंकर तिवारी चाळ, गणेश बाग, पहेलवान बाबा झोपडपट्टी, बंदोबा वाडी, नंदकुशेट चाळ, के.के.मोदी चाळ, आझाद नगर, टिळक नगर, गोपाळ गांव वगैरे वगैरे. या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. त्या ठिकाणी 15-20 लाख रुपये देऊन, आम्ही जो पंचनामा केला आहे त्यानुसार 40 लाख रुपये नुकसान भरपाई आम्ही देणे आवश्यक आहे असे सांगितले गेले. परंतु त्यांना जिल्हाधिकारी सांगत आहे की, पैसे नसल्यामुळे ते देऊ शकत नाहीत. खाजगीमध्ये सांगतात की, साहेब तुम्ही आमचे नाव सांगू नका परंतु आलेले ॲप्लीकेशन उद्या-परवा देऊ, अशी उत्तरे द्या. असे करुन लोकांच्या जीवनाशी तुम्ही खेळ खेळणार आहात काय ? खरे म्हणजे शासनाकडून ज्यांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई न देता ज्यांचे काहीही नुकसान झालेले नाही त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. अंधेरी, बोरीवली वा अन्य उपनगरामध्ये नुकसान झालेले नसताना सुध्दा शासनाकडून त्या ठिकाणी मदत करण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्री महोदय, श्री.बाबा सिद्दीकी आपण कितीही नाही म्हणत असला तरी, अशा प्रकारे मदत दिल्याची किती तरी उदाहरणे आम्ही देऊ शकतो.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSK/ SBT/ MHM यापूर्वी श्री. बोर्डे .. 14.50

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, पुरामुळे अफेक्टेड झालेल्या लोकांना मदत करण्याची येथे बाब आहे. त्याचप्रमाणे पान क्रमांक 25 मध्ये, बाब क्रमांक 34 - परिस्थिती पर्यटन योजनेंतर्गत पेंच राष्ट्रीय उद्यान या संदर्भातील मागणी आहे. सभापती महोदय, केरळसारखे राज्य फक्त पर्यटनाच्या जाहिरातीवर शंभर काटी रुपये खर्च करुन लोकांना आकर्षित करते. सभापती महोदय, मागील वेळेला माननीय मंत्रीमडळाने बजेटमध्ये 15 कोटी रुपयांना मान्यता दिली. परंतु तरतूद फक्त 3 कोटी रुपयांची केली आणि प्रत्यक्षात फक्त 50 लाख रुपये महाराष्ट्राच्या सपूंर्ण पर्यटनासाठी खर्च केले. सभापती महोदय, या ठिकाणी छोटे छोटे रोजगार आहेत, त्यामुळे अनेक तरुणांना नोकऱ्या मिळू शकतात. म्हणून माझी मागणी आहे की, पर्यटनावर जास्त खर्च करावा. सभापती महोदय, भारतातील पर्यटनाला आता महत्व प्राप्त झालेले आहे. कोकण विभागात पर्यटनाची अनेक ठिकाणे आहेत. कोकणाला परमेश्वराने आणि निसर्गाने भरभरुन देणे दिले आहे . कोकणातील गुहागर तालुका हा त्यापैकीच एक आहे. कोकणातील स्वच्छ, सुंदर, अप्रतिम असा समुद्र किनारा, हेदवी, वेळणेश्वर, गुहागरची चौपाटी, अंजनवेलचा गोपाळगड इत्यादी गावे पर्यटकांना खास आकर्षित करु शकतात. म्हणून या मागणीच्या निमित्ताने मी आपल्याला विनंती करतो की, शासनाने मी सुचविलेल्या गावांची पाहणी करुन त्यांचा पर्यटन स्थळांमध्ये समावेश करावा. त्याचप्रमाणे घारापुरी येथील एलिफंटा बेटावरील रहिवाशांना देखील सवलती मिळत नाहीत. सभापती महोदय, पर्यटक आकर्षित व्हावेत म्हणून कोणत्याही प्रकारची व्यवस्था आपण केलेली नाही. त्याचप्रमाणे सभापती महोदय, मी सुत गिरण्या व वस्त्रोद्योग या संदर्भातील पान क्रमांक 161 वरील बाब क्रमांक 181 विषयी बोलू इच्छितो. सभापती महोदय, गेली दोन वर्षे मी आणि इतर सन्माननीय सदस्य खटाव मिलच्या कामगारांना त्यांची देणी मिळण्यासंदर्भात आग्रहाने मागणी करत आहोत. परंतु त्या पन्ना खटाव यांना शासन कुठली तरी नकळत मदत तर करत नाही ना ? मागील दोन वर्षांपूर्वीच्या प्रत्येक अधिवेशनात माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, मी स्वत: दालनामध्ये संबंधित लोकांची बैठक बोलावून या प्रश्नाला न्याय देईन असे सांगितले होते. परंतु त्यांनी शेवटी मला पत्र पाठविले, त्या पत्रातील मजकूर मी आपल्याला दोन मिनिटांत वाचून दाखवितो.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, तो मजकूर पुढीलप्रमाणे आहे. " व्यवस्थापनाची गिरणीच्या पुनरज्जीवनाची योजना ही, भायखळा आणि बोरिवली येथील जमिनीच्या विकासातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून कामगारांची देणी देणे तसेच वित्तीय संस्थांची देणी देणे यांवर आधारित आहे. कामगारांच्या देय देणीसंदर्भात व्यवस्थापनाने राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्याबरोबर दि. 8.3.2003 रोजी समझोता केला आहे. यात सुध्दा गिरणीच्या जमिनीच्या विकासातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून कामगारांची कायदेशीर देणी देण्याचे मान्य करण्यात आले आहे. परंतु अद्यापपर्यंत या जमिनीची विक्री आणि विकास याबद्दल योजना कार्यान्वित न झाल्याने कामगारांची देणे भागविणे शक्य झाले नाही, असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. यातून तोडगा काढण्यासाठी दिनांक 23 ऑगस्ट, 2005 ला मी बैठक बोलाविली होती. सदर बैठकीत गिरणी व्यवस्थापनातर्फे असे सांगण्यात आले की, वित्तीय संस्थांच्या सहमतीने लवकरच गिरणीच्या पुनरुज्जीवानाचा सुधारित प्रस्ताव ए.ए.आय.एफ.आर. हया प्राधिकरणासमोर सादर केला जाणार आहे. " सभापती महोदय, यातील मजकूरावरुन तर मला असे वाटत आहे की, ही पळवाट आहे. सभापती महोदय, येथील कामगार गेली 10-12 वर्षे देशोधडीला लागलेले आहेत. गेली दोन वर्षे माननीय कामगार मंत्र्यांना आणि आपल्या शासनाला त्याची देणी देण्याकरिता प्रयत्न करावे लागत आहेत. सभापती महोदय, शासन हे सर्वबल आहे, सर्व शक्तीमान आहे. म्हणून या निमित्ताने माझी मागणी आहे की, शासनाने व माननीय वस्त्रोद्योगमंत्र्यांनी या संदर्भात अतिशय सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारुन खटाव मिलच्या कामगारांची देणी त्यांना ताबडतोब देण्यासाठी प्रयत्न करावेत आणि काही प्रसंग आला तरी कायदा बदलायला किंवा त्या कायद्यामध्ये वेगळ्या काही तरतुदी करायला मागेपुढे पाहू नका आणि तरीही ते गिरणी मालक ऐकत नसतील तर गिरणीची सर्व जमीन विकून कामगारांची देणी द्यावीत. धन्यवाद !

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, बाब क्रमांक 12 च्या संदर्भात मी बोलणार आहे. पोलिसांच्या गणवेशाच्या संदर्भातील ही बाब आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सुध्दा या बाबीचा उल्लेख केलेला आहे. त्यावर त्यांनी वेगळे भाष्यही केलेले आहे. माननीय मंत्री महोदयांना माझी कळकळीची विनंती आहे की, आपण पोलिसांना जो गणवेश देत आहात त्याबाबत मला एक तरी पोलीस दाखवा की शासनाने दिलेला गणवेश तो 100 टक्के वापरतो. कमिशनर पासून हवालदारापर्यंत हा गणवेश वापरतात काय ? या सदनाच्या परिसरात जे पोलीस कर्मचारी आहेत त्यांच्या पायातील बूट जरी पाहिला तर ते सुध्दा आपणास एक सारखे दिसणार नाही. एका कंपनीचे दिसणार नाहीत. कारण त्या बुटांना दर्जाच नाही. अनेक जण कपडे घेतात, बुट घेतात, यासंदर्भातील उल्लेख सभापती महोदय आपणसुध्दा आपल्या भाषणात केलेला आहे. पोलीस कर्मचाऱ्याच्या पायाचा बुट जर 7 नंबरचा असेल आणि तो जर बुट घ्यावयास गेला तर त्यास 7 किंवा 8 ज्या नंबरचा बुट असेल तो घ्यावयास सांगतात, हा बुट घे आणि निघ... पोलीस खाते हे मिलिटरीपेक्षाही वरचे आहे कडक शिस्तीचे आहे, वरच्या अधिकाऱ्यांना विचारु शकत नाही. आपण जर यासंदर्भात पाहणी केली तर जेवढे पोलीस शिपाई आहेत, हे सगळे स्वखर्चाने टेरिकॉटचे गणवेश शिवतात आणि घालतात. म्हणून ते नीटनेटके दिसतात. या अगोदर त्यांचे स्टीचिंगचे एक कंत्राट असायचे ते आणखी कोणाला तरी दिलेले असायचे, परळ येथील पालव यांचेकडे ते असायचे असे मला आठवते. तेथे कपडयाचे गट्ठे द्यायचे मेजरमेंट घेतली जात नसत, तेथे गणवेश वेगळे शिवले जात असत, माझ्या साईजचा गणवेश येईल तो घ्यायचा आणि निघून जायचे. म्हणून यासंदर्भात नुसती तरतूद करुन जमणार नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, यासंदर्भात सभापती महोदयांनी सुध्दा उल्लेख केलेला आहे, पोलीस शिपायांना जे बुट देण्यात येतात त्या ऐवजी त्यांना पैसे देण्यात यावेत, त्या पैशातून ते स्टॅण्डर्ड बाटा कंपनीचे बूट घेतील. स्टॅण्डर्ड कंपनीचे बूट टिकाऊ असतात. आपण दिलेले बूट त्यांना 6 महिने सुध्दा टिकत नाहीत. येथील कर्मचाऱ्यांचे जरी आपण बूट पाहिले तरी आपणास ते कळेल. दोघांच्या पायामध्ये सारखे बूट नाहीत. ज्या गणवेशाबद्दल ज्याला आदर वाटला पाहिजे तोच जर त्याच्याकडे नाही तर बाकीचे काम तर नंतरचे आहे. पोलिसांना जो गणवेश देण्यात येतो तो व्यवस्थित नसतो म्हणून यासंदर्भात सुध्दा त्यांना पैसा देण्यात यावा. त्यांना आपण सांगावे की बाटा कंपनीचे बूट घ्यावे ते निदान टिकतील तरी. ते

......2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

टिकाऊ असतात त्यांची स्टॅण्डर्ड किंमत असते. त्यांच्याशी कंत्राट करा, पण हे जे टेंडर पध्दती आहे त्यामध्ये सर्व सामान्य माणसाची वाट लावतात. यासंदर्भात आणखी मी असे सांगेन की, ड्रेस घातल्यानंतर माणूसपण बदलला पाहिजे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उल्लेख केला की पोलिसांकडून कोणतीही कारवाई होत नाही. तेथे सुध्दा तेच झाले एवढे लक्षावधी लोक आले व महाराष्ट्र टाईम्सवर हल्ला झाला, गाडया फोडण्यात आल्या, पण तक्रार झाली नाही. वर्तमान पत्रांनी सुध्दा दखल घेतली नाही. मिडीया सुध्दा चुपचाप बसले. करणारे कोण यावर त्यांच्या बातम्या अवलंबून असतात. सत्य असत्य पेक्षा ते कोण करते यावर ती बातमी ठरत असते. इतका मोठा गहजब होऊन सुध्दा पोलिसांनी एकही गुन्हा दाखल केलेला नाही. याचे आश्चर्य वाटते यासंदर्भात तपासणी सुध्दा झालेली नाही. एवढे तुमचे इंटिलिजन्स डिपार्टमेंट आहे त्यांना काहीच माहिती नाही. इतक्या मोठया प्रमाणात लोक येतात, लोक यायला सुरुवात झाली, तेव्हा सुध्दा रस्त्यावरुन कळायला लागले की, प्रचंड प्रमाणात लोकांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत, तरी पोलीस सांगतात आमच्याकडे कर्मचारी संख्या कमी आहे म्हणून आम्ही काही करु शकलो नाही. पोलिसांच्या संदर्भात 1960 चा जो उल्लेख केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा उल्लेख आहे. 1960 चे निकष धरुन आपण पोलिसांची संख्या ठेवत आहात ते तातडीने बदलण्याची गरज आहे. गेल्या वर्षभरापासून रमेश गोवेकर प्रकरण हे पोलिसांना काळीमा फासणारे आहे, लांच्छनास्पद आहे, आपण त्याच्या आईला जाऊन भेटा, त्या मातेला काय वाटते हेही जाऊन विचारा ? त्याच्या कुटुंबाला भेटा त्यांना काय वाटते हेही विचारा. एक जेसिका लाल प्रकरणामध्ये त्यांना फाशी झ ाालेली नाही तरी याबाबत सुप्रिम कोर्टाने दखल घेतली, महामहिम राष्ट्रपती यांनी दखल घेतली, संसदेने दखल घेतली, पंतप्रधान यांनी दखल घेतली. पुन्हा कोर्टामध्ये केस गेलेली आहे. रमेश गोवेकर प्रकरणाबाबत आम्हाला भांडावे लागत आहे, त्याचे राजकारण केले जात आहे. तेव्हा सुध्दा आम्ही अपेक्षा केली होती की, जोपर्यंत सिंधुदुर्ग जिल्हयाचे पोलीस अधिक्षक आणि सिंधुदुर्ग जिल्हयाचे जिल्हाधिकारी.... या संदर्भात काल सभापती महोदयांनी आपणास प्रश्न विचारला होता की, इतक्या ज्युनिअर असतांना सिंधुदुर्गच्या सीईओ पदी श्रीमती विद्री होत्या त्या निवडणुकीच्या

....3....



VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 14:55

श्री. अरविंद सावंत...

पूर्वी सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी झाल्या. त्यांचे पती एस.पी. त्यामुळे या जिल्हयाला कसा काय न्याय मिळेल. रमेश गोवेकर प्रकरणाचा छडा लावण्यासाठी पोलिसांना ज्या पध्दतीने अपयश आलेले आहे. ते त्यांना काळीमा फासणारे आहे. माणसाच्या लापता होण्याचे राजकाण करु नका. त्याचे काय झाले असेल त्याच सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये भिसे प्रकरण घडले, नाईक प्रकरण घडले, त्याच सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आता रमेश गोवेकर प्रकरण घडले आहे,

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 15:00

श्री.अरविंद सावंत ....

आपल्याला याचा शोध घेता येत नाही, नुसते कपडे देऊन होणार नाही, त्याच्या मागील माणूस सुध्दा मानसिकदृष्टया सबळ करावा लागेल, तो विकाऊ असता कामा नये. दुर्देवाने कायदा व सुव्यवस्था सांभाळणारी माणसांची कधी बुध्दी गहाण ठेवली जाते तर कधी त्यांना आर्थिकदृष्टया गहाण ठेवले जात आहेत, म्हणून अशा घटना घडत आहेत. याबाबत व्यक्तिश: लक्ष घालण्याची आवश्यकता आहे, केवळ सीबीआयकडे केस सोपवून भागणार नाही. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. ही केस आपण सीबीआयकडे सोपवली याचा अर्थ या प्रकरणामध्ये आपल्याला काही करता आले नाही, हे आपले फेल्यूअर आहे, याबाबत तातडीने विचार करावा अशी मी अपेक्षा बाळगतो. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, काल सुध्दा एक बाबीचा उल्लेख झाला होता त्यामध्ये राष्ट्रीय सिमीतसंबंधीचा उल्लेख होता, त्यामध्ये 15 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. बाब क्र.18 मध्ये गृह विभागाने भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व संकीर्ण संघटना, हे हेड मी आज पहिल्यांदाच ऐकत आहे. या अंतर्गत रु.4,34,000 इतक्या मंजूर अनुदानापेक्षा 3000 रुपयांचा अधिकचा खर्च झालेला असल्यामुळे मागणी केली आहे. या रकमेबाबत माझे काही म्हणणे नाही, परंतु यामध्ये नक्की काय करता, कोणाच्या अखत्यारित ही बाब येते, हे मला कळलेले नाही, याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. ही बाब गृह विभागाच्या अंतर्गत आहे. बाब क्र.18 मध्ये जी तरतूद केलेली आहे यासाठी राज्य शासन या नात्याने आपण कोणती भूमिका निभावता, तेथे कशासाठी खर्च येतो, कशासाठी माणसे ठेवावी लागतात, त्यांना पगार का द्यावा लागतो, श्री.लालुप्रसाद यादव आपले ऐकतात काय, लोकल गाडया वाढवतात काय, लोकलचे डब्बे वाढवतात काय, महिलांसाठी डब्बे वाढवतात काय, ही बाब कोणत्या धोरणाखाली केली याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

दर्जेदार मराठी चित्रपटांसाठी निधी वाढवला ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु त्याही पेक्षा मला एका गोष्टीचा आनंद होतो की, तांत्रिकदृष्टया उत्कृष्ट ठरलेल्या मराठी चित्रपटासाठी 10 लाख रुपयांचे पारितोषिक देणार आहात, ही बाब अतिशय चांगली आहे. चित्रपटाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, एखाद्या चित्रपटाचा विषय चांगला असतो, परंतु तो तांत्रिकदृष्टया संपन्न नसेल तर प्रभावीदृष्टया मांडला जात नाही. हे सर्व पाहिल्यानंतर एखादा "श्वास" सारखा सिनेमा येतो व आपला श्वास कोंडला जातो. चित्रपटाच्या संदर्भात शासनाने निश्चितच चांगले काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 15:00

श्री.अरविंद सावंत ....

केलेले असल्यामुळे मी शासनाचे स्वागत करतो.

तसेच पौगंडावस्थेतील मुलींसाठी पोषण आहाराची अंमलबजावणी करण्याबाबत केंद्र पुरस्कृत योजना आहे. विशेषकरुन दलित वस्त्यांमध्ये व आदिवासी भागांमध्ये या योजनेची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या संदर्भात अलिकडेच झालेल्या श्रीवर्धनच्या निवडणुकीचा एक किस्सा सांगून मी माझे भाषण संपवणार आहे. निवडणुकीच्या वेळी तेथे रात्री-अपरात्री आमच्या महिला कार्यकर्त्या राहत होत्या. त्यावेळी एका महिलेला प्रसुती वेदना होऊ लागल्या, तेथे असलेल्या आमच्या महिला कार्यकर्त्यांनी त्या महिलेला त्या गावाहून घेऊन मुरुडच्या शासकीय हॉस्पीटलला आणले. त्यावेळी तेथे डॉक्टर नव्हते, नर्स नव्हत्या, एवढी त्या हॉस्पीटलची वाईट अवस्था होती. मी या ठिकाणी मुरुडच्या शासकीय हॉस्पीटलची माहिती सांगत आहे. याबाबत डॉक्टरला विचारले असता त्यांनी सांगितले की, मी या ठिकाणी माझ्या वेतनातून दोन माणसे कमर्शिअल ठेवलेली आहेत. या ठिकाणी शासनाकडून माणसे नेमलेली नाहीत. यानंतर आम्ही त्या महिलेला भेटण्यासाठी गेलो असता तिची अतिशय वाईट अवस्था होती. म्हणून पौगंडावस्थेत सुदृढता येणे ही चांगली बाब आहे. परंतु ख-या अर्थाने हा निधी पोहचेल की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून या संदर्भात पौंगडावस्थेतील महिलांना सुदृढ करण्याबाबत एक ठराविक टारगेट ठेवले तर या तरतुदीला काही अर्थ राहील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो.

---------

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी)** : मी सन्माननीय सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की, पुरवणी मागण्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी माझ्याकडे जी सदस्यांची नावे आणि संख्या आलेली आहे त्यामध्ये या बाजूला 57सदस्य असून शिवसेनेचे 12, भारतीय जनता पक्षाचे 12 असून शिवसेनेच्या वतीने माझ्याकडे 6 आणि भा.ज.पक्षाच्या वतीने 7 नावे आलेली आहेत. तेव्हा चर्चेमध्ये क्रमानुसार सदस्यांची नावे भाषणासाठी पुकारली जातील.

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षातर्फे या चर्चेत भाग घेऊन बोलणाऱ्या सदस्यांची संख्या फार कमी आहे त्यामुळे आपण मला बोलण्यासाठी 2-4 मिनिटे जास्त दिली तर मी आपला आभारी होईन. कारण मी झोपडपट्टीत राहणारा एक सामान्य कार्यकर्ता असून दलित आणि तळगाळातील माणसांच्या अडचणी, प्रश्न मला या ठिकाणी अत्यंत तळमळीने मांडावयाचे आहेत. त्या दृष्टीनेच मी या ठिकाणी बोलणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेताना सुरूवातीलाच सामाजिक न्याय विभागाची पृष्ठ क्रमांक 125 व 126 वरील बाब क्रमांक 148, 149, 150 च्या संदर्भात मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, 1979-80 मध्ये समाजकल्याण मंत्री श्री. अर्जुनराव कस्तुरे हे होते. त्यांनी संत चोखामेळा यांचे स्मारक करण्याच्या दृष्टीने एक समिती नेमली होती. त्या समितीचे अध्यक्ष स्वत: ना.श्री.अर्जुनराव कस्तुरे, समाजकल्याण मंत्री हे होते आणि उपाध्यक्ष समाजकल्याण विभागाच्या राज्यमंत्री श्रीमती शांती नाईक या होत्या. तसेच समितीचे सदस्य सचिव श्री.आर.एल.परदीप, संचालक, समाजकल्याण संचालनालय,पुणे हे होते आणि आमंत्रक सभासद म्हणून श्री.ना.रा.शेंडे, श्रीशेषाश्रम, भंडारा., श्री.दि.दि.चव्हाण,माजी राज्यमंत्री., श्री.संतोषराव पाटील, माजी वि.स.स. व दलितमित्र,सावरगाव डुकरे,बुलढाणा., श्री.एस.एच.चोखामेळा अभिवक्ता, वाशीम,जि.अकोला., श्री.स.भा.कदम, वरळी नाका,मुंबई., श्री.एम.बी.चिटणीस,प्राचार्य,मिलिंद महाविद्यालय,औरंगाबाद., आणि श्री.नरेंद्र बोर्डे, सामाजिक कार्यकर्ते,बुलढाणा हे होते. या समितीच्या मे,1979 ते डिसेंबर 1979 या काळामध्ये एकंदर 10 बैठका झाल्या. त्या समितीमध्ये असे ठरले की, श्री संत चोखामेळा यांचे स्मारक तयार करण्यात यावे., श्री संत चोखामेळा यांचे साहित्य संशोधित करण्यात यावे., आणि श्री संत चोखामेळा यांचा 641 वा पुण्यतिथीदिन 17 मे 1979 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात असलेल्या मेहुणा या गावी संपन्न करण्यात

..... पीपी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निकोसे ...

यावा. या प्रमाणे संत चोखामेळा यांचा 641 वा पुण्यतिथी दिन साजरा झाला त्याला मी देखील उपस्थित होतो. सभापती महोदय, तत्कालीन समाजकल्याण मंत्री श्री.कस्तुरे यांनी पुढाकार घेऊन संत चोखामेळा यांचे स्मारक होण्याच्या दृष्टीने, त्यांचे साहित्य संशोधित व्हावे यासाठी समिती स्थापन केली पण एक वर्षामध्येच हे काम बंद पडले. श्री संत चोखामेळा हे दलित संत होते. त्यांच्यावर पंढरीरायाच्या म्हणजे देवाच्या गळ्यातील हार चोरल्याचा आळ आला होता. त्यावेळी रडून, ओरडून ते सांगत होते की, मी तो हार चोरलेला नाही, मला मारू नका. संत चोखामेळा हा एक क्रांतिकारी माणूस होता, कवि होता. त्याने देवाला म्हटले, देवा मी तुझा हार चोरलेला नाही आणि हे तुलाही माहीत आहे. पण हे बडवे लोक मला मारून राहिले आहेत आणि तुला त्याची लाज का वाटली नाही ? अशा या संत चोखामेळ्याचे स्मारक त्यांच्या मेहुणा, जिल्हा बुलढाणा या गावी आज देखील झालेले नाही. किंवा त्यांच्या कर्मभूमीमध्ये म्हणजे पंढरपुरामध्ये वा मंगळवेढ्यामध्ये देखील झालेले नाही. ...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.निकोसे हे कोणत्या बाबीवर बोलत आहेत ? त्यांनी बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सुरूवातीस सांगितला आहे का ?

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी पृष्ठ क्रमांक 125 व 126 वरील बाब क्रमांक 148, 149 व 150 च्या संदर्भात बोलतो आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, संत चोखामेळा हे दलित साहित्यिक होते आणि या संतांचे स्मारक व्हावे म्हणून तत्कालीन समाजकल्याण मंत्र्यांनी एक समिती देखील गठित केली होती. त्या समितीचे निमंत्रक असलेले श्री. ना.रा.शेंडे हेही एक साहित्यिक होते आणि मराठी साहित्य परिषदेचे ते अध्यक्ष देखील राहिले होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे निधन झालेले असून त्यांनी मृत्यूपूर्वी संत चोखामेळा यांच्यावर एक पुस्तक लिहिलेले आहे आणि ते मी छापले आहे. दुसरे म्हणजे सावरगाव येथे विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन होते ...

( वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते.. )

सभापती महोदय, मला आपण दोन तीन मिनिटांचा अवधी द्यावा. ...

...... पीपी 3 ..



KBS/KGS/MAP. श्री. सांगळे नंतर --- 15:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांमधील जी बाब आहे त्यासंबंधात बोलावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी समाजकल्याण खात्याचे लक्ष वेधतो आहे. 1980 पासून संत चोखामेळा यांचे स्मारकाचा हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यासाठी नेमलेल्या समितीचे एक निमंत्रक श्री.ना.रा.शेंडे यांचेही मध्यंतरी निधन झाले. त्यांचे घर ज्याला ते श्रीशेषाश्रम म्हणत ते घर पडून गेले आहे. तेथेच त्यांनी मृत्यूपूर्वी आपली समाधी बांधली. तेव्हा माझे या निमित्ताने असे सांगणे आहे की, संत चोखामेळा या दलित संताचे उचित स्मारक त्याच्या जन्मगावी होण्यासाठी एक स्मारक समिती पुन्हा निर्माण करावी आणि या कामाला वेग आणावा ही विनंती.

( यानंतर श्री. सरफरे .... क्यूक्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे...

उत्तर नागपूरामधील दलितांची फार मोठी अपेक्षा आहे. त्या ठिकाणी 10 वर्षापूर्वी कामगार कल्याण मंडळाची इमारत बांधण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. तो प्रस्ताव मंजूर होऊन कामाचे टेंडरही निघाले होते. दहा वर्षापासून इमारतीचे बांधकाम सुरु असून अजून ते पूर्ण होत नाही. त्याठिक्‌ाणी स्वीमिंग पूल व नाटयगृह बांधण्याचे काम अजून पूर्ण झाले नाही. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबईतील वाढत्या गर्दीकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. परप्रांतियांचे लोंढे मुंबई शहरामध्ये येत असल्यामुळे लोकांना आज रहायला जागा मिळत नाही. वसई व विरार या परिसरामध्ये लोक रहायला जात आहेत. त्या भागामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव आले आहेत. हे प्रस्ताव नगर विकास विभाग, उद्योग विभागाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहेत. तेव्हा संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांनी त्यामध्ये तातडीने लक्ष घालून ते प्रस्ताव मंजूर करावेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 145 वरील बाब क्र. 164, 165 व 166 च्या बाबतीत सांगावेसे वाटते की, रुग्णालयांमध्ये नर्सेसच्या नेमणुका करीत असतांना नागपूरला रहाणाऱ्या नर्सला औरंगाबादला पाठविले जाते, मुंबईला पाठविले जाते. आणि दोन-तीन वर्षे नोकरी केल्यानंतर त्या पुन्हा आपल्या बदलीसाठी प्रयत्न करतात. त्यांच्या मुला-मुलींचा शिक्षणाचा प्रश्न असतो, त्यांच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, ज्या विभागातील नर्सेस असतील त्या विभागामधील रुग्णालयांमध्ये त्यांची नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांच्या बदल्या करण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्र. 139 वरील बाब क्र. 162, 163 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, उत्तर नागपूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय बांधण्यात आले. ते रुग्णालय बांधल्यानंतर त्या ठिकाणी एक डॉक्टर व एक नर्स ओ.पी.डी. साठी ठेवण्यात आले. या रुग्णालयासाठी 5 ते 10 लाख रुपये खर्च केले व पुन्हा साडे सात लाख मंजूर करण्यात आले. परंतु त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. तेव्हा याबाबत आपण खुलासा करावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, दलित वस्त्यांमध्ये जे प्रकल्प शासनाने मंजूर केले आहेत ते पूर्ण केले पाहिजेत. आज गरीब रुग्णांना मेयो हॉस्पिटल, टाटा हॉस्पिटलमध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

जाऊन वैद्यकीय उपचारासाठी पैसे खर्च करावे लागत असल्यामुळे त्याठिकाणी जाता येत नाही. म्हणून शासनाने हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावेत.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या पान क्र. 124 वरील बाब क्र. 147 मध्ये अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेला सहायक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. शासनाने भव्य प्रमाणामध्ये नाटय संमेलन यशस्वी केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. विशेष म्हणजे या विधान परिषदेचा सदस्य श्री. रमेश निकोसे म्हणजे माझे "गांधी, आंबेडकर आणि रमाई" हे एकपात्री नाटक यशस्वी केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ क्र.182 व बाब क्र. 203 मध्ये 0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलांना पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी अतिरिक्त अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, अंगणवाडी सेविकांना सप्टेंबर 2005 पासून पगार देण्यात आलेला नाही. अंगणवाडी सेविकांची सेवा ही उत्पादक स्वरुपामध्ये असून त्यांची पगाराची देयके मंजूर होऊन दर महिन्याला त्यांना नियमितपणे पगार मिळेल अशी शासनाने व्यवस्था करावी अशी मी विनंती करतो. त्याचप्रमाणे गृह विभागाच्या पृष्ठ क्र. 14 वरील बाब क्र.12 मध्ये पोलिसांचे गणवेश खरेदी करण्याकरीता अतिरिक्त तरतूद करण्यात आली त्याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देतो की, नागपूरला ठवरे नगरमध्ये श्रीमती सुषमा जांबुलकर व श्री.दाउजन बडगे यांच्या मालकीच्या घरामध्ये भाडेकरु रहावयास आले. परंतु मुदत संपल्यानंतर संबंधित भाडेकरु घरामधून बाहेर पडण्यास तयार नाहीत व भाडयाचे पैसेही द्यायला तयार नाहीत. याबाबत जरीपटका पोलीस स्टेशनमध्ये मी स्वत: तक्रार केली असता त्यांनी सांगितले की, घरमालक आणि भाडेकरु या दोघांमध्ये भांडण झाल्याशिवाय आम्ही हस्तक्षेप करणार नाही. याचा अर्थ त्या ठिकाणी मारामारी झाली पाहिजे, एकमेकांचे हात तोडले पाहिजेत, एकमेकांचे डोके फोडले पाहिजे, एकमेकांच्या तंगडया तोडल्या पाहिजेत. तसे झाल्यानंतर आपले पोलीस कारवाई करणार काय? म्हणून माझी आपणास विनंती आहे की, संबंधित भाडेकरु कायद्यामध्ये आपण सुधारणा करावी आणि घरामधून जर भाडेकरु निघत नसेल आणि घर मालकाला त्या घराची आवश्यकता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

असेल तर पोलिसांमार्फत त्या गुन्हयाची नोंद झाली पाहिजे व घर मालकाला न्याय मिळाला पाहिजे. एवढे बोलून पुरवणी मागण्यांना पाठींबा देऊन माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरें... 15:15

श्री.विनायक मेटे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गृह विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संबंधाने मी बोलू इच्छितो. पृष्ठ क्रमांक 14, बाब क्रमांक 12, पोलिसांचे गणवेश खरेदी करण्याकरिता तरतूद केलेली आहे. गणवेशासाठी तरतूद केलेली आहे ही चांगली बाब आहे. गणवेश घेऊन पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करावे आणि गरिबांना न्याय द्यावा अशी साधरणत: संकल्पना आहे. काही पोलीस याला अपवाद ठरतात. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दिनांक 20 मार्च 2006 रोजी औरंगाबाद येथील पोलिसांनी काळिमा फासणारे कृत्य केलेले आहे. 20 मार्च रोजी कार्पोरेशनची निवडणूक झाली. तेथील मतमोजणी संपल्यानंतर निकाल लागला. त्यानंतर कार्यकर्ते आणि दोन-तीन उमेदवार बाहेर पडून पत्रकारांना मुलाखत देत असतांना अे.पी.आय. श्री.सोनवणे आणि त्यांचे 20-25 सहकारी पालिसांनी, ते मुलाखत देत असतांना तेथील कार्यकर्त्यांना पोटामध्ये लाथा मारल्या. का मारता ? असे विचारल्यानंतर पुन्हा त्यांचे सहकारी आले आणि त्यांना काठ्यांनी एवढे मारले की, ते मरता मरता वाचले. माझ्याकडे त्या ठिकाणचे फोटो आहेत. ही 20 मार्च 2006 ची घटना आहे. एवढेच नाही तर तीन-चार लोकांना 25 पोलिसांनी काठ्यांनी मारले आणि पोलीस अधिक्षक मोठया अभिमानाने सांगतात की, त्या ठिकाणी 50 ते 100 लोकांचा जमाव पोलिसांवर चालून आल्यामुळे पोलिसांनी लाठी चार्ज केला. आपण पोलिसांना गणवेश देतो, ते लोकांचे रक्षण करण्यासाठी देतो, मारहाण करण्यासाठी नाही. या ठिकाणी गृहमंत्री माननीय आर.आर.पाटील साहेब उपस्थित नाहीत, परंतु त्यांचे सहकारी राज्यमंत्री उपस्थित आहेत, त्यांनी यामध्ये लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. एवढेच नाही तर पोलिसांना काठ्या देतो, त्या निरपराध लोकांना मारण्यासाठी देतो, की त्यांचे संरक्षण करण्यासाठी देतो ? ही काय पध्दती आहे, ते समजत नाही. माझ्याकडे त्याची सी.डी. उपलब्ध आहे, अे.पी.आय. श्री.सोनवणे आणि त्यांचे सहकारी यांना सस्पेंड केले पाहिजे. सभापती महोदय, मी त्या ठिकाणचे त्यांचे फोटो पाठवून देतो. निरपराध कार्यकर्ते असतील, जनता असेल त्यांना अशाप्रकारे नराधमासारखे पोलीस वागत असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पोलीस हे युनिफॉर्ममध्ये मारहाण करतात,अशाप्रकारचा विषय मांडलेला आहे. परंतु युनिफॉर्मवरच पोलिसांनी कारवाई केली पाहिजे. म्हणूनच अमरावती येथील चारघर येथे पोलीस अधिक्षक हे युनिफॉर्ममध्ये नसतांना त्यांनी कारवाई केली, म्हणून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे अशी आम्ही मागणी केली. तोही मुद्दा येथे मांडा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.विनायक मेटे : आमची अपेक्षा आहे की, पोलिसांना युनिफार्म किंवा कोणतेही साहित्य देतो, त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे आणि गरिबांना संरक्षण केले पाहिजे, निरपराध लोकांना न्याय दिला पाहिजे, चांगल्यासाठी या युनिफॉर्मचा उपयोग केला पाहिजे. म्हणून माझी मागणी आहे की, निरपराध कार्यकर्त्यांना, लोकांना मारणाऱ्या ए.पी.आय.श्री. सोनवणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आजच्या आज निलंबित करण्याची घोषणा केली तरच खऱ्या अर्थाने निरपराधांना न्याय देऊ शकू...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

काही पोलीस आपल्या कृत्याने आणि आपल्या कामगिरीने पोलिसांना बदनाम करतात. त्यांना धडा शिकवला तर या गोष्टीला आळा बसू शकेल. सभापती महोदय, बाब क्रमांक 126, पृष्ठ क्रमांक 107, यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना अर्थसहाय्य देण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये कृषि ग्राहकांना वीज बिलात 33.33 टक्के ते 100 टक्के सवलत देण्यासाठी तरतूद केलेली आहे. आपण ही सवलत देत असताना ज्या ठिकाणी वीज मिळत नाही त्या ठिकाणी नवीन सबस्टेशन करतो. त्या ठिकाणी नवीन वीज जोडण्या देतो. परंतु असे दिसून येते की, आपण मंजुरी एका गावाला देतो आणि सबस्टेशन दुसऱ्याच गावाला होते. अशा प्रकारचा वीज मंडळाचा चमत्कारिक अनुभव आम्हाला पहावयास मिळतो. माझ्या स्वत:च्या गावाचे उदाहरण देता येईल.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : विजेच्या संदर्भात चर्चा झाली आहे.

श्री. विनायक मेटे : ठीक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यावर चर्चा करीत असताना प्रथम मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 12, पृष्ठ क्रमांक 14 बाबत बोलणार आहे. यामध्ये पोलिसांचे गणवेष खरेदी करण्याकरिता तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे पोलिसांना गणवेष आवश्यक आहेत आणि त्यासाठी ही तरतूद केलेली आहे. जी नवीन पोलीस भरती झालेली आहे त्यांचें गणवेष खरेदी करण्यासाठी तरतूद केलेली आहे. पोलिसांना आपण गणवेष तर देतोच परंतु ते ज्या ठिकणी राहतात त्या ठिकाणी आपण जाऊन पाहिले तर तेथील दुरावस्था आपल्या लक्षात येईल. मी पंधरा दिवसांपूर्वी माहीम येथील पोलीस वसाहतीमध्ये गेले होते. त्या इमारतींमधील पायऱ्या तुटलेल्या होत्या. दरवाजे तुटलेले होते. घराचा रंग निघालेला होता. मी विचारल्यावर असे सांगण्यात आले की, आम्ही जर घराला रंग दिला तर आमच्या पगारातून पैसे कापले जातात. त्या ठिकाणी एकच बल्ब, एकच नळ दिलेला आहे. पोलिसांची ही दुरावस्था पाहणे आवश्यक आहे. त्यांची मानसिकता आपण पाहिली पाहिजे. त्यांना रिलॅक्सेशन मिळत नाही. त्यांना तासंतास ड्युटी करावी लागते. त्यांना कौटुंबिक सहवास जास्त मिळत नाही. शेवटी पोलीस हाही माणूस आहे. या सगळ्या गोष्टींचा त्यांच्यावर परिणाम होत असतो. काही पोलीस अधिकारी अपवाद आहेत. ते पशूप्रमाणे वागतात. तरी सुध्दा त्यांची परिस्थिती काय आहे याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. गणवेषासाठी खर्च करणे आवश्यक आहे परंतु मला असे वाटते की, पोलीस ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी सुध्दा त्यांना योग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत. ते ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी त्यांचे मनोरंजन झाले पाहिजे. त्यांची जी ड्युटी आहे किंवा कामाचे तास आहेत त्यामध्ये कोठे तरी मर्यादा असली पाहिजे. आपल्याकडे पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. आताच इयत्ता बारावीच्या परीक्षा झाल्या. सायन येथे एक विद्यार्थी परीक्षेला जात असताना त्याचे पाकीट मारण्यात आले तसेच त्याला खूप मारहाण झाली. त्याची परीक्षा बुडाली. उल्हासनगर येथे दोन विद्यार्थी परीक्षेला जात असताना एका विद्यार्थ्याच्या डोक्यात खिळे ठोकण्यात आले, चुका ठोकण्यात आल्या. आपल्याकडे पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे .......

सभापती महोदय, बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 15 यामध्ये पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्याचे सुशोभिकरण करण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. यासाठी तरतूद करणे ही अत्यावश्यक बाब आहे. पर्यटनाच्या विकासामध्येच राज्याचा विकास सामावलेला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आपण इतर राज्यांमध्ये जाऊन पाहिले तर त्यांनी त्यांची ऐतिहासिक स्थळे छानपणे जपलेली आहेत. आपल्याकडे असलेल्या किल्ल्यांची मात्र फार दुरावस्था झालेली दिसून येते. मला असे वाटते की, शिवाजी महाराजांचे जेवढे किल्ले आहेत त्या सर्व किल्ल्यांचे सुशोभिकरण करणे गरजेचे आहे. आपला इतिहास आपण जपला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जागतिक स्तरावर झालेले आहे. अशावेळी त्यांचे जे सर्व किल्ले आहेत किंवा त्यांनी तयार केलेला जो प्रतापगड किल्ला आहे त्याचे सुशोभिकरण करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे...)

त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नाही, दूरध्वनीची सोय नाही, उन्हाळयात तर तेथे पाण्याचा पत्ताच नसतो, कोणत्याही प्रकारची सुविधा त्या ठिकाणी नाही. तेव्हा केवळ प्रतापगड किल्ल्याचेच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्वच किल्ल्याचे सुशोभिकरण करण्याचे काम शासनाने हाती घेतले तर बरे होईल. या किल्ल्यांचा प्रचार आणि प्रसारही केला पाहिजे.

पृ.क्र. 23 वरील बाब क्रमांक 27 मध्ये शासकीय प्रयोजनांसाठी भूमी संपादनाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. आपण ग्रामीण भागातील पाटबंधारे प्रकल्पांची पाहणी केली तर अनेक पाटबंधा-याचे प्रकल्प अर्धवट स्थितीत असल्याचे आपणाला दिसून येईल. प्रकल्पांचे 10-10 वर्षापूर्वी उद्‌घाटन होऊनही एक इंचही काम झालेले नसल्याचे दिसून येईल. शासन दरबारी अशा प्रकल्पांबाबत विचारणा केली तर काम प्रगतीपथावर आहे असे उत्तर देण्यात येते. कवठे केंजळी हा देखील असाच एक प्रकल्प अनेक वर्षापासून रेंगाळत पउलेला आहे. या प्रकल्पाचे चौथ्यांदा उद्‌घाटन झाले. प्रकल्पाचे एक इंच देखील काम अद्याप झालेले नाही. अशा प्रकल्पांचे केवळ उद्‌घाटन करुन त्याकडे शासन दुर्लक्ष करणार असेल तर हे शासन शेतक-यांना कसा न्याय देईल असा प्रश्न निर्माण होतो.

पृ.क्र. 23 वरील बाब क्रमांक 29मध्ये मांढरदेव, तालुका वाई, जिल्हा सातारा येथील दंगलीची झळ पोहोचलेल्या दुकानदारांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता तरतूद केलेली आहे. मांढरदेव याठिकाणी चेंगराचेंगरी झाली त्यामध्ये दुकानदारांचेही नुकसान झाले. दुकानदारांसाठी शासनाने मदत पाठविलेली आहे. परंतु ती त्यांना मिळालेली नाही. तेथील जमिनीचे जे मूळ मालक आहेत त्यांनाही पैसे मिळावयास पाहिजेत. बाहेरचे दुकारनदारही त्या ठिकाणी होते. त्या दुकानदारांनाही पैसे मिळालेले नाही. शासनाने नेमलेल्या कोचर आयोगाचे काम जलद गतीने होण्याची आवश्यकता आहे. वाईचा साक्षीदार क्रमांक 41 श्री. रोहिदास बबन गुरव (क्षीरसागर) याने अनुक्रमे दोन प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत. पहिले प्रतिज्ञाप्रत्र दिनांक 23.7.2005 रोजी केले. त्यामध्ये त्याने तहसिलदार वाई, प्रांताधिकारी वाई, पोलीस आणि ट्रस्ट यांच्यावर टीका केली. त्यानंतर त्याने दोन महिन्याने दिनांक 23.9.2005 रोजी पुन्हा प्रतिज्ञापत्र सादर केले. साक्षीच्या वेळी त्याने कोर्टासमोर सांगितले की, दुसरे प्रतिज्ञापत्र मी वाईच्या पोलिसांनी सांगितले म्हणून

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे...)

केलेले आहे. दुस-या प्रतिज्ञापत्रामध्ये त्याने "घटनेच्या वेळी मी नव्हतो" असे सांगितलेले आहे. म्हणजे साक्षीदारांवर पोलिसांचा दबाव आहे. जे प्रत्यक्ष घटनास्थळी होते त्यांना बोलू दिले जात नाही. या कोचर आयोगावर हे शासन किती पैसा वाया घालविणार आहे असा मला या निमित्ताने शासनाला सवाल करावयाचा आहे.

सभापती महोदय, पृ.क्र. 174 वरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 191 मध्ये महिला अभ्यास केंद्राच्या अध्यापन पदांची वित्तीय दायित्वे हाती घेण्यासाठी पुणे विद्यापीठाला अनुदान देण्यासंबंधी तरतूद केलेली आहे. आज आपण पाहतो की, महिला या प्रत्येक क्षेत्रामध्ये आघाडीवर आहेत. अखिल भारतीय स्तरावर आघाडीवर असलेल्यांमध्ये महाराष्ट्रातील महिलांची संख्या अधिक आहे. या महिला अभ्यास केंद्रामुळे महिला पुढे येण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. या निमित्ताने मला शासनाला सुचवावयाचे आहे की, या महिला अभ्यास केंद्राचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रामध्ये सर्व ठिकाणी व्हावयास पाहिजे जेणे करुन 12वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनींना देखील या अभ्यास केंद्राचा लाभ घेता येईल.

पृ.क्र.124 वरील बाब क्रमांक 146 आणि बाब क्रमांक 147मध्ये दर्जेदार मराठी चित्रपटाच्या निर्मितीसाठी तसेच अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद केल्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. मागील दोन वर्षापासून आपले मराठी चित्रपट तसेच नाटके दर्जेदार व्हायला लागली आहेत. ती अधिकाधिक दर्जेदार होण्यासाठी त्यांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे.

पृ.क्र. 126 वरील बाब क्रमांक 152 मध्ये मागासवर्गीये मुले व मुली यांच्याकरिता शासकीय वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. नाशिक, अमरावती व औरंगाबा येथें मागासवर्गातील मुले व मुली यांच्याकरिता वसतिगृह बांधण्यात येणार आहेत. मुंबईतील वसतिगृहांना माननीय मंत्री महोदयांनी भेटी देऊन त्या वसतिगृहांची स्थिती कशी आहे हे सांगून त्यासंदर्भात आश्वासनही दिले होते. त्या आश्वासनाचे पुढे काय झाले ?

...नंतर श्री. कानडे...

अध्यक्षांचा/ सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 15:30

श्रीमती कांता नलावडे ...

मुंबईतील मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये कोणत्या सुधारणा झालेल्या आहेत याची माहिती शासनाने द्यावी. प्रत्येक जिल्हयात मागासवर्गीय मुला-मुलींसाठी वसतिगृह असणे हे अत्यंत गरजेचे आहे. सभापती महोदय, बाब क्र.178,पृष्ठ क्रमांक 162 यामध्ये बागायती पिकासाठी घेतलेले व्याज प्रदान करण्यासाठी पुरवणी मागणी मांडण्यात आली आहे. परंतु यामध्ये दुजाभाव होता कामा नये. गरजू बागायतदारांना मदत मिळेल यादृष्टीने शासनाने काळजी घ्यावी. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या विवाहासाठी पॅकेज यामध्ये दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. परंतु आतापर्यंत किती विवाह झालेले आहेत आणि किती शेतकऱ्यांना याचा लाभ झाला आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. या योजनेमध्ये मुदतवाढ दिलेली आहे ही अत्यावश्यक आणि अभिनंदनीय गोष्ट आहे. धन्यवाद.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 15:30

श्री. मुजफ्फर हुसेन (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पुरवणी मागणी क्रमांक बी-1,पृष्ठ क्रमांक 14 यातील बाब क्र.12,14 आणि 17 यावर मी बोलणार आहे. पोलिसांच्या कल्याणाकरिता अतिरिक्त तरतूद त्याचप्रमाणे मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च या स्वरुपात ही मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 10 कोटींच्या आसपास आहे. यामध्ये 42 टक्के शहरी भाग आणि 58 टक्के ग्रामीण भाग आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये विशेषत: मुंबईच्या परिसरामध्ये बाहेरुन आणि इतर राज्यातून येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरी भागामध्ये गुन्हेगारी वाढत आहे. लोकसंख्येच्या मानाने राज्यामध्ये पोलीस आयुक्तालये आणि पोलीस दल यांची संख्या अपुरीच आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या राजधानीला अधिक बळकट करण्यासाठी या शहरामध्ये आर्थिक गुंतवणूक होणे आवश्यक आहे आणि आर्थिक गुंतवणूक वाढण्याची आपण अपेक्षा करतो त्यावेळी राज्याची आणि शहराची कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती आणि ज्युडीशिअरी सिस्टीम चांगली असणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने देशाच्या विकासामध्ये चांगला क्रमांक मिळविलेला आहे. हे जरी खरे असले तरी या राज्याला विकासाच्या मार्गावर पुढे न्यावयाचे असेल तर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती तसेच ज्युडीशिअरी सिस्टीम अधिक शक्तीशाली होणे किंवा रिझल्ट ओरिएंटेड करणे आवश्यक आहे. राज्यातील पोलीस दलाची जी परिस्थिती आहे त्यामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे. पोलीस दलातील कर्मचाऱ्यांवर पडणारा कामाचा ताण,कामाच्या वेळा,राहण्याची व्यवस्था यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. काम करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे पोलिसांवर कामाचा ताण पडतो आणि काही पोलीस ठाण्यात काही विरुध्द घटना घडतात. विशेषत: पोलीस दलातून चुकीची वागणूक मिळाल्यामुळे आत्महत्या होता.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसैन ........

मुंबई ही राज्याची आर्थिक राजधानी आहे म्हणून या मुंबई परिसरातील कायदा व सुव्यवस्था चांगली असणे आवश्यक आहे. विशेषत: ठाणे जिल्हयाच्या बाबतीत मला असे सुचवावयाचे आहे की, ठाणे जिल्हयाची लोकसंख्या आता 1 कोटीच्या जवळपास पोहचली आहे. पण या ठिकाणी आवश्यक ते पोलीस दल आणि न्यायालय नाही, नवीन पोलीस आयुक्तालयाची निर्मिती विशेषकरुन सागरी आयुक्तालय हे बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित आहे, त्याचा निर्णय शासनाने लवकरात लवकर घ्यावा. नवी मुंबईमध्ये नुकतीच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्याला आटोक्यात आणण्यासाठी शासनाला काही काळ लागला, कारण पोलीस दल आपल्याकडे अपुरे आहे. मुंबई आणि ठाणे जिल्हा हे लागूनच असल्यामुळे आणि मुंबईत काम करणारे लाखो लोक ठाणे जिल्हयात राहतात म्हणून ठाणे जिल्हयाच्या कायदा व सुव्यवस्थेवर जर परिणाम झाला तर त्याचा परिणाम मुंबई शहरावर सुध्दा होऊ शकतो. म्हणून सागरी आयुक्तालय, पोलीस स्टेशनची निर्मिती आणि पोलीस दलात वाढ करणे गरजेचे आहे व यासंदर्भात शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, गृह विभाग, पृ.क्र.14, बाब क्र.12 यासंबंधी बऱ्याच सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले असले तरी मी एका वेगळया मुद्दयाच्या संदर्भात बोलू इच्छितो. राज्यातील पोलीस आज 18-18 तास काम करतात, उन्हा-पावसात काम करतात पण त्यांना शासनाकडून वर्षातून फक्त एकच ड्रेस देण्यात येतो. हा गणवेष मिळाल्यानंतर त्याच्या धुलासाठी फक्त 75 रुपये मिळतात. त्याचप्रमाणे पोलीस निरिक्षकाला 2500 रुपये दीड वर्षातून एकदा गणवेशासाठी आणि धुलाईसाठी 250 रुपये मिळतात. एका हवालदाराला मी विचारले त्यावेळी त्यांनी ही परिस्थिती मला सांगितली होती. परवा जी दंगल झाली त्यावेळी पोलिसांनी 24-24 तास काम केलेले आहे. एकविसाव्या शतकात आपण असतांना पोलिसांना मात्र एकच गणवेश देतो हे योग्य आहे काय याचा शासनाने विचार करावा. तसेच मोजे वर्षातून दोन वेळा आणि बूट फक्त एक वेळा देण्यात येतात. ज्या पोलिसांकडून कायदा व सुव्यवस्थेची अपेक्षा करतो त्यांना अशा प्रकारची वागणूक आपण देत आहोत. ज्या ज्या ठिकाणी मोर्चे येतात व वेतन भत्ते वाढीची मागणी करतात त्या ठिकाणी पोलिसांना आपली डयुटी मूकपणे करावी लागते परंतु त्याची मागणी तो करु शकत नाही. दुसरी बाब म्हणजे एखादा तोतया पोलीस खाकी वर्दीचा वापर करुन जनमानसात कशा प्रकारे दहशत निर्माण करतो याचा पुरावाच मी सांगतो. 31 डिसेंबर रोजी मुंबई शहरात नवीन वर्षाच्या स्वागतासाठी वेगवेगळया ठिकाणी पाटर्या होत होत्या त्यावेळी माधुरी अपार्टमेंट वरळी, या ठिकाणी एका युवकाने पोलीस इनस्पेक्टरचे कपडे व हॅट घालून या इमारतीमध्ये दहशत पसरविण्याचे काम केले. "खोटया पोलिसाबाबत करण्यात आलेली खरी तक्रार" रेअर कंप्लेंट फॉर फेक कॉप" अशा प्रकारे त्याने खाकी वर्दी घातलेली होती व हॅट घातलेली होती. ज्यावेळी पार्टी रंगात आली त्यावेळी त्याने दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. वरळी पोलीस स्टेशनच्या अखत्यारित ही इमारत येते. मी स्वत: तेथे जाऊन तक्रार केली. ज्याप्रमाणे "काम चालू रस्ता बंद" त्याप्रमाणे अशा तक्रारींची चौकशी केली जाते.....

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट...

अजूनही चौकशीसाठी वेळ पाहिजे आहे, मला वाटते याबाबत संशोधन केले पाहिजे. ही बाब गृह विभागाच्या दृष्टीने लाजिरवाणी आहे.

यानंतर मी पान क्र.124 वरील बाब क्र.146 वर बोलणार आहे. मराठी चित्रपट निर्मितीसाठी रुपये 7 कोटी 75 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, त्याचे मी स्वागत करतो. मराठी चित्रपट निर्माते आणि कलाकारांना जगविण्यासाठी शासनाने ही तरतूद केली आहे. पण गेल्या दोन वर्षात मुंबईतील चित्रपटगृहांची अवस्था काय झाली आहे ? आज मुंबईतील अप्सरा, नंदी, मीलन सारखी चित्रपटगृहे काळाच्या पडद्याआड गेली आहेत. या चित्रपटगृहांचे व्यापारी संकुलात रुपांतर झाले आहे. मराठी चित्रपटसृष्टी जीवंत ठेवावयाची असेल तर चित्रपटगृहांचे व्यापारी संकुलामध्ये रुपांतर करण्यास शासनाने बंदी घातली पाहिजे. मुंबई शहरातील सगळी चित्रपटगृहे आज बंद पडत असून त्यांचे व्यापारी संकुलामध्ये रुपांतर होत आहे. त्यामुळे शासन हे अनुदान कोणासाठी देणार आहे ? असा देखील प्रश्न उपस्थित होतो. केंद्रीय ऊर्जा मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी 15 लाख रुपये अनुदान देण्याची घोषणा केली होती. परंतु त्याची पूर्तता अद्यापपावेतो झालेली नाही. शासन केवळ घोषणाच करणार असेल तर मग त्याला काहीही अर्थ राहणार नाही. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विचार व्यक्त करताना सांगितले होते की, ज्याप्रमाणे कामगार, शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्याप्रमाणे कदाचित कर्जाच्या भीतीपोटी मराठी चित्रपट निर्मात्यांवरसुध्दा आत्महत्या करण्याची वेळ येईल. शासनाने केलेली तरतूद खरोखरच मराठी चित्रपट निर्मात्यांपर्यंत पोहचली तरच त्यांना फायदा होईल. तसेच, तांत्रिकदृष्टया उत्कृष्ट चित्रपटाला रुपये 10.00 लाख एवढे वित्तीय सहाय्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. पण त्यासाठी कोणतेही निकष ठरविण्यात आलेले नाहीत. जो पर्यंत निकष ठरवत नाहीत तो पर्यंत वित्तीय सहाय्य देखील मिळणार नाही. तेव्हा शासनाने आतापर्यंत किती जणांना अनुदान दिले आहे, यासंबंधीची माहिती मिळाली तर बरे होईल. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 12 वर बोलण्यासाठी मी उभी आहे. आज राज्यातील पोलिसांना 12-12, 14-14 तास काम करावे लागत आहे. त्यांच्यावर कामाचा प्रचंड ताण असतो. त्यामुळे तो ताण कमी करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने त्यांच्या कामांचे तास कमी करणे आवश्यक आहे. पोलिसांच्या कामांचे तास कमी व्हावेत म्हणून 10,500 नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत. ही पदे त्वरित भरली तर कदाचित त्यांच्यावरील जादा तासाद्वारे पडणारा कामाचा ताण निश्चितच कमी होईल. त्याच प्रमाणे मृत पोलीस कर्मचाऱ्यांचे जे वारसदार आहेत, त्यांना अनुकंपा तत्त्वावर पोलीस सेवेत सामावून घेतले पाहिजे. त्यासाठी विशेष भरती मोहीम हाती घ्यावी अशी मी विनंती करते. नाशिक आणि दौंड येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र आहे. त्या धर्तीवर मुंबई पोलिसांसाठी वेगळे प्रशिक्षण केंद्र उघडण्यात यावे अशी मी विनंती करीत आहे. येथे सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी पोलिसांच्या वसाहती संबंधीचा मुद्दा उपस्थित केला. आज पोलीस वसाहतीतील इमारतींचा दर्जा अत्यंत निकृष्ट झालेला आहे.

यानंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ KGS/ MAP यापूर्वी श्री. भारवि .. 15.45

श्रीमती सुधा जोशी ....

त्यांच्या घरांची दुरुस्ती कोणीही करत नाही. पी.डब्ल्यू.डी विभाग त्यांच्या घरांची दुरुस्ती करत नाही की पोलीस गृहनिर्माण मंडळही त्याकडे लक्ष देत नाही. तरी, या प्रश्नाकडे शासनाने जरुर लक्ष द्यावे. सभापती महोदय, गुन्हेगारांकडे पोलिसांपेक्षा जास्त चांगली हत्यारे आहेत. मग पोलिसांनी काय करावे ? त्यांच्याकडेही चांगल्या प्रतीची हत्यारे असणे आवश्यक आहे. तरी, शासनाने याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या, पृष्ठ क्रमांक 147, बाब क्रमांक 166 वर बोलणार आहे. सभापती महोदय, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, युनानी महाविद्यालयांना चालना देण्यासाठी यामध्ये तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नियम तयार करताना त्यात एक नियम असा करण्यात आला आहे की, नापास विद्यार्थ्यांना परत परिक्षेस बसता येत नाही. परंतु जर एखाद्या विद्यार्थ्याच्या कौटुंबिक अडचणीमुळे त्याच्या शिक्षणात खंड पडला. त्याचे प्रथम वर्ष पूर्ण झाले आणि नंतर काही कारणास्तव दुसऱ्या वर्षाला तो बसू शकला नाही, त्याला शिक्षण घेता आले नाही तर त्याच्या शिक्षणाचा तो खंड कालावधी कंडोन करुन अथवा त्या कालावधीची फी सह दंड आकारणी करुन प्रवेश देण्यासाठी तरतूद नसल्यामुळे हा विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहातो. काही कालावधीनंतर राहिलेले अर्धवट शिक्षण पूर्ण करण्याची त्याची इच्छा असते. परंतु इच्छा असुनही फक्त तरतूद नसल्यामुळे त्याला शिक्षण अर्धवट सोडावे लागते, शिक्षणापासून वंचित रहावे लागते. तरी, याबाबत देखील शासनाने योग्य ती दुरुस्ती करावी आणि तशाप्रकारे जर कोणी अर्ज केले असतील तर " खास बाब " म्हणून त्या अर्जांचा सहानुभूतीपर्वूक विचार करण्याची आवश्यकता आहे. तरी, भविष्यात अशी अडचण उद्‌भवू नये म्हणून सदरच्या नियमात ही गोष्ट समाविष्ट करण्याबाबत मी आपल्याला विनंती करते.

सभापती महोदय, आता मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 125 वरील बाब क्रमांक 149 बाबत बोलू इच्छिते. सदर मागणीच्या माध्यमातून शिक्षण, शिष्यवृत्ती यांसाठी तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, दलित मित्र पुरस्कार दोन वर्षांपासून दिलेला नाही. यासाठी शासनाकडे पूर्वी अर्ज प्राप्त झालले आहेत परंतु तरीही आता नव्याने प्रस्ताव यावेत असे या ठिकाणी म्हटलेले आहे. तरी, पूर्वी अर्ज केलेल्या समाजसेवकांनी परत अर्ज केले नसतील तर त्यांचा पूर्वीचाच अर्ज

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ....

विचारात घेऊन हा दलित मित्र पुरस्कार जाहीर करावा. तसेच हा पुरस्कार 14 एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या वेळी जाहीर करण्यात यावा, अशी मी या निमित्ताने आपणास विनंती करते.

सभापती महोदय, आता मी महिला व बालकल्याण विभागाच्या, पृष्ठ क्रमांक 182 वरील बाब क्रमांक 202 वर बोलू इच्छिते. पौगंडावस्थेतील मुलींसाठी केंद्र पुरस्कृत पोषण आहार कार्यक्रम ही अत्यंत गरजेची बाब आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. त्याचप्रमाणे पृष्ठ क्रमांक 181 वरील बाब क्रमांक 200 संदर्भात मी असे सांगू इच्छिते की, राज्यातील महिला वसतिगृहे तसेच अनाथ मुलींची वसतिगृहे यांची अतिशय दुरावस्था आहे. त्यांना अपुरे संरक्षण आहे. त्यामुळे त्यांच्यावर अतिशय अत्याचार होत असतात. महिलांवरील अत्याचारासंदर्भात चौकशी करण्यासाठी महिलांची कमिटी गेली होती. त्यावेळी अतिशय विदारक असे वर्णन ऐकायला मिळालेले आहे. तरी, त्यांच्या सुखसोयींबाबत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा विचार करुन तेथील दुरावस्था दूर करण्याची आवश्यकता असल्यामुळे शासनाने या संदर्भात योग्य ती काळजी घ्यावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद !

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुबई शिक्षक) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 105 बाब क्रमांक 122 मा. उच्च न्यायालच्याच्या आदेशानुसार मृत्यू-नि-सेवानिवृत्त उपदनावरील व्याज प्रदान करणे. यासंदर्भात श्री. बळवंत गायकवाड, शासकीय मुद्रणालय पुणे यांच्या मृत्यूनंतर पत्नी हेमलता हिला उच्च न्यायालयात जावं लागले व उच्च न्यायालयाच्या निकालानुसार 10 एप्रिल, 1995 पासून कुटुंब निवृत्ती वेतनातील फरक मृत्यू व सेवानिवृत्त उपदानावरील व्याज देण्याचे आदेश दिले. यानुसार 50963 रुपये दिलेत व 43000 हजार रुपये व्याजाचे देणे बाकी आहेत, वास्तविक दृष्टया एका महिलेला कोर्टात जाऊन याबाबत कार्यवाही करावी लागते ही बाब शासनास भूषणावह नाही.

पृष्ठ क्रमांक 124 बाब क्रमांक 146 मराठी चित्रपट निर्मितीसाठी सहाय्यक अनुदान 7 कोटी 95 लाख रुपये दिलेले आहे. यासंदर्भात 65 ते 70 अर्ज आलेले असतांना आपण फक्त 27 अर्जाची छाननी केलेली आहे. छाननीची प्रक्रिया खूप धिम्यागतीने चाललेली आहे. मराठी चित्रपट निर्मात्यांना 6 महिन्याच्या आत सहाय्यक अनुदान मिळेल काय ? अनेक कारणांनी आपण अनुदान देण्याचे पुढे ढकलित आहेत, त्यामध्ये कधी आचारसंहिता येते यामुळे उशीर होतो, म्हणून हे अनुदान लवकरात लवकर द्यावयास पाहिजे.

पृष्ठ क्रमांक 124 बाब क्रमांक 147 कला व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान- यामध्ये जानेवारी, 2005 मध्ये डोंबिवली येथे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेला 25 लाख 53 हजारांचे अनुदान दिलेले आहे. नाटयसंमलनासाठी ही चांगली बाब आहे. आपण इंग्रजी माध्यमांच्या शाळांना जास्त मान्यता देऊ नये, असे केले तर मराठी नाटाकाकडे सहज लोक वळतील यादृष्टीने कार्यवाही करावी.

पृष्ठ क्रमांक 135 बाब क्रमांक 161 बृहन्मुंबईकरिता सक्षम प्राधिकारी- यासाठी 32 लाख 5 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे, या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे काय ? त्यांचे निश्चित काम काय आहे ? त्यांच्यासाठी जागा कोठे दिली आहे यासंदर्भातील खुलासा मंत्री महोदयांनी केला तर बरे होईल व आमच्या कामाच्या संदर्भात आम्हाला भेटता येईल.

पृष्ठ क्रमांक 145 बाब क्रमांक 164 कस्तुरबा आरोग्य संस्थेस सहायक अनुदान- कस्तुरबा आरोग्य संस्था सेवाग्राम वर्धा यास एकूण अंदाजपत्रकीय खर्चाच्या 25 टक्के रक्कम त्यास द्यावयास असते. त्यासाठी 6 कोटी 45 लाख रुपयांची तरतूद करावयाची आहे. चालू वित्तीय वर्षात फक्त 2 कोटी 31 लाख 65 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. बाकीची रक्कम केव्हा देणार आहात? एवढया पैशामध्ये त्यांचे व्यवहार कसे काय चालतील ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

पृष्ठ क्रमांक 174 बाब क्रमांक 191, महिला अभ्यास केंद्राचे अध्यापन यासाठी 1990 ते 91 पासून त्यातील 2 पदांसाठी एक एप्रिल, 1997 पासून ते 31 मार्च 2005 पर्यंत वेतनाच्या थकबाकीची रक्क्म का देण्यात आलेली नव्हती ? इतके दिवस त्यांना उशीर का करण्यात आलेला आहे ? नशिबाने त्यांना आता पैसा मिळालेला आहे. पुढील काळामध्ये याकडे लक्ष देण्यात यावे.

पृष्ठ क्रमांक 177 बाब क्रमांक 199- कारागिरांच्या तांत्रिक व्यावसायिक प्रशिक्षणाचा विस्तार. कारागिरांच्या तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाची विस्तार या संदर्भातील भूमिका कोर्टात मांडण्यात आलेली आहे. यापुढे नवीन जमीन संपादित करतांना न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना रक्कम द्यावी लागेल यामध्ये 43 कोटी 22 लाख रुपये द्यावे लागत आहेत. असा व्यवहार करतांना त्यांनी एनओसी घेतली होती काय ? नको त्या माणसांच्या जमीनी ताब्यात घेतल्या होत्या काय ? ही सर्व प्रकरणे कशी काय झालेली आहेत ? याबाबत सुध्दा खुलासा व्हावा.

पृष्ठ क्रमांक 181 बाब क्रमांक 201 शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान. स्वयंसेवी संस्थांना 2 कोटी रुपयांचे अनुदान दिलेले आहेत यामध्ये किती मुलींचे विवाह होतील, प्रत्येक लग्नाला किती खर्च करण्यात येईल. याबाबत सुध्दा खुलासा करण्यात यावा.

पृष्ठ क्रमांक 182 बाब क्रमांक 202 पौंगडावस्थेतील मुलींसाठी पोषण आहार- 11 ते 19 वयोमर्यादेतील व 35 किलो पेक्षा कमी वजन असलेल्या मुलींना पोषण आहार देण्याचे ठरविलेले आहे. पंरतु 18 वर्षानंतर मुलींची लग्न होतात मग त्या मुलींना पोषण आहार देणार किंवा नाही त्यासंदर्भातील सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

पृष्ठ क्रामंक 181 बाब क्रमांक 200- यामध्ये निराश्रीत बालक पोषण आहार, गणवेष, पस्तके यासाठी 3 कोटी 9 लाख 22 हजार रुपयांची तरतूद करण्यात अलेली आहे. ही एक चांगली बाब आहे. या मुलांना जूनमध्ये शाळा सुरु झाल्यानंतर गणवेश व पुस्तके देण्यात आली होती काय, असल्यास एवढा उशीर लावण्यास काय अर्थ आहे. याबाबत सुध्दा खुलासा करावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

------------------

यानंतर श्री. सांगळे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : बाब क्र.12, पान क्रमांक 14, गृह विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी पोलिसांच्या गणवेष खरेदीसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. थोडया वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी पोलिसांच्या गणवेशाबाबत सभागृहाला माहिती दिली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी पोलिसांना वर्षाला किती गणवेश दिले जातात, व किती धुलाई भत्ता मिळतो याबाबतची माहिती दिली आहे. त्यांच्या माहितीप्रमाणे पोलिसांना एका वर्षात साधारणपणे एकच गणवेश दिला जातो. यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. आज लोकांमध्ये पोलिसांची प्रतिमा, त्यांच्या गणवेशामुळे झाली आहे. लोक पोलिसांच्या खाकी वर्दी असलेल्या गणवेशाला घाबरतात. अशा परिस्थितीत या ठिकाणी पोलिसांसाठी फक्त एकाच गणवेषासाठी तरतूद केलेली आहे. त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, याबाबत अजून तरतूद करुन पोलिसांना वर्षाला किमान 2 गणवेश देणे आवश्यक आहे. आज पोलिसांची मानसिक मनोधैर्य वाढवण्याची आवश्यकता आहे, प्रतिमा उंचावण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीकोनातून पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री पोलिसांची बाजू घेऊन नेहमी भांडतात, याची आम्हाला माहिती आहे. परंतु हे काम करीत असताना पोलिसांची मानसिक स्थिती कशी चांगली राहिल, पोलीस चांगल्या प्रकारे कसे काम करु शकतील याकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. यापूर्वी माननीय गृहमंत्र्यांनी पोलीस दलातील अधिका-यांना फाईव्ह स्टार हॉस्पीटलमध्ये ट्रीटमेंट मिळणार असल्याची घोषणा केली होती. आतापर्यंत पोलीस दलातील किती लोकांना लिलावती, हिंदुजा, ब्रीचकँडी, किंवा बॉम्बे हॉस्पीटल सारख्या हॉस्पीटलमध्ये ट्रीटमेंट मिळाली ?

बाब क्र.16, पान क्रमांक 15, गृह विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी श्रीमती काकडे यांचे पती कै.प्रताप काकडे मध्यवर्ती येरवडा, पुणे येथे मृत पावल्याने त्यांना भरपाईची रक्कम देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. श्रीमती काकडे यांच्या पतीचा मृत्यू कसा झाला, कोणामुळे झाला या सर्व बाबी अतिशय संदिग्ध असल्यामुळे याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. त्यांचा मृत्यू होण्याच्या वेळी त्यांना ट्रीटमेंट मिळाली किंवा नाही, कारण माझ्या माहितीप्रमाणे त्यांचा हृदयविकारामुळे मृत्यू झालेला आहे. मध्यंतरीच्या काळात ई-टीव्ही चॅनेलद्वारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

तुरुंगात कोणत्या प्रकारच्या सोयी दिल्या आहेत, याबाबतचा एक वृत्त प्रसारीत करण्यात आले होते. तुरुंगासाठी काही मार्गदर्शक तत्वे आहेत. एका रुममध्ये किती कैदी ठेवावेत, त्यांना कोणत्या सुविधा द्याव्यात, कैद्यांना अंथरुण-पांघरुण देण्यासाठी, तसेच साबण देण्यात यावा की नाही याबाबतची काही मार्गदर्शक तत्वे घालून देण्यात आली आहेत. परंतु कोणत्याही तुरुंगामध्ये या मार्गदर्शक तत्वांचे पालन होत नाहीत असा माझा दावा आहे. या मार्गदर्शक तत्वानुसार तुरुगांत सोयी दिल्या जातात की नाही याची आपण तपासणी करणार आहात काय ? तसेच या निमित्ताने मी एक घटना माननीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पोलीस दलामध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती लता मंगेश भालेकर यांच्या शासकीय निवास, वांद्रे येथील राहत्या घरी दरोडा पडला होता. त्याचा आतापर्यंत तपास करण्यात आलेला नाही ही दुर्देवाची बाब आहे.

श्री.आर.आर. पाटील : ही घटना केव्हा घडली होती ?

डॉ.दीपक सावंत : ही घटना गेल्या तीन महिन्यांपूर्वीची आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ...

सभापती महोदया, बाब क्र. 164, 165, 166 या संबंधात मी बोलू इच्छितो. राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथिक आणि युनानी महाविद्यालयांना चालना देण्यासाठी बाब क्र.166 ही येथे आणण्यात आलेली आहे. सभापती महोदया, आपण हे जे अनुदान या महाविद्यालयांना देतो त्याला क्रायटेरिया काय असतो ? आणि या महाविद्यालयांमध्ये नॉर्म्स प्रमाणे ज्या बेसिक रिक्वायरमेंट, एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे किंवा राज्य शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे असणे आवश्यक असते., तो क्रायटेरिया या महाविद्यालयांनी पूर्ण केलेला आहे काय ? सभापती महोदय, याच सभागृहामध्ये गेल्या अधिवेशनामध्ये, चंदाबेन मोहनभाई पटेल होमिओपॅथी कॉलेज विषयी चर्चा झाली होती आणि त्यावेळी हे कॉलेज भरमसाठ देणग्या घेते मात्र येथील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग अजूनही दिला जात नाही अशा प्रकारची तक्रार मी मांडली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी कबूल केले होते की, मी यामध्ये लक्ष घालून या कॉलेजातील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग का मिळत नाही हे पाहतो. परंतु आज पर्यंत सन्माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी यांचेकडून मला एका ओळीचे देखील पत्र आलेले नाही की, आपण यामध्ये काय केले आहे. किंवा हा पाचवा वेतन आयोग ..... मंत्री महोदयांनी मला त्यांच्या दालनामध्ये सांगितले की, आपण त्यांना देऊ. पण प्रत्यक्षात आपला तो निर्णय आलेला नाही. हे अतिशय खेदपूर्वक मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदया, बाब क्रमांक 165, मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित खर्च भागविण्यासाठी ही बाब येथे आणण्यात आलेली आहे. आज आपण जेव्हा जेव्हा पाहतो की, त्या त्यावेळी त्याच त्याच हॉस्पिटल्सची नावे असतात. आपण उपकरणे आणता, दवाखाने सुधरवता., यामध्ये जे.जे.हॉस्पिटल आहे, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल आहे. आता काल परवा कॉलरा आला आणि त्यावेळी आपली आरोग्य व्यवस्था किती अपूर्ण आहे हे आम्हाला पहावयास मिळाले. सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये, कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये ज्यावेळी 400 पेशंटस् ॲडमिट झाले त्यावेळी त्याची कपॅसिटी संपली. काही रूग्ण आपल्याला जी.टी.हॉस्पिटलमधून दुसरीकडे शिफ्ट करावे लागले. असा प्रकार एखाद्या वेळेस झाला तर त्या डिझास्टरशी सामना करण्याची क्षमता आपल्या हॉस्पिटल्समध्ये तयार करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टिकोनातून कोठेही तरतूद होत नाही ही दु:खाची गोष्ट आहे. गेल्या 26 जुलैला आपल्याकडे एवढे मोठे रामायण घडले, इतकेच कशाला आपल्याकडे बॉम्ब स्फोट झाले. त्यावेळी आपल्याकडील सर्व डॉक्टरांनी प्रयत्नांची शर्थ करून सर्वांना वाचविले. त्याबद्दल त्या

...... 3ए 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ...

डॉक्टरांना धन्यवाद, हॉस्पिटल्सच्या कर्मचाऱ्यांनाही धन्यवाद. पण आजपर्यंत आपण त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केल्याचे यामध्ये दिसत नाही. दुसरे असे की, नुकताच झालेला 'मार्ड'चा संप. मला असे वाटले होते की, या पुरवणी मागण्यांमध्ये त्याचा समावेश असेल, पण त्याचा समावेश यामध्ये नाही. अर्थात त्यासाठी या वर्षीच्या बजेटमध्ये समावेश केला असेल तर आपण आपल्या उत्तरामध्ये सांगावे. तसेच त्यामध्ये त्यांना नेमके काय देण्यात आले आहे ? कारण संपाच्या त्या 14 दिवसांमध्ये रूग्णांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. संपूर्ण मेडिकल सर्व्हिस पॅरलाईज झाली होती. सभापती महोदया, दंत वैद्यक हॉस्पिटलसाठी आपण पैसे दिलेले आहेत. दंतवैद्यक विद्यार्थ्यांच्या देखील काही मागण्या होत्या. त्या विषयी काय झाले ? हे देखील या निमित्ताने आम्हाला आपल्याकडून जाणून घ्यावयाचे आहे. तरी आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये या सर्व बाबतीत खुलासा करण्याची कृपा करावी. सभापती महोदया, या जे.जे.हॉस्पिटलमध्ये सीटी स्कॅन मशीन बंद होते. आणि त्याबद्दल नियम 93 च्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी येथे सांगितले होते. हे सीटी स्कॅन मशीन तेथे चालू झालेले आहे आणि ते बीओटी तत्त्वावर वा दुसऱ्या कोणत्या तरी तत्त्वावर आपण याचे खाजगीकरण करणार असल्याचे त्यावरील उत्तरामध्ये दिलेले होते. तर त्याबाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हे देखील येथे सांगण्याची आपण कृपा करावी. सभापती महोदया, या पुरवणी मागण्यांमध्ये जे.जे.हॉस्पिटलचा संदर्भ आहे आणि आपण स्वत: देखील भाषण करताना त्याबाबत मुद्दा येथे उपस्थित केला होता. मी जे.जे.हॉस्पिटलमधील सीटी स्कॅन मशीन विषयी बोलतो आहे आणि त्या संबंधातील नियम 93 खाली दिलेली सूचना कालच या सभागृहात आली होती पण दुर्दैवानी ती चर्चेला आली नाही. तेथील सीटी स्कॅन मशीन आज देखील बंद आहे. ते मशीन केव्हा चालू करणार ? तेथील सोनोग्राफी मशीन केव्हा चालू करणार ? एमआरआय मशीन कधी आणणार? हे सर्व प्रश्न आपल्या समोर आहेत त्यांची आपण उत्तरे द्यावीत अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

****

( यानंतर श्री. सरफरे .... 3बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदया, बाब क्र. 127 पृष्ठ क्र. 107 मध्ये मोठया व लघू उद्योजकांना 208 कोटींच्या अनुदानासाठी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मी सरकारला धन्यवाद देतो. त्याचबरोबर सुदैवाने मराठवाडयाचे उद्योग मंत्री व राज्यमंत्री सभागृहामध्ये आहेत. त्यांना अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, मराठवाडयाची राजधानी असलेल्या संभाजीनगर शहरामध्ये लघू उद्योजकांना देण्यासाठी एम.आय.डी.सी. कडे एक सुध्दा भूखंड शिल्लक नाही. आपण दोघेही मराठवाडयाचे आहात. वाळूंज येथील एम.आय.डी.सी.तील सर्व भूखंड दिले गेले आहेत. चिखलठाणा एम.आय.डी.सी. पूर्णपणे शिफ्ट झाली. आणि शेंद्रा एम.आय.डी.सी. मोठया उद्योगांसाठी राखून ठेवली. त्या ठिकाणी एक हजार लघू उद्योजक पुढील काळात येण्याची शक्यता आहे. त्या करीता आपण ताबडतोब एम.आय.डी.सी. ची घोषणा करावी. बीड रस्त्यावर स्वस्तामध्ये जागा मिळत असल्यामुळे मराठवाडयातील दोन्ही उद्योग मंत्री असतांनाही आपण काही करु शकला नाहीत. परमेश्वर आपले भले करु शकणार नाही. तेव्हा एवढे काही तरी करा अशी मी आपणास विनंती करतो. माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांनी मध्यंतरी संभाजीनगरला विमा इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरींग असोसिएशनचा चांगला कार्यक्रम घेतला. मला त्यांना विनंती करावयाची आहे की, आपण त्यांना बैठकीसाठी बोलाविले होते. त्या दिवशी मला आपल्यासंबंधी खूप चांगले भाषण करावयाचे होते. परंतु आपल्याला माननीय राज्यपालांना भेटावयाचे असल्यामुळे आम्हाला ती संधी मिळाली नाही. महिलांची बारबालामधून मुक्तता करुन त्यांना उद्योजकतेकडे वळवावे अशाप्रकारचे चांगले प्रेरणादायी भाषण आपण केले. त्यासाठी त्यांना कुठेतरी आऊटलेट करण्याची गरज आहे. त्यासाठी बैठक घेण्याची आवश्यकता आहे. आपण राज्याचे उपमुख्यमंत्री असल्यामुळे आपण त्यासाठी प्रयत्न करावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 136 मध्ये लघू पाटबंधारेसाठी 19 कोटी 86 लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. परंतु 100 हेक्टरच्या खाली प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार पूर्णपणे थांबले आहेत. म्हणून गेल्या वर्षभरामध्ये किती मागास भागामध्ये आपण प्रशासकीय मान्यता दिली याची माहिती द्यावी अशी माझी मागणी आहे. बाब क्र. 138 मध्ये झेड.पी. सेस रजिस्ट्रीमधून जमा झालेला आहे. आपण 138 कोटी रुपयें वेगवेगळया जिल्हा परिषदांना देणार आहात. माझी ग्राम विकास विभागामार्फत शासनाला विंनती आहे की, जमा होणारा झेड.पी. सेस त्याच ट्रेझरीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

ठेवून वर्ष पूर्ण झाल्यानंतर तो जिल्हा परिषदेला हँडींग इन हँड ओव्हर करण्याची व्यवस्था केली तर ते उपयुक्त होईल व त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कारभारामध्ये सुधारणा होईल. 2003 चा जमा झालेला सेस आता देत आहोत ही परिस्थिती बरोबर नाही. त्याचप्रमाणे बाब क्र. 152 मध्ये मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. संत तुकाराम वसतिगृह, पदमपूरा, संभाजीनगर येथे आहे. दर तीन महिन्यांनी तेथील मुले आंदोलनासाठी रस्त्यावर येतात. मंत्रिमहोदयांनी कधी तरी त्याठिकाणी भेट द्यावी. आणि या बदलत्या काळात, एकविसाव्या शतकात मेडिकल व इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या हॉस्टेल्सची दुरावस्था आपण जाऊन बघावी अशी मी आपणास विनंती करतो

बाब क्र. 166 मध्ये राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी महाविद्यालयांना चालना देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. नांदेडच्या आयुर्वेदिक महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष संपत आले. मागील वेळेस माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील साहेबांना हात जोडून विंनती केली होती की सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण या महाविद्यालयाला चकाकी आणा. त्यांनी बैठक घेतो असे आश्वासन दिले होते. आम्ही काय घोडे मारले समजत नाही पण आमची बैठक होत नाही. एक रुपया मिळाला नाही, रोज साडे पाचशे रुग्ण त्या ठिकाणी उपचारासाठी येतात. अत्यंत सुंदर परंपरा असलेले, ज्याच्यामध्ये आयुर्वेदामध्ये प्रचंड झेप घेण्याची क्षमता आहे असे हॉस्पिटल फक्त मराठवाडयात आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. माननीय राज्यमंत्री श्री. शेट्टी आपण तरी याबाबत पुढाकार घ्यावा . सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने तरी आपण या महाविद्यालयाकडे लक्ष द्यावे अशी विनंती करतो. सभापती महोदय, बाब क्र. 194 मध्ये विदर्भातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला आपण विशेष पैसे दिले आहेत. परंतु शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबादचा मी विद्यार्थी आहे. गेल्या चार वर्षापासून मागणी करीत आहे की, ऑन लाईन एक्झामिनेशन सेंटर या कॉलेजमध्ये करण्याची गरज आहे. त्याला आय.आय.टी. चा दर्जा देण्याची गरज आहे. परंतु अजून सुध्दा त्याठिकाणी पुरेसे संगणक दिले नाहीत. तेथील वसतिगृहांची दुरावस्था आहे. त्या ठिकाणी व्यायामशाळा नाही, कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण विभागाने त्याकडे लक्ष द्यावे. माननीय श्री. वळसे पाटील साहेब हे ऊर्जा विभागामध्ये गुंतलेले असल्यामुळे ते आम्हाला सापडत नाहीत. मार्डचा संप झाला त्यानंतर सर्व ठिकाणच्या हॉस्टेलमध्ये रहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

आपण त्यामध्ये लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

शेवटची बाब क्र. 184 मध्ये टेक्सकॉमची रक्कम समायोजित करावयाची आहे. नांदेडच्या टेक्सकॉमसाठी 112 कोटी 50 लाख रुपये शासनाचे अनुदान व व्याज समायोजित करुन ते शेअर कॅपिटलमध्ये आपण कन्व्हर्ट करीत आहोत. त्यासाठी पूरक मागणी केली आहे. या नांदेडच्या टेक्सकॉमचे आपण खाजगीकरण करणार आहात काय? करणार असाल तर आज या शेअरची व्हॅल्यू काय असणार आहे? त्यांचा संचित तोटा किती आहे. संचित तोटा काढून जर त्यांची व्हॅल्यू झ ीरो होणार असेल तर मग ही 112 कोटींची लायाबिलिटी आपण वाईप आऊट करावयाची याकरीता ही मागणी केली आहे काय? ही टेक्सकॉम खाजगीकरणामध्ये कुणाला देणार आहात की ईक्विटीमध्ये कुणी घेणार आहेत याचे विवेचन या निमित्ताने झाले पाहिजे. शासनाचे देणे परत यायला पाहिजे त्याऐवजी आपण या मागणीतून पुन्हा शेअर कॅपिटलमध्ये गुंतवणूक करीत आहोत. त्या शेअरची व्हॅल्यू शून्य होणार आहे. परंतु त्याठिकाणी असलेल्या ॲसेट्सचे उद्योगात रुपांतर होणार आहे की नाही हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे.

शेवटी बाब क्र. 177 मध्ये एन.सी.डी.सी. च्या इंटरेस्टसाठी, द्राक्षाच्या झालेल्या हानीसाठी 9 कोटींचे व्याज देत आहोत. अशाप्रकारची औरंगाबाद व जालना जिल्हयातील मोसंबीची हानी गेल्या तीन वर्षापासून मोठया प्रमाणात झाली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु....

पण मोसंबीसाठी मात्र अशा पध्दतीची कोणतीही सोसायटी नाही. आशियातील सगळयात मोठे आणि उत्कृष्ट मोसंबीचे उत्पादन हे जालना जिल्ह्यामध्ये होते. तरी तेथील शेतकऱ्यांच्या पर कॅपिटा इन्कममध्ये वाढ होण्यासाठी ही योजना अत्यंत चांगली आहे. यासाठी या वर्षी आपण 1 कोटी रुपये हे कृषी खात्यामार्फत दिलेले आहे. टँकरने पाणी देऊन मोसंबीची झाडे जगविण्यासाठी त्यांना विशिष्ट वेळेत बँकेतून कमी व्याजाने फायनान्स उपलब्ध करुन दिले तर त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. कारण पुढचे तीन महिने हे मोसंबी उत्पादकांसाठी अत्यंत कठीण काळ असतो. तीन महिन्यामध्ये मोसंबीची झाडे त्यांनी जगविली तर पुढच्या वर्षी पाच ते सहा लाख रुपयाचे उत्पन्न घेण्याची क्षमता असलेल्या बऱ्याच मोठ्या बागा होतील. परंतु दुर्दैवाने अशी योजना नसल्यामुळे, त्या मोसंबीच्या बागा नेहमीच कोसळतात. तेव्हा या निमित्ताने विशेष बाब म्हणून अशा पध्दतीची योजना ही कमी व्याजदरामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी पैसे उपलब्ध करुन द्यावेत, अशी विनंती करतो आणि माझे बोलणे संपवितो.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी पुरवणी मागण्यांवरील दोन-तीन मुद्यांबाबत मनोगत व्यक्त करणार आहे.

सभापती महोदया, पान क्रमांक 14, गृह विभाग, बाब क्रमांक 12, पान क्रमांक 14 मध्ये पोलिसांचे गणवेश खरेदी करण्यासाठी तरतूद केलेली आहे. या संबंधाने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेले आहे. त्यामुळे मी अधिक काही बोलणार नाही. पण या बाबतीमध्ये एवढेच जाणून घेऊ इच्छितो की, पोलिसांच्या कामाचे दिवस व कामाचे तास कमी करण्याच्या संदर्भामध्ये शासनाने काहीतरी विचार करणे आवश्यक आहे. या पूर्वीच्या भाषणामध्ये मी मुद्दा नमूद केलेला होता की, पोलीस बांधव प्रचंड तणावाखाली काम करतात. गणवेशाची सुविधा दिलेली आहे, बरोबरच त्यांच्या कामाचे तास कमी करणे आणि त्यांना सुट्टया मिळण्यासाठी काही तरी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्यानंतर महसूल विभाग, बाब क्रमांक 22, पान क्रमांक 25 तसेच महसूल विभागाच्या अन्य ज्या मागण्या आहेत त्यांना मी पाठिंबा देतो. आदरणीय महसूल मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी शासनाने योजना तयार केलेली आहे, त्याप्रमाणे अनेक शिक्षकांना खरे म्हणजे शिक्षक पूरगस्त असूनही त्यांना तीन महिन्याचे अग्रीम मिळालेले नाही. पंढरपूर येथील 15 शाळांतील शिक्षकांना अद्यापही अग्रीम मिळालेले नाही. ती तांत्रिक बाब आहे. त्यांचे तीनवेळा ट्रेझरीमध्ये बील सादर करण्यात आले परंतु तांत्रिक आधारावर बील परत आलेले आहे. मी या निमित्ताने विनंती करणार आहे की, पंढरपूर येथील 15 शाळांतील शिक्षकांना अग्रीम मिळण्याच्या दृष्टीने लक्ष घालावे.

त्यानंतर सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 151 पान क्रमांक 126 वर अपंग कल्याणाच्यासंबंधात चांगल्याप्रकारच्या योजना तयार केलेल्या आहेत. परंतु हे करत असतांना अंध आणि अपंग शाळा आहेत, त्यांची वसतिगृहे, अन्य योजना, किंवा शिष्यवृत्ती याबाबतीमध्ये शासनाने चांगले निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय मंत्री श्री. हंडोरे साहेब येथे बसलेले आहेत. अनेक बाबींवर त्यांच्याशी चर्चा झालेली आहे परंतु या अंध आणि अपंगांच्या शाळा आहेत, त्या मेळघाटसारख्या भागामध्ये काम करतात, या शाळांकडे खास करुन विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पण या अंध आणि अपंगांच्या शाळांकडे शासनाचे दुर्लक्ष होते आहे. त्यांना वेळेवर अनुदान मिळत नाही. अंध अपंगांच्या शाळांमध्ये पदे कमी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. खरे म्हणजे सर्वच बाबींवर न्यायालयाने आदेश द्यावेत की काय, अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

शिक्षण खात्याचा एक निर्णय काल आदरणीय उच्च न्यायालयाने रद्द ठरविला. तो निर्णय याच्याशी संबंधित नाही. परंतु 18 ऑगस्ट, 2004 च्या निर्णयानुसार अंध-अपंगांच्या शाळेमधील पदे कमी केलेली आहेत. त्याबाबत उच्च न्यायालयाने विचारले की, तुम्ही तेथील ड्रायव्हरचे पद कसे काय रद्द केले ? तेथील अंध आणि अपंगांना कोण घेऊन जाणार ? याबाबतीत मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश देऊनही त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अशा प्रकारे न्यायालयाने निर्देश देण्याची वेळ का यावी ? यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी आणि विभागाने निर्णय घेऊ नये ही अत्यंत खेदाची बाब आहे. अंध आणि अपंगांच्या शाळेकडे शासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 162 आणि 163 यामध्ये आरोग्य विभागाच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी या निमित्ताने एकच विनंती करणार आहे. आरोग्य विभागाने शासकीय कर्मचाऱ्यांना आणि अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची योजना लागू केली आहे. त्यासंदर्भात सिव्हील सर्जन किंवा शासन मान्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. त्यांच्याकडे प्रकरण गेल्यानंतर ते कोणत्याही प्रकारची पडताळणी करीत नाहीत. ज्या आजारासाठी हा खर्च झालेला आहे तो आजार शासनाने मान्य केलेल्या आजारांच्या यादीमध्ये आहे की, नाही एवढेच सर्टिफिकेट ते देतात. अमूक या आजारावर झालेला खर्च अमूक जी.आर. मधील अनुक्रमांक अमूक अमूक प्रमाणे आहे अशा पध्दतीचे सर्टिफिकेट देतात. त्यासाठी शासकीय रुग्णालयामध्ये आमच्याकडून 3 टक्के स्क्रुटिनी फी घेतली जाते. एखाद्याची बायपास सर्जरी झाली असेल, एखाद्याची हृदय शस्त्रक्रिया झाली असेल किंवा किडनीचे ट्रान्सप्लांटेशन झाले असेल तर त्यासाठी चार ते पाच लाख रुपये खर्च येतो. चार पाच लाख रुपयांचे बिल होते. 3 लाख रुपयांचे बिल असेल आणि त्यावर 3 टक्के प्रमाणे रक्कम द्यावयाची म्हटली तर 10 हजार रुपये स्क्रुटिनी फी द्यावी लागते. हा कोणता नियम आहे ? हा नियम कोणी केला हे माहीत नाही. परंतु ही अत्यंत गंभीर बाब आहे. केवळ सर्टिफिकेट देण्यासाठी दहा दहा हजार रुपये फी द्यावी लागत असेल तर हा कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. रामनाथ मोते ......

यासंदर्भात शासनाने विचार करणे आवश्यक आहे. आपल्याला बँकेसारखी स्क्रूटिनी फी घ्यावयाची असेल तर त्या प्रकरणाची पूर्णपणे स्क्रूटिनी करावी. त्या प्रकरणाची संपूर्णपणे पडताळणी करावी. त्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे ऑब्जेक्शन येता कामा नये. संपूर्ण प्रकरण तयार करुन दिल्यानंतर ते प्रकरण खात्याकडे सादर केले की, ताबडतोब बिल मिळाले पाहिजे. तशा पध्दतीचा निर्णय घ्यावा. केवळ सर्टिफिकेट देण्यासाठी 3 टक्के फी घेणे हा जिझिया करासारखा प्रकार आहे. तो तातडीने रद्द करण्याचा विचार व्हावा. अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी गृह खात्याच्या पृष्ठ क्रमांक 14 वरील बाब क्रमांक 12 च्या संदर्भात बोलणार आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री हे अतिशय चांगले निर्णय घेतात, चांगले आदेश देतात परंतु त्या आदेशांचे पालन खालच्या पातळीवर होत नाही. पनवेलमध्ये सीआयडी चौकशी करण्याचे माननीय गृहमंत्र्यांनी मान्य केले परंतु आजपर्यंत त्याबाबत काहीही झालेले नाही. मार्च 2005 मध्ये पी.एस.आय. श्री. सुरेश खेडेकर यांच्यावर फायरींग झाले होते. त्याला शासकीय मदत देऊ असे माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये सांगितले होते. त्यांना पाच पैशाची सुध्दा मदत मिळालेली नाही. त्याच्या छातीला गोळ्या लागल्या होत्या. त्यातून तो जेमतेम कसा तरी वाचला. माझा आणखी एक मुद्दा असा आहे की, श्री. चित्तधन नामदेव इंगळे हे एमएसईबीमध्ये शाखा अभियंता आहेत. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड भागातील, आदिवासी भागातील लोकांनी त्याच्या बाबतीत तक्रारी केलेल्या आहेत. ते लोकांकडून हप्ते वसूल करण्याचे काम करतात. माननीय गृहमंत्र्यांकडे मी अर्ज दिलेला आहे. त्याबाबतीत कोणतीही कारवाई झालेली नाही.

सभापती महोदया, धारावी-सायन रस्ता संध्याकाळी 7 वाजल्यानंतर बंद केला जातो. फूटपाथवर जे छोटेछोटे धंदे आहेत ते चालण्यासाठी रस्ता बंद केला जातो. या सदनामध्ये विशेष उल्लेख केल्यानंतर काही महिने तो रस्ता पूर्णपणे मोकळा ठेवण्यात येत होता परंतु आता पुन्हा संध्याकाळी 7 वाजल्यानंतर तो रस्ता व्यापाऱ्यासाठी, टपऱ्या चालविणाऱ्या लोकांसाठी बंद केला जातो. त्या ठिकाणी एकाच बाजूने वाहतूक केली जाते. तो रस्ता सुरु करण्यात यावा अशी मी विनंती करतो. ठाणे-मुंब्रा आणि ठाणे-कळवा या रस्त्यावर दोन अपघात झाले. गेल्या दोन वर्षापासून हा राष्ट्रीय महामार्ग बंद केलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 16:20

(श्री. अनंत तरे...)

आणि जड वाहनांची वाहतूक ही ठाण्याच्या अंतर्गत रस्त्यावरुन सुरु केलेली आहे. अपघात घडू नये याबाबत पोलीस खात्याने काळजी घ्यावी. हा जो राष्ट्रीय महामार्ग गेली 2 वर्षे बंद आहे तो तातडीने सुरु करावा. या विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी पोलिसांचा प्रचंड मोठा बंदोबस्त असताना देखील त्यांच्या समोरुन सिग्नल तोडून वाहतूक होत असते. त्या बाबतीतही दखल घेतली जात नाही. माननीय गृहमंत्र्यांनी मागे सागरी आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. आज देखील तशाच प्रकारची घोषणा त्यांनी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.22 वरील बाब क्रमांक 24च्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ठाणे, भिवंडी, अंबरनाथ, उल्हासनगर याठिकाणी सुमारे 20 ते 25 हजार रिक्षा विनापरवाना चालविल्या जात आहेत. रिक्षात 3 माणसांना बसण्याची परवानगी असताना मागे तीन आणि पुढे दोन अशी रिक्षाचालकासह सहा माणसे रिक्षामध्ये असतात. याबाबतीत तक्रार करुन देखील कोणतीही कारवाई केली जात नाही. ठाणे ट्राफिक कार्यालयाने याबाबतीत थोडी कारवाई केली. रिक्षांना स्टिकर देण्यात आले. परंतु अशा प्रकारे आपण किती रिक्षांना स्ट्रिकर देणार हा प्रश्न आहे. तेव्हा ज्या 20 ते 25 हजार विनापरवाना रिक्षा चालविल्या जातात त्या थांबविल्या जाव्यात. मुंबईतील सीएनजीवरील रिक्षांचे पहिले मीटर भाडे 9 रुपये आणि त्यानंतरच्या 10 पॉईण्टस्ना 1 रुपया याप्रमाणे असते. परतु ठाण्यातील रिक्षांसाठी पहिले मीटर भाडे 11 रुपये असून त्यानंतरच्या 10 पॉईण्टस्ना 1.20 रु. या प्रमाणे भाडे आहे. ठाण्यातील रिक्षांसाठी भाडय़ामध्ये हा फरक का, असा प्रश्न पडतो. या संदर्भात मी माननीय मंत्री महोदय श्री. सुरुपसिंग नाईक यांना पत्र दिलेले असून त्याबाबतीत कारवाई होत नाही. ठाणेकरांना मुंबईमध्ये येण्यासाठी 3 टोल भरावे लागतात. त्यामध्ये हा रिक्षाचा भार अती होतो. दुसरे असे की, रिक्षावाले भाडे नाकारतात, काही वेळा मीटर जलद करुन ठेवलेले असते. तेव्हा याबाबतीतही लक्ष देण्याची गरज आहे.

महसूल विभागाच्या बाब क्रमांक 23 मध्ये 7,25,45,000 रु.ची मागणी करण्यात आलेली आहे. खाजगी जागेतील कार्यालयांच्या भाड्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 55 वर्षे झाली आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊनही बरीच वर्षे झाली. असे असताना शासकीय कार्यालये अजूनही खाजगी जमिनीवर असणे योग्य वाटत नाही. तसेच हे जे भाडे दिले जाते त्या भाड्याचे दर तपासण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या मालकीच्या मोकळया

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनंत तरे...)

जागा आणि इमारती देखील आहेत. अशा ठिकाणी ही कार्यालये हलविली तर शासनाला भाड्यापोटी रक्कम खर्च करावी लागणार नाही.

सभापती महोदय, ठाण्याच्या जिल्हाधिका-यांनी इल्लिगल रॉयल्टीपोटी 50 कोटीच्या नोटीसा दिलेल्या आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या नोटीसा देण्याची वेळ का आली ? ज्यावेळी बेकायदेशीर भरणी केली जात होती त्याच वेळी त्यांना का अडवण्यात आले नाही ? आता ही 50 कोटीची इल्लिगल रॉयल्टी कधी वसूल करणार, हा प्रश्न आहे. या बाबतीतही तातडीने कारवाई होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 29मध्ये मांढरदेव, तालुका वाई, जिल्हा सातारा येथील घडलेल्या घटनेचा "दंगल" असा उल्लेख करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे त्याठिकाणी चेंगराचेंगरी होऊन 325 भाविकांचा मृत्यू झाला. त्या घटनेबाबत "दंगल" असा उल्लेख करणे संयुक्तिक नाही. त्याबाबतीत सुधारणा व्हावी अशी माझी विनंती आहे.

पृ.क्र. 157 वरील बाब क्रमांक 175 मध्ये महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीवरील तिवरांच्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी मागणी केलेली आहे. या तिवरांच्या झाडांचे संरक्षण करण्याबाबत हायकोर्टाने निदेश दिलेले आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. शिगम 16:25

श्री. अनंत तरे ...

सभापती महोदया, माझा शासनाला याठिकाणी प्रश्न असा आहे की सगळयाच गोष्टी हायकोर्टात जाऊन सोडविल्या पाहिजेत काय ? वारंवार संबंधित खात्याकडे तक्रार करुन सुध्दा दखल घेतली जात नाही. त्यामुळे जो उठतो तो हायकोर्टात जातो आणि हायकोर्टाचे निर्देश आल्यानंतर शासनाकडून कारवाई केली जाते. हायकोर्टातून वारंवार निर्देश आल्यामुळे सुध्दा कोर्टाचा हस्तक्षेप वाढला आहे असे म्हटले जाते. म्हणून नागरिकांनी कोर्टात जाण्यापेक्षा शासनाने सुध्दा या प्रश्नांची दखल घेण्याची गरज आहे. धन्यवाद.

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( **सभापतीस्थानी मा. उपसभापती** )

श्री. आर.आर.पाटील(उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांना सदनाने पाठिंबा द्यावा ही विनंती करण्यासाठी मी उभा आहे. आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण पाहिले असेल की, अनेक खात्यांचे प्रश्न चर्चेला असताना सुध्दा सदनामध्ये 100 टक्के प्रश्न गृहखात्यावरील चर्चेमध्ये उपस्थित करण्यात आले होते. या खात्यावर माननीय सदस्य बोलत असताना स्वारस्य दाखवितात,शासनाची भूमिका जाणून घेतात आणि असलेल्या अडचणी या निमित्ताने सांगतात याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देईन. पुरवणी मागण्या मांडत असताना यावर चर्चा होणे स्वाभाविक आहे. बहुतेक सन्माननीय सदस्यांनी विविध सूचना केल्या त्याचप्रमाणे काही त्रुटी दाखविण्याचा प्रयत्न निश्चितपणे केलेला आहे. गृहखात्यावरील प्रामुख्याने चार मागण्या सदनासमोर आहेत. गणवेषाची मागणी आहे. त्याचप्रमाणे तुरुंग विभागासाठी सुध्दा नवनवीन गोष्टी करावयाच्या आहेत. मानवी हक्क आयोगामार्फत काकडे यांना मदत करावयाची आहे. तुरुंगामध्ये काही गैरप्रकार आहेत याबाबत सुरुवातीलाच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काही मुद्दे मांडले. मी ही गोष्ट नाकारीत नाही की काही त्रुटी तुरुंगामध्ये अलिकडच्या काळात आढळून आल्या आहेत. तुरुंगातील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने लक्षही केंद्रीत केले आहे. प्रामुख्याने या गोष्टी का घडतात याचा शोध घेतला असता 2/3 त्रुटी शासनाच्या बाजूने राहिल्या आहेत. एक तर जगभरात लोकसंख्येच्या पाठीमागे किती कैदी हे ठरविले जाते. त्यामानाने तुरुंगाची क्षमता निश्चित केली जाते. एक लाख लोकसंख्येच्या मागे 30 कैदी ठरविले जातात. महाराष्ट्राची लोकसंख्या 10 कोटी आहे. साधारणत: 30 हजार कैदी सामावतील एवढया क्षमतेचे तुरुंग आपल्याकडे असणे आवश्यक आहे. परंतु राज्यातील तुरुंगाची क्षमता 19000 कैदी सामावले जातील एवढी आहे. प्रत्यक्षात 26 हजार कैदी आज तुरुंगात आहेत. क्षमतेच्या पावणेदोन पटींनी जास्त कैदी आहेत. महाराष्ट्रामध्ये साडेपाचलाख लोकांना पोलीस विविध कारणांनी अटक करीत असतात. त्यातील अडीच लाख कैदी जेलमध्ये पाठविले जातात. त्याशिवाय कच्चे कैदी असतात. एवढा लोड या तुरुंगातील कर्मचाऱ्यांवर येत असतो. राज्यातील तुरुंग हे ओव्हरलोडेड झालेले आहेत. तशातच पोलीस दलावर कामाचा ताण असतो. तुरुंगातील पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची अवस्था अधिकच वाईट आहे. जगभरात 6 बंदीमागे एक पोलीस आपल्याकडे 26 बंदीमागे एक पोलीस कर्मचारी आहे. रोज तुरुंगातून शेकडो कैद्यांना न्यायालयात नेण्यासाठी बाहेर काढले जाते आणि परत आणले जाते. हे काम तपासाच्या दृष्टीने घाईगडबडीने करावे लागते. कमी मनुष्यबळाचा फायदा या कर्मचाऱ्यांकडून घेतला जातो.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .......

ज्या उणीवा दाखवून दिल्या त्याकडे शासनाने यापूर्वीच लक्ष दिलेले आहे आणि काही कठोर भूमिकाही घेतल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, ऑर्थर रोड जेलमध्ये एका कैद्याकडे मोबाईल सापडला. तुरुंगातून छोटा राजनबरोबर बोलणे झाले हे कोणाच्या सांगण्यावरुन नाही तर पोलिसांच्याच लक्षात आले होते. ज्यावेळी पोलिसांना या गोष्टीचा सुगावा लागला की काही लोक तुरुंगातून छोटा राजनबरोबर संवाद साधत आहेत. बाकीच्या लोकांना धमकावित आहेत. तुरुंगात असतांना सुध्दा मोबाईल कोठून मिळतो यासंबंधीचा तपास पोलिसांनी घेतला व संबंधित कर्मचाऱ्यांना निलंबित केले व त्याची चौकशी आता मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत सुरु आहे. ही गोष्ट देखील खरी आहे की, गेल्यावर्षी तुरुंग भरतीमध्ये काही गैरप्रकार झाले होते व त्यासंबंधीचे निनावी पत्र शासनाकडे प्राप्त झाले होते. त्या पत्रासंबंधी चौकशी अे.सी.बी. मार्फत केली असता त्यात तथ्य आढळून आले आणि काही पुरावे दिसून आले. त्यावरुन क्लास-3 व क्लास-4 च्या कर्मचाऱ्यांच्या या भरतीमध्ये गैरप्रकार केल्याबद्दल मागील आठवडयातच एक डी.आय.जी., 3 जेल अधीक्षक आणि 2 अन्य कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे. एवढी कठोर कारवाई करण्यामागचा शासनाचा असा उद्देश असा होता की थोडीशी जरी चूक झाली तरी ती सहन करण्याची भूमिका यापुढे स्वीकारली जाणार नाही. अशा प्रकारे कोणी चूक केली तर शासन कठोरपणे वागेल या गोष्टीचा संदेश जावा म्हणून ही कारवाई शासनाने केली आहे. गणवेशाच्या खरेदीची मागणी करीत असतांना काही ठिकाणी सागरी आयुक्तालयाची मागणी तसेच अन्य ठिकाणी पोलिस दलात वाढ करण्याची मागणी या निमित्ताने करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी रायगड जिल्हयामध्ये पोलीस स्टेशन्स वाढलेले नाहीत अशी तक्रार केली आहे तर मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे तिला सुरक्षित ठेवावयाचे असेल तर समुद्र सुध्दा सुरक्षित राखला पाहिजे अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी केली, ती मागणी निश्चितपणे योग्य अशीच आहे. यासंदर्भात केंद्रशासनाने तत्वत: मान्यता दिली असून आज मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि ठाणे ग्रामीण परिसरात संपर्क साधण्याच्या दृष्टीने हा भाग एवढा जवळ आला आहे की, मेगा पॉलिसींगसारखी आधुनिक यंत्रणा तसेच या सर्व परिसरात असे स्टेशन्स निर्माण करण्यात येतील त्यावेळी सागरी पोलीस स्टेशन लवकरच स्थापन होईल याची मी

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .......

ग्वाही देतो. ठाणे आणि रागयड जिल्हयातील लोकसंख्या आज झपाटयाने वाढत आहे, नवनवीन इंडस्ट्रीज निर्माण होत आहेत. गेल्या दहा वर्षाममध्ये नवी मुंबईची लोकसंख्या 126 पटीने वाढलेली आहे परंतु आमचे पोलीस दल 1960 च्या मानकाप्रमाणेच आज काम करीत आहे. या ठिकाणी अशीही मागणी करण्यात आली की, सन 1990 च्या माणकाप्रमाणे पोलीस कर्मचारी भरले गेले पाहिजे. राज्यामध्ये असलेली साधनसंपत्ती लक्षात घेता ही गोष्ट लगेच शक्य होईल असे नाही. पोलिसांना रजा मिळत नाही, कामाचे अतिरिक्त तास आहेत ही गोष्ट शासनाच्या ध्यानात आली असल्यामुळे याबाबतीत काही सुरुवात तर केली पाहिजे म्हणून 11021 नवीन पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. अन्य विभागासारख्ये केवळ पदांना मान्यता देऊन लगेच ही पदे भरली जाऊ शकत नाहीत कारण आपल्याकडील ट्रेनिंग स्कूल्सची क्षमता कमी आहे म्हणून तातडीने या ट्रेनिंग स्कूल्सची क्षमता वाढविण्यास सुरुवात केली आहे. ही मंजूर असलेली 11021 पदे लवकरच भरली जातील, काही ठिकाणी लोकसंख्येचे वाढलेले प्रमाणत लक्षात घेऊन पोलिसांची संख्या वाढविता येईल आणि पोलिस स्टेशन्सची संख्या देखील वाढविता येईल.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, राज्य सरकारने पोलिसांच्या अडचणी लक्षात घेऊन काही चांगल्या योजना निश्चित केल्या आहेत. पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य निर्माण योजना ही अभिनव योजना आहे. एखादा पोलीस कर्मचारी आजारी पडला, कर्तव्यावर असताना जखमी झाल्यानंतर दवाखान्यामध्ये उपचारासाठी आणला तर एकूण खर्चाच्या 80 टक्केच रक्कम त्यांना अदा करण्यात येत होती. ती रक्कम सुध्दा त्यांना लवकर मिळत नव्हती. नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस कॉन्स्टेबल यांना एका वाहनाने धडक दिल्याने ते बेशुध्द पडले. त्यांच्यावर मुंबई रूग्णालयात उपचार करण्यात आले. त्याचा खर्च जवळपास साडेतीन लाख रूपये झाला. मुंबई रूग्णालयाचे बिल लवकर दिले जात नव्हते म्हणून तंदुरूस्त झाल्यानंतर देखील रूग्णालयाने त्यांना चार दिवस घरी सोडले नव्हते. स्वत:ची 20 टक्के रक्कम त्यांनी भरली पाहिजे असे सांगितले गेले. वास्तविक पाहता ती रक्कम जवळ जवळ 60 ते 65 हजाराच्या आसपास होती. हे पैसे कोठून आणून भरावयाचे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. भारत व राज्याच्या अन्य भागातील व्ही.आय.पी. ज्यावेळी मुंबईत औषधोपचारासाठी येतात त्यावेळी मुंबई पोलीस दवाखान्यामध्ये बंदोबस्तासाठी जातात. एखाद्या आरोपीला रूग्णालयात नेले तर त्याच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडण्यासाठी पोलिसांना पाठविले जाते. पण तो स्वत: आजारी पडल्यानंतर त्याला नगरपालिकेचे किंवा अन्य दुसरे सामान्य रुग्णालय शोधावे लागते. तेव्हा अशा या पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तात्काळ काळजी घ्यावी म्हणून निर्णय घेण्यात आला व सदर योजना राज्यात सुरू झाली. ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत 434 जणांनी योजनेचा लाभ घेतला आहे, तर जुन्या योजने अंतर्गत मुंबईच्या बाहेरील 837 जणांनी लाभ घेतला आहे. यावर आतापर्यंत 5 कोटी रुपये खर्च झाले आहेत. अशाप्रकारे पोलीस कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक असणारा निधी देखील उपलब्ध करून दिलेला आहे. पोलिसांनी आपले ओळखपत्र दाखविल्यानंतर रुग्णालयामध्ये औषधोपचार सुरू करण्यात येईल. त्यासाठी पोलिसांकडून डिपॉझिट सुध्दा घेतले जाणार नाही. पोलिसांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती ही परस्पर केली जाणार आहे. हा लाभ पोलिसांना मिळण्यास सुरूवात झाली आहे. यात सुरूवातीला काही त्रुटी होत्या. काकडे याचा मृत्यू कसा झाला ? अशी विचारणा येथे करण्यात आली आहे. काकडे हा तेलगी प्रकरणातील आरोपी आहे. अति दारू सेवनाने, गळयाखाली व्रण असल्याने त्याचा मृत्यू ..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

झाला असा प्राथमिक अहवाल आल्यानंतर जे संबंधित कर्मचारी होते, त्यांना या प्रकरणी निलंबित करण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. हा तपास सीआयडी मार्फत सुरू आहे. याप्रकरणी काकडे यांची पत्नी मानवी हक्क आयोगाकडे गेली. मानवी हक्क आयोगाच्या निदेशाप्रमाणे त्यांना रुपये 3.00 लाख द्यावे लागणार आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी औरंगाबाद येथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांवर केलेला बेछूट लाठीमार यासंबंधी मुद्दा उपस्थित केला. या घटनेबाबतचे त्यांनी काही फोटी देखील दाखविले. या गंभीर घटनेची जरूर चौकशी करण्यात येईल. खरे म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रथम समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तरच नाईलाजास्तव शेवटचे हत्यार म्हणून टोकाची भूमिका स्वीकारली पाहिजे, अशा स्पष्ट सूचना आहेत. आता जमावाला पांगविण्यासाठी रबरी बुलेट मिळायला सुरूवात झाली आहे. या बुलेटमुळे वेदना होतील, पण जखमा होणार नाहीत. जमावाला पांगविण्यासाठी रबरी बुलेटचा वापर केला तर त्यातून कोणाचाही मृत्यू होणार नाही. तसेच, पाण्याच्या फवाऱ्याचा देखील वापर करण्यात येत आहे. आम्ही महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये पाण्याचे फवारे ठेवणार आहोत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, ते बाँबच्या स्वरुपात आहेत. तो जर फुटला तर रंगाचे ठिपके अंगावर पडतात व ते ठिपके 4-8 दिवस निघत नाहीत. दंगलीच्या वेळी या बॉम्बच्या सहाय्याने पोलिसांना गुन्हेगाराला शोधता येऊ शकते. त्यामुळे या रंग लावणाऱ्या बाँबचा भविष्यात वापर करण्याबाबत विचार करता येईल. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, आमचा धुलाई भत्ता, शिलाई भत्ता कमी आहे. पोलिसांना आम्ही एकच गणवेष देतो. आज तर अशी स्थिती आहे की, त्यांना कपडे सुध्दा पगारातून शिवून घ्यावे लागतात. त्यामुळे आम्ही आमच्या पोलीस कर्मचाऱ्यांना अजून एक गणवेष देऊ व धुलाई भत्त्यात वाढ करु. आज पोलीस स्टेशनची अवस्था पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, तेथे स्टेशनरीची कमतरता आहे. आज दर वर्षाला साडे तीनशे बेवारस प्रेते आढळतात. त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यासाठी प्रति प्रेतासाठी पाचशे रुपये खर्च होतो. एम.पी.डी.ए. ची एक केस केली तर साडे तीन हजार रुपये कागद व टायपिस्टपोटी खर्च येतो. हा खर्च आपण देत नाही. त्यामुळे त्यांना दुसरा मार्ग काढावा लागू नये, त्यांना चुकीच्या मार्गाने जावे लागू नये म्हणून पोलीस स्टेशन चालविण्यासाठी अधिकृतपणे पैसा उपलब्ध करुन दिला जाईल. पोलिसांना कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. निधी उपलब्ध करुन देण्याची भूमिका शासनाकडून स्वीकारली जाईल. अनेक सन्माननीय सदस्यांनी निरनिराळया प्रश्नांच्या संदर्भात या ठिकाणी जे विचार व्यक्त केले, त्यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. काही तालुक्यांच्या ठिकाणी प्रशासकीय अडचणी आहेत याबाबत ज्या काही भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केल्या त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची भूमिका शासनातर्फे स्वीकारण्यात येईल. त्यामुळे सभागृहाने या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सदनास विनंती करतो.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मी उपस्थित केलेले प्रकरण अतिशय गंभीर आहे. दिनांक 20 मार्च रोजी घडलेल्या घटनेबाबत माननीय गृहमंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात काहीही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे त्यांनी या प्रकरणाबाबत उत्तर देणे आवश्यक आहे.

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी ज्या घटनेबाबत उल्लेख केला त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मेल्यानंतर काय चौकशी केली जाणार आहे ? त्यामुळे माझी तर अशी मागणी आहे की, संबंधिताला सस्पेंड करण्यात यावे.

श्री. आर.आर.पाटील : या प्रकरणी अतिशय गांभीर्यपूर्वक चौकशी केली जाईल. कारण चौकशी न करता एखाद्याला सस्पेंड करणे योग्य होणार नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोलपणे चौकशी करण्यात येईल. या प्रकरणात अतिरिक्त बळाचा वापर करण्याची गरज नसताना जर वापर करण्यात आला असेल तर जरुर संबंधितांला निलंबित करण्यात येईल. केवळ निलंबितच नव्हेतर त्याच्यावर कडक कारवाई सुध्दा करण्यात येईल. कारण चौकशी न करता कारवाई केल्यास, पोलिसांच्या मनौधैर्यावर परिणाम होईल. त्यामुळे चौकशीपूर्वी कारवाई करण्याची भूमिका शासनाकडून कदापि स्वीकारली जाणार नाही. ही चौकशी नि:पक्षपातीपणे व्हावी म्हणून संबंधितांची बदली अन्यत्र केली जाईल.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VVK/ MHM/ SBT/ प्रथम श्री. कांबळे.. 16:45

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) सभापती महोदय, महसूल, पुनर्वसन, मदत कार्य क्रीडा आणि युवक कल्याण व माजी सैनिक कल्याण या मागण्यांवर ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामध्ये काही सूचना सुध्दा करण्यात आलेल्या आहेत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी धुळे जिल्हयातील वाडी-शिवडी प्रकल्पाच्या बाबतीत भूमी संपादनाचा मोबदला मोठया प्रमाणात दिला गेलेला नाही. तसेच कोरडवाहू शेत जमीन असतांना त्या ठिकाणी फळबागांची लागवड दाखविलेली आहे. पर्यायाने लाखो रुपयांचा भुर्दंड शासनास झालेला आहे यासंदर्भातील माहिती देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. तसेच या प्रकरणाची माहिती आज घेऊन द्यावी अशी त्यांची मागणी होती. मी माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु ती माहिती अजूनपर्यंत माझ्यापर्यंत आलेली नाही आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत यासंदर्भातील माहिती मागवून यामध्ये जर भूसंपादन करतांना महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुन काही पैशांचा अपहार केला असेल तर निश्चितपणे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. अझिज यांनी वक्फ महामंडळाचे 79 लाख रुपये शासनाकडून येणे आहे त्याबाबत वक्फ महामंडळास पैसा देण्यात येईल काय ? आणि असा प्रश्न विचारला होता यासंदर्भात निश्चितपणे तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांनी असेही विचारले होते की, चॅरिटी कमिशनर वक्फ बोर्डाकडून 2 टक्के महसूल गोळा करते हा महसूल कशासाठी गोळा करतात, याबाबत विधी व न्याय विभागाच्या माध्यमातून सल्ला मागवून यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्हयामध्ये वन खात्याकडून वन विभागाच्या जागेमध्ये जाण्यासाठी बंधन घालण्यात येते कारण ते प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहे त्यामुळे आमची अडचण निर्माण होते. आम्हाला डबर दगड व रेती घेऊन जाता येत नाही म्हणून हा प्रश्न केंद्र सरकाच्या अखत्यारीत असला तरी यासंदर्भात राज्य सरकारने पाठपुरावा करावा अशी त्यांनी मागणी केली होती. यासंदर्भात निश्चितपणे लक्ष घालण्यात येईल. शाळांमधील शिक्षकांना पुरग्रस्तांच्या संदर्भातील वेतनाची मागणी होती परंतु अजूनही त्यांना पैसा मिळालेला नाही. यासंदर्भात निश्चितपणे त्यांचे देणे असेल तर त्यांना ती रक्कम दिली जाईल यानिमित्ताने मी आश्वासन देत आहे. .....2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे....

सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी शासकीय कार्यालयांची जागा अनेक ठिकाणी रिकामी असतांना आपण भाडयाने जागा घेतलेल्या आहेत याबाबत शासनाचा लाखो रुपये खर्च होतो याबाबत तक्रार केलेली आहे. त्यांनी केलेल्या तक्रारी प्रमाणे जर काही शासकीय इमारती रिकाम्या असतील तर त्या ठिकाणी शासकीय कार्यालयांना जागा उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच रिकाम्या इमारतीमध्ये महसूल विभागाचे कार्यालय स्थलांतरीत करण्यात येईल. पंढरपूर व ठाणे येथील जिल्हाधिकारी यांनी रॉयल्टीच्या संदर्भात नोटीस काढलेली आहे. यामध्ये बेकायदा उत्खन्न, वाहतूक गौण खनिज काढणे यासाठी 50 कोटी व अधिक रक्कम वसुलीसाठी नोटीसा दिलेल्या आहेत. काही ठिकाणी ही रक्कम वसूल झालेली आहे. असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी 2 दिवसांपूर्वी खालच्या सभागृहात आश्वासन दिलेले आहे की, ही रक्कम वसूल होत नसेल तर संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल व ही रक्कम वसूल करण्यात येईल. तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे त्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्यासंदर्भात तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. माझी सभागृहाला विनंती आहे की, महसूल, पूनर्वसन, माजी सैनिक व कल्याण या विभागांच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्या अशी परत विनंती करतो.

-------------

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : मुंबईमध्ये गेल्या वर्षी पूर आला होता, त्यावेळी जे पंचनामे झाले होते त्यांना जिल्हाधिका-यांनी पैसे देण्यास सांगितले होते. याबाबत मी स्पेसिफिक उल्लेख केला होता. त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी कोणताही उल्लेख केला नाही.

डॉ.राजेंद्र शिंगणे : ज्यांचे पंचनामे झालेले असतील व ज्या लोकांना पैसे देय असतील त्यांना सुध्दा पैसे दिले जातील.

श्री.मधुकर चव्हाण : हे पैसे केव्हा दिले जातील ? या बाबतची तरतूद या वर्षीच्या बजेटमध्ये करणार आहात काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : ही बाब तपासून घेऊन लवकरात लवकर पैसे देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.नारायण राणे : ज्यावेळी मुंबईमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी शासनातर्फे लोकांना मदत देण्यात आली होती. त्यावेळी काही लोकांचा सर्व्हे होऊन सुध्दा मदत मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा काही प्रकरणांची तपासणी सुरु आहे. हा तपासणी लवकरच पूर्ण केली जाईल. तसेच पूर परिस्थितीमुळे ज्या लोकांच्या घरात पाणी जाऊन नुकसान झालेले आहे अशा लोकांना लवकरात लवकर मदत देण्याची कार्यवाही केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : मुंबईमध्ये गेल्या वर्षी जेव्हा पूर परिस्थिती निर्माण झाली होती तेव्हा वांद्रे भागातील ज्या लोकांचे नुकसान झाले नव्हते अशा लोकांनाही वांद्रे भागात राहत असलेल्या माननीय राज्यमंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित धान्य वाटण्यात आले रॉकेल वाटण्यात आले.अनेक तक्रारी आलेल्या आहेत. याबाबतची चौकशी करुन माननीय मंत्रिमहोदय काही दखल घेणार आहेत काय ?

श्री.नारायण राणे : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काही ठिकाणी चूकीच्या पध्दतीने मदतीचे वाटप झाले आहे, असे वाटप व्हायला नको होते. याबाबतची चौकशी सुरु आहे. या बाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्र.134, 135, 137 आणि 138 अशा एकूण चार मागण्या आहेत. बाब क्र.134 मध्ये कै.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त ग्रामअभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी विभागीय तसेच राज्य पातळीवर केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी पारितोषिके देण्यासाठी केलेली आहे. यासाठी आकस्मिकता निधीतून आगाऊ 67 कोटी रुपये एवढी रक्कम काढण्यात आली होती. या रकमेची भरपाई करण्यासाठी रु.1000 एवढया रकमेची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. बाब क्र. 135 मध्ये इंफ्रास्ट्रक्चर व मूलभूत सुविधांसाठी यशवंत ग्राम समृध्दी योजना अतिशय चांगल्या स्वरुपाची आहे. या योजनेमध्ये लोकांचा सुध्दा सहभाग आहे. या संदर्भात 25/10/2005 ही कट ऑफ डेट होती. तोपर्यंत जवळपास 600 कोटी रुपयांची मागणी होती. आता या पुरवणी मागणीच्या माध्यमातून 124.81 कोटी रुपयांची मागणी आहे. ....

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, मांढरदेवीच्या संदर्भात असलेल्या बाबीमध्ये त्या ठिकाणी दंगल झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तेथे दंगल झाली नव्हती.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे दुरुस्ती करण्यात येईल. बाब क्र.137 कर्मचारी व अधिका-यांच्या महागाई भत्त्याच्या संदर्भातील आहे. बाब क्र.138 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी मुद्दा उपस्थित केला होता. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मुद्रांक शुल्काकरिता जिल्हा परिषदांना नुकसानभरपाई अनुदानाच्या थकबाकीची रक्कम देण्यात येते. या मुद्रांक शुल्काच्या दरात शासनाने सन 2002 पासून अर्धा टक्क्यावरुन एक टक्का एवढी वाढ केली आहे, त्यांच्यासाठी ही बाब आहे. पूर्वी बजेटरी प्रोव्हीजन केले जात होते. त्यानंतर ज्या जिल्हा परिषदांसाठी पैसे आहेत, त्याच जिल्हा परिषदेला देण्याचा निर्णय झाला. परंतु ट्रेझरी रुल्स मध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यामुळे बजेटरी प्रोव्हीजन करण्याची आवश्यकता आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कांबळे ....

त्यामुळे आता बजेटरी प्रोविजन करण्याची गरज आहे आणि हा पैसा दिल्यानंतर, जवळपास 23 कोटी दिल्यानंतर 2003-04 पर्यंत सर्व जिल्हा परिषदांना हा पैसा मिळणार आहे. 2005-06 या वर्षासाठीही बजेटरी प्रोविजन आपण केलेली आहे आणि त्यामुळे यानंतर कोणत्याही जिल्हा परिषदेला हा त्रास होणार नाही. दर वर्षी ते पैसे त्यांना मिळणार आहेत. एवढे सांगून ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्या आपण मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मांढरदेवी यात्रेमध्ये झालेल्या अपघातात ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांच्यापर्यंत आपण 5 कोटी रूपयांची जी मदत दिलेली आहे ती पोहोचलेली नाही त्याबद्दल आपण काही खुलासा केलेला नाही. कृपया त्याबाबत खुलासा केल्यास बरे होईल.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ते मी तपासून घेतो आणि त्यानंतर योग्य ती कारवाई करतो.

****

...... 3एल 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (पर्यटन व विशेष सहाय्य तसेच वैद्यकीय शिक्षण व उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या पूरक मागण्यांना आपण मान्यता द्यावी अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 19 यामध्ये केवळ दोन विषय आपण घेतलेले आहेत. एक म्हणजे विदर्भ पॅकेजमध्ये 11 लाख रूपये दिलेले आहेत आणि दुसरे म्हणजे पुणे येथील शिवनेरी किल्ल्याच्या दुरूस्ती तथा सौंदर्यीकरणाचे जे काम अर्धवट झाले होते ते पूर्ण करण्याच्यासाठी म्हणून 3 कोटी 61 लाख रूपये आपण दिलेले आहेत. या संबंधात चर्चा करताना सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार, श्री.जयंत प्र.पाटील, श्री.विनोद तावडे आणि श्रीमती कांता नलावडे यांनी आपले विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी बाब क्र.34 च्या संदर्भात जो मुद्दा मांडला आहे तो पर्यटनामध्ये येत नाही तर वन विभागाची ती बाब आहे त्यामुळे त्याबाबत मी आपल्याला काही सांगू शकत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आज पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये बोललोच नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये मी उशीरा आलो. परंतु माझ्याकडे या चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सदस्यांची जी नावे आणि त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती दिली आहे त्यानुसार मी हे सांगितले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.तावडे हे आज बोलले आहेत किंवा नाही याची मला माहिती नाही.

त्यानंतर महाराष्ट्रातील जे किल्ले आहत त्या संबंधात देखील काही सन्माननीय सदस्यांनी येथे चर्चा केली. विशेष करून त्यांच्या डागडुजीसंबंधात आणि सौंदर्यीकरणाच्या संबंधात. आपल्याकडे दोन प्रकारचे किल्ले आहेत. एक म्हणजे महाराष्ट्र शासनाकडे असलेले किल्ले आणि दुसरे केंद्र शासनाकडे असलेले किल्ले. तेव्हा महाराष्ट्र शासनाकडे असलेल्या किल्ल्यांच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्राचे पर्यटन धोरण लवकरच जाहीर होणार आहे त्यामध्ये या किल्ल्यांचा समावेश आपण करणार आहोत. तरी आता सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण माझ्या या विभागाच्या पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी.

सभापती महोदय, त्यानंतर माझ्याकडील वैद्यकीय शिक्षण आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांना देखील आपण मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

( काही सन्माननीय सदस्य 'आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांना मंत्री महोदयांनी उत्तरे दिलेली नाहीत म्हणून सांगतात. ...) ****

...... 3L 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय, परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्याकडे असलेल्या सामाजिक न्याय, परिवहन, ओबीसी व विमुक्त, भटक्या जमाती, महिला व बाल कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्यांना आपण मान्यता द्यावी अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, या विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये जवळपास 9 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे आणि श्रीमती कांता नलावडे यांनी मागासवर्गीयांसाठी हॉस्टेल्स झाली पाहिजेत असे सांगितले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण जवळ जवळ 100 हॉस्टेल्सचे बांधकाम करणार आहोत आणि तसेच आपल्या असलेल्या हॉस्टेल्सच्या देखभाव दुरूस्तीसाठी म्हणूनच आपण हे पैसे येथे मागितले आहेत. तरी त्या दृष्टीने आपण माझ्या या विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

***

( यानंतर श्री. सरफरे .... 3एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र. 162, 163 वरील पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही उपस्थित केलेल्या मुद्दयांना मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळणे अपेक्षित आहे. तसे न करता सभागृहामध्ये एका मागोमाग एक विभागाच्या मागण्या मंजूर केल्या जात आहेत हे बरोबर नाही. याबाबतीत आम्हाला आपले संरक्षण पाहिजे.

**उपसभापती** : मी माननीय सदस्यांना नेहमी संरक्षण देतो. विभागनिहाय मंत्रिमहोदयांनी एकदा उत्तराचे भाषण केल्यानंतर व कामकाज पुढे गेल्यानंतर पुन्हा उभे राहून प्रश्न विचारले जात असतील तर ते मी मान्य करणार नाही...

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही सभागृहामध्ये जे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांना मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळाले नाही तर आम्ही काय करायचे?

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण मला देखील सभागृहाच्या कामकाजाची पध्दत माहीत आहे. आणि अद्याप पावेतो मी माझ्या कामकाजाची पध्दत व्यवस्थित ठेवली आहे. मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर आपणास काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते विचारण्यास मी परवानगी देतो. परंतु मंत्रिमहोदयांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर व सभागृहाचे कामकाज पुढे गेल्यानंतर आपण उशिराने प्रश्न विचारण्याचा आग्रह धरता ही पध्दत बरोबर नाही. तेव्हा आपण कृपया खाली बसावे.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापति महोदय, मेरे विभाग की पूरक मागणी के बारे में दो माननीय सदस्यों ने अपने विचार प्रकट किए हैं. माननीय सदस्य श्री. जोगेन्द्र कवाडे ने इमारत के बारे में प्रश्न उठाया है. मैं सदन को आश्वासन देता हूँ कि यह इमारत कामगारों के हित के लिए बनाई जा रही है. माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण ने खटाव मिल के बारे में प्रश्न उपस्थित किया है. मैं उनकी बात से सहमत हूँ. यह मामला सब-ज्युडिश है. अभी यह मामला ए.आई.एफ.आर. में है और इसका निकाल आने वाला है. जमीन के बारे में हाईकोर्ट

.....3M-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. बाबा सिद्दीकी जारी

के स्टे को सुप्रिम कोर्ट ने दिनांक 7 मार्च 2006 को वेकेट कर दिया है. इस वजह से पुनर्वसन की कंडीशन पूरी हो जाती है. यह मामला अभी ए.आई.एफ.आर. में पेंडिंग है और जैसे ही ए.आई.एफ.आर. का निकाल आएगा, खटाव मिल का प्रश्न खत्म हो जाएगा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. खटाव मिलच्या संदर्भात कोणते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे ते त्यांनी सांगावे. या संदर्भात माननीय कामगार मंत्री श्री. गणेश नाईक यांनी एकमेकांच्या सहमतीने बैठक घेऊ असे सांगितले होते. मी त्यांना दिलेल्या पत्राला त्यांनी दिनांक 3 मार्चला उत्तर दिले आहे, त्याबाबत आपण काहीही सांगितले नाही. त्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ठ नाही.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह विषय पूरक मागणी से संबंधित नहीं है. मैं आपको बताना चाहता हूँ कि खटाव मिल की पुनर्वसन स्कीम बी.आई.एफ.आर. ने लिक्वीडेशन में डाली थी, लेकिन मेनेजमेंट ने उसको ए.आई.एफ.आर. में डाल दिया है और अभी वह पेंडिंग है. यह मामला सब-ज्युडिश है. जमीन की बिक्री के बारे में हाईकोर्ट के आदेश को सुप्रिम कोर्ट ने 7 मार्च को वेकेट कर दिया है. अब जमीन की बिक्री हो सकती है. यह वस्तुस्थिति है.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, उत्तर नागपूरमधील कामगार कल्याण केंद्राच्या इमारतीचे बांधकाम 10 वर्षापासून सुरु असून ते अजून पूर्ण करण्यात आले नाही. त्या ठिकाणी नाटयगृह व स्वीमिंग पूल बांधण्यात यावयाचे आहे. त्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये कोणतेही भाष्य केले नाही. तेव्हा त्याबाबत आपण काय कारवाई करणार आहात एवढे स्पष्ट करावे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे सभागृहापुढे मंजूरीसाठी असलेल्या बाबीमध्ये समाविष्ट नाहीत. तरीसुध्दा मी त्यांचे मुद्दे तपासून घेईन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कामगार राज्यमंत्री यांनी या ठिकाणी आपल्या खात्याच्या संदर्भातील मागण्या आणि पुरवणी मागण्या ज्या या ठिकाणी आलेल्या आहेत, त्या त्या संदर्भात उत्तर देत होते. मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की,दोन-चार दिवसामध्ये मोठया प्रमाणात बालकामगारांच्या सुटका, अशाप्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात आलेल्या आहेत. पण मला सन्माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, किती बाल कामगार आपल्या राज्यात आहेत, याची काही नोंद आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : बालकामगारांच्या विरोधामध्ये एक टास्कफोर्स तयार करण्यात आलेला आहे. त्यांनी मोठया प्रमाणात गेल्या दोन तीन महिन्यामध्ये मुंबईमध्ये धाडी टाकल्या. जवळजवळ 1300 बाल कामगारांची सुटका केल्यानंतर आणि 181 कारखानदारांना अटक केल्यानंतर, बाकीच्या घाबरलेल्या कारखानदारांनी, जवळजवळ 19 हजार मुले ही आपापल्या स्टेटला परत पाठविलेली आहेत. आजही धाडी टाकण्याचे काम सुरु आहे. परिमंडळ 3 मध्ये टाकलेल्या धाडीमध्ये 64 मुलांची सुटका करण्यात आली असून, 26 कारखानदारांना अटक करण्यात आलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपला सन्मान ठेवून मी अशी विनंती करतो की, सन्माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी साहेब मघाशी बोलत असताना,मी खाली बसून विनंती केली की,मागण्या मांडा आणि मंजूर करुन घ्या. त्याप्रमाणे त्यांनी मागण्या मांडल्या आणि ते खाली बसले. ती त्यांची चूक नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या प्रश्नांना काहीच उत्तरे त्यांनी दिली नाहीत. काही सन्माननीय सदस्यांचे महत्वाचे दोन-तीन मुद्दे होते,त्याचे उत्तर न मिळाल्यामुळे, ते अस्वस्थ झालेले आहेत. त्यामध्ये थोडीशी माझीही चूक झाली. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की,सन्माननीय राज्य मंत्री महोदयांना दोन मिनिटांचा वेळ देऊन सदस्यांनी उपस्थित केलेले एक-दोन मुद्दे आहेत, त्याचे निरसन करण्याची त्यांना परवानगी द्यावी.

**उपसभापती** : आता शेवटच्या विभागाच्या मंत्री महोदयांचे भाषण झाल्यानंतर त्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. आता मधेच त्यांना बोलण्याची परवानगी देता येणार नाही.

श्री.नितीन गडकरी : ठीक आहे.

श्री.सुरेश शेट्टी : मी सन्माननीय सदस्यांना हवे तर त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात लेखी उत्तर देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांचा आणि माननीय सदस्यांचा आणि त्यांचा हा काही खाजगी मामला नाही. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सहकार,पणन आणि वस्त्रोद्योग या विभागाच्या बाब क्रमांक 177,178,179,180,182, 185,186,181,183,184,187 या मागण्या मान्य कराव्यात,अशी सुरुवातीलाच विनंती करतो. या चर्चेच्या दरम्यान पणन विषयाशी संबंधित विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांनी 350 कोटी रुपये परत दिलेले आहेत. उर्वरित पैसे केव्हा देणार आहात, असा प्रश्न विचारला. पुढील आर्थिक वर्षामध्ये म्हणजे 2006-2007 मध्ये जुलैपर्यन्त हे पैसे देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. पण पुढच्या वर्षी हे पैसे नक्की दिले जातील. कापूस एकाधिकार योजना बंद केली की नाही असा प्रश्न उपस्थित केला. याही वर्षी कापूस एकाधिकार योजना चालू आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : कापूस एकाधिकार योजने संबंधीचे बील तुम्ही गेली दोन वर्षे सभागृहात आणत नाही. बिना कायद्याने योजना चालवीत आहात. तो कायदा या अधिवेशनामध्ये मंजूर करुन घेणार आहात काय ? योजना बंद करावयाची असेल तर तसे सांगा. पण त्याबाबतचे उत्तर मोघम देऊ नका.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : आपणच कायदा विभागाकडे प्रपोजल गेल्याचे सांगितले. कायदा विभागाकडून ते मान्य करुन आले की, त्याबाबतीतील जरुर निर्णय घेण्यात येईल. तरीही शेतकऱ्याची अडचण होऊ नये म्हणून आपण महाराष्ट्रामध्ये कापूस खरेदी योजना सुरु ठेवलेली आहे. आतापर्यन्त जवळजवळ 16 लाख क्विंटल कापूसही खरेदी झालेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : एक वर्षे झाले कायदा विभागाकडे अजूनही हे प्रकरण आहे. त्यांच्याकडून अजूनही पाच वर्षे त्याबाबतचा मसुदा येणार नाही. तुम्ही बिना कायद्याची एकाधिकार योजना चालविणार आहात काय ? एक तर त्या योजनेचे नाव बदला किंवा एकाधिकार योजना आम्ही बंद केली असे तरी सांगा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे राज्य कायद्याने चालणारे आहे काय ? कॉटन मोनापली ॲक्ट 1973 साली आपण मंजूर केला. त्या अक्टप्रमाणे एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरु झाली. या योजनेला 10 वर्षाची मुदतवाढ केंद्र सरकारने दिली. मागच्या दोन वर्षापासून हा कायदा अस्तित्वात नाही. त्याची मुदत संपली. दोन वर्षे असेच बगिच्यामध्ये फिरणे सुरु आहे. ही योजना यापुढे चालू ठेवायची आहे, चालू ठेवायची नाही, ती रद्द



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

करायची आहे ते करा. ही योजना चालू ठेवायची असेल तर कायदा करा. नसेल करायचे तर योजना रद्द करा. दोन वर्षे कायदा न करता ही योजना आपण चालू ठेवत आहात. एकाधिकार कायदा अस्तित्वातच नाही, याबाबत नेमके काय आहे, त्याचा खुलासा करावा. कायद्याची परवानगी कोठे मागता ? योजना बंद केली असे सांगा.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : योजनेचे जुनेच नाव एकाधिकार असल्यामुळे,त्या योजनेच्या नावाखाली कापूस खरेदी चालू असली,तरी यावर्षी आपण व्यापाऱ्यांना सुध्दा कापूस ओपन खरेदी करण्यासाठी लायसन्स दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ....

आपण जी सूचना केली आहे त्याबाबत सजेशन फॉर ॲक्शन असे मी सांगत आहे.

श्री. नितीन गडकरी : तो कायदा अस्तित्वात आहे की नाही ? तो कायदा आणावयाचा आहे की नाही ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : तो कायदा अस्तित्वात नाही. कायदा विभागाचे मत घेऊन त्याबाबतीत निर्णय घेतला जाईल.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा कायदा अस्तित्वात नाही पण सरकारने त्या कायद्याप्रमाणे योजना सुरु ठेवलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आमच्या ज्ञानामध्ये भर घालावी. आपल्याला उत्कृष्ट संसदपटू म्हणून पुरस्कार मिळालेला आहे. आपण उत्तम भाषण करता. आपण एका बाबतीत खुलासा करावा. कायदा अस्तित्वात नाही पण काम चालू आहे. ते काम कोणत्या कायद्याने चालू आहे ? शासनाने अध्यादेश काढला काय ? कायदा अस्तित्वात नाही पण काम चालू आहे. कोणत्या कायद्याप्रमाणे काम चालू आहे ?

श्री. पांडुरंग फुंडकर : कायदा विभागाचे मत येईपर्यंत अध्यादेश काढा. अध्यादेशाशिवाय आणि कायद्याशिवाय योजना कशी चालेल ?

श्री. आर. आर. पाटील : अध्यादेश काढावा, कायदा करावा अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे त्याबाबत सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि इतर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. नांदेड सूतगिरणीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी विचारणा केली. नांदेडचा विषय बीआयएफआरकडे रेफर करण्यात आला. हा उद्योग बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बीआयएफआरच्या कक्षेतून बाहेर काढण्यासाठी कर्जाचे रुपांतर भागभांडवलामध्ये करण्यासाठी नियोजन केलेले आहे. ती मिल चालू करण्याच्या बाबतीत पूर्ण प्रकरण तपासले जाईल. त्या मिलची मलाही पूर्ण कल्पना नाही. आपण सांगितल्याप्रमाणे ही बाब तपासून कार्यवाही करण्यात येईल. सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग आणि पणन विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

-----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य,राज शिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार, रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे तसेच सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी उद्योग विभागाच्या बाबतीत विचार व्यक्त केले. पॅकेज स्किम ऑफ इन्स्टेंटीव्हज या अंतर्गत 200 कोटी रुपयांचे अनुदान दिलेले आहे. त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केले. त्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी औरंगाबादमध्ये एसएसआय युनिटसाठी एमआयडीसीमध्ये जागा उपलब्ध नाही असे सांगितले. सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. त्या ठिकाणी अतिरिक्त एमआयडीसीची जागा संपादित करण्याची प्रोसीजर लवकरात लवकर सुरु करणार आहोत.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाबतीत चित्रपटांना अनुदान यामध्ये आपण जवळजवळ 8 कोटी रुपये देत आहोत. त्याबाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, रमेश निकासे व विलास अवचट यांनी शासनाचे अभिनंदन केले. त्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केले. त्यामध्ये एक महत्वाचा उल्लेख त्यांनी असा केला होता की, चित्रपटगृह तोडून त्या ठिकाणी मल्टीप्लेक्स येत आहेत. 365 दिवसांमध्ये म्हणजे एका वर्षामध्ये एका थिएटरमध्ये किमान 105 दिवस मराठी चित्रपट दाखववावे असे शासनाने बंधनकारक केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी टेक्निकल इव्हॅल्यूएशन कसे होणार ? असा दुसरा मुद्दा उपस्थित केला. जर 35 एम.एम. चित्रपट तयार केला असेल आणि डिजिटल साऊंड सिस्टीम वापरली असेल, या दोन्ही गोष्टी केल्या असतील आणि "अे" कॅटॅगरीतील चित्रपट असेल तर त्याला अधिक 10 लाख रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सन 2003-04 आणि 2004-05 या दोन वर्षामध्ये 36 चित्रपटांना 2 कोटी 60 लाख रुपये एवढे अनुदान जाहीर केलेले आहे आणि ते प्रत्यक्षात दिलेले आहे. मी आपल्या माध्यमातून सदनाला विनंती करतो की उद्योग खात्याच्या तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

-----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (वने,पर्यावरण व आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 174,175 आणि 176 वरील मागण्यांना माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी समर्थन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. बाब क्रमांक 175वर बोलत असताना माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी तिवरांच्या झाडाचे संरक्षण करण्यासंबंधीचा विषय मांडला. त्यांनी केलेल्या सूचना दखलपात्र असून त्यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल. सभागृहाने पर्यावरण विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी पर्यटन, उच्च व तंत्र शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात मी दोन-तीन प्रश्न उपस्थित केले होते. त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी नांदेड येथील आयुर्वेदिक कॉलेज संबंधी प्रश्न विचारला होता. आम्ही त्यांना मदत करणार असून तो प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी बाब क्रमांक 166च्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, पाच-सहा संस्थांना दिलेले पैसे हे केन्द्र शासनाकडून आलेले होते. केन्द्र शासनाकडून आलेले पैसे त्या संस्थांना देण्याचे काम फक्त शासनाने केलेले आहे. प्रायव्हेट कॉलेजेस्ना शासन एक रुपया देखील अनुदान देत नाही. 5 वा वेतन आयोग कर्मचा-यांना द्या असे शासन त्यांना लेखी कळवू शकते, त्यांच्यावर ते लादता येणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नागपूर येथील रुग्णालयात एमआरआय मशिन नाही असा उल्लेख केला होता. या वित्तीय वर्षामध्ये एमआरआय मशिनकरिता तरतूद करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये लगेच ती मशीन देऊ असे आश्वासन दिले होते. आता तुम्ही पुढील वर्षात ही तरतूद करणार आहात.

श्री. सुरेश शेट्टी : जे.जे. हॉस्पिटलसाठी आम्ही वित्त मंत्र्यांकडे 18 कोटी रुपये मागितले होते. परंतु एक पैशाचीही तरतूद झाली नाही. माझी माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सदनातील सर्व माननीय सदस्य माननीय वित्त मंत्र्यांकडे जाऊन त्यांना जे.जे. हॉस्पिटलसाठी तरतूद करण्यासंबंधी विनंती करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पुरवणी मागण्या संमत होण्यापूर्वी एक महत्वाचा विषय मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. एक अतिशय भयंकर गोष्ट घडलेली आहे. त्याची ताबडतोबीने दखल घेतली नाही तर आपल्या नियमांना, कामकाजाला, कशालाच काही सॅन्क्टीटी राहाणार नाही. माननीय राज्यपालांनी पाटबंधा-यासाठी 4 हजार कोटींची तरतूद करावी असे सांगितले होते. याबाबतीत नियोजन सचिवांनी सांगितले की, तेवढी आर्थिक स्थिती नाही, रिसोर्सेस नाहीत, 1941 कोटी रु. देऊ शकतो. मला असे कळले आहे की जानेवारी महिन्यापर्यन्त 3100



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

कोटी रु. खर्च झालेले असून त्या खर्चास विधिमंडळाची मान्यता घेतलेली नाही. 3100 कोटी रु. खर्च झालेले आहेत आणि 1300 कोटी रुपये पुन्हा नव्याने आलेले आहेत. मागण्या अजून मंजूर व्हायच्या आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. आमची आर्थिक स्थिती चांगली नाही, आमच्याकडे रिसोर्सेस नाहीत त्यामुळे पाटबंधा-यासाठी 4 हजार कोटी रुपये देऊ शकत नाही, फक्त 1941 कोटी रुपये देऊ शकतो, असे तुम्ही माननीय राज्यपालांना सांगा. आपण रिॲप्रोप्रिएशन केले तेही रिजनच्या बाहेर केले. त्याबाबतीत माननीय राज्यपालांची परवानगी घेतली नाही. ही अनियमितता झालेली आहे.

...नंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

त्याच्यापेक्षा मोठी अनियमितता अशी आहे की, 1941 कोटी रुपयांचे बजेट असताना 3100 कोटी रु. पाटबंधारे खात्यासाठी खर्च केलेले आहेत. मी अत्यंत जबाबदारीने आरोप करीत आहे. उपमुख्यमंत्री महोदय याठिकाणी बसलेले आहेत त्यांनी खुलासा करावा. पाटबंधारे खात्यासाठी 3100 कोटी रुपये मंजूर करुन टाकले म्हणजे मूळ बजेटपेक्षा 1200 कोटी रुपये अधिकचे खर्च केले त्याला विधिमंडळाची मान्यता घेणे जरुर होते. या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला काही अर्थ आहे काय ? जादा 1200 कोटी रुपये खर्च करुन टाकले हे खरे आहे काय ? शासनाने खुलासा करावा. खर्च केला असेल तर कोणत्या नियमाखाली केला ? विधिमंडळाला आणि राज्यपालांना न विचारता कसा केला ? खर्च करण्यासाठी दोन्ही गोष्टी लागू होतात. एक तर विधिमंडळाची मान्यता आणि राज्यपालांचे निर्देश. शासनाने दोन्ही नियम पाळलेले नाहीत. आमचा अपमान आहे,विधिमंडळाचा अपमान आहे,राज्यपालांचा अपमान आहे. सगळे नियम धाब्यावर बसवून पैसे खर्च केले आहेत. पाटबंधारे खात्यासाठी पैसे खर्च करताना राज्यपालांचे निर्देश आहेत. जेव्हा जेव्हा शासनाकडे पैसा येईल तेव्हा पाटबंधाऱ्याच्या बाबतीत राज्यपाल रिॲलोकेशन करुन देतील. हा नियम केलेला आहे. पैसे आल्याबरोबर शासनाने ताबडतोब राज्यपाल महोदयांना कळविणे आवश्यक आहे. सभागृहाने केलेले नियम पाळावयाचे आहेत किंवा नाही ? मंत्री काय करतात ?मंत्रिमंडळ काय करते ? नियम आहेत किंवा नाहीत ? आमच्या राणे साहेबांना दादा म्हणतो. पण हे बारामतीचे दादा आहेत त्यांना नियम माहीत नाहीत काय ? असले तर पाळले जातात किंवा नाहीत ? मुख्यमंत्र्यांना हे माहीत आहे. उपमुख्यमंत्र्यांना माहीत आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. कोणत्या आधारावर 3100 कोटी रु. खर्च केले ? याचा खुलासा होत नसेल तर पूरक मागण्या सादर करण्याचा हा तमाशा कशाला करावयाचा ? पूरक मागण्यांवर चर्चा कशाला करावयाची ? आम्ही सभागृहात कशाला बोलावयाचे ? ॲड. गुरुनाथ कुलकर्णी आम्हांला समजावून सांगा. विधिमंडळाची परवानगी न घेता आणि राज्यपालांची परवानगी न घेता 3100 कोटी रु. खर्च केलेले आहेत हे योग्य आहे काय ? संविधानाप्रमाणे बरोबर आहे काय ? अर्थमंत्री काय करतात ? परवानगी कशी देतात ? सरकारला थोडीबहुत सुध्दा नियमांची चाड राहिलेली नाही. या चर्चेला त्यामुळे अर्थ उरत नाही. या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील चर्चेचे काही कारण नाही. या सभागृहाची सॅंक्टीटी नाही,सभापतींची नाही,सदस्यांची नाही. सभागृहाशी काहीही देणेघेणे नाही.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 17:20

श्री. नितीन गडकरी ....

सहाव्या माळयावर बसा आणि चेक फाडा. सभापती महोदय, राज्यात कोणाला कॉन्ट्रॅक्ट दिली जाणार आहेत त्यांची मी नांवे सांगतो. लिफाफ्यात नांवे घालून देतो. भविष्यात कामे कुणाला द्यावयाची याचे आधीच बुकींग झालेले आहे. माझे भविष्य खोटे असेल तर मी राजकारणातून निवृत्त होईन. उपमुख्यमंत्री महोदयांनी या विषयाच्या बाबतीत माहिती द्यावी. चूक असेल तर दुरुस्त करु. 1941 कोटी रुपये पाटबंधारे खात्याची तरतूद असताना 3100 कोटी रु. जानेवारी महिन्याच्या आधीच खर्च केले. अजून 1941 कोटी रुपयांच्या पूरक मागण्या मंजूर व्हावयाच्या आहेत. कालपर्यंत मंजूर झालेल्या नव्हत्या. मग हे 3100 कोटी रु. खर्च केले कसे ? खुलासा झाला पाहिजे. पुरवणी मागण्या सादर केल्या हा नुसता कागद आहे. रद्दीमध्ये विकायचा आहे. सभागृहाला विश्वासात न घेता आणि नियमांचा आधार न घेता परस्पर सगळे व्यवहार सरकार करणार असेल तर विधिमंडळाचे महत्व काय ? राज्यपालांचे ऐकत नाही,विधिमंडळाचे ऐकत नाही मग कशाला अधिवेशन घेता ? जे करावयाचे असेल ते सरकारने करावे. सभापती महोदय, याचा खुलासा झ ााल्याशिवाय बजेट मंजूर करु नये. आतापर्यंतची ही चर्चा वांझोटी झालेली आहे. या चर्चेला काही अर्थ नाही. सरकारने सगळेच संपवून टाकले आहे. उपमुख्यमंत्री महोदयांनी याबाबत ताबडतोब खुलासा करावा. आमचा विश्वासघात झालेला आहे. सभागृहाचा,राज्यपालांचा,विधिमंडळ सदस्यांचा अपमान झालेला आहे. अशा प्रकारची दादागिरी करणार असाल तर ते बरोबर होणार नाही. याचा खुलासा झाल्याशिवाय ही चर्चा पुढे नेऊ नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय गंभीर विषय या ठिकाणी मांडलेला आहे. गेले दोन दिवस या ठिकाणी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. ही चर्चा सुरु होण्यापुर्वी माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश बाजूला करुन या निधीचे वाटप केले असा आरोप सन्माननीय सदस्यांनी यापुर्वी देखील केला आणि आजही केला. पुरवणी मागण्या मंजूर होण्यापुर्वीच हा पैसा खर्च करण्यात आलेला आहे. त्यानंतर आपण जी चर्चा करतो त्याला काहीच अर्थ नाही. या गोष्टीचा जोपर्यंत खुलासा होत नाही, हा पैसा कसा, कोणी व कुठे खर्च केला याचा खुलासा झाला तर खऱ्या अर्थाने या सभागृहाबद्दलची विश्वासार्हता कायम राहणार आहे. म्हणून शासनाने ताबडतोब या बाबीचा खुलासा करावा असे निर्देश आपण शासनाला द्यावेत.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एका गंभीर मुद्दयाकडे या सार्वभौम सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. त्यांनी जे आरोप केले हे खरे आहेत, वस्तुस्थितीला धरुन आहेत की अयोग्य आहेत याचा खुलासा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी करावा. आम्ही हे खरे नाही असे समजून येथे चर्चा केली. परंतु हे खरे असेल तर चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. हेच मुद्दे सन्माननीय सदस्यांनी दोन दिवसांपूर्वी सभागृहात उपस्थित केले होते त्यावेळी या सर्व गोष्टी सदनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. खरोखरच अशा प्रकारे सदनाला डावलून, माननीय राज्यपालांचे आदेश डावलून, प्रत्येक गोष्टीला डावलून स्वत:च्या अधिकारात अशा घटना घडत असतील तर सार्वभौम सभागृहाची किंमत शिल्लक राहिली नाही म्हणून याबाबतीत खुलासा होण्याची आवश्यकता आहे. माननीय राज्यपालांनी निर्देश दिले की जर शासनाकडे पैसे उपलब्ध असतील तर त्याचे वाटप करतांना जे निकष घालून दिले आहेत त्याप्रमाणेच त्याचे वाटप झाले पाहिजे नाही तर तसे वाटप करता येणार नाही. पण शासनाने स्वत:च्या मर्जीप्रमाणे निकष डावलून हे वाटप केले आहे. जे पैसे खर्च केले ते 1941 कोटीऐवजी 3100 कोटी रुपये एवढी वाटप करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे निकष डावलून आपण जी चर्चा येथे या मागण्या मंजुरीसाठी करीत आहोत ती निष्फळ आहे, कशासाठी चर्चा करावयाची ? सभागृहाची मान्यता घेण्यापूर्वीच शासन पैसे खर्च करुन बसले नंतर सभागृहाला जाऊन फसावावयाचे असे समजून आले असेल तर हा फसवाफसवीचा धंदा योग्य नाही. ही

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

फसवणूक करणे म्हणजे संपूर्ण राज्यातील जनतेची, ज्यांचा संबंध या योजनांशी आहे त्यांची सर्वांची फसवणूक करण्यासारखे आहे, म्हणून याबाबतीत खुलासा झाला पाहिजे. त्यानंतरच ज्या मागण्या येथे मांडण्यात आल्या आहेत त्या मतास टाकाव्यात व मंजूर कराव्यात.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, आपल्या राज्यात काम करतांना नेहमीच कायदयाचे पालन करुन शासनाने आपले कर्तव्य पार पाडलेले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी माहिती या ठिकाणी दिलेली आहे ती तपासून पाहण्यात येईल व त्यासंबंधीचा खुलासा माननीय अर्थमंत्री करतील. यासंबंधीचा खुलासा करण्याची जबाबदारी शासनामार्फत स्वीकारण्यात येईल तोपर्यंत पुढील कामकाज करण्यास परवानगी द्यावी, अशी मी विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

श्री. आर.आर.पाटील : प्रत्येक वेळेस सभागृहाची बैठक स्थगित करणे हे योग्य नाही.

श्री. नितीन गडकरी : काल चार तास आणि आज तीन चार तास चर्चा या सभागृहात पुरवणी मागण्यांवर झाली आणि अशा प्रकारे जर मान्यतेपूर्वीच पैसा खर्च केला जात असेल तर आम्ही फुकटची बॅटिंग करायला येथे बसलेलो नाहीत. अशा प्रकारे या विषयावर पडदा टाकता येणार नाही.

श्री. आर.आर.पाटील : शासनाच्या वतीने यासंबंधीचा खुलासा करण्यात येईल, असे मी सांगितले. विषयावर पडदा टाकावा असे मी म्हटलेले नाही.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा मुद्दा हा विषयाला धरून आहे. तो बाहेरचा नाही. येथे पुरवणी मागण्यांवर चर्चा झालेली आहे. त्या विषयावर मी बोलत आहे. काल पाटबधारे मंत्र्यांनी पान क्र.92 वरील बाब क्रमांक 109,वर उत्तर दिलेले आहे. काल पाच-सहा विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होती. आज आठ-दहा विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. बाब क्र.109 अन्वये 2005-2006 च्या सुधारित अंदाजानुसार उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानामधून रुपये 263 कोटी 21 लाख 3 हजार एवढया रकमेचा खर्च भागविणे आवश्यक असल्याने रुपये 778 कोटी 68 लाख 97 हजार रुपयाची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. वित्तीय बिलामध्ये दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा आम्हाला अधिकार नाही हे माहित आहे. तो आमचा अधिकार नाही. आम्ही फक्त शिफारस करू शकतो. एक रुपयाची दुरूस्तीसुध्दा सुचवू शकत नाही. येथे रुपये 1041 कोटी मंजुरीकरिता आले आहेत. खरे म्हणजे श्री.आर.आर.पाटील साहेब आपल्या सारख्या गृह मंत्र्यांनी वित्ती मंत्री, वित्त सचिव, पाटबंधारे मंत्री, पाटबंधारे सचिव यांच्याविरूध्द क्रीमिनल कोड अंतर्गत गुन्हा नोंदविला पाहिजे. इतके हे ब्रीच ऑफ ट्रस्ट आहे. ही लोकशाहीची हत्या आहे. शासन आमच्याकडे परवानगी मागण्यासाठी आले आहे. पुरवणी मागण्या मंजूर करणे हा शासनाचा अधिकार आहे. या मागण्या मंजूर करून जिथे पाहिजे तिथे रक्कम खर्च करा. परंतु, आपण विधिमंडळाला विश्वासात न घेता, मंजुरी मिळण्याच्या आधी चेक इश्यू करून, कमिशन घेऊन मोकळे झाले आहात. मग येथे रिकाम्या डिशेस कशासाठी दाखवायला घेऊन आला आहात. मी येथे जे बोलत आहे त्याला रेलेव्हन्स आहे. मी पुरवणी मागण्यासंबंधी बोलत आहे. यानंतर आपण पुरवणी मागण्या मंजूर करणार आहात. तेव्हा या मागण्या मंजूर करण्यासंबंधी आपण मला संरक्षण द्यावे. या मागण्यांवरील पैसा हा सभागृहाची मंजूरी घेण्या आधीच खर्च झालेला आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, येथे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, ते तपासून बघून त्यासंबंधीचा खुलासा माननीय वित्त मंत्री करतील. हा प्रश्न आम्ही तसाच सोडून देणार नाही. येथे जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याचे शासनाच्यावतीने उत्तर दिले जाईल.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झ ाालेली आहे. या चर्चेला संबंधित मंत्र्यांनी उत्तरे देखील दिलेली आहेत. पुरवण्या मागण्या मंजूर करण्याच्या स्टेजला आपण येऊन पोहोचलेलो आहोत. अशा वेळी सन्माननीय सदस्य ....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

श्री.नितीन गडकरी यांनी माहिती विचारलेली आहे की, पुरवणी मागण्यांमधील अधिकची रक्कम खर्च झाली आहे काय ? पुरवणी मागणी हा एक विषय आहे. अधिकची मागणी ही तात्काळ द्यायला पाहिजे, तो पर्यंत पुरवणी मागण्या मंजूर करू नयेत असे म्हणणे उचित होणार नाही, नियमाला धरून होणार नाही. यासंबंधीची माहिती उद्या देखील देता येऊ शकते. पण पुरवण्या मागण्यांवरील कार्यरिती थांबवून, आम्ही विचारलेली माहिती ताबडतोब द्या आणि त्यानंतर पुरवणी मागण्या मान्य करा असे म्हणणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांचा तांत्रिक मुद्दा आहे. त्यासंबंधीची माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासन आपली जबाबदारी टाळत नाही. परंतु, जो पर्यंत उत्तर येत नाही, तो पर्यंत पुरवण्या मागण्या मतास टाकू नयेत असे म्हणणे योग्य होणार नाही. तेव्हा पुरवण्या मागण्या मतास टाकून संमत करण्यात याव्यात अशी मी विनंती करीत आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याला उत्तर देण्यास शासन कटिबद्ध आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या मागणीवर आम्ही चर्चा केली आहे, त्या मागणीवरील पैसे आधीच शासनाने खर्च केलेले आहेत.

यानंतर श्री.कांबळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : हे तुमचे म्हणणे आहे.

श्री. नितीन गडकरी : मग तुम्ही " नाही केले " असे म्हणा ना.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, शासन सर्व माहिती घेऊन ती माहिती तपासल्यानंतर आपल्याला देणार आहे. आपण म्हणता ते योग्य आहे की अयोग्य आहे हे अगोदर तपासावे लागेल. पुरवणी मागण्यांव्यतिरिक्त आपण माहिती मागत आहात. त्यामुळे ती माहिती घेतल्याशिवाय व तपासल्याशिवाय आपल्याला कशी काय देणार ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आज आपण या पुरवणी मागण्यांना मंजूर म्हटले की, आज संध्याकाळी 6 पासून रात्री 2-3 वाजेपर्यंत मंत्रालयात बॅक डेटमध्ये एन्ट्रीज करण्याचे व चेक दुरुस्त करण्याचे काम सुरु होईल. सभापती महोदय, हा एका मार्काचा सिंपल प्रश्न आहे. सभापती महोदय, हा प्रश्न एक रुपयाचा वगैरे नसून 1200 कोटी रुपयांचा प्रश्न आहे. मागील वेळी 1941 कोटी रुपयांचे बजेट मंजूर झाले होते, परंतु कोणतीही मंजूरी न घेता 3100 कोटी रुपये खर्च केले आहेत. म्हणजेच 1200 कोटी रुपये जास्त खर्च केलेले आहेत आणि आमच्याकडे आता पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने पुन्हा शासन 1041 कोटी रुपयांच्या परवानगीसाठी आलेले आहे. आता हे 3100 कोटी रुपये अधिक 1041 कोटी रुपये म्हणजे एकूण 4200 कोटी रुपये होतील. सभापती महोदय, माननीय राज्यपालांना सांगितले आहे की, आमची परिस्थिती वाईट आहे. सभापती महोदय, बजेट फक्त 1941 कोटी रुपयांचे आहे आणि प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. निकोसेसाहेब हे 2000 कोटी रुपये जादूच्या प्रयोगातून काढले आहेत, अशी कशी तुमची पार्टी ? तरी, या संदर्भात शासनाने काहीतरी खुलासा केला पाहिजे. हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे आपण हे कामकाज दहा मिनिटे थांबवावे.

**उपसभापती** : ठीक आहे. पुरवणी मागण्यांवर आपण काही मतमोजणी घेत नाही.

श्री. नितीन गडकरी : माझा मुद्दा अजूनपर्यंत क्लिअर झालेला नाही. सभापती महोदय, आपण तरी या सभागृहाच्या सार्वभौमत्वाला, सन्माननीय सदस्यांच्या अधिकाराला किंमत देता ना ? सभापती महोदय, आज कामकाज संपविण्याच्या आत या ठिकाणी सरकार खुलासा करेल एवढे तरी सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 3100 कोटी रुपये खर्च झालेले आहेत असे माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी कबूल केले आहे आणि याबाबतचे रेकॉर्ड आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृह समाप्त होण्याअगोदर तरी निवेदन करावयास सांगावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे अगोदर तपासून पाहण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मग ते केले की नाही हे तरी सांगावे. माझा असा अंदाज आहे की, माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांना व माननीय महसुल मंत्री श्री. नारायण राणे साहेबांना याची सत्य माहिती आहे किंवा असण्याची शक्यता आहे. कदाचित सांगणे गैरसोयीचे असू शकते.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांना सांगताना पूर्ण अभ्यास करुन माहिती देणे गरजेचे आहे. ओझरत्या माहितीवर चुकीचे सांगितल्यास उद्या हक्कभंग येऊ शकतो.

श्री. नितीन गडकरी : सभागृह संपण्याच्या अगोदर या संदर्भातील खुलासा झाला पाहिजे.

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी आता काही प्रश्न उपस्थित केले आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याला समर्थन दिले आहे. तरी, या बाबीसंदर्भातील खुलासा उद्या करण्यात येईल.

**उपसभापती** : सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आता संपली आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि सायंकाळी 6.00 वाजता पुन: भरेल.

( सायंकाळी 5.39 ते सायंकाळी 6.00 पर्यंत मध्यंतर )

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर)**

**( सभापती स्थानी माननीय उपसभापती )**

**माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी स्वत:च्या गळयात बांधलेली दोरी**

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या गळयाला दोरी बांधलेली आहे, त्यांना सभागृहात दोरी बांधून बसता येणार नाही. तरी कृपया आपण त्यांना दोरी बाहेर घेऊन जाण्यास सांगावे. हे करण्यासाठी बाहेर खूप जागा आहे त्यांनी ते बाहेर करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझ्या गळयामध्ये दोरी बांधलेली आहे यापासून मला असे भासवावयाचे आहे की, शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होते आहेत, अशा प्रसंगी गळयामध्ये दोरीचा फास अडकविणे ही महाराष्ट्र सरकारची ओळख आहे. महाराष्ट्र सरकारचा तो ट्रेडमार्क आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी ती दोरी माझ्याकडे पाठवावी.

( उपसभापती यांच्याकडे दोरी पाठविण्यात आली )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या.

**मु.शी.**: राज्यामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, गोपीकिशन बजोरिया, विनोद तावडे, सुरेश जेथलिया, श्रीकांत जोशी, डॉ. निलम गोऱ्हे, श्रीमती कांता नलावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेवर मतदान मागता येणार नाही, सूचना देणारे सन्माननीय सदस्य आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो,

" राज्यातील आघाडी शासनाने डिसेंबर, 2005 च्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पॅकेजची घोषणा केल्यानंतरही आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झ ालेली आहे, मोफत विजेच्या घोषणेप्रमाणे आत्महत्या रोखण्यासाठी घोषित केलेले पॅकेजही पोकळ असल्याची शेतकऱ्यांची खात्री झालेली आहे, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी निम्म्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांनाही शासनाने जाहीर केलेली मदत मिळालेली नाही, बोगस बियाणे, बोगस किटकनाशके, नापिकी, गारपीट यासारख्या विविध संकटामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे व शासनाकडून काही दिलासा मिळेल अशी त्याला काडीमात्र आशा उरलेली नाही व त्यामुळे आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता दिसत आहे, याप्रकरणी हस्तक्षेप करुन शेतकऱ्यांच्या अतिशय जिव्हाळयाच्या व ज्वलंत विषयावर तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. सांगळे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

आपल्या महाराष्ट्राच्या फासाची सर्व जगाला ओळख झाली आहे तो फास मी थोडयाच वेळापूर्वी एवढयासाठी आणला होता की, हा फास येथे लोंबकळत राहिल्यास किंवा गळयात असल्यावर आपण किती अस्वस्थ होऊ शकतो, तर महाराष्ट्रातील उद्वध्वस्त झालेला शेतकरी या फासाला किती उद्वीग्नतेने सामोरा जात असेल, याची प्रचिती यावी असा माझा उद्देश होता. हा फास गळयात घालून भाषण करावे एवढी सध्या विदारक परिस्थिती आहे. तेव्हा माननीय महसूल मंत्र्यांनी मला हे सर्व करण्यासाठी बाहेर खूप जागा असल्याचा सल्ला दिला होता. मी माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी आत्महत्या करुन मरणारा माणूस नाही, मी त्यांच्या सारखाच मारुन, मरण्याच्या वृत्तीचा माणूस आहे, मी अशा फाजील आत्महत्येने मरणार नाही. आज महाराष्ट्राची कीर्ती संपूर्ण जगामध्ये पोहचली आहे. आत्महत्या करणारा शेतकरी हा जगामध्ये चर्चेचा विषय झालेला आहे. दि.2/12/2005 रोजीचे "लोकमत" वर्तमानपत्र या ठिकाणी माझ्याकडे आहे. या वर्तमानपत्रामधील पहिलीच बातमी अशी आहे की, " ब्रिटनच्या बी.बी.सी. व अमेरिकेच्या सी.एन.एन. या प्रसिध्द चॅनेलच्या वेबसाईटवरही विदर्भातील कर्जबाजारी शेतक-यांच्या आत्महत्यांची नोंद घेण्यात आली आहे." अशाप्रकारे महाराष्ट्राची संपूर्ण जगामध्ये कीर्ती पोहचली आहे. आपल्या राज्याचे आदरणीय केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार ज्यांचा आम्ही अभिमान बाळगतो. या विषयी जगाने नोंद घेतलेली असल्यामुळे आपण मागे का रहावे असे त्यांना कुठतरी वाटले असेल म्हणून आपल्या देशाच्या लोकसभेमध्ये याबाबतची नोंद झाली पाहिजे म्हणून श्री.शरद पवार यांनी लोकसभेमध्ये स्वत: जी आकडेवारी सांगितली, ती आत्मियतेने सांगितली की, अभिमानाने सांगितली की, दु:खाने सांगितली हे या ठिकाणी बसून समजू शकणार नाही. पण त्यांनी ही आकडेवारी सांगताना महाराष्ट्रातच शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या नाहीत, तर आंध्रप्रदेशात सन 2003-04 मध्ये 254 शेतक-यांच्या आत्महत्येची नोंद करण्यात आली तर 2004-05 या वर्षातील 11 नोव्हेंबर पर्यंत ही आकडेवारी 1,068 एवढी झाली आहे. अशाप्रकारे आंध्रप्रदेशात कर्जबाजारी शेतक-यांनी मृत्यूला कवटाळले आहे. कर्नाटकमध्ये सन 2004-05 साली 271 आत्महत्याच्या घटना नोंदवण्यात आल्या असून चालू असलेल्या 2005-06 च्या आतापर्यंतच्या काळात 52 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. अशाप्रकारे महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येची आकडेवारी सन 2004 मध्ये 524

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

आणि सन 2005 मध्ये 187 नोंदवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच केरळमध्ये सन 2005 मध्ये व ओरिसा राज्यात सन 2004-05 या वर्षाच्या दरम्यान एकाही शेतक-याच्या आत्महत्याची नोंद नाही. मात्र ओरिसात सन 2005-06 दरम्यान फक्त 5 आत्महत्याची नोंद झाली आहे व गुजराथमध्ये सन 2004 व 2005 मध्ये अनुक्रमे चार व एका शेतक-याच्या आत्महत्यांची नोंद झाल्याची त्यांनी माहिती दिली. निवेदन करताना ज्या ठिकाणी कापूस उत्पादकता आहे तेथे आत्महत्येचे जास्त प्रमाण आहे, जेथे कापूस उत्पादकता नाही तेथे आत्महत्येचे प्रमाण नाही ही बाब लक्षात आली. हे निवेदन श्री.शरद पवार यांनी लोकसभेच्या पटलावर ठेवले. यानंतर महाराष्ट्रात झ ाालेल्या आत्महत्येच्या संदर्भात सर्व राज्यातील खासदारांनी एकमुखाने सर्व पक्षाच्या खासदारांची एक समिती नेमावी अशाप्रकारचा एक प्रस्ताव लोकसभेमध्ये मांडला होता. अशाप्रकारे महाराष्ट्रात झालेल्या आत्महत्यांना, जगानंतर देशातील सार्वभौम असलेल्या सभागृहामध्ये मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे आमचे आघाडी सरकार महाराष्ट्रातील शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या थांबवण्यासाठी किती आत्मियतेने काम करीत आहे याबाबतची तेथे नोंद झाली आहे. महाराष्ट्रामध्ये कृषिची किती प्रगती झाली आहे, महाराष्ट्र इंडस्टीजमध्ये किती पुढे गेला, महाराष्ट्र इरिगेशनमध्ये किती पुढे गेला, महाराष्ट्रात किती रस्त्यांची प्रगती झाली या विषयी लोकसभेमध्ये चर्चा न होता महाराष्ट्रात किती शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या हा चर्चेचा विषय होतो, ही अतिशय दु:खाची व खेदाची बाब आहे. या संदर्भात माननीय केंद्रीय कृषिमंत्री व सर्व खासदारांनी नोंद घेतली. यामुळे या विषयी माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांना नोंद घेणे भाग पडले. त्यांनी विदर्भात झालेल्या शेतक-यांच्या आत्महत्येचे सर्व्हेक्षण करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी सत्यशोधन नावाची एक समिती पाठवली. या समितीने महाराष्ट्र शासनाच्या कतृत्वाचा संपूर्ण पर्दाफाश केला. या समितीने दिलेल्या अहवालाचा घोषवारा जाहीर झाला.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP. श्री. सांगळे नंतर --- 18.10

श्री. रावते .....

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे कापसाचे अर्थकारण कारणीभूत असून जलसिंचन क्षेत्रातील पिछेहाट आणि त्यातून निर्माण झालेल्या नैराश्यामुळे या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची खळबळजनक निष्कर्ष केंद्र सरकारच्या सत्यशोधन समितीने काढले आहेत व तशी कबुली या समितीचे प्रमुख असलेले श्री.आदर्श मिश्रा यांनी दिलेली आहे. सभापती महोदय, आपण आता या पीठासनावर बसला आहात. मघाशी या सभागृहामध्ये माननीय राज्यपालांचे निदेश डावलून विदर्भ मराठवाड्याच्या सिंचनाचा अनुशेष असतानाही बळजबरीने बेकायदेशीरपणे विदर्भ-मराठवाड्याचा पैसा खेचून नेला त्यावर येथे चर्चा होत होती. त्या संदर्भात सरकारचे निवेदन आणि त्यावर येथे जे पाच मिनिटापूर्वी झाले ते आपण पाहिले आहे. परंतु सत्यशोधन समितीने जो अहवाल दिला त्यामध्ये जलसिंचन क्षेत्रातील पिछेहाटीतून ही परिस्थिती निर्माण झाली आहे अशा प्रकारचा निष्कर्ष केंद्रीय अभ्यासगटाने नोंदविला आहे. सभापती महोदय, ज्यावेळेस या सदनाचे सर्व सदस्य माननीय राज्यपालांना या आत्महत्यांच्या संदर्भात भेटावयास गेलो होतो त्यावेळी माननीय राज्यपाल एवढेच म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे हे महाराष्ट्राला लांच्छनास्पद आहे. अशा प्रकारे सरकार बद्दलची भूमिका माननीय राज्यपालांनी जाहीररित्या व्यक्त केली. पण या सरकारला त्यातून काही जाग आली की नाही हा नंतरचा प्रश्न आहे. सरकारने जे पॅकेज दिले त्याबद्दल मी नंतर बोलणारच आहे. काय हो तुमचा अभिमान ? काय हो तुमचा स्वाभिमान ? या महाराष्ट्रात होणाऱ्या आत्महत्या थांबविण्यासाठी, त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकऱ्याला विश्वास देण्यामध्ये हे सरकार कुचकामी आणि अपयशी ठरलेले आहे म्हणून या आत्महत्या सतत चालू रहात असल्याने माननीय राष्ट्रपती महोदयांनी देखील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची नोंद घेतली आणि महाराष्ट्रातील, विदर्भातील कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची गंभीर दखल देशाचे राष्ट्रपती माननीय श्री.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी घेतली असून या प्रकरणी तात्काळ अहवाल देण्याचे आदेश महाराष्ट्र सरकारला दिले. आपल्या राज्यातील आत्महत्यांची कीर्ती किती दिगंत होत चालली आहे याचे हे एक नमुनेदार आणि मासलेवाईक उदाहरण आहे. सभापती महोदय, या आत्महत्येचे प्रमाण पॅकेज जाहीर केल्यानंतर देखील वाढतेच आहे. आतापर्यंत गेल्या खरीप हंगामा पासून ते रब्बी हंगामापर्यंत 309 आत्महत्या झालेल्या आहेत. जून मध्ये 16, जुलै मध्ये 11, ऑगस्ट मध्ये 18, सप्टेंबरमध्ये 26, ऑक्टोबरमध्ये 20, नोव्हेंबरमध्ये 52 ... म्हणजे वाढता क्रम आहे.,

... 3डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी )** श्री. रावते ....

डिसेंबरमध्ये 72 आणि पॅकेज जाहीर झाल्यानंतर म्हणजे जानेवारीमध्ये 68, फेब्रुवारीमध्ये 26 आणि मार्चच्या अजून नोंदवावयाच्या आहेत. अशा प्रकारे एकूण 309 आत्महत्या या अशा महिन्याप्रमाणे झाल्या आहेत. सभापती महोदय, या आत्महत्या का होतात, त्याबाबत कशी परिस्थिती आहे ? विदर्भाचा अनुशेष किती आहे, मराठवाड्याचा अनुशेष किती आहे ? आणि या प्रकरणामध्ये सहकार खात्याचे एकंदर कर्तृत्त्व काय आहे ? हे असे का होते आहे ? त्याचा अहवाल जो आता माझ्याकडे उपलब्ध आहे त्यानुसार विकास तर सोडाच पण शेतीसाठी कर्ज देण्याच्या संदर्भात उर्वरित महाराष्ट्राने विदर्भाला पार दाबून टाकले आहे. त्यातही पश्चिम महाराष्ट्राची दादागिरी असून या भागातील 80 टक्के शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध होते तर विदर्भातील केवळ 8 टक्के शेतकरी वीज कर्जासाठी पात्र ठरविले जातात. कोकणात हीच आकडेवारी फक्त 24 टक्के आहे तर मराठवाड्यामध्ये ती 18 टक्के असून पश्चिम महाराष्ट्राची संपन्नता स्पष्ट करणारी अशी ही सहकार खात्याची शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्याबाबतीतील आकडेवारी आहे. विदर्भातील केवळ 8 टक्के शेतकरी बँकेकडून कर्ज मिळवू शकतो. त्यामुळे 92 टक्के शेतकऱ्यांना खाजगी अवैध सावकाराच्या दुष्टचक्रामध्ये गुंतावे लागते. हे सहकार खात्याचे अपयश आहे की कोणत्या बँकांचे आहे की कर्ज वाटप यंत्रणेचे आहे ? म्हणून वारंवार गेले सहा महिने घोष चालविला आहे की, शेतकऱ्याला कर्जमुक्त करा, त्याला पीक कर्ज देण्याची व्यवस्था करा. तर मग सहकार खात्याने याबाबतीत कोणती ठोस पावले उचलली आहेत हे येथे स्पष्ट होणे आवश्यक आहे. या परिस्थितीत 8 टक्के शेतकऱ्यांना केवळ बँकेकडून कर्ज मिळणार असेल आणि 92 टक्के शेतकऱ्यांना खाजगी अवैध सावकाराच्या कर्जावर अवलंबून रहावे लागत असेल तर आत्महत्येचे हे प्रमाण कमी होण्या ऐवजी वाढतच राहणार आहे हे स्पष्ट होणारी ही सहकार खात्याच्या यंत्रणेची पार्श्वभूमी आहे. सभापती महोदय, पश्चिम विदर्भामध्ये काय परिस्थिती आहे ? कारण सर्वात जास्त आत्महत्या या पश्चिम विदर्भामध्ये झालेल्या आहेत. जवळ जवळ 85 टक्के आत्महत्या या पश्चिम विदर्भातील आहेत. पश्चिम विदर्भामध्ये 50 लाख एकरावर 32 लाख शेतकऱ्यांनी कापसाचा पेरा केला होता. मागील वर्षी पश्चित विदर्भात 150 लाख क्विंटल कापसाचे पीक झाले होते. त्याच 50 लाख एकरावर 22 लाख शेतकऱ्यांना या वर्षी केवळ 30 लाख क्विंटलच कापूस पिकविता आला. ..

( यानंतर श्री. सरफरे .... 3एक्स 1 ...

अपरिशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

याचा अर्थ गेल्या वर्षीच्या मानाने या वर्षी पेरा कमी झाल्यामुळे जवळ जवळ 5 पट कापसाचे कमी पीक आले. त्यामुळे आत्महत्त्या केलेल्या कर्जबाजारी शेतकऱ्यांकडील कर्ज वाढत गेले. त्या शेतकऱ्याच्या कापसाला किती भाव मिळाला? हा नेहमीच्या चर्चेचा विषय आहे. शेतकऱ्याला 2500 ते 2700 रुपये भाव द्यायचे बोलतो. परंतु त्या शेतकऱ्याला कापसाच्या पेरणीसाठी किती खर्च येतो? माननीय कृषी मंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी काल बीटी कॉटन बियाण्यांबाबत बोललो. काल मी शब्द वापरल्याबद्दल मला वाईट वाटले तो शब्द मी पुन्हा वापरणार नाही. परंतु हे बियाणे निकृष्ट प्रतीचे आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. आणि म्हणून शेतकऱ्याला त्या बी.टी. कॉटनचा पेरा करण्यासाठी किती खर्च करावा लागतो त्याबाबत मी आपल्याला माहिती सांगतो. एका एकरामध्ये बियाण्यांचा दीड डबा वापरावा लागतो. त्याची किंमत 2500 रुपये आहे. म्हणजे एक एकराला बियाण्यांचा खर्च 2500 रुपये येतो. त्यानंतर खताची 10:26:26 ची बॅग लागते तिला 380 रुपये लागतात. यूरीयाची एक बॅग लागते तिला 260 रुपये लागतात. सुपरफॉस्फेटची एक बॅग लागते तिला 190 रुपये लागतात. पोटॅशच्या एका बॅगला 220 रुपये लागतात. हा खर्च पहिल्या 25 दिवसाकरीता करावा लागतो. त्याकरीता एकूण 3550 रुपये खर्च येतो. पोटॅशचा पहिला डोस दिल्यानंतर दुसऱ्या टप्प्यामध्ये 15:15:15 च्या दोन बॅग वापराव्या लागतात. त्यापैकी एका बॅगला 380 रुपये लागतात. दोन बॅगचे 760 रुपये खर्च येतो. यूरीयाची 260 रुपयांची एक बॅग पुन्हा वापरावी लागते. अशाप्रकारे दुसऱ्या टप्प्यामध्ये 4590 रुपये येथपर्यंत हा खर्च जातो. त्यानंतर रोपे उगवून झ ाल्यानंतर फवारणीचा प्रश्न येतो. त्याचप्रमाणे मोनोक्रोटोफास्ट 180 रुपये, सोमेसिडीन 270 रुपये ही औषधांची फवारणी करावी लागते. ही औषधे बोगस असतात त्यासंबंधीचा विषय काल चर्चिला गेला आहे. हा संपूर्ण खर्च 4940 पर्यंत जातो. त्यानंतर मजुरांच्या मजूरीचा प्रश्न येतो. लागवडीसाठी दोन पुरुष आणि 4 बाया घेतल्या तर 120 रुपये खर्च येतो. त्यामध्ये बायांचा पेरणीच्या वेळी 220 रुपये खर्च येतो. दोन वेळा फवारणी आणि खतावणी करावयाची असेल तर 440 रुपये अधिक 120 रुपये खर्च येतो. निंदण व वेचणीसाठी 300रुपये खर्च येतो. हा सर्व मिळून 6640 रुपये खर्च एका एकराकरीता येतो. त्यानंतर सिंचनाचे चार्जेस भरावे लागतात. या अर्थसंकल्पामध्ये त्यामध्ये 15 टक्के वाढ केली आहे. कालपर्यंत एका एकराला 400 रुपये पाण्याचा चार्ज भरावा लागत होता. एका एकरामध्ये शेतकऱ्याला 7040 रुपये खर्च करावा लागतो. यामध्ये नांगरणी ही घरातील लोकांकडून होत असल्यामुळे त्यावरील खर्च पकडत नाही. आपल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये याची नोंद व्हावी म्हणून मी तपशीलवार याठिक्‌ाणी माहिती सांगितली आहे. सभापती महोदय, यावेळी बीटी कॉटनचा पेरा झाला. या बीटी कॉटनच्या पेऱ्याची जी कारणमीमांसा आहे ती सांगावयास गेलो तर अत्यंत वाईट वाटेल. पश्चिम विदर्भामध्ये बाऊसला कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आघाडी सरकारच्या कृषी खात्याच्या आग्रहाने प्रदर्शन भरविले होते. माननीय कृषी मंत्री मी आपणास मुद्दाम सांगत आहे. आपण त्यासाठी मोठया प्रमाणावर प्रसिध्दी केली होती. आपल्या अधिकाऱ्यांना कामाला लावले होते. जसे काही आपण बीटी कॉटनचे गुलाम आहोत अशापध्दतीने आपले अधिकारी कामाला लागले होते. बीटी कॉटनमुळे प्रति एकरी शेतीचा खर्च 7050 निर्माण झाला. कारण आपण एकरी 20 क्विंटल कापसाचा दावा करीत होता.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

कंपनीचे जे मालक आहेत ते प्रती एकरी 2 क्विंटलपेक्षा जास्त कापूस येत नसतांना मात्र नंतर चूप बसले. मी अत्यंत खेदाने एक गोष्ट नमूद करतो की, विदर्भामध्ये कापूस हंगामध्ये आत्महत्या करणाऱ्या 321 पैकी 212 शेतकऱ्यांनी सर्वात महागडे असे मोनसेनट्रो कंपनीचे बी-बियाणे पेरले होते या आशेवर की, प्रती एकरी 20 क्विंटल पीक होईल, फवारणीचा खर्च लागणार नाही. कारण काय तर कंपनीने तसा दावा केला होता व त्याची प्रसिध्दी केली होती. त्या बियाणाच्या संबंधातही मागच्या अधिवेशनामध्ये माझी लक्षवेधी सूचना होती,त्यावेळेस चर्चा झाली. पण प्रत्यक्षात फवारणीचा प्रचंड खर्च आला व कापसाचे पीक अर्ध्यावर येऊन सरासरी दोन ते तीन क्विंटल प्रती एकराच्या घरात कापूस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पेरणीच्यावेळी मोनसेन्ट्रो कंपनीच्या बीटी बियाणाचा पेरा करा असा प्रचार सन्माननीय मंत्री बाळासाहेब थोरात साहेब आपण स्वत: सिने अभिनेते श्री.नाना पाटेकर यांच्या बरोबर संपूर्ण विदर्भाच्या दौऱ्यामध्ये जाऊन केला. भारताचे कृषी मंत्री माननीय शरद पवार साहेब यांनी मोनसेन्ट्रोच्या बीटी बियाणांच्या वापरामुळे दुसरी हरित क्रांती येईल त्यामुळे आता इतर सर्व पिकांसाठी जैविक बियाणांचा सर्रास वापर करण्याचा सल्ला दिला होता.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर जाऊ नये म्हणून मी सांगतो की, श्री.नाना पाटेकर आणि मी कधीही एकत्र गेलो नाही.

श्री.दिवाकर रावते : मी करेक्ट करतो. श्री.नाना पाटेकर आणि आपण एकत्र आपण गेला नाही. पण नाना पाटेकर आणि आपण बी.टी.बियाणाचा प्रचार विदर्भामध्ये करत फिरला. श्री.नाना पाटेकर,नट आहेत, त्यांनी त्या कंपनीकडून पैसे घेतले, ते फिरले. परंतु तुम्ही स्वतंत्र प्रचार केला. तुम्ही बी.टी.कॉटनची वकिली केलेली आहे, हे नाकारुन चालणार नाही. बी.टी.बियाणांच्याबाबतीत शरद पवार साहेबांनी आता हरित क्रांती होईल, असे जाहीर स्टेटमेंट केलेले आहे. आपण एक असे वाक्य वापरलेले आहे की, ते आपल्याला नाकारता येणार नाही. आपण असे म्हणाला की, "शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत म्हणून बी.टी.बियाणे हे देवाने धाडले आहे, ते एक वरदान आहे", असे प्रचाराच्यावेळी एका भाषणामध्ये आपण म्हटलेले आहे. ते वर्तमानपत्रामध्ये छापून आले. ते आपण नाकारु नका. चुका होतात, आमच्याही चुका होतात, सर्वांच्या चुका होतात. त्या सीडमध्ये काय लपलेले आहे ते काय माहिती ? नंतर उगवल्यानंतर काय भानगड झाली हे समजले. महाराष्ट्रातील कृषी मंत्रालयातील सर्व अधिकाऱ्यांवर दबाव आणून जास्तीत जास्त बी.टी. बियाणे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

पेरा करावा, असा सल्ला शेतकऱ्यांना देण्याचा आदेशच थोरात साहेब आपण दिला. महाराष्ट्र सरकार इतके करुन थांबले नाही, तर आपल्या महाबीज बियाणे महामंडळामार्फत..

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून खुलासा करतो की, अशापध्दतीने सर्रास बी.टी.बियाणे वापरावे अशा पध्दतीने कधीही आम्ही सल्ला दिलेला नाही. उलट असे दिसते की, जिथे सिंचनची व्यवस्था आहे, त्या ठिकाणी बी.टी.बियाणे परवडू शकते. आम्ही स्वतंत्र बैठक घेतली त्यानंतर सगळा अहवाल तयार करुन सांगितले की,जिथे पावसावर आधारित शेती आहे, तेथे बी.टी. बियाणे परवडणारे होणार नाही, असे केंद्र शासनालाही आम्ही कळविले. त्याबाबतीत आमची जी मते आहेत ती स्पष्ट आहेत.

श्री.दिवाकर रावते : मला आनंद आहे की,आपल्या खुलाशामधूनच आपण कमिट करता पाऊस जास्त पडेल, असे वाटले नव्हते, जिथे पाहिजे तेथे वापरा,असे सांगितले ते बरोबर आहे. निसर्गाने दगा दिला, हा तुमचा दोष नाही. तुम्ही सांगितले, ते बरोबर आहे. देवाने धाडलेले ते बियाणे आहे. थोरात साहेब आणि या सदनामध्ये सागत होता की, आम्ही हे पकडले, ते पकडले, ही धाड घातली, त्यामध्ये बोगस बियाणे पकडले, एवढया लोकांना जेलमध्ये पाठविले. हा शासनाच्या वतीने केवढा प्रचार केला होता. मग आपण सभागृहामध्ये सांगितले की, त्यांच्यावर कारवाई करण्याची कायद्यामध्ये तरतूदच नाही. महाराष्ट्र सरकार इतके करुनही थांबले नाही. महाबीज बियाणे मंडळामार्फत मोनसेन्ट्रो बी.टी.बियाणे विकण्याचा अफलातून करार केला. तेही आपण सांगितले की, 4400 रुपये बियाण्याची किंमत आहे आणि 1250 मोनसेन्ट्रो कंपनीची रॉयल्टी आहे. नाना पाटेकर जाहिरात करतात, हे मी टीव्हीवरुन पाहिलेले आहे. स्टेजवर एखादे नाटक करुन दाखविले तर समजू शकतो. खाली उतरायचे लोकांमध्ये जायचे, गप्पा मारायच्या. लोकांना वाटते की, नाना आला,आपल्यामध्ये बसला,आपल्यासारखा साधा माणूस आहे,ते लोकांना सांगायचे. याला लोक भुलले. नाकारता येत नाही. नाना पाटेकरना जबाबदारी ध्यावी लागेल. मागच्याही वेळेला मी सांगितले होते की, चित्रपटामध्ये सिगारेट ओढण्यास बंदी केल्यानंतर अभिताभ बच्चनचे एक पोस्टर लागले.त्यात अमिताभा बच्चनला सिगारेट ओढताना दाखविण्यात आले होते. त्यामध्ये डायरेक्टर दोषी ठरला नाही. अभिताभ दोषी ठरला. त्याला माफी मागावी लागली.

यानंतर श्री.बरवड....

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून बीटी बियाणे फेल गेल्यानंतर त्याचा प्रचार करणाऱ्या श्री. नाना पाटेकर यांनी लाखो रुपये घेतले असतील तर त्यांनी शेतकऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे अशी माझी मागणी आहे. कारण आज शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. सभापती महोदय, बीटी कॉटन बियाणाच्या फसवणुकीमुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत गेलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, देवाने बियाणे धाडले. शेतकरी श्रीमंत व्हावा अशी तुमची चांगली इच्छा होती. सभापती महोदय, यंदाच्या हंगामामध्ये विदर्भातील सुमारे 6 लाख 12 हजार शेतकऱ्यांनी राशी, महिको, अंकुर, निजीवीडू या कंपन्यांच्या अधिकृत बीटी बियाणांची पेरणी केली होती. सुमारे 20 हजार एकर शेतीमध्ये जवळजवळ 30 लाख पाकिटातील बियाणे वापरण्यात आले होते. हा रेकॉर्ड आहे. कंपनीने याबाबत प्रचार केला. बीटी हे जैविक बियाणे असल्यामुळे रोगांपासून बचाव आणि अधिक उत्पादकतेची हमी कंपनीने दिली होती. प्रत्यक्षात बीटी च्या पऱ्हाटीवर भयंकर रोगराई आली. पर्यायाने उत्पन्नही सरासरी दोन क्विंटल प्रती एकरवर आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना 2800 कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसलेला आहे. बीटी हे जैविक बियाणे असल्याने रोग पडणार नाही व त्यामुळे 50 टक्के फवारणीचा खर्च वाचेल असे सुरुवातीला सांगण्यात आले होते पण प्रत्यक्षात मोठया प्रमाणावर रोग पडल्याने शेतकऱ्यांचा फवारणीचा खर्चही दुपटीने वाढला. परिणामतः 116 कोटीचा जादा खर्च शेतकऱ्यांना करावा लागला कारण त्या भागामध्ये, पश्चिम विदर्भामध्ये 116 कोटी रुपयांच्या, 120 कोटी रुपयांच्या औषधांची विक्री झाली. हे रेकॉर्डवर आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. बाळासाहेब थोरात, आपण काही म्हणालात तर मग मी श्री. प्रकाश कोरे यांना बीटी बियाणावर लेख लिहिलेले सगळे अंक आपल्याकडे पाठवण्यास सांगतो. हे बियाणे किती दोषी आहे याबद्दल वारंवार सूचना येत होत्या. खात्याने त्याची नोंद घ्यावयास पाहिजे होती. आपण जे म्हणालात त्याचे उत्तर इकडे आहे. सभापती महोदय, बीटी बियाणांचे मॅनेजर्स आहेत ते अपयश लपविण्याकरिता जे म्हणाले ते महाराष्ट्र टाईम्सच्या 7 मार्च, 2006 च्या अंकात आलेले आहे. "शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खापर बी.टी. कॉटनवर फोडू नका" अशा शीर्षकाखाली ते छापले आहे. बीटी बियाणांमुळे विदर्भामध्ये कशा आत्महत्या वाढलेल्या आहेत हे सत्य जेव्हा बाहेर यावयास

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते .....

लागले त्यावेळी कंपनीचे हे सगळे मॅनेजर्स बाहेर आले. ते स्टेटमेंट द्यावयास लागले. श्री. राजेंद्र बारवाले यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सर्वात प्रथम 2002 मध्ये प्रकाशझ ोतात आल्या. त्याच सुमारास बीटी कॉटनही सर्वातप्रथम भारतात दाखल झाला. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या आत्महत्या दुर्दैवी असल्या तरी त्याचा संबंध थेट बीटी कॉटनशी जोडणे चुकीचे आहे. कारण बीटी कॉटनबाबत असलेले अपेक्षांचे ओझे असे कारण त्यांनी दिले आहे. म्हणजे 15 क्विंटल येईल, 20 क्विंटल कापूस येईल अशी शेतकऱ्यांनी अपेक्षा केली तर हे त्यांच्या अपेक्षांचे ओझे आहे असे ते म्हणतात. या बियाणांबद्दलचे गैरसमज आणि अयोग्य पध्दतीने केलेली लागवड असेही कारण त्यांनी दिले आहे. म्हणजे त्यांनी जो प्रचार केला तो गैरसमज आहे काय ? "अयोग्य पध्दतीने केलेली लागवड" असे त्यांनी म्हटले आहे. म्हणजे यामध्ये त्या कंपनीने शेतकऱ्यांवर दोष फोडलेला आहे की, लागवडच अयोग्य पध्दतीने केली म्हणून तुम्हाला अपयश आले असे त्यांचे मॅनेजर्स म्हणत आहेत. या कारणांमुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली आहे असे प्रतिपादन श्री. बारवाले या मॅनेजरने केले. पुढे असे म्हटले आहे की, मात्र बीटी कॉटनबद्दल शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरसमज असल्यामुळेच यंदा खरीप हंगामात बीटी कॉटनला अपेक्षित यश मिळाले नाही हे कंपनीने मान्य केले आहे. अशी माहिती महिकोच्या संशोधन विभागातील अधिकाऱ्याने जाहीररीत्या दिली. साध्या बियाणाची किंमत 450 ग्रॅमसाठी अवघे 400 रुपये असून याच वजनाच्या बीटी कॉटन बियाणाची किंमत मात्र तब्बल 1600 ते 1700 रुपये आहे. मॉनसॅंट्रो कंपनीच्या 400 ग्रॅम बीटी कॉटन बियाणांसाठी 1200 रुपयांपासून 1650 रुपये शेतकऱ्यांना द्यावे लागले. यंदा कापसाच्या पेऱ्यावर "लाल्या" रोग आला. आपण सांगितले की, पाऊस जास्त पडला. बीटी कॉटनमध्ये फक्त बोंड अळीपुरतीच प्रतिकारक क्षमता आहे. बाकीचे सगळे रोग त्याला लागू पडतात अशा प्रकारे आपण सांगितले. शेतकऱ्यांचे नुकसान झाले हे त्या त्या बीटी कॉटन कंपनीच्या मॅनेजर्सनी स्वीकारले आहे. त्यामुळे आपण ते नाकारण्यामध्ये काही अर्थ आहे असे मला वाटत नाही. शेतकऱ्यांवर खापर फोडून कंपनी ते स्वीकारत आहे. ज्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या झाल्या त्याबाबतीत आपण 8 डिसेंबरला पॅकेज जाहीर केले. 8 डिसेंबरला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते ....

पॅकेज घोषित केल्यानंतर 125 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. 1075 कोटींपैकी दमडीचेही वाटप त्यावेळेला झाले नाही. तुमच्या कालच्या पुरवणी मागण्यांमध्ये आम्ही बघितले. ती तरतूदही पुरेशी नाही. उलट पश्चिम विदर्भातील यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला वर्धा, चंद्रपूर, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यातील आणेवारी सरासरी 51 टक्के घोषित करण्यात आली असून त्यामुळे एकाही शेतकऱ्याला सरकारी मदत मिळणार नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:30

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

सन्माननीय महसूल मंत्री हे त्यावेळी महसूल मंत्री नव्हते. त्यानंतर ते महसूल मंत्री झाले. शासनाची झालेली चूक त्यांनी सुधारावी. तिकडच्या भागामध्ये आणेवारी जबरदसतीने 51 टक्के करायला लावलेली आहे. ती आणेवारी कमी करुन योग्य आणेवारी लावली तर त्या भागातील शेतक-यांना दुष्काळाचे सर्व फायदे मिळतील आणि इतर कसले पुण्य त्यांना जमा करता आले नाही तरी योग्य निर्णय घेऊन आणेवारीमध्ये सुधारणा केली तर शेतक-यांना वाचवण्याचे पुण्य त्यांना जमा करता येईल. सभापती महोदय, कापसाची व ज्वारीची पूर्णत: नापिकी झालेली असताना जिल्हाधिका-यांनी 51 टक्के आणेवारी लावण्याचे आदेश दिले. 49 टक्क्या ऐवजी 51 टक्के आणेवारी दाखवा असे आदेश जिल्हाधिका-यांनी दिले. त्याचे परिणाम काय झाले? तर शेतसारा वसुली सक्तीची झाली, कर्ज वसुली सक्तीची झाली, कर वसुली सक्तीची झाली आणि त्यामुळे हवालदील शेतकरी आत्महत्या करायला लागला. सरकारने विदर्भात दुष्काळ जाहीर करुन सर्व प्रकारची वसुली थांबवावी व घोषणा केल्याप्रमाणे आर्थिक मदत शेतक-यांना द्यावी. ही आता ही मदत शेतक-यांना तातडीने मिळण्याची गरज आहे. विदर्भातील या हंगामामध्ये होत असलेल्या आत्महत्यांनी आता रौद्र रुप धारण केलेले आहे. 2 जून 2005 पासून 309 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या सर्व आत्महत्या सरकारने पीक कर्ज व कापसाच्या भावात केलेली कपात या धोरणामुळे झालेल्या असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांच्यासह 12 मंत्र्यांचा सहभाग असणा-या आघाडी सरकार मधील प्रमुख घटक, याला जबाबदार आहेत. काँग्रसने आयोजित केलेले शेतकरी जागरण व जनसंपर्क यात्रा हे थोतांड होते. उलट शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न या शासनाने केलेला आहे. या यात्रेबाबत मी सर्व सांगणार आहे. पॅकेज जाहीर झाल्यानंतर 2 जून पासून आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 189वर पोहोचली. 70 दिवसात 108 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. पॅकेज झाल्यानंतरची ही परिस्थिती आहे. हे पॅकेज सरकारने मुंबईतील भ्रष्ट नोकरशहांच्या अक्कलहुशारीतून निर्माण केले आहे असा माझा दावा आहे. 600 कोटीच्या योजनांचा गाजावाजा ज्या पॅकेजमध्ये करण्यात आला त्या पॅकेजचा माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मागील अधिवेशनात पर्दाफाश केला होता. जे 600 कोटीचे पॅकेज करण्यात आले

..2..

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

त्यातील हे पैसे चढ-उतार निधीतील होते. तो चढ-उतार निधी सध्या अस्तित्वात नाही. पुढे अर्थ संकल्पात ज्याची तरतूद करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही अशा 400 कोटीच्या निधीचा समावेश या पॅकेजमध्ये करण्यात आला आहे. खरे तर हे पॅकेज 1हजार 75 कोटीचे नाही. मघाशी मी शेतक-यांच्या 61 कोटी व्याज माफीची जी तरतूद वाचली तेवढीच तरतूद आहे. हे पॅकेज फक्त 61 कोटींचे होते. बाकी जुन्याच तरतुदी होत्या हे सप्रमाण माननीय गडकरी साहेबांनी पर्दाफाश करुन सांगितलेले आहे. शेतकरी पॅकेजची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल आयुक्त श्री.मनोज सैनिकी यांनी ज्या दिवशी कार्यभार स्वीकारला त्याच दिवशी - हवालदील झालेल्या कापूस उत्पादक शेतक-यांना आपला कोणी तरी तारणहार आला आहे आणि त्यामुळे आपल्याला काही तरी मिळेल अशा प्रकारचा विश्वास विदर्भातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांना नसल्यामुळे - 7 आत्महत्या झाल्या. विशेष पॅकेजमध्ये शेतक-यांची टिंगलटवाळी केलेली आहे ती आपण ताबडतोबीने दूर करावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, हे मला अत्यंत कष्टाने आणि खेदाने सांगावे लागत आहे. विशेष पॅकेज मध्ये मनोरुग्णांसाठी डॉक्टर असलेले विशेष चमू देण्याची घोषणा केलेली आहे. म्हणजे कापूस उत्पादक शेतकरी पिसाट झालेला आहे अशा समजूतीने ही घोषणा सरकारने केली. मनोरुग्ण डॉक्टर्स् कशासाठी नेमले ? शेतकरी वेडा होऊन आत्महत्या करतोय असे शासनाला सांगायचे आहे काय ? शेतक-याचे डोके फिरले म्हणून तो आत्महत्या करतोय हे शासनाला सांगायचे आहे काय ? शेतक-यांसाठी मनोरुग्ण डॉक्टरांचा चमू अशी विचित्र तरतूद पहिल्यांदाच पाहाण्यात येत आहे. पॅकेजमध्ये डॉक्टरांचे पथक जाहीर करुन शेतक-यांचा मोठा अपमान केलेला आहे. मघाशी मी सांगितल्या प्रमाणे माननीय राष्ट्रपतीपर्यन्त ज्यावेळी या घटना पोहोचल्या त्यावेळी मुंबईच्या टाटा इन्स्टिटयूट, इंदिरा गांधी फाऊंडेशन, पुण्याची यशदा संस्था, डॉ. स्वामीनाथन समिती यानी आपले अहवाल सादर केले. त्यांनी केलेल्या सूचना अमलात आणायला पाहिजे होत्या. पण तसे करण्या ऐवजी सरकारने ज्याप्रमाणे ऑक्ट्रायची 14वी समिती नेमली त्याप्रमाणे पुन्हा एकदा चौकशी समिती नेमून आत्महत्या करणा-या निराधार शेतक-यांच्या कुटुंबीयांवर मीठ चोळण्याचे काम केलेले आहे.

...नंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. शिगम 18:35

श्री. दिवाकर रावते...

एवढया फाईंडींग्ज् आल्यानंतर सुध्दा सरकारने दुसरी समिती नेमण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या अहवालाची नोंद घेण्यासाठी कित्येक ठिकाणी तहसीलदार आणि पोलीस शेतकऱ्यांच्या कुटुंबियांकडून लाच मागत असल्याचे निदर्शनास आले आहे. अधिकारी लाच घेत असल्याचा गंभीर आरोप जाहीररित्या तेथील स्थानिक नेत्यांकडून करण्यात आला परंतु शासनाने त्याची नोंद घेतली नाही. आत्महत्या झाली आहे याची नोंद घ्यावयाची असेल आणि पंचनामा करावयाचा असेल तर पैसे द्या, आम्ही अशा प्रकारे पंचनामा करु असे त्यांनी सांगितले. मृतांच्या टाळूवरील लोणी खाणारी ही यंत्रणा दुर्देवी आहे. कापसाला 2700 रु. भाव देऊ असे वचन देणाऱ्या आघाडी शासनाने 700 रु.प्रतिक्विंटल असा तोटा दिला. महसूल मंत्र्यांनी खालच्या सभागृहामध्ये उत्तर देताना असे सांगितले की, गेल्या वेळी 2500 रु. भाव दिला तरी आत्महत्या होतच होत्या. आता 1700 रु. भाव दिला तरी आत्महत्या होतच आहेत तेव्हा भाव देण्याचा काय संबंध ? त्याचे विश्लेषण निश्चितपणाने वेगळे करता येईल. 2700 रु. भाव ज्यावेळी दिला त्यावेळी कापसाचे चुकारे वेळेवर दिले नव्हते. 3 हप्त्यात चुकारे दिले. पहिला 400-500 रुपयांचा मे महिन्यात दिला. नंतरचा चुकारा मे महिन्यात दिला त्यानंतरचा चुकारा ऑक्टोबर महिन्यात दिला. शेतकऱ्यांचे कर्ज त्यांच्या गरजा लक्षात घेऊन शेतकऱ्याचे आपला कापूस 2500 रु. भाव असताना सुध्दा शासनाकडे आणून टाकून उधारीमध्ये आपले जीवन जगण्यापेक्षा रोकडीच्या गरजा भागविण्याकरिता व्यापाऱ्यांना विकला आणि व्यापाऱ्यांची मौजमजा भागविली, शेतकरी मात्र हलाकीमध्ये राहिला. यावर्षी कापसाचे चुकारे 15 दिवसांनी का होईना एकरकमी चेक दिले. त्यावेळी 50 टक्के का होईना अग्रिम म्हणून जरी दिले असते तरी शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना कापूस दिला नसता आणि आत्महत्या थांबल्या असत्या. भावातील फरक आहे तो त्यातील आहे. यावेळी तुम्ही 700 रु. कमी दिले. 2500 रु. भाव देतो असे सांगून कमी पैसे दिले. हजार रु.मदत देऊन काय साधणार आहात? कारण 700 रु. मुळातच कमी दिलेले आहेत. पॅकेजमध्ये 1000 रु. शेतकऱ्यांना देण्यात येणारी मदत दान करण्याचा निर्णय चिडलेल्या शेतकऱ्यांनी घेतला. केळापूर पंचायत समितीचे सभापती श्रीमती कट्टेवार,पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवारत्न येट्टीवार जिल्हा परिषद सदस्य तुकाराम मेश्राम यांनी ही मदत आम्ही तुम्हांला दान करतो अशा प्रकारची घोषणा करुन सरकारच्या थोबाडीत मारण्याचा प्रयत्न केला आणि शेतकऱ्यांमधील

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. शिगम 18:35

श्री. दिवाकर रावते ..

प्रक्षोभ इतक्या पराकोटीला गेला की या पॅकेजमुळे आत्महत्या वाढत होत्या आणि शेतकऱ्यांना काही मिळत नव्हते. यवतमाळ जिल्हयामध्ये वणी तालुक्यातील फसाळा या खेडयात तुळशीराम आस्वले,किशोर भोयर,किशोर गवळी या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या घरासमोर सामुदायिकरित्या या पॅकेजची शेतकऱ्यांनी होळी केली एवढा तीव्र संताप या भागामध्ये व्यक्त होत होता. यातून शहापण शिकले पाहिजे. दुर्दैवाने शासन शहाणपण शिकण्याऐवजी पॅकेज जाहीर केल्यानंतर सुध्दा आत्महत्या वाढत आहेत याचे चिंतन करण्याऐवजी आणि शेतकऱ्याला आधार देणारा एखादा शब्द बोलण्याऐवजी आम्ही पॅकेज आणले पॅकेज आमच्यामुळे मिळाले असे सांगत यवतमाळ जिल्हयामध्ये श्री.माणिकराव ठाकरे माजी मंत्री आणि त्या जिल्हयाचे कॉंग्रेसचे अध्यक्ष यांनी एक यात्रा काढली. यात्रेचे पुस्तक माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी लिहिले की हे पॅकेज माझ्यामुळे आले. यवतमाळ जिल्हयामध्ये श्री.माणिकराव ठाकरे यांनी जे निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले असे सांगण्यात आले. त्या फेरीला मंत्रीमहोदयांना बोलाविले. पक्षाचा कार्यक्रम केला. त्यामध्ये सरकारी कार्यक्रम मिक्स केला. दुर्दैवाने मला एवढच म्हणावयाचे आहे की, पक्षाने एखादा कार्यक्रम करावा. तो कार्यक्रम करीत असताना सांगावे आमच्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळते. परंतु तिकडेही शेतकऱ्यांनी शासनाला जोडा काढून हाणला. तुमच्या पॅकेजच्या गौरवार्थ यात्रा काढली. चिडलेल्या शेतकऱ्यांचे मला फोन आले की अशी यात्रा काढत आहेत आपण आंदोलन केले पाहिजे. जोडा मारो आंदोलन करणार होतो. यादी वाचली मा.मंत्रीमहोदय जात आहेत. लोकांनी जोडे मारु दे आपण कशाला मारायचे ? काय झाले त्या आंदोलनाचे ? 16 फेब्रवारी ते 28 फेब्रुवारी अशी शेतकऱ्यांच्या पॅकेजच्या संदर्भात यात्रा निघाली. त्या जिल्हयामध्ये यात्रेच्या दिवशी रोज एक आत्महत्या होत होती आणि एकूण 28 आत्महत्या 16 फेब्रवारी ते 28 फेब्रुवारी या दरम्यान झाल्या. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची यादी माझ्याकडे आहे. ती वाचावी म्हणून मला मोह होत आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

त्या जिल्हयामध्ये दररोज एक आत्महत्त्या अशा प्रकारे 16 तारखेपासून 28 तारखेपर्यंत 28 आत्महत्त्या झाल्या. यात्रा काढून त्या ठिकाणी मंत्री महोदय जातात आणि जनतेला विश्वासात घेण्याचा प्रयत्न होतो तरी जनतेचा विश्वास अजून बसलेला नाही. हया ज्या आत्महत्त्या या रुटवर झालेल्या आहेत तो संपूर्ण रुट माझ्याकडे आहे. या रुटवर कोणकोणत्या सभा होणार होत्या याची यादी माझ्याकडे आहे ते वाचून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. या रुटवरुन जात असतांना शेतकयांना शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजचा विश्वास वाटला नाही. हा रुट म्हणजे नेर, वरुळ, मंगरुळपीर, यवतमाळ, शेगांव, सेलू, पळस अशा भागातून गेला व त्या भागात 28 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. त्यावेळी मी "जोडे-मारो" आंदोलन करण्याचा विचार केला होता परंतु शासनाने दिलेल्या पॅकेजने आम्हाला जगता येणार नाही हे जनतेनेच सिध्द करुन दाखविले, एवढी वाईट दुर्दशा कुठल्याही दुसऱ्या कार्यक्रमाची झाली नसती. कॉंग्रेस सरकारने जे पॅकेज दिले त्याची ही फलनिष्पत्ती झाली. त्या ठिकाणी शेवटची जी सभा माननीय मुख्यमंत्र्यांची झाली त्यावेळी आत्महत्त्या झालेल्या रुटचा गोषवारा घेतल्यानंतर त्यांना एक निवेदन देण्यात आले. या भागात सरकारच्या व लोकप्रतिनिधींच्या विरोधात कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी निदर्शने केल्यामुळे जवळपास 1500 शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. परंतु मुख्यमंत्र्यांपासून सर्वांच्या गाडया अडविण्यात आल्या व त्याचा परिणाम म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या सभेत जाहीर केले की पंचनामे काहीही असले तरी प्रत्येक आत्महत्त्या झालेल्य शेतकऱ्याकरिता आणि प्रत्येकाला कोणतेही कारण न पाहता मदत दिली जाईल, मदत देण्याबाबतचे निकष बदलले जातील. गेल्या वेळेस ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले की "होय" जवळजवळ 90 टक्के आत्महत्त्या या कर्जबाजारीपणामुळे झाल्या आहेत. महसूल खात्याचे मत झालेले असतांना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हे चुकीचे आहे. महसूल खाते संवेदनशील होण्याचा प्रयत्न करीत असतांना मुख्यमंत्री ते नाकारतात. पण ज्यावेळी त्यांच्या गाडया अडविल्या आणि शेतकरी बेभान झाला, त्याला अटक करण्याची पाळी आली त्यावेळी यवतमाळ येथील सभेत निकष बदलून मदत देण्याबाबत त्यांनी जाहीर केले. परंतु त्यासंबंधीची तरतूद या पुरवणी मागणीमध्ये कुठेही दिसत नाही. यापूर्वी 200 लोकांना 1 लाखाप्रमाणे मदत दिलेली आहे आणि पुरवणी मागणीमध्ये 2

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

कोटीची तरतूद केली त्यातून 200 लोकांना मदत देण्यात येईल, अशा प्रकारे 400 शेतकऱ्यांनाच यातून मदत देऊ शकणार आहात पण त्यासंबंधीचे रिफ्लेक्शन या पुरवणी मागणीमध्ये कुठेही आलेले नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या बघण्याचीच शासनाची भूमिका अजूनही कायमच आहे की काय अशी शंका मला येत आहे. केंद्रिय कृषी आयोगाने याबाबतीत शिफारस केलेली आहेच. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, शेतकऱ्यांचा जर शासनाला कळवळा असेल, आम्ही काय मागतो, तूम्ही काय देणार तो भाग वेगळा पण केंद्रापासून सर्व तज्ज्ञांना जे वाटते ते तरी अंमलात आणावे. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या प्रश्नावर 5000 कोटीचे विशेष पॅकेज देण्यात यावे, त्यातून कापसाला 3000 रुपये भाव द्यावा आणि सर्व थकित कर्ज माफ करुन नवीन पीक कर्ज देण्याची तरतूद करावी अशी शिफारस केंद्रिय कृषी आयोगाने केलेली आहे. हे माझे म्हणणे नाही तर केंद्रीय कृषी आयोगाने उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यासाठी ही शिफारस केली आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या प्रश्नाने सर्वांचेच लक्ष वेधलेले आहे, लोकसभेचे लक्ष वेधले आहे, माननीय राष्ट्रपतींचे लक्ष वेधलेले आहे, जागतिक तज्ज्ञांचेही लक्ष वेधले आहे. म्हणून केंद्रिय कृषी आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे 5000 कोटीचे पॅकेज आत्महत्त्या केलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर करावे, शेवटी आपण किमान त्यांचे तरी ऐकणार आहात की नाही हा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, विदर्भातील 8 टक्के शेतकऱ्यांना बँकेचे कर्ज मिळते. त्यामुळे 92 टक्के लोकांना सावकारीवर अवलंबून रहावे लागत आहे. सावराकारांच्याबाबतीमध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी घोषणा केली. कधी कधी असे वाटते की, ते घोषणा का करतात ? त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आमच्या मनात अजिबात शंका नाही. त्यांच्या कतृत्त्वाबद्दल देखील आमच्या मनात शंका नाही. कधी कधी ते भावनेच्या आहारी जाऊन जी घोषणा करतात, ती सरकारी घोषणा आहे की, रस्त्यावर उतरलेल्या एका कार्यकर्त्याची आहे, तेच काही कळत नाही. त्यांनी काय घोषणा केली ? त्यांच्या विविध घोषणा माझ्याकडे आहेत. त्यांचा पंचनामा करण्याकरिता मी उभा नाही. पण शेतकऱ्यांची थट्टा होईल अशाप्रकारची घोषणा करतात., त्यावेळी मन व्यथित होते. त्यामुळे हे सर्व सांगावे लागते. सावकारी करणाऱ्याला कोपरापासून ढोपरा पर्यंत बदडून काढा व त्यांची धिंड काढा असा आदेश महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी दिला आहे, हे सर्वांना माहित आहे. राज्याचा गृहमंत्री असे बोलू शकतो काय ? या त्यांच्या घोषणेवर सावकारांना घराघरातून बाहेर काढून त्यांना चौकामध्ये आणून कोपरापासून ढोपरापर्यंत बदडवून काढण्याचा कार्यक्रम आम्ही जाहीर करणार होतो. असे आम्ही केले असतेत तर चालले असते काय ? आज सकाळीच शेतकऱ्याच्या आत्महत्येचा पहिला प्रश्न होतो. त्यावेळी आपण सभागृहामध्ये होतात. त्या प्रश्नाचे उत्तर मला पाहिजे आहे. सावकारांनी शेतकऱ्यांची हडप केलेली भांडीकुंडी, दागिने, धनादेश त्वरित परत करावेत असे आदेश गृहमंत्र्यांनी नागपूर अधिवेशनामध्ये दिलेत. मला वाईट एवढेच वाटते की, गृहमंत्री जे काही बोलतात ते काही करत नाही. पण खूप काही करीत आहोत असा दांभिकपणाचा आव आणत आहेत. मी किती सचोटीचा उपमुख्यमंत्री आहे हे दाखविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्याचे आम्हाला वाईट वाटते. त्यांचा शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा दांभिकपणा सहन होत नाही. नागपूर अधिवेशनामध्ये गृहमंत्र्यांनी आदेश दिला म्हणून आज सकाळी प्रश्न विचारला होता. पण त्यास गृहराज्यमंत्री आणि गृहमंत्री यापैकी कोणीही उत्तर दिलेले नाही. गृहमंत्र्यांनी नागपूर अधिवेशनामध्ये जो ओदश दिला त्या आदेशाची अंमलबजावणी एकाही सावकाराने केलेली नाही. पोलीस सुध्दा सावकारांना हात लावण्यास तयार नाहीत. विदर्भातील यवतमाळ, अमरावती, वाशिम,

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अकोला, बुलढाणा व नागपूर या 6 कापूस उत्पादक जिल्हयात 20 हजाराहून अधिक अवैध सावकार आहे. मी एका जाहीर सभेत सावकाराविरूध्द बोलत असताना काही सावकार माझ्या अंगावर आलेत. माझ्या समोर पाच हजार शेतकरी बसले असताना सुध्दा त्यांनी एवढी हिंमत केली. पण तेथे कार्यकर्ते असल्यामुळे पुढील प्रसंग टळला. सावकारांचा संताप एवढा की, त्यांच्या विरूध्द बोलले तर ते भर गर्दीत अंगावर येतात. म्हणजे त्या सावकारांची हिंमत काय असेल ते बघा. जवळ जवळ 20 हजार सावकार अवैध आहेत. कालच्या अभिभाषणामध्ये पोलिसांनी 940 सावकारांवर गुन्हे दाखल केले आहेत,असे म्हटले आहे. अजूनही हजारो सावकार राजरोसपणे जुलमी व्याज वसूल करीत आहेत. शेतकऱ्यांची शेती व व व्याजापोटी घेतलेले कोटयवधी रुपये व अनेकांची घरेसुध्दा हडप केलेले सावकार अद्यापही मोकळेच आहेत. पण त्यांच्या विरूध्द तक्रार नाही. ज्यावेळी सामाजिक प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी कोणत्याही तक्रारीची आवश्यकता नसते. त्यावेळी सुमोटो कारवाई केली पाहिजे. सावकार शोधावे लागतात. तसा धाक निर्माण करावा लागतो. म्हणून मी सकाळी प्रश्न विचारला होता की, ज्या 940 सावकारांकडे शेतकऱ्यांचे दस्तऐवज आहेत, ते त्यांच्याकडून घेणार काय? यासाठी मी महसूल मंत्र्यांना विनंती करणार आहे. महसूल मंत्र्यांचा स्वभाव हा डेअरिंग बाज आहे. तो नको तिथे दाखविण्यापेक्षा याबाबतीत दाखववावा. सर्व सावकारांवर धाडी घाला. सगळा दस्तऐवज शासनाने ताब्यात घ्यावीत. मूळ शेतकऱ्यांच्या नावावर 7/12 करावेत. मूळ शेतकऱ्याच्या जमीन त्यांना मिळवून द्याव्यात. लोक तुम्हाला दुवा दिल्या शिवाय राहणार नाहीत. महागडे जैविक बियाणे पेरल्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, ते शेतकरी देखील आत्महत्येच्या कडयावर उभे आहेत. त्यांना देखील शासन मदत करणार आहे काय ? महसूल खाते पंचनामा करते म्हणून येथे येते. सर्वात खरे पाप हे कृषि खात्याचे आहे, पणन खात्याचे आहे, सहकार खात्याचे आहे, म्हणून आम्ही तीन विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी विनंती केली होती.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 18:50

श्री.दिवाकर रावते....

सरकार खाजगी सावकारांविरोधात उभे राहिल्यामुळे सावकार आता शेतकऱ्यांना कर्जे देणार नाही. त्यामुळे हा तिढा सोडविण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. शेतकऱ्यांना सहकारी बँकांच्या माध्यमातून किफायतशीर दराने कर्जे उपलब्ध करुन दिली पाहिजेत.

महोदय, आम्ही शासनाचा कारभार कसा सुरु आहे हे निदर्शनास आणून देण्यासाठी माननीय राज्यपाल महोदयांकडे गेलो होतो. खरे म्हणजे राज्यपाल महोदयांचा निषेध करणे योग्य होणार नाही, आणि प्रतिष्ठेला सुध्दा धरुन होणार नाही. महोदय, या सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यात येईल असे जाहीरनाम्यात नमूद केले होते. ज्यावेळी हे सरकार स्थापन झाले त्यानंतर काही दिवसांतच शेतकऱ्यांना मोफत देण्यात येणारी वीज बंद करण्यात आली. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांना या निर्णयासंदर्भात विचारले असता त्यांनी जाहीररित्या सांगितले की, निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळावयाची नसतात. तसेच आश्वासन ज्या वेळी दिले गेले त्या वेळी मी मुख्यमंत्री नव्हतो. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे जेव्हा केंद्रीय ऊर्जा मंत्री झाले त्यावेळी त्यांनी मोफत वीज बंदी संदर्भात सांगितले की, निवडणुकीत दिलेले मोफत विजेचे आश्वासन ही राजकीय व्यूहरचना आणि राजकीय स्टंट होता. महोदय, कोणत्याही राज्यकर्त्यांनी केलेली नसेल, एवढी क्रूर थट्टा आज या सरकारने शेतकऱ्यांची चालविलेली आहे. त्यामुळे आम्ही राज्यपाल महोदयांना भेटलो. परंतु त्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी जरी हिंमत दाखविली नसली तरी, राज्याचे महसूल मंत्री या नात्याने राणेसाहेब आपण तरी हिंमत दाखवा. मराठवाडयामध्ये दुष्काळ पडला तेव्हा तत्कालीन राज्यपाल श्री.पी.सी.अलेक्झांडर चार दिवस मराठवाडयाच्या दौऱ्यावर आले होते. गावागावात आणि जिल्हयाजिल्हयात त्यांनी पाहणी केली होती. ते प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भेटले व त्यांची विचारपूस केली. त्यामुळे माझी माननीय राज्यपाल महोदयांना विनंती आहे की, आपण किमान विदर्भामध्ये तरी जाऊन परिस्थिती पहा. आत्महत्या करणाऱ्या निदान चार तरी कुटुंबियांना तरी भेटा. जर आपण त्या ठिकाणी जाऊन त्यांना भेटलात तर, तेथील शेतकऱ्यांची मानसिकता वाढेल, त्यांना एक प्रकारे मानसिक बळ मिळेल. शेतकरी आत्महत्या करण्यापासून परावृत्त होऊन, आपल्याकडे राज्यपालांसारखी सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्त्व पाहत आहे असे त्यांना वाटून, आत्महत्या रोखल्या जातील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 18:50

श्री.दिवाकर रावते....

महोदय, विदर्भात जेव्हा 70 वर्षाच्या वृध्द शेतकऱ्याची आत्महत्या झाली त्यावर शासनाच्या वतीने कोर्टामध्ये जो पंचनामा सादर झाला त्यामध्ये असे म्हटले आहे की, बाजूला राहत असलेल्या 50 वर्षाच्या बाईबरोबर त्याचे प्रेम होते आणि ते सफल झाले नाही म्हणून त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. महोदय, हिरामण पाटील या शेतकऱ्याच्या संदर्भात असा पंचनामा करण्यात आला की, त्याची पत्नी वारल्यामुळे आणि तिच्या विरहामुळे त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. परंतु या केसच्या संदर्भात जेव्हा कोर्टासमोर कागदपत्रे सादर करण्यात आली त्यावरुन असे निदर्शनास आले की, त्याची पत्नी 15 वर्षापूर्वीच वारलेली होती. महोदय, अशा प्रकारचे चुकीचे पंचनामे करुन, ते कोर्टामध्ये सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी माझी या चर्चेच्या माध्यमातून मागणी आहे.

या आत्महत्यांसंदर्भात शासनाचे व खाजगी संस्थांचे फाईंडींग पाहणे महत्वाचे आहे. पाशा पटेल यांचे देखील फाईंडींग माझ्याकडे उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्यांसंदर्भातील टाटा इंन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स आणि इंदिरा गांधी इन्स्टिटयुट या संस्थेचे फाईंडिंग माझ्याकडे आहे. शासनाचे फाईंडिंग आणि या संस्थांचे फाईंडिंग यामध्ये काय म्हटलेले आहे, हे आपल्याला दिसून येईल.

नागपूरच्या केस क्र.46 च्या संदर्भात शासनाने असे म्हटले आहे की, आत्महत्येस कर्ज हे कारण नाही. आत्महत्येबाबतचे कारण माहीत नाही. परंतु या संस्थांचा निष्कर्ष असा आहे की, आत्महत्या करण्यास कर्ज हेच कारण आहे. या शेतकऱ्यावर 74 हजार रुपयांचे कर्ज होते. केस क्र.60 च्या संदर्भात शासनाने असा निष्कर्ष काढला आहे की, कर्ज हे आत्महत्येचे कारण नाही. तो जीप चालक होता. तर या संस्थांचा असा निष्कर्ष आहे की, आत्महत्येचे कारण कर्ज हेच आहे. कारण त्याच्यावर 1 लाख 40 हजार रुपये कर्ज होते.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT/ MAP/ KGS यापूर्वी श्री. बोर्डे .. 18.55

श्री. दिवाकर रावते ....

त्याचप्रमाणे नागपूर कमिशनरच्या केस क्रमांक 69 बाबत शासनाने असा निष्कर्ष काढला आहे की, दारु पिण्याच्या व्यसनामुळे कर्ज हे आर्थिक समस्येचे कारण झाले आहे. त्या केसमध्ये संबंधितावर 57 हजार रुपयांचे कर्ज होते, म्हणून त्याने आत्महत्या केली. त्याचप्रमाणे सभापती महोदय, कलेक्टर जालना यांच्या संदर्भ क्रमांक 18 संदर्भात शासनाने असा निष्कर्ष काढला आहे की, शेतकऱ्यांचे आत्महत्येचे कारण कर्ज किंवा पीक न येणे हे नाही. परंतु त्या संदर्भात टाटा इन्स्टिटयुटचे असे फायन्डींग आहे की, कर्ज हे एक कारण असून पीक न येणे हे दुसरे कारण आहे. सभापती महोदय, या केस संदर्भातील संबंधितावर एकूण कर्ज 37 हजार रुपये आहे. त्याचप्रमाणे कलेक्टर जालना यांच्या संदर्भ क्रमांक सहाच्या बाबतीत शासनाने असा निष्कर्ष काढला आहे की, शेतकऱ्याच्या आत्महत्येचे कारण कर्ज हे नसून व्यक्तिगत समस्येमुळे त्याने आत्महत्या केली आहे. परंतु त्या संदर्भात टाटा इन्स्टिटयूटने असे कारण दिले आहे की, शेतकऱ्याच्या आत्महत्येचे कारण कर्ज हेच असून, संबंधितावर 75 हजार रुपयांचे कर्ज आहे. सभापती महोदय, मग अशाप्रकारे चुकीचे पंचनामे करुन आपण शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवून शेतकऱ्यांची त्यांच्या मृत्यूनंतर देखील अवहेलना का करत आहात ? सभापती महोदय, ही अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह बाब आहे. यामध्ये जर शासन असेल तर शासनाचा धिक्कार केला पाहिजे. सभापती महोदय, या संदर्भात निश्चितपणे काय केले पाहिजे आणि काय करायला नको या संदर्भात पाशा पटेलने सांगितले आहे. मी आता येथे सर्व काही वाचत नाही. शेवटी त्यांनी अन्नधान्याच्या उत्पादन खर्चाबाबत सांगितले आहे की, शेतकऱ्यांचा माल आधारभूत किंमतीवर खरेदी केला पाहिजे. सभापती महोदय, मी आपणास पहिल्यापासून सांगत आहे की, शेतकऱ्याला उत्पादनाच्या खर्चाव्यतिरिक्त दहा टक्के नफा मिळाला पाहिजे. त्याचप्रमाणे असेही सांगत होतो की, खेड्यांच्या स्तरावर आधारव्यवस्था निर्माण करण्यात यावी, अन्नधान्याच्या उत्पादनाच्या नियोजनात वातानुकूल तसेच फायदेशीर पिकांचा समावेश व्हावा, जमीन धारणेवर लागलेली बंदी उठवावी, शेतकऱ्याला कमीत कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध व्हावे. सभापती महोदय, आपण गेली सहा महिने सांगत आहात की, आम्ही सहा टक्के दराने कर्ज देऊ. परंतु तशाप्रकारे कर्ज काही देण्यात आलेले नाही. म्हणून मी शेवटी शासनाला एवढीच विनंती करतो की, आपण कापसाला

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्वरित 2700 रुपये भाव द्यावा. मघाशी आपण पणनच्या विषयावर देखील चर्चा केली. सभापती महोदय, शेवटी मरणाऱ्या शेतकऱ्याला शासनाने सांभाळले पाहिजे. आपण आता एक लाख वीस हजार कोटी रुपयांचे कर्ज काढलेच आहे. मग आणखी पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज काढून आपणास काही फरक पडणार नाही. आपण शेतकऱ्यांसाठी काही तरी करा, त्यांचे जीव वाचवा, त्यांना आधार द्या. सभापती महोदय, हे काम सरकारनेच करावयाचे काम आहे आणि ते सरकारला करायलाच लागेल. सभापती महोदय, केंद्रीय कृषी आयोगाची कापसाला 3000 रुपये भाव देण्याबाबतची शिफारस आहे. आपण जर त्याच्या कापसाला 2700 रुपये भाव दिला तर उत्पादन खर्च निघण्याची तरी त्याच्यामध्ये आशा निर्माण होईल. सभापती महोदय, आता 51 पैशांची आणेवारी जाहीर करण्यात आली आहे. तरी, मी माननीय महसुल मंत्र्यांना केलेली विनंती त्यांनी ताबडतोब स्वीकारावी. आपण शेतकऱ्यांना हेक्टरी एक किंवा दोन हजार रुपयांप्रमाणे देणार असाल तर 20 लाख शेतकऱ्यांना 400 कोटींची तरतूद केली पाहिजे. परंतु आपल्याकडे आज फक्त 200 कोटी रुपयांची तरतूद आहे. सभापती महोदय, आज एकूण 20 लाख शेतकरी बाधीत आहेत. त्यामुळे आपल्या पॅकेजचा जर परिणाम व्हायचा असेल तर 400 कोटी रुपये आपण त्वरित उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आपण कर्ज पुर्नवसनाची मर्यादा 25 हजार रुपये केली आहे. परंतु तेथील कमिशनरने सांगितले आहे की, 25 हजारांमध्ये फक्त काही हजार शेतकऱ्यांनाच त्याचा फायदा मिळेल. आपण त्या संदर्भात एक लाख रुपयांची मर्यादा आणली तर किमान 5 लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळेल आणि आत्महत्यांचे प्रमाण त्वरित थांबण्यास मदत होईल. तरी, ती मर्यादा एक लाख रुपयांची करण्यात यावी. सभापती महोदय, तारणाशिवाय कर्ज अद्याप कोणालाही मिळालेले नाही. तरी, त्या संदर्भातही छाननी करण्यात यावी. आपण चढ उतार निधीची जी तरतूद 300 कोटीची रुपयांची केलेली आहे, ती ताबडतोब 700 कोटी रुपये करावी, अशी मी आपणास विनंती करतो. हे देताना आपण काही मेहेरबानी करत नाही. त्यांच्याकडून वसूल केलेले पैसेच त्यांना परत द्यायचे आहेत. तरी, कर्ज वसुली त्वरित थांबवून पीक कर्जाची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे सावकारांच्या ताब्यात असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना मोकळ्या करुन द्याव्यात. त्याचप्रमाणे बी.टी. कॉटनमुळे उद्ध्वस्त

..3



MSK/ MHM/ SBT/ MAP/ KGS 18.55

श्री. दिवाकर रावते ....

झालेल्या शेतकऱ्यांचा खास विचार करुन त्यांना या संदर्भात अनुदान द्यावे. तसेच चुकीचे पंचनामे करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. बाळासाहेब, आपण प्रचार केलात पण याचे आपल्याला प्रायश्चित घ्यावे लागेल. नाना पाटेकरांनी देखील माफी मागावी लागेल. बी.टी. कॉटन हे हरित क्रांती घेऊन येणार आहे, अशाप्रकारे प्रचार करणाऱ्या माननीय मंत्रीमहोदयांनी व माननीय केंद्रीय कृषीमंत्र्यांनी देखील या संदर्भात माफी मागावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. खरे तर मानव अधिकाराप्रमाणे शासन सर्व आत्महत्यांना जबाबदार आहे असे बोलणे कदाचित गैर ठरणार नाही. म्हणून अशाप्रकारे भविष्यात तरी बोगस बियाणांच्या प्रचारासाठी मोहिम राबवू नये. सभापती महोदय, गुजरातमध्ये देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. तेथे देखील बी.टी. बियाणेच होते. परंतु त्यांनी छाती ठोकून सांगितले की, आम्ही आमच्या शेतकऱ्याला 400 रुपयांतच बी-बियाणे घेऊन देऊ. आता ठोकशाहीमध्ये ते तेथे यशस्वी झाले आहेत. तरी, आपण या संदर्भात राजकारण न करता एकत्र येऊन काम केले पाहिजे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ SBT/ MAP/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 19:00

श्री. दिवाकर रावते....

आमचे प्रामाणिक प्रयत्न आहेत, अशा प्रकारच्या सूचना करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे व आत्महत्यांचे राजकारण न करता आमच्या मदतीची गरज असेल तर आम्ही मदत देण्यास तयार आहोत. आत्महत्यांचे प्रमाण वाढत असतांना विरोधी पक्षांला आपले नेक काम करणे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये हा प्रस्ताव चर्चेला आला आहे. दुर्दैवाने महाराष्ट्र सरकारची ओळख हे फासावर लटकविणारे शासन अशी झालेली आहे. आपण आपला मी पण सोडून द्यावा या देशाचा शेतकरी वाचला नाही तर आपले सरकार यशस्वी होणार नाही. आपले सरकार बदनाम होईल. मी सुरुवातीला जो फास आणला होता तो सभापती महोदयांच्या निदेशानुसार त्यांच्याकडे दिलेला आहे. आपण मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------------

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये या सभागृहामध्ये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राचे आणि आपले दुर्दैव असे आहे की, स्वातंत्र्यानंतर लोकशाहीमध्ये या विधानमंडळात या राज्यातील 50 टक्के लोकप्रतिनिधी हे शेतकऱ्यांच्या घरातून जन्माला आलेले असतांना त्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर या सभागृहात चर्चा करण्याची वेळ राज्यसरकारने दुर्दैवाने आणलेली आहे. गेल्या 6 वर्षापासून या राज्यामध्ये आघाडीचे सरकार कार्यरत आहे. 6 वर्षापूर्वी या राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्तेचे प्रमाण अगदी अल्प होते ते कोणाच्या दृष्टीस येणार नाही इतके ते नगण्य होते. परंतु गेल्या 6 वर्षापासून सात्तत्याने आत्महत्यांचा आलेख राज्यामध्ये वाढत चाललेला आहे. तो इतका वाढला की या आत्महत्त्यांची दखल सरकारला घ्यावी लागली आहे. आत्महत्यांची दखल या देशाचे माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान, माननीय संसद व माननीय खासदार यांनी घेतलेली आहे. सभापती महोदय, या संदर्भात दखल का घ्यावी लागली आहे, कारण या राज्यामध्ये 1200 ते 1250 इतक्या मोठया प्रमाणात आत्महत्तेचा आकडा गेलेला आहे. ही आकडेवारी वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे. आमच्या विदर्भामध्ये "दैनिक देशोन्नती " म्हणून एक वर्तमानपत्र आहे, दररोज देशोन्नतीच्या पहिल्या पानावार संपादकांनी एक सदर सुरु केले होते. त्या सदरावर गळफासाचे चित्र काढण्यात आले होते, दररोज किती आत्महत्त्या झाल्या यासंदर्भात आकडा त्या ठिकाणी देण्यात येत होता. रोज सकाळी उठल्यावर वर्तमानपत्र पाहिल्यानंतर किती आकडा झाला हे आम्ही पाहत होतो. या आत्महत्त्यांची दखल दररोज घेण्यात येत होती व हा आकडा एवढा मोठा वाढला की, देशोन्नतीचे संपादक श्री. प्रकाश पोहरे यांनी यासंदर्भात कोर्टामध्ये एक रिट याचिका दाखल केली. त्यामुळे या आत्महत्यांचा सर्वे करण्यासाठी टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सेस् व इंदिरा गांधी इन्स्टिटयूट यांना सांगण्यात आले. या दोन्ही इन्स्टिटयूटचे जेव्हा अहवाल आले तेव्हा त्यांनी त्यामध्ये स्पष्ट म्हटले होते की, 1042 आत्महत्त्या हया कर्जबाजारीपणामुळे झालेल्या आहेत. आतापर्यंत या राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे झाल्याचे मान्य करीत नव्हते. राज्याच्या उपमुख्यमंत्री महोदयांनी तर "लोकसत्ता " वर्तमानपत्रामध्ये एक लेख लिहिला होता त्यात असे म्हटले की, "आत्महत्या करणारे शेतकरी हे वेडसर झालेले आहेत, त्यांची मनोवृत्ती ठीक नाही. त्यांचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. ते व्यवसनाधीन झालेले आहेत," तरी सुध्दा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आत्महत्या कर्जबारीपणामुळे होतात हे मानण्यास तयार नव्हते.

( यानंतर सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:05

श्री.पांडुरंग फुंडकर ...

नागपूर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला टाटा इन्स्टिटयूटचा अहवाल आला. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्रकार परिषद घ्यावी लागली व या पत्रकार परिषदेमध्ये कर्जबाजारीपणामुळे 1042 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्याचे त्यांनी मान्य केले. अशाप्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांनी टाटा इन्स्टिटयूटचा रिपोर्ट मान्य केला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये आत्महत्या झालेल्या शेतक-यांच्या कुटुंबाला किती टक्के मदत दिली याबाबतचा उल्लेख केला होता. आत्महत्या झालेल्या 850 शेतक-यांचे खोटे पंचनामे तयार करण्यात आले. मी या ठिकाणी माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत असलेले निकष बदलण्याचे घोषित केलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये 2-3 उदाहरणांचा उल्लेख केला होता. या संदर्भात महसूल खात्याचे कर्मचारी आपल्याला कोणत्या स्तरावर नेऊन ठेऊ शकतात, या ठिकाणी कर्मचा-यांचे काही बिघडले नाही, आपले बिघडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये अमरावती जिल्हयातील एका शेतक-याच्या घरी जाऊन आल्याचे सांगितले. ही आत्महत्या नागपूर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झाली होती. त्या शेतक-याला दोन मुले होती, सुना होत्या, नातवंडे होती. त्याच्यावर सहकारी बँक व भूविकास बँकेचे एकूण 75,000 रुपयांचे कर्ज होते. कर्ज वसुली अधिकारी या शेतक-याच्या घरी गेले होते. विदर्भामध्ये यावर्षी तसा दुष्काळ आहे, त्यामुळे पीक न आल्यामुळे त्याला सहकारी बँकेच्या कर्जाची परतफेड करता आला नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक निवेदन करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे भाषण सुरु असल्यामुळे, मध्येच त्यांचे भाषण थांबवून एवढया तातडीने निवेदन करण्याची काही आवश्यकता नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे भाषण संपल्यानंतर माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी निवेदन करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे भाषण संपल्यानंतर आपण निवेदन करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:05

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्वत: त्या शेतक-याच्या घरी जाऊन आलो. त्या शेतक-याचे आडनाव सोनटक्के असे होते. त्याच्यावर 75,000 रुपयांचे कर्ज होते. कर्ज वसूल करण्यासाठी त्याच्या घरी वसुली अधिकारी गेल्यामुळे त्याचा अवमान झाला. या शेतक-याने एक चिठ्ठी लिहून त्यामध्ये त्याने असे लिहिले की, "मी आयुष्यात कर्ज घेतले नव्हते. परंतु नापिकी व दुष्काळी परिस्थितीमुळे कर्ज काढावे लागले. मी या कर्जाची परतफेड करु शकलो नाही म्हणून वसुली अधिका-याने माझा अवमान केला, माझ्या आयुष्यामध्ये माझा कोणी एवढा अवमान केला नव्हता, तो मला सहन झाला नाही म्हणून मी आत्महत्या करीत आहे" परंतु या शेतक-याचा तहसीलदाराने कोणताही विचार न करता, या शेतक-याचे शेजारी राहत असलेल्या 60 वर्षे वयाच्या म्हातारीवर प्रेम होते. म्हातारीने प्रेमाला नकार दिल्यामुळे म्हाता-याला विरह सहन न झाल्यामुळे शेतक-याने आत्महत्या केली. अशाप्रकारे शेतक-याच्या आत्महत्येची खिल्ली उडवणार आहात काय ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दुसरे उदाहरण यवतमाळ जिल्हयातील शेतक-याचे सांगितलेले आहे. त्या शेतक-याच्या पत्नीचा 15 वर्षांपूर्वी मृत्यू झालेला असताना तेथील मामलेदाराने असा रिपोर्ट केला की, त्या शेतक-याची पत्नी मयत झाल्यामुळे त्याला आपल्या पत्नीचा विरह सहन न झाल्यामुळे त्याने आत्महत्या केली. अशाप्रकारची अनेक उदाहरणे आहेत. शेतकरी दारु पीत नसताना सुध्दा तहसीलदाराने शेतकरी व्यसनाधीन झाल्यामुळे आत्महत्या केली. अशाप्रकारे 850 शेतक-याच्या आत्महत्येचे चूकीचे पंचनामे करण्यात आले. म्हणून माझी माननीय महसूल मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, 850 शेतक-यांचे करण्यात आलेले चूकीचे पंचनाम्याचे पुन्हा फेर पंचनामे करणार आहात काय ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. आज महाराष्ट्र राज्य अग्रगण्य राज्य असल्याचे समजले जाते. माननीय महसूल मंत्री श्रीयुत नारायण राणे साहेब आपण तिकडे निघून गेलात. दुर्दैवाने आज राज्याची स्थिती " असहाय्य प्रजा व मुर्दाड राजा " अशी झाली आहे. आज प्रजा एवढी असहाय्य व संवेदनशुन्य झाली आहे, ती काही करु शकत नाही, अशी शासनाने जनतेची स्थिती करुन टाकली आहे. एकेकाळी महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावरील राज्य होते. परंतु दुर्दैवाने मला या ठिकाणी सांगावे लागते की, ज्याला बळीराजा म्हणतो, तसेच अन्नदाता असलेला शेतकरी, जो स्वत:चे रक्त आटवून, कष्ट करुन अन्नधान्य पिकवतो व शहरात राहणा-या लोकांची खळगी भरतो ....

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ...

त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी यावी या सारखे महाराष्ट्राचे दुसरे दुर्दैव कोठलेही नाही. सभापती महोदय, या ठिकाणी केवळ आम्हीच हे म्हणत नाही, म्हणजे मी आपल्याला सांगितलेच आहे की, देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान यांनी देखील या आत्महत्यांची दखल घेतली आहे, संसदेने देखील दखल घेतली आहे आणि एवढेच नव्हे तर कोर्टाने देखील दखल घेतली आहे. सभापती महोदय, नागपूरचे अधिवेशन संपल्याच्या दुसऱ्याच दिवशी अकोल्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा एक मेळावा झाला. त्यामध्ये देशाचे कृषी मंत्री आणि महाराष्ट्राचा जाणता राजा असलेले माननीय श्री. शरद पवार आले होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या या आत्महत्यांबद्दल काय म्हटले आहे ? त्यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील खरे कारण म्हणजे त्यांच्या शेतीवरील कर्ज आहे. या आत्महत्या थांबल्या पाहिजेत. पुरोगामी महाराष्ट्राला या घटना कलंक असून हा कलंक पुसून काढणे गरजेचे आहे. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या या जाणत्या राजाने हे जे म्हटले आहे त्यांच्याच अनुयायांचे राज्य या महाराष्ट्रात चालू आहे. माननीय श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या या महाराष्ट्राला कलंक आहेत असे म्हटले असले तरी देखील या सरकारला त्याची दखल घ्यावीशी वाटली नाही. सभापती महोदय, हे आत्महत्यांचे प्रकरण इतके पुढे गेले आहे की, आता कापसापुरते हे प्रकरण राहिलेले नाही. तुम्ही सहा जिल्ह्यांसाठी पॅकेज दिले. मी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आणि पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये देखील सांगितले होते की, तुम्ही सहा जिल्ह्यांसाठी पॅकेज दिले. पण माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील साहेबांना मी सांगू इच्छितो की, कापूस हा केवळ विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्येच पिकतो का ? महाराष्ट्रातील जवळपास 14-15 जिल्ह्यांमध्ये कापूस पिकतो आहे आणि जी अवस्था विदर्भातील या 6 जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची आहे तीच अवस्था मराठवाडा आणि खानदेशातील शेतकऱ्यांची देखील आज झालेली आहे. त्यांच्यासाठी तुम्ही काय पॅकेज दिले ? सभापती महोदय, कापूस उत्पादक श्योतकऱ्याची जी अवस्था या महाराष्ट्रात आहे तीच अवस्था धान उत्पादक शेतकऱ्याची देखील आहे आणि हे लोण आता साखरेच्या आगरामध्ये देखील घुसलेले आहे. 1 फेब्रुवारी ते 15 मार्च या काळामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये कापूस पिकतो का ? सभापती महोदय, नगर जिल्ह्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये एकाच्या पत्नीचा देखील समावेश आहे. म्हणजे आता केवळ शेतकरीच आत्महत्या करतो आहे असे नाही

....... 4आय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

तर शेतकऱ्यांची कुटुंबच्या कुटुंबे आत्महत्या करू लागली आहेत. सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एका शेतकऱ्याला तीन मुली होत्या. त्या उपवर झाल्या होत्या. मुलींची वये वाढत चालली हाती. शेतकऱ्याच्या त्यांच्या लग्नाची चिंता होती. तो पाच एकर शेती असलेला शेतकरी होता. पण त्याच्या डोक्यावर शेतीसाठी घेतलेले बँकेचे कर्ज होते, सतत नापिकी होत होती. आणि त्यामुळे तो मुलींसाठी हुंडा देऊ शकत नव्हता. आमच्या विदर्भामध्ये लग्नामध्ये मुलींच्या बापाकडून हुंडा घेण्याची पद्धत आहे. हुंडा देऊ शकत नसल्याने मुलींची लग्ने होत नव्हती. रोज रात्री शेतकरी आणि त्याची पत्नी चिंतन करीत होते. आपल्या मुलींचे भवितव्य काय आहे याचाच विचार ते करीत होते. त्या मुली घरामध्येच असायच्या आणि त्या आपल्या आईवडिलांचे संभाषण ऐकत होत्या. त्याचा परिणाम मुलींच्या मनावर झाला. आपल्या जन्मदात्या आईवडीलांना आपल्या लग्नाची चिंता आहे, त्यामुळे ते सुखात राहू शकत नाहीत हे त्या मुलींच्या लक्षात आले आणि एक दिवस त्या तिन्ही मुलींनी विचार केला आणि दुसऱ्याच दिवशी एकमेकींच्या कमरेला बांधून घेऊन त्या तिघींनी विहिरीमध्ये उड्या टाकल्या आणि आत्महत्या केली. म्हणजे शेतकऱ्यांची कुटुंबच्या कुटुंबे आता आत्महत्या करीत आहेत अशी या महाराष्ट्रात स्थिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, नगर जिल्हयाच्या विषी मी सांगत होतो की, तेथे पुरेसा वीज पुरवठा होत नसल्यामुळे शेतकऱ्याने पत्नीसह आत्महत्या केली. पाटाच्या पाण्याने समृद्ध असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यामुळे हे प्रकरण किती गंभीर बनले आहे हे आपण लक्षात घ्या. नगर जिल्ह्यातील हे उदाहरण आहे. मी आता आपल्याला नासिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील रेड गावच्या सोमनाथ गांगुर्डे यांची कहाणी सांगतो. केवळ 66 लाखाचे कर्ज त्याच्या डोक्यावर होते पण तो ते दोन वर्षात फेडू शकला नाही म्हणून लोक लाजेस्तव दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन त्याने आत्महत्या केली आणि मृत्यूपूर्वी त्यांनी लिहिलेल्या चिठ्ठीमधील मजकूर वाचल्यानंतर आपल्या देखील डोळ्यातून पाणी येईल. ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... 4जे 1 ...

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, सोमनाथ गांगुर्डे याने आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, "मला माफ कर, मी तुझा संसार चालवू शकत नाही, यामध्ये मार्ग निघेल असे वाटत नाही. नाशिक मर्चंट को ऑपरेटीव्ह बँकेचे व श्री.दत्ताजी पाटील यांच्या सहकारी बँकेमधून घेतलेले पैसे आपल्या मालकीच्या असलेल्या जमिनीतील एक एकर जमिनीचा तुकडा विकून परत कर, मी तुझा निरोप घेत आहे" अशाप्रकारचे पत्र त्याने आपल्या पत्नीला लिहून ठेवले होते. सभापती महोदय, शासनाने शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले. माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे पॅकेजबाबत काय बोलले हे सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्या पॅकेजसंबंधी सर्व माहिती दिली आहे. त्या पॅकेजमध्ये काय आहे? 1972 पासून 3 टक्के चढ उतार निधीची रक्कम कापूस पणन महासंघाजवळ जमा होती त्यावरील व्याज आपण दिले नाही, त्या रकमेचा हिशेब शेतकऱ्याला दिला नाही. 1972 पासून 1995 पर्यंत आपण पैसे कापले. 1995 मध्ये युतीचे सरकार राज्यामध्ये आल्यानंतर शेतकऱ्यांचे 3 टक्के पैसे कापणे बंद करण्याचा निर्णय आम्ही घेतला. तेव्हापासून 3 टक्के रक्कम कापण्याचे बंद झाले. 1972 पासून 1995 पर्यंतच्या काळात जी रक्कम कापण्यात आली त्याची किंमत 768 कोटी रुपये आहे असे सांगण्यात आले आहे. माझ्याकडील माहिती जर चुकीची नसेल तर यापेक्षा जास्त किंमत निघेल. या रकमेवरील 12 टक्के व्याज आपण कोठून देणार? कोणत्या वर्षापासून देणार आहात याचा खुलासा केला नाही. 1972 पासून देणार आहात की फक्त एक वर्षाचे देणार आहात याचा खुलासा झाला नाही. सभापती महोदय, 3 टक्केप्रमाणे 768 कोटी रुपये देण्याचे त्यांनी जाहीर केले आहे. याचे कारण असे की, त्यांच्या मनामध्ये पाप आहे. कापूस एकाधिकार योजना बंद करण्याचे पाप आहे. सभागृहामध्ये तुम्ही ही रक्कम परत करण्याबाबत म्हणत आहात. जर तुम्हाला कापूस एकाधिकार योजना पुढे चालू ठेवायची असेल तर ही रक्कम तुम्ही परत केली नसती.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, आमच्या मनामध्ये पाप आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये 3 टक्के रक्कम परत करण्यासंबंधी त्यांच्या भाषणामध्ये उल्लेख झाला. व त्यांनी ती रक्कम परत करा अशी मागणी केली होती. त्यामुळे त्यांना सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांची 3 टक्के कापलेली रक्कम व्याजासहीत शेतकऱ्यांना परत देणार आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी यासाठी मागणी केली की, गेल्या दोन वर्षापासून आपण कापूस एकाधिकार योजनेचे मुदतवाढीचे विधेयक सभागृहापुढे आणले नाही. कापूस एकाधिकार योजनेची मुदत संपल्यानंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये ते विधेयक आणून आपण मंजूर केले असते तर आम्ही ही रक्कम परत मागितली नसती. त्यामुळे आपण दोन वर्षापासून सभागृहामध्ये विधेयक आणणार नाही, त्याचे कायद्यात रुपांतर करणार नाही. अशावेळी शेतकऱ्यांचे पैसे बिनव्याजी वापरणार असाल तर आम्ही ते वापरु देणार नाही. म्हणून नागपूरच्या अधिवेशनात मी मागणी केली होती. आपण आज त्याबाबत नीट उत्तर दिले नाही.परंतु आपण 350 कोटींचे पॅकेज जाहीर केले  ते पैसे अजून मिळाले नाहीत. फक्त अमरावती जिल्हा सोडला तर अन्य कोणत्याही जिल्हयामध्ये ते पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे आपण 350 कोटी रुपयांचे जाहीर केलेल्या पॅकेजचे पैसे आमचे आहेत आणि नाव तुमचे जाहीर केले आहे. विदर्भाच्या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांना आपण 1 हजार कोटी देणार आहात. शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी आज आपण 161 कोटी रुपयांची मागणी केली. सभापती महोदय, 25 हजार रुपयांपर्यंत कर्जाची फेररचना करण्यासासाठी तुम्ही पैसे देणार आहात. त्यासाठी किती पैसे मागितले? राज्यामध्ये फक्त सहा जिल्हयामध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या नाहीत. आपल्याला जर निर्णय घ्यावयाचा असेल तर विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील सर्व कापूस उत्पादक शेतक-यांना लाभ मिळेल यादृष्टीने घ्यावा लागेल. नागपूरच्या अधिवेशनामध्ये पॅकेज जाहीर करण्यात आले व त्याचा उदो उदो करण्यात आला. हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर आपल्या महसूल विभागाचे कर्मचारी 15 दिवस कार्यालयामध्ये नव्हते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुध्दित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु..

एस.डी.ओ. साहेब कोठे आहेत ? तहसिलदार साहेब कोठे आहेत ? कलेक्टर साहेब कोठे आहेत ? असे विचारल्यानंतर सांगण्यात येत होते की, पॅकेजचा प्रचार करायला गेलेले आहेत. म्हणजे ते अधिकारी 15 दिवस प्रचारच करत होते,आपल्या ऑफीसमध्ये बसलेच नाहीत. ते गावात जाऊन सांगत होते की, सरकारने हे जाहीर केलेले आहे, ते जाहीर केलेले आहे. पण शेतकऱ्याला अजून काही मिळाले नाही. सन्माननीय श्री.हर्षवर्धन पाटील साहेब आपण कापूस उत्पादक शेतकऱ्यासाठी फार मोठे मन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी उत्पादन खर्चाची आकडेवारी सांगितली. तुम्ही कापूस उत्पादक शेतकऱ्याला किती मदत दिली ? सभापती महोदय, कापसाला 2700 रुपयाचा भाव मागितला. ..तो भाव आम्ही मागितला नाही. तुमच्या पक्षाच्या घोषणा पत्रकामध्ये तो भाव जाहीर केला होता. नतर मुख्यमंत्र्यांनी 2500 रुपयाचा भाव देऊ असे सांगितले. तोही 2500 रु.भ्ाव दिला नाही. हंगाम सुरु झाला आणि नंतर सांगितले की, हमीभाव 1700 रु. क्विंटलने कापूस खरेदी करु, परंतु 1700 रुपये क्विंटल या हमी भावातही कापूस खरेदी केला नाही. कापूस खरेदी केंद्रच राज्यामध्ये सुरु झाले नाहीत. आता सांगितले गेले की, फक्त 16 लाख क्विंटल कापूस खरेदी केला गेला. या महाराष्ट्रामध्यें दीड कोटी क्विंटल कापसाच्या खरेदीचा उच्चांक होत असतो, त्या महाराष्ट्रामध्ये फक्त 16 लाख क्विंटल कापूस खरेदी झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. हिराणी साहेबांनी याबाबत प्रतिक्रिया दिली की, पॅकेजमधून शेतकऱ्याला काही मिळणार नाही, ही फक्त मलमपट्टी आहे. या मलमपट्टीने आत्महत्या थांबणार नाहीत. सभापती महोदय, मी आपला फार वेळ घेणार नाही. मी एका कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या पोटी जन्मलेला कार्यकर्ता आहे. अनेक वर्षे मी पहातो की, या हिंदुस्थानला "कृषी प्रधान", देश असे म्हटले गेलेले आहे. हिंदुस्थानातील 75 टक्के माणसे ही शेती करतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुजनीय महात्मा गांधींनी या देशाला सांगितले की, देशाचा विकास करायचा असेल तर खेडयात जाऊन खेड्याचा विकास करा, शेतीचा विकास करा. हा कृषी प्रधान देश आहे. पण दुर्दैवाने नियोजन उलटे केले गेलेले आहे. आत्महत्येचे मूळ कारण शोधले पाहिजे. पॅकेज जाहीर करुन आत्महत्या थांबणार नाहीत. एखाद्या वेळेला एखाद्या शेतकऱ्याचे व्याज माफ करुन आत्महत्या थांबणार नाहीत. एखाद्याला 5 हजार रुपयाची मदत करुन आत्महत्या थांबणार नाही. कापसाला एकरी 400 रुपये देऊन या आत्महत्या थांबणार नाहीत. या राज्यातील आत्महत्या थांबायच्या असतील तर तुम्हाला शेतकऱ्याच्या शेतीच्या मुळाशी जावे लागेल. आतापर्यन्त कापूस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु....

पिकविणारा शेतकरी आत्महत्या करत होता. आता ऊस उत्पादक शेतकऱ्यापर्यन्त हे लोन गेलेले आहे. उद्या कांदा उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळाला नाही म्हणून तोही त्याकडे वळेल. कांद्याचा भाव अजून जाहीर केला नाही. काल कबूल केले होते की, उद्या मी नाफेडशी चर्चा करतो, त्याला निर्यातीची परवानगी देतो. 800 रु.चा भाव जाहीर करतो. 100 रुपयामध्ये आज कांदा विकला जातो. उद्या कांद्याला भाव मिळाला नाही, कांद्याच्या निर्यातीला परवानगी मिळाली नाही तर कांदा उत्पादक शेतकरी देखील आत्महत्या करायला उद्युक्त होईल. म्हणून मी या ठिकाणी दोन-चार गोष्टी सांगणार आहे. या देशमध्ये स्वातंत्र्यानंतर नियोजनाची दिशाच उलटी फिरविली गेली. सन्माननीय श्री.राणे साहेब खऱ्या अर्थाने 75 टक्के शेतकरी हा देशात शेती करीत होता, तर या देशात शेतीला प्रमुख स्थान द्यायला पाहिजे होते, ते दिले नाही. लोखंडाला दिले, पोलादाला दिले, सूत गिरण्याला दिले, शहरी भागाला दिले. शेतीला कनिष्ठ दर्जा दिला गेला. परिणाम असा झाला की, शे्तकऱ्याच्या शेतीला पाणी मिळाले नाही, शेतीला वीज मिळाली नाही, शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळाला नाही. त्याला दर्जेदार खते मिळाली नाहीत. त्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळण्यासाठी मार्केटिंगची व्यवस्था झाली नाही. त्याला कमी व्याजाच्या दरामध्ये कर्जपुरवठा झाला नाही, या सर्व बाबी याला कारणीभूत आहेत. या देशात उद्योगपतीला सवलती दिलेल्या आहेत, उद्योग प्रधान अर्थव्यवस्था केली, उद्योगाला सवलती दिल्या. एखाद्या ठिकाणी उद्योग टाकायचा असेल तर त्याला त्वरित पाणी दिले जाते. ताबडतोब वीज दिली जाते, उत्पादित झालेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार उद्योगपतीला दिला जातो. सरकार त्याच्या मालाची किंमत ठरवत नाही. किंमत ठरवत असतांना सर्व कराचा समावेश केला जातो, सर्व खर्चाचा समावेश केला जातो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

मी एक उदाहरण सांगणार आहे. आमच्या खामगावला हिदुस्थान लिव्हरची आशियातील दोन नंबरची फॅक्टरी आहे. एकदा त्या फॅक्टरीमध्ये गेलो आणि तेथील मॅनेजरशी चर्चा केली. त्यांना विचारले की, या फॅक्टरीमध्ये काय काय तयार करता ? त्यांनी सांगितले की, आम्ही साबण तयार करतो. मी विचारले की, आपण साबणाची किंमत कशी ठरवता ? साबणाची किंमत सरकार ठरवते की तुम्ही ठरवता ? ते म्हणाले की, तेल हे साबणासाठी लागणारा कच्चा माल आहे. कच्च्या मालाची म्हणजे त्या तेलाची किंमत आम्ही यामध्ये धरतो. ते तेल मशीनमध्ये टाकून आटवतो. त्यामध्ये केमिकल्स टाकले जातात. त्या केमिकल्सची किंमत यामध्ये समाविष्ट करतो. मशीन्स चालतात त्यांचा घसारा तसेच विजेचे बिल यामध्ये समाविष्ट करतो. साबण तयार झाल्यानंतर त्याचे छोटेछोटे पॅकिंग केले जाते. त्या पॅकिंगची किंमत त्यामध्ये समाविष्ट करतो. त्यानंतर मोठे पॅकिंग केले जाते त्याची किंमत त्यामध्ये समाविष्ट करतो. नंतर त्याच्यापेक्षा मोठे पॅकिंग करतो. त्याची किंमत त्यामध्ये समाविष्ट करतो. नंतर त्यामध्ये ट्रान्सपोर्टचा खर्च, सेल्स टॅक्स त्यामध्ये धरतो. आमच्या संचालक मंडळाचा खर्च त्यामध्ये समाविष्ट करतो. आमच्या एखाद्या डायरेक्टरची बायको मुंबईवरुन कारखाना पाहण्यासाठी आली तर तिच्या विमानाच्या तिकिटाचा खर्च यामध्ये समाविष्ट करतो. अकोल्यापासून खामगाव पर्यंतच्या टॅक्सीचा खर्च त्यामध्ये समाविष्ट करतो. त्यानंतर सर्व हिशेब करुन त्या साबणाची किंमत ठरवितो. असे शेतकऱ्यांसाठी या देशामध्ये कधी घडले आहे काय ? खताच्या किंमतीचा, औषधाच्या किंमतीचा कधी विचार होतो काय ? आपण बीटी कॉटन बियाणाबाबत सांगतो. या महाराष्ट्रामध्ये किती लोक बीटी कॉटन बियाणे वापरतात ? दोन टक्के सुध्दा शेतकरी बीटी कॉटन बियाणे वापरत नाहीत. बीटी कॉटन बियाणाची किंमत 400 ग्रॅमला 1600 रुपये आहे. ते बियाणे जर बोगस निघाले तर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार ? शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळत नाही. त्यांना आपल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही. त्यानी महाग बियाणे पेरावयाचे, महाग खते टाकावयाची, महाग औषधे फवारावयाची. माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेब, काही शेतकऱ्यांनी मला सांगितले की, जहर खाऊनही आम्ही आत्महत्या करु शकत नाही. कारण किटकनाशकाची किंमत एका लिटरला 3

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

हजार रुपये आहे. किटकनाशकाची किंमत एका लिटरला 3 हजार रुपये असेल तर शेतकरी किटकनाशक विकत घेऊन मरु शकत नाही अशी त्यांची आज अवस्था झालेली आहे. एवढी महाग खते, बियाणे तो शेतीमध्ये घालतो. नांगरणी, वखरणी करतो. शेतकरी कापसाचा एक एक बोंड जमा करतो. त्याला दोन रुपये प्रती किलो वेचाई द्यावी लागते. शेतकऱ्याची बायको शेतावर त्याच्यासाठी भाकरी घेऊन आली तर त्या बायकोची मजुरी शेतकरी कापसाच्या किंमतीमध्ये लावत नाही. शेतकरी कोणता भाव मागतो ? तुम्ही जो भाव जाहीर केला तोच भाव शेतकरी मागत आहेत. शेतकऱ्यांच्या कापसाला 2700 रुपये भाव मिळाला पाहिजे. तुमच्या जाहीरनाम्यामध्ये कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे म्हटले होते. तोच भाव शेतकरी मागत आहेत. तुम्ही भाव ठरवता. कांद्याच्या बाबतीत ज्वारीच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. मिरचीच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. सोयाबीनच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. प्रत्येक पिकाची हीच अवस्था आहे. माल आमचा आणि भाव तुमचा अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शेतकरी जगू शकणार नाही. शेतकऱ्याला पुरेशी वीज मिळत नाही. शेतकऱ्यांना मोफत वीज नको आहे. शेतकऱ्यांना मेहरबानी नको आहे. शेतकऱ्यांकडून विजेचे पैसे घ्या परंतु त्यांना 24 तास वीज द्यावी. 24 तास वीज देण्याची तुमची कुवत नाही. आज 12 तास, 14 तास, 16 तास लोडशेडींग होते. परवा असे जाहीर झाले की, लोडशेडींगची मर्यादा आणखी वाढणार आहे. तुम्ही शेतकऱ्यांना वीज देत नाही, त्यांना पाणी देत नाही. पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत माननीय राज्यपालांचे निर्देश पाळत नाहीत. विदर्भातील प्रकल्प अपूर्ण ठेवले. विदर्भातील प्रकल्प पूर्ण केले असते तर आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले असते. शेतकऱ्यांना आपण वीज दिली नाही, पाणी दिले नाही. त्यांच्या मालाला भाव दिला नाही. मग शेतकरी कसा जगणार ? या सर्व गोष्टीतून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रकरण सुरु झालेले आहे. मी या ठिकाणी एकच मागणी करतो. याबाबतीत वरवर मलमपट्टी न करता खोलवर जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही मागण्या केल्या. तशा मागण्या करणारा मी कार्यकर्ता नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा इमानदारीने विचार करावयाचा असेल, या राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवावयाचे असेल तर त्या शेतकऱ्यांच्या शेतीला प्रथम क्रमांक द्यावा.

यानंतर श्री. शिगम ...

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

त्याच्या शेतीला जे जे आवश्यक असेल ते द्या. त्याला वीज द्या, पाणी द्या, त्याच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करा, त्याच्या मालाच्या निर्यातीची व्यवस्था करा. हे शासन फक्त बागायतदार शेतक-यांच्या मालाची निर्यात करते. द्राक्षे तसेच अन्य फळ पिकांची निर्यात होते, गुलाबाच्या फुलांची निर्यात होते. पण कापसाची निर्यात करण्याचा विचार हे शासन करीत नाही. कोरडवाहू शेतक-याच्या शेतामध्ये निर्माण होणा-या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदरारी ग्रामीण भागामध्ये उभी करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. कारखानदारी उभी राहिली ती मुंबई आणि बेलापूरच्या पट्टयामध्ये. सभापती महोदय, शेतक-याला ख-या अर्थाने न्याय द्यायचा असेल तर शेतक-याने उत्पादित केलेल्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी तालुक्या तालुक्यामध्ये उभी करा. आता ज्वारी पासून दारु तयार होऊ शकते असा नवीन शोध लागलेला आहे. दारु तयार करणारे कारखाने ग्रामीण भागात काढा. शेतक-याच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी ग्रामीण भागामध्ये काढली तर त्याच्या मालाला योग्य भाव मिळेल. त्यासाठी शेतक-याला वीज द्या, पाणी द्या, गावागावातून कारखाने उघडा आणि त्याने उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळेल अशी मार्केटिंगची व्यवस्था करा, अशी माझी मागणी आहे. केन्द्र सरकारने शेतक-यांना 7 टक्के कर्ज देण्याचे जाहीर केले. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी याबाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा बँका, सोसायटया यांचे प्रमाण त्यामध्ये किती टक्के राहील याचा खुलासा माननीय सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना करता आला नाही. केन्द्र सरकार 7 टक्के दराने कर्ज देणार आणि ते आपण शेतक-यांना 11 टक्के दराने दिले तर त्याबाबतीत शेतक-यांना काहीच लाभ मिळणार नाही. तेव्हा कर्जाची ही थ्री-टायर सिस्टीम काढून टाकून शेतक-याला डायरेक्ट कर्ज मिळेल अशी व्यवस्था करा. शेतक-याला अल्प मुदतीच्या कर्जाची गरज नाही तर त्याला दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची गरज आहे. शेतक-याला दीर्घ मुदतीने आणि कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करुन द्या. मी सांगितलेल्या सर्व सोयीसुविधा शेतक-याला उपलब्ध करुन द्या. हे जर या सरकारने केले तर शेतक-यांच्या आत्महत्या निश्चितचपणे थांबतील एवढेच मी या ठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला
सादर करणे व तो संमत करुन घेणे

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक 23 मार्च 2006 रोजी भरलेल्या बैठकीत सोमवार, दिनांक 27.3.2006 ते बुधवार, दिनांक 5 एप्रिल 2006 पर्यंतचा विधान परिष्देच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 27 | अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. (पहिला दिवस) |
| मंगळवार, दिनांक 28 | अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. (दुसरा दिवस) |
| बुधवार, दिनांक 29 | 1) सभागृहाची विशेष बैठक.<br>( सकाळी 11.00 ते 1.45 पर्यंत )<br>या बैठकीत अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा घेण्यात येईल.<br>( तिसरा व शेवटचा दिवस )<br>2) लेखानुदान विनियोजन विधेयक.<br>3) शासकीय विधेयके. |
| गुरुवार, दिनांक 30 | सुट्टी. (गुढीपाडवा) |
| शुक्रवार, दिनांक 31 | बैठक होणार नाही. |

**<u>एप्रिल, 2006</u>**

| | |
|---|---|
| शनिवार, दिनांक 1 | बैठक होणार नाही. |
| रविवार, दिनांक 2 | सुट्टी. |
| सोमवार, दिनांक 3 | शासकीय विधेयके. |
| मंगळवार, दिनांक 4 | 1) सभागृहाची विशेष बैठक.<br>( सकाळी 10.00 ते 12.30 पर्यंत ) |

..3..



**तालिका सभापती** : कामगाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

...नंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या.

**मु.शी.**: राज्यामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,नितीन गडकरी,गोपीकिशन बाजोरिया, विनोद तावडे,सुरेश जेथलिया,श्रीकांत जोशी,डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती कांता नलावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

( चर्चा पुढे सुरु )

डॉ. एन.पी.हिराणी ( यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आत्महत्या करता तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत याठिकाणी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्याबाबतीत बोलण्याकरिता मी याठिकाणी उभा आहे. याठिकाणी याविषयावर या अधिवेशनामध्ये खूप बोलले गेले आहे. हिवाळी अधिवेशनात सुध्दा सगळयांनी याबाबतीमध्ये गांभीर्याने चर्चा केली. मी आमचे मित्र सन्माननीय विरोधी पक्षनेते फुंडकर साहेब यांच्या मताशी सहमत आहे. जोपर्यंत या आत्महत्येच्या मुळाशी आपण जाणार नाही तोपर्यंत याबाबतीमध्ये चांगल्या प्रकारे उपाययोजना करुच शकत नाही. तातडीच्या उपाययोजना संपल्या. 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. शेतकऱ्यांच्या हातात ते पुष्कळअंशी पोहोचले आहे. कापसाचे 3 टक्के पैसे होते ते सुध्दा सहा जिल्हयामध्ये जवळजवळ 100 टक्के दिले गेले आहेत. ही तातडीची उपाययोजना संपली. याच्यानंतर आम्हांला दीर्घकालीन...मी मागील वेळी सांगितले होते की डॉक्टरकडे जेव्हा एखादा पेशंट जातो त्यावेळी दोन प्रकारची ट्रीटमेंट त्याला द्यावी लागते. एक ट्रीटमेंट आल्याबरोबर त्याचे दु:ख पाहून ताबडतोब त्याचे दु:ख आपण कसे कमी करु याबाबतची ट्रीटमेंट त्याला द्यावी लागेल आणि त्यानंतर त्याच्या आजाराचे मूळ शोधून त्याप्रमाणे क्युरेटिव्ह ट्रीटमेंट. त्याला एक महिन्याची ट्रीटमेंट लागते. टीबी सारखा आजार असेल तर एक वर्ष, दीड वर्ष ट्रीटमेंट लागते. अशा प्रकारे निदान करुन या लोकांनि ट्रीटमेंट आपल्याला द्यावी लागेल अशा प्रकारचे मी नेहमी सांगत असतो. म्हणून तशा प्रकारे मुळात जर आपण गेलो तर आपल्या लक्षात येईल की, भाव जास्त देणे कापसाचा किंवा कुठल्याही पिकाचा हा त्याच्यावरचा उपाय ठरणार नाही. शेतकऱ्याच्या वेगळया पध्दतीने त्याच्या मुळाशी जाऊन काय पाहिजे आहे याचा उपाय आपण सगळयांनी शोधणे

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी................

आवश्यक आहे. मला आनंद आहे की याबाबतीत राज्य सरकारने.....राज्य सरकारला धन्यवादही द्यायला पाहिजेत की ताबडतोबची ट्रीटमेंट म्हणून 1000 रु. च्या वर मदत करण्यात आली. ताबडतोब वेगवेगळया प्रकारच्या कमिटीज् त्याठिकाणी पाठविण्यात आल्या. केंद्रीय शासनाच्या माध्यमातून सुध्दा एक कमिटी त्याठिकाणी दौरा करुन गेली. सगळयांचे याबाबतीत जवळजवळ एकमत आहे की, शेतकरी आत्महत्या करतो त्याचे कारण आहे कर्जबाजारीपणा. कर्जबाजारीपणा का होतो याचा शोध घेणे आवश्यक नाही का ? कर्जबाजारीपणा याच्याकरिता होतो की त्याचे पीक पीकले नाही शेतामध्ये आणि जेव्हा आपण विचार करतो की त्याच्या शेतामध्ये पीक का पिकले नाही तेव्हा अस लक्षात येते की, त्याठिकाणी वेळेवर पाऊस पडला नाही. वेळेवर पाऊस पडला नाही आणि तो आहे अल्पभूधारक तो आहे अत्यल्पभूधारक. ज्याठिकाणी इरिगेशन आहे सिंचनाची व्यवस्था आहे त्याठिकाणी आत्महत्या नाही. कोरडवाहू शेतकरी,अल्पभूधारक,अत्यल्पभूधारक या शेतकऱ्याला निसर्गाने साथ दिली नाही पाऊस नाही पडला म्हणून ती शेती पिकली नाही. म्हणजे जर मुळाशी जर आपण गेलो तर अस लक्षात येते की पाणी हे अत्यंत महत्वाचे कारण जे आत्महत्यांच्या पाठीमागे आहे किंवा कर्जबाजारीपणामुळे आहे. काय उपाय झाला इतके वर्षे झाले स्वातंत्र्य मिळून. विदर्भामध्ये 97 टक्के आमची शेती कोरडवाहू आहे आता ते परसेंटेज थोडे कमी इ ाले आहे. ते 92 93 टक्क्यापर्यंत आले आहे. महाराष्ट्राचा जर विचार केला तर 87 टक्के कोरडवाहू शेती आहे असे म्हटले जाते. आणि 17 टक्के सिंचनाची शेती आणि त्यात सुध्दा जर आपण मुळाशी गेलो तर 7 टक्के फक्त सरफेस इरिगेशन आहे. बाकीच सगळे विहिरीवर इरिगेशन आहे. जमिनीतील पाणी संपण्याचे कारण या विहिरीचे इरिगेशन. वरुन पाणी पडत नाही आणि जमिनीतून पाणी आम्ही काढायला लागलो अशी परिस्थिती आहे. आता या अत्यल्प भूधारक शेतकरी आहे त्याच्या शेतामध्ये विहिर नाही. मग त्याने काय करायचे ? कर्ज फेडण्याची परिस्थिती नाही आली म्हणून खाजगी सावकाराकडे तो गेला. दीड दुपटीने कर्ज घेतले तेही बुडाले आणि म्हणून त्याला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा काहीही पर्याय उरला नाही.

नंतर भारवि

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी...

आता तयारी काय केली पाहिजे यासाठी विचार केला पाहिजे. राजकारणाचा चष्मा लावून बोलायला लागलो तर खूप काही बोलता येते. परंतु, आपण सर्वांनी राजकारण विसरून काम केले पाहिजे. आज शेतकऱ्याची स्थिती काय आहे ? याचा विचार केला पाहिजे. या चर्चेच्या माध्यमातून मी पुन्हा विदर्भाच्या सिंचना संबंधीचा मुद्दा उपस्थित करू इच्छितो. विदर्भामध्ये अपूर्ण राहिलेले जे सिंचन प्रकल्प आहेत, ते ताबडतोब पूर्ण केले पाहिजेत. तसेच विदर्भाचा अनुशेष देखील भरून काढला पाहिजे. तसेच यापुढील जे सिंचन प्रकल्प हाती घेण्यात येतील ते व्हायबल असतील तरच त्यांचे नियोजन केले पाहिजे. आता पुढील काळामध्ये आपल्याला जलसंधारणाच्या माध्यमातून धडक योजनेकडे दिले पाहिजे. आज जल संधारणाचा कार्यक्रम विदर्भामध्ये मोठया प्रमाणावर घेतला पाहिजे. पाण्याची व्यवस्था केली तर शेतकऱ्याचे जीवन आपल्याला अधिक सफल बनविता येईल. पाणी मिळाल्यानंतर कोरडवाहू असणाऱ्या शेतीतील उत्पादन अधिक वाढू शकेल. कोरडवाडू शेतीतून पावसाळयात दीड ते दोन क्विंटल कापसाचे उत्पादन येते. त्या शेतीला पाणी दिले तर नक्कीच आपल्याला डबल उत्पादन घेता येऊ शकेल. तेव्हा पाण्याची व्यवस्था करून जास्तीत जास्त उत्पादन कसे वाढविता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. दुर्दैवाने एक काळ असा होता की, एक हेक्टरमध्ये 188 किलो कापसाचे उत्पादन होत होते. पण सध्या ते होते नाही. कापसाचे उत्पादन हे विदर्भामध्ये सर्वात जास्त होते. म्हणून तेथे पाण्याची व्यवस्था करणे सर्वात महत्त्वाचे आहे. त्यासाठी काही तरी उपाययोजना करावी लागेल. तसेच, चांगले बियाणे देखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे लागेल. आज मार्केटमध्ये शेतकऱ्यांसमोर 200 ते 250 प्रकारची बियाणे दुकानदार फेकतो. ज्या बियाण्यांपासून दुकानदाराला जास्त कमिशन मिळते ते बियाणे दुकानदार शेतकऱ्यांच्या माथी मारतो. शेतकरी हा अगतिक असतो. त्याला उधारीने बियाणे घ्यावे लागत असल्यामुळे तो त्या दुकानदाराकडून नाईलाजास्त ते बियाणे घेतो. अशाप्रकारे नको ते बियाणे घेऊन शेतकरी फसतो आणि मग पुन्हा तो कर्जाच्या विळख्यात अडकतो. तेव्हा यावर शासनाने नियंत्रण आणणे आवश्यक आहे. आज बाजारात बोगस बियाणे का येत आहे ? यासाठी शासन

डॉ.एन.पी.हिराणी...

कडक उपाययोजना का करीत नाही ? जो पर्यंत शासन कडक उपाययोजना करीत नाही, तो पर्यंत बोगस बियाण्यांवर निर्बंध येणार नाही. माझ्या एका मित्राच्या घराच्या बाजूला असाच प्रकार चालू होता. कुठले तरी कापसाचे बियाणे घेऊन काही मंडळी आली होती. ते बियाणे चांगले साफ केल्यानंतर एक चकाचक असलेल्या पाकिटामध्ये बंद करून विकण्यास घेऊन जात होती. अशाने शेतकरी कसा काय वर येऊ शकेल ? आज शॉर्ट, लाँग अँड मिडियम स्टेपलच्या बियाणांना मान्यता दिलेली आहे. अशाने बोगस बियाणांवर नियंत्रण ठेवता येणार नाही. बी.टी.बियाणे हे शेतकऱ्यांना वरदान ठरणार आहे. असे असले तरी त्याचे देखील बोगस बियाणे बाजारात आले आहे. गुजरातमध्ये बी.टी.बियाणे वापरले जाते. पण ते टर्मिनेटर आहे. गुजरातमधील लोकांनी थर्ड ग्रेडचे बियाणे महाराष्ट्रामध्ये विकले. त्यामुळे येथील शेतकरी फसविला गेला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि... 19:45

डॉ.एन.पी.हिराणी....

यासंदर्भात शासनाने कडक पाऊल उचलणे आवश्यक आहे. बियाणे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच पाणी सुध्दा महत्वाचे आहे. म्हणून शासनाने बियाणांच्या संदर्भात शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा देण्याबाबत प्रयत्न करावयास पाहिजे.

महोदय, तिसरी बाब ही विजेची आहे. आज राज्यात विजेची परिस्थिती भयावह झालेली आहे. या परिस्थतीला कोण कारणीभूत आहे या खोलात मी शिरत नाही. परंतु आज शेतकऱ्यांना वेळेवर वीज मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या परिस्थितीला आपल्याला फेस करावे लागेल. माझी या चर्चेच्या माध्यमातून विनंती आहे की, आपल्याला पॉवर कट करावयाची असेल तर करा, परंतु शेतकऱ्यांना वीज देताना मात्र ती सलग द्या. एक तास वीज आणि अर्धा तास वीज नाही, पुन्हा दोन तास वीज आणि नंतर एक तास वीज नाही, असे करु नका. शेतकऱ्यांना वीज देताना सलग 4-6-8 तास वीज पुरवठा करा. कारण विद्युत पुरवठा वारंवार खंडीत केल्यामुळे मजूर शेतीतून पळून जात आहेत, शिवाय अनेक शेतकऱ्यांच्या मोटारी विजेच्या लपंडावामुळे जळून जात आहेत. खंडीत होणारा वीज पुरवठा हे देखील आत्महत्येचे एक कारण आहे. म्हणून शेतकऱ्यांना कमी प्रमाणात का असेना परंतु सलग वीज पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. आपण 12 तास जरी पॉवर कट केला असला तरी नंतर मात्र वीज देताना ती सलग द्या एवढीच माझी शासनाला विनंती आहे. त्यामुळे या संदर्भात शासनाने लवकरात लवकर लक्ष घालून योग्य प्रकारची कार्यवाही करावी अशी अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो.

महोदय, "गुणवत्ता" हा शब्द अजूनही शेतकऱ्यांना माहीत नाही. कारण राज्यात शिकलेल्या शेतकऱ्यांचे किंवा आपण ज्यांना "एज्युकेटेड फार्मर्स" म्हणतो त्यांचे प्रमाण केवळ 15 ते 20 टक्के इतके अल्प आहे. उर्वरित शेतकरी हा अडाणी आहे. गुणवत्तेच्या बाबतीत शेतकऱ्यांचे प्रबोधन झ ालेले नाही. मागे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये माननीय कृषी मंत्री श्री.थोरातसाहेब आपण उपस्थित होता की नाही मला माहीत नाही. परंतु विभागाचे सचिव श्री.सहारिया हे मात्र उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये अशी चर्चा झाली होती की, गुणवत्तेच्या बाबतीत शेतकऱ्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. कापूस वेचताना त्यामध्ये आपल्या डोक्यातील केस पडू देऊ नये हे अजूनही कित्येक शेतकऱ्यांना माहीत नाही. महोदय,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि... 19:45

डॉ.एन.पी.हिराणी....

आज राज्यात अशी परिस्थिती आहे की, 10-12 वर्षाच्या मुलींचे भुरभुरणारे केस कापूस वेचताना त्यामध्ये पडतात किंवा आपले डोके खाजवताना हाताला लागलेला केस कापसामध्ये पडतो. अशा प्रकारची पुष्कळ उदाहरणे आपल्याला देता येतील. म्हणून गुणवत्तेच्या बाबतीत शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्याची खरी आवश्यकता आहे. त्यावेळी विभागाच्या सचिवांनी हे कबूल केले होते की, शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. महोदय, दूरदर्शन, वर्तमानपत्र किंवा सेमिनारच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. गुणवत्तेला बदलत्या काळात फार महत्त्व प्राप्त झाले आहे. गुणवत्ता हे यशाचे समीकरण बनले आहे. त्यामुळे गुणवत्तेवर भर देणे आवश्यक आहे. गुणवत्ता असली तर उत्पादित झालेला माल ताबडतोब विकला जाईल. आपल्या कापसामध्ये कचरा असण्याचे प्रमाण राज्यात वाढत चालले आहे. इतरांच्या तुलनेने हे प्रमाण आपल्या राज्यात जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे शासनाचे कर्तव्य आहे. शेतकऱ्यांचे दोन-चार वर्षे प्रभावी प्रबोधन केले तर माझ्या मते कापसाच्या गुणवत्तेमध्ये फार मोठा फरक पडू शकेल.

महोदय, टी.एम.सी.योजनेंतर्गत इंडस्ट्रीयल लोकांनी जिनिंगमध्ये 30-40 लाख रुपये सबसिडी घेतली आहे. मला हे कळत नाही की, ही योजना का राबविण्यात आली ? केंद्र सरकारची इच्छा होती की, कापसाची गुणवत्ता लवकरात लवकर वाढली पाहिजे. कारण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये टीकावयाचे असेल तर गुणवत्ता ही असलीच पाहिजे. परंतु या योजनेंतर्गत 30-40 लाख रुपये सबसिडी घेऊन या जिनिंग फॅक्टरीच्या मालकांनी योजनेचे एकप्रकारे बायपासच केले आहे. त्यामुळे यासंदर्भात काहीतरी टेक्नॉलॉजी सिस्टीम अंमलात आणली पाहिजे. केंद्र सरकारने या योजनेवर व्हिजिलंस ठेऊन ज्यांना सबसिडी दिली आहे त्यांच्याकडून ती परत घेतली पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी ....

सभापती महोदय, अशा प्रकारचे कडक काम केल्याशिवाय आमचा शेतकरी सुखावू शकत नाही. तरी, याकडे देखील शासनाने पाहणे फार आवश्यक आहे. सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये देखील 3-4 वर्षे सतत दुष्काळ पडलेला आहे आणि आपल्या माननीय मंत्रीमहोदयांच्या जिल्ह्यामध्ये तर नेहमीच दुष्काळ असतो. मग पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या का करत नाहीत ? पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ असताना एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे आपण कधी ऐकले आहे का ? आपण असे कधी ऐकले नसेल. परंतु आमच्या विदर्भामध्ये असे होत आहे. तरी, याचा विचार कोणी करणार आहे की नाही ? सभापती महोदय, याचे कारण एकच आहे की, पश्चिम महाराष्ट्राचा शेतकरी सगळी अंडी एका थैलीत टाकत नाही. They do not put all the eggs in one basket. पश्चिम महाराष्ट्रामध्ये निसर्गाने पावसाच्या बाबतीत धोका दिला तर दूध आहे, दूध हातातून गेले तर मच्छीव्यवसाय आहे, मच्छीव्यवसाय नसेल तर पोल्ट्री आहे. अशाप्रकारचे जोडधंदे पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतीला लागून तयार करण्यात आले आहेत. परंतु या संदर्भात आमच्या विदर्भामध्ये कोणीही लक्ष दिले नाही. शासनाने या पॅकेजमध्ये तशी व्यवस्था केली आहे. मी म्हणतो की, हे पॅकेज तात्पुरते आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी मघांशी सांगितल्याप्रमाणे, ही तात्पुरती मलमपट्टी आहे. दीर्घकालीन योजना राबविल्याशिवाय व एकसारखे 4-4, 5-5 वर्षे पाठीमागे लागल्याशिवाय तसेच दूधाची व्यवस्था, पोल्ट्रीची व्यवस्था, मत्स्यव्यवसायाची व्यवस्था आपण केल्याशिवाय आपल्याला यश मिळू शकणार नाही. सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा प्रक्रिया उद्योगासंबंधी आहे. प्रक्रिया उद्योग जोपर्यंत आमच्या विदर्भामध्ये होत नाहीत, तोपर्यंत विदर्भाचा विकास जलद गतीने होणार नाही. नाईक साहेबांनी जेव्हा एकाधिकार कापूस योजना तयार केली, त्या योजनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी केली, त्यावेळी त्यांचे स्वप्न होते की, माझा शेतकरी हा कापसाच्या बोंडापासून शेवटी कापड तयार होण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेचा मालक झाला पाहिजे. परंतु आम्ही मध्येच थांबलो, लोकांनी आम्हाला वर येऊ दिले नाही. व्यापाऱ्यांनी आमची योजना संपवून टाकली. आमच्या फेडरेशनच्या लोकांनी त्यामध्ये हातभार लावला आणि आज आपण पाहत आहोत की, आवश्यक ते कारखाने, प्रक्रिया उद्योग आमच्याकडे नाहीत. सभापती महोदय, कापूस

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी ....

आमच्याकडे आणि इचलकरंजी व मालेगावला पॉवर लूम्स अशी परिस्थिती आहे. आमच्याकडून कापूस घेऊन ते पॉवर लूम्स लावतात, सूत गिरण्या व कापड गिरण्या लावतात. आमच्याकडे फक्त 16 सूत गिरण्या होत्या आणि आता त्यापैकी फक्त 4 सूत गिरण्या आहेत, बाकीच्या बंद आहेत. याबाबत कोणी विचार केला का ? आताही शासनाने जाहीर केलेले पॅकेज 1:6 या प्रमाणात आहे आणि ते परत सहकारी क्षेत्राकरिता आहे. तरी, माननीय महसूल मंत्र्यांना विनंती राहील की, मेहेरबानी करुन सहकार क्षेत्रामध्ये हे पैसे देऊ नका. सभापती महोदय, सहकार क्षेत्रात आम्ही फेल्युअर आहोत, आमचे 14 साखर कारखाने होते, सध्या ते सर्वच्या सर्व बंद आहेत, फक्त एकच सुरु आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत लिमिटेड कंपनी जर पुढे आली किंवा चार लोक जर पुढे होऊन हे काम करु इच्छित असतील तर त्यांना आपण सवलती द्या, त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहा. सभापती महोदय, कापड गिरण्या आमच्याकडे होणे फार आवश्यक आहे. आपण कृपा करुन सहकारी क्षेत्रामध्ये या कापड गिरण्या उभ्या करु नका. आज सूत गिरणी उभारावयाची असेल तर 40 कोटी रुपये लागतात. ओपन एअर स्पिनिंग लावयाचे असेल तर 16-17 कोटी रुपये लागतात. कापड गिरणी उभारावयाची असेल तर शंभर कोटींच्या वर रक्कम जाते. अशाप्रकारे गिरण्या उभ्या करण्यासाठी मोठमोठ्या कारखानदारांना इनसेंटीव्ह्ज द्यावा लागेल. त्यांना जमीन फुकट द्यावी लागली तरी द्या, कमी भावाने द्यावी लागली तरी द्या, पाणी फुकट द्या, वीज फुकट द्या, काय द्यायचे असेल ते द्या आणि कमीत कमी पाच वर्षे अशाप्रकारच्या जास्तीत जास्त सवलती त्यांना देऊन या प्रक्रिया उद्योगांना आमच्या विभागात घेऊन या. तरच आमच्या मुलांना नोकऱ्या मिळतील आणि शेतकरी कायमचा आत्महत्या विसरुन प्रगती करत राहील. सभापती महोदय, अशाप्रकारे या सगळया उपाययोजना कराव्यात, अशी मी या ठिकाणी विनंती करुन आपण संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, डॉ. एन.पी. हिराणी यांनी अतिशय उत्कृष्ठ असे भाषण केलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी मांडलेल्या मुद्दांबाबत सरकारने जरुर विचार केला पाहिजे. या विषयावर बरीच चर्चा झालेली असल्यामुळे मी त्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. माझी महसूल मंत्री महोदयांना विनंती आहे की, आत्महत्या हया गेल्या अनेक वर्षापासून सातत्त्याने होत आहेत, अनेक वेळा यासंदर्भात आम्ही सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे, यावर कामकाज थांबविलेले आहे, परंतु सरकारची मानसिकता अशी झालेली आहे की, आत्महत्या झाल्याचे मानण्यास तयार नाही. सरकारचे असे मत झालेले आहे की, आपण जर हया आत्महत्या झाल्याचे मान्य केले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रोत्साहन मिळेल व आपले सरकार फेलीवर झाले असा आरोप करण्यात येईल. अशा प्रकारचा सल्ला समोरच्या इमारतीमध्ये बसणा-या अधिका-यांनी सरकारला दिलेला आहे, तो सल्ला सरकारने स्वीकारलेला आहे. सन्माननीय राणे साहेब आपण जेव्हा आमच्याकडे होता तेव्हा या विषयावर तुम्ही व मी सर्व प्रकारची कागदपत्रे गोळा करुन माननीय राज्यपाल महोदयांची भेट घेतलेली आहे. आपण बदलणार नाहीत असा मला विश्वास आहे. म्हणून माझी महसूल मंत्री महोदयांना विनंती आहे की चुकले तर आपण ती चुक कबूल करावी, आत्महत्या केवळ काँग्रेसच्या काळात झालेल्या आहेत असे म्हणणे योग्य होणार नाही, तसे कोणी म्हणणार सुध्दा नाही. युती शासनाच्या काळात सुध्दा आत्महत्या झालेल्या आहेत. केवळ काही धोरण करण्यामध्ये सरकार जबाबदार आहे. सरकारची जबाबदारी आपणास टाळता येणार नाही, या संदर्भामध्ये आजपर्यंत आत्महत्यांचा आकडा 1300 च्या जवळपास गेलेला आहे. यासंदर्भात तीन रिपोर्ट आलेले आहेत. त्यामध्ये एक इंदिरा गांधी इन्स्टिटयूट, स्वामीनाथन कमिटी व टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस् या तीन संस्थांवर कोर्टाने सर्वे करण्याची जबाबदारी टाकली होती. पोलिस खात्याने खालच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते की, आत्महत्यांची नोंद करु नका, त्याप्रमाणे त्यांनी जसा वरुन आदेश आला त्यानुसार आत्महत्यांच्या नोंदी केलेल्या नाहीत. या तीन संस्थांनी जेव्हा हायकोर्टाच्या निर्णयानुसार रिपोर्ट दिला तेव्हा 1042 लोकांच्या आत्महत्या हया कर्जबाजीपणा व नापिकीमुळे झालेल्या आहेत असा अहवाल दिलेला आहे. म्हणून या 1042 शेतकऱ्यांना प्रत्येकी 1-1 लाख रुपयांची मदत आपण देणार आहात काय ? मंत्री महोदय मी जर आपल्या ठिकाणी असतो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

तर आऊट ऑफ वे जाऊन शेतकऱ्यांना मदत केली असती. या शेतकऱ्यांना आपण मदत करावी, यामध्ये राजकारण आणू नये. मी स्वत: व विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम आम्ही तिघे आत्महत्या झाली तेव्हा एका ठिकाणी भेटण्यास गेलो होतो. तेव्हा तेथील लहान मुले रडत होती, त्या बाईच्या कपाळाचे कुंकू पुसले गेले, तिच्या घरात काहीही नव्हते. त्यांच्याकडे आम्हाला पाहावत नव्हते. म्हणून आमची कळकळीची विनंती आहे अशा 1042 शेतकऱ्यांच्या वारसांना आपण प्रत्येकी 1-1 लाख रुपये देणार आहात किंवा नाही ? 1042 आत्महत्या झालेल्या आहेत हा टाटा इन्स्टिटयूटने अहवाल दिलेला आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंधेला आम्ही जेव्हा मुख्यमंत्री महोदयांकडे चहापानासाठी गेलो तेव्हा त्यांनी 1042 शेतकऱ्यांच्या आत्महत्या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे झालेल्या आहेत हे अतिशय मोकळेपणाने मान्य केलेले आहे. तेव्हा या सगळया 1042 शेतकऱ्यांना 1-1 लाख रुपयांची मदत दिली पाहिजे. आपण अंशत: मदत देता. हा अंशत: शब्द कोणी आणला, कोणाच्या डोक्यातून हा शब्द निघलेला आहे. एखाद्या मंत्र्यांच्या बंगल्याच्या दुरुस्तीचे काम करावयाचे असेल तर तेथे आपण 5-5 लाख रुपये खर्च करतो, इटालियन स्टाईल लावतो, आमचे त्यासंदर्भात काहीही म्हणणे नाही, आम्हाला त्याबाबतीत काहीही फरक पडत नाही, परंतु आपण अंशत: म्हणून 25 हजार रुपयांची मदत देतो, हा फरक आपण कशासाठी करीत आहात, अंशत: मदत करण्याच्या संदर्भात कोण जी.आर. काढतात, डेस्क ऑफिसर, अंडर सेक्रेटरी, सेक्रेटरी ऑडर काढतात, आपण त्यावर सही करतात. अंशत: मदत देण्याची काय गरज आहे ? दंगलीमध्ये जर कोणी मृत्यूमुखी पावले तर त्यांना आपण 2 ते 3 लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करतो. म्हणून ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या वारसांना 1-1 लाख रुपयांची मदत आपण करावयास पाहिजे. मंत्रालयामध्ये शिपायापासून, कक्ष अधिकारी व इतर सर्व अधिकारी पैसे घेत असतात. दररोज मंत्रालयामध्ये 15 ते 20 कोटी रुपयांचा व्यवहार होत असतो. कोणतेही काम करण्यासाठी गेलो तर डेस्क ऑफिसर पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत. एवढा मोठा पैशाचा व्यवहार होत असतांना आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना 1-1 लाख रुपयांची मदत देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ श्री.विठ्ठल खर्चे ... 20:00

श्री.नितीन गडकरी .....

माझी शासनाला दुसरी महत्वाची विनंती आहे की, या सर्व आत्महत्या कापूस उत्पादक क्षेत्रांमध्ये झालेल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या का होत नाहीत ? कारण तेथील सोशल इकॉनॉमिक स्थिती वेगळी आहे. तेथे मोठया प्रमाणावर एरिगेशन झाले आहे, मोठया प्रमाणावर ऊसाची शेती, साखर कारखाने, सहकारी चळवळी तसेच फलोद्यानाचा कार्यक्रम यशस्वी झालेले आहेत. अशाप्रकारे पश्चिम महाराष्ट्रामध्ये शासनाच्या मदतीने व काही लोकांच्या इनिशिएव्टीव्हमधून तेथील ग्रामीण भागातील चित्र बदलले आहे. याबाबत मला लाज वाटते की, यासाठी आपण नव्हे तर आम्ही जबाबदार आहोत. मी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 25,000 लिटर्सची दुधाची डेअरी सुरु करीत आहे. आमच्या जिल्हयाची कन्स्ट्रक्टीव्ह वृत्ती असली पाहिजे, जोडधंदे उभे केले पाहिजेत. पुण्यातील एका सामाजिक कार्यकर्त्याने आत्महत्या झालेल्या जिल्हयांमध्ये पायी प्रवास केला, त्यांचा एक रिपोर्ट आला. हा रिपोर्ट अतिशय सुंदर आहे. त्यांच्या रिपोर्टवर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी रिसर्च करीत आहे. या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे की, गावांमध्ये परसाकडे जाण्यासाठी संडास नाहीत, पिण्यासाठी शुध्द पाणी नाही, मुलांसाठी शाळा नाहीत, शाळेची इमारत असेल तर शिक्षक नाहीत, शिक्षक असेल तर विद्यार्थी नाहीत, शिक्षक व विद्यार्थी असतील तर शाळेसाठी इमारती नाहीत, तसेच शाळेची इमारत, शिक्षक व विद्यार्थी असल्यास तेथे शिक्षण नाही. सरकारी दवाखान्यांची अशीच स्थिती आहे. त्या ठिकाणी डॉक्टर भेटला तर आपले नशीब समजावे, तेथील सरकारी कर्मचारी गावामध्ये राहत नाहीत, दवाखान्यात डॉक्टर असेल तर औषधे नाहीत, औषधे असेल तर डॉक्टर नाहीत, डॉक्टर व औषधे असतील तर नर्स नाहीत, डॉक्टर, औषधे व नर्स असतील तर त्या ठिकाणी पलंग नाहीत अशी आपल्या सरकारी दवाखान्याची स्थिती आहे. आज सरकारी दवाखान्याचे क्वालिटी लाईफ किती सुंदर आहे याचा विचार करण्याची गरज आहे. देशाला स्वांतत्र्य मिळून 58 वर्षे झाली आहेत, आज देशामध्ये साडेसहा लाख गावांपैकी फक्त 1,40,000 गावांमध्ये जाण्यासाठी रस्ते आहेत, गावामध्ये पिण्यासाठी पाणी नाही आणि येथे महात्मा गांधी जिंदाबादचे नारे दिले जातात व डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज यांची नावे घेतली जातात. मी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सांगू इच्छितो की, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसने काढलेल्या रिपोर्टनुसार एकूण आत्महत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

करणा-यांमध्ये 36 टक्के दलित समाजतील लोक आहेत. खरे म्हणजे शेतक-याला जात नसते, मी याबाबतचा उल्लेख करु इच्छित नाही. परंतु समाजातील तळागाळातील जी शोषीत माणसे आहेत, गरीब माणसे आहेत, जे सामाजिकदृष्टया, शैक्षणिकदृष्टया, आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत म्हणून ते जीवनाला कंटाळून आत्महत्या करीत आहेत, ही गोष्ट शासनाला भुषणावह नाही. या 58 वर्षांच्या कालावधीत आपण काय झाले, आपण एखाद्या कामाला कधी प्राधान्य दिले आहे काय, मी या संदर्भात अतिशय जबाबदारीने सांगू इच्छितो की, यवतमाळ जिल्हयातील फक्त बेंबळा प्रकल्प पूर्ण केला तरी साडेतीन लाख एकर जमीन पाण्याखाली येऊ शकेल. अशाप्रकारे एक प्रकल्प संपूर्ण जिल्हयाची सोशल इकॉनॉमीक सिनेरियो बदलू शकतो. त्यामुळे या प्रकल्पासाठी शासन निधी का देत नाही या विषय पुन्हा येईलच. आज राज्यकर्त्यांनी शांतपणे विचार केल्यास विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील सर्व पाटबंधारे प्रकल्प दोन वर्षात पूर्ण होऊ शकतात. काम करण्यासाठी पैशाची नव्हेतर इच्छाशक्तीची आवश्यकता असते, दृष्टीची गरज असते. आपण डोळे दान करु शकतो, परंतु दृष्टी दान करु शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. काम करण्यासाठी गंभीरतेची गरज असते, परंतु या ठिकाणी कुणीही गंभीर नाही, या ठिकाणी टोलमटाली सुरु आहे. येथे कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रसचे राज्य आहे. दोघांचेही काही जमत नाही, " तुझ माझ जमेना अन तुझ्या वाचून करमेना " अशी आजची स्थिती आहे. घोषणा करण्यात आणि लोकांना मुर्ख बनविण्यामध्ये कॉंगेस पक्षाचा हात या दुनियेमध्ये कुणीही धरु शकत नाही.

श्री.नारायण राणे ( खाली बसून ): मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, त्यांनी शेतक-यांच्या आत्महत्यांच्या विषयावर बोलावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या संदर्भात माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, कॉंग्रेस पक्षाची आर्थिक धोरणे शेतक-यांच्या आत्महत्यांसाठी कारणीभूत आहेत. मी या ठिकाणी काही राजकीय बोलत नसून अर्थशास्त्राचा अभ्यासक म्हणून विचारपूर्वक बोलत आहे. 1947 मध्ये देश स्वातंत्र्य झाल्यापासून सन 2006 पर्यंत आपण पब्लिक सेक्टर्समध्ये, पब्लिक टेकर अंडरटेकिंगमध्ये आणि गव्हर्नमेंट सेक्टर्स मध्ये एकूण 5,60,000 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

आपण हॉटेल्स उघडली, मोटेल्स उघडली, ट्रॅक्टरचे कारखाने टाकले, घड्याळे बनविली. खताचे कारखाने सुरू केले, पॉवर प्रोजेक्ट टाकले. पण ही सगळी म्हणजे जवळ 98 टक्के मृत गुंतवणूक झाली. त्यातूनकाही रिटर्नच नाही. मी तर म्हणतो की, जेथे जेथे सरकारी कर्मचाऱ्यांचा हात लागला आणि मंत्री उद्‌घाटन करतील ते सारे डुबले. मग तो मंत्री वा कर्मचारी कोणीही असो. हे मी आताच बोलतो आहे असे नाही तर आमच्या राज्यामध्ये देखील मी हे सांगितले होते. सभापती महोदय, सुरूवातीस श्री.आर.आर.पाटील आणि श्री.जयंत पाटील मला प्रश्न विचारीत होते की, तुम्ही बीओटीवर चालविण्यास सुरूवात केली आहे तर मग राज्य सरकारच बीओटी वर चालविण्यास का देत नाही ? मी या राज्यामध्ये टोल संस्कृती आणली, ते मी नाकारीत नाही. पण मग मी बजेटमध्ये ते काही आणले नाही, मी बजेटमध्ये काय आणले ? मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे हा संपूर्णतया सरकारच्या पैशातून करण्यात आलेला नाही तर बाहेरच्या पैशातून झालेला आहे आणि मग ते पैसे मी ग्रामीण भागामध्ये, गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये रस्ते करण्यासाठी, गावे जोडण्यासाठी वापरले. 16हजार गावे रस्त्यांनी त्या काळात आम्ही जोडली आहेत. मुंबईमध्ये आम्ही एवढे पूल बांधले पण त्यामध्ये सरकारचा एकही पैसा वापरलेला नाही. ते पैसे आम्ही दलित शोषित माणसासाठी वळविले. आमच्या साडेचार वर्षाच्या कारकीर्दीमध्ये मी बहुतेक सर्व गावे जोडण्याचे काम केले आणि त्यासाठी सरकारचा पैसा वापरला आणि शहरातील रस्ते व पूल बांधण्यासाठी खाजगीतून पैसा उभा करून वापरला. जो देऊ शकतो त्याच्याकडून घेतलेच पाहिजे. If you want good services, you have to pay for it. जो गाडीतून फिरतो त्याच्याकडून टोल घ्यायला काय हरकत आहे ? नाही तरी जे अंतर पार करण्यासाठी त्याला 4 तास लागणार होते ते आता तो 2 तासामध्ये पार करू शकतो आहे, त्यातून त्याचे श्रम, वेळ आणि पेट्रोल म्हणजेच पैसा वाचणार आहे. मग त्यातील काही हिस्सा आपण टोल म्हणून घेतला तर काय बिघडले ? हे कोणी तरी छातीठोकपणे सांगितले पाहिजे आणि मी तसे सांगितले. सभापती महोदय, पंडित जवाहरलाल नेहरू हे मोठे नेते होते, द्रष्टे होते. त्यांच्या साहित्याबद्दल, काव्याबद्दल मला आदर आहे. त्या काळात तीन वाद होते. एक म्हणजे साम्यवाद, दुसरा समाजवाद आणि तिसरा पुंजीवाद. मी यापैकी कोठलाच वाद मानत नाही. वाद आणि विचार या पेक्षा बेसिक इश्यू कडे लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक तरूणाच्या हाताला काम कसे मिळेल, शेतकऱ्याच्या मालाला

...... 4टी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

भाव कसा मिळेल आणि गावातील माणसाला चांगली हॉस्पिटल्स, चांगल्या शाळा कशा मिळतील याचा विचार व्हायला पाहिजे. सभापती महोदय, मला माफ करा. पण मला सांगितले पाहिजे की, पंडित नेहरू यांचेवर त्यावेळी प्रभाव होता तो रशियाचा. पण आजही आपल्या पंतप्रधानांना, माननीय श्री. मनमोहनसिंग यांना लाल बावटेवालेच त्रास देत आहेत. मध्यंतरी मी चीनमध्ये गेलो होतो. तेथे मी पाहिले तेथील इकॉनॉमी फ्री आहे. तेथे सगळ्या प्रकारचे कायदे आहेत. आणि येथे आले की, बस्स. पश्चिम बंगालमध्ये मी गेलो होतो. तेथे मला सांगण्यात आले की, ज्या प्रकारे येथे काम चालते आहे त्यातून आम्ही एक गावसुद्धा सुधारू शकत नाही. तेथेच कॉंग्रेसच्या विचारांची चूक झाली. साम्यवादी असलेला रशिया आज उध्वस्त झाला आहे. त्याचे 13 तुकडे झाले. आणि तरीही आम्ही अजूनही रशियाच्या मॉडेलची कॉपी करीत आहोत. सभापती महोदय, या वर्षी आम्ही एक हजार कोटी रूपये पॉवर जनरेशनसाठी ठेवले आहेत. पण मी म्हणतो की, आपण यासाठी एक रूपया देखील ठेवू नका. गरजच नाही त्याची. आज 100 उद्योगपती लाईन लावून बसले आहेत. त्यांना आपण पॉवर जनरेशन करण्यासाठी परवानगी द्या, त्यांच्यात स्पर्धा होऊ द्यात. आपण हे केले म्हणूनच तर आता विमान प्रवास भाडे कमी झालेले आहे. इतकेच काय पण ट्रंककॉलचा दर 65 रूपये होता तो आता 1 रूपयावर आला आहे. तेव्हा या उद्योगपतींना आपण केवळ जमीन-पाणी द्या आणि त्यांना वीज तयार करण्यास सांगा. 2 रूपयामध्ये आपल्याला वीज मिळू शकेल. पण नाही, मी करणार नाही आणि तुलाही करू देणार नाही ही आपली वृत्ती. सरकारी कर्मचारी केवळ एवढेच पाहतो आणि म्हणतो की, आम्हाला पाचवा वेतन आयोग दिला आता सहावा आणि सातवा केव्हा मिळेल. हे सगळे ऑर्गनाईज्ड आहेत. सभापती महोदय, मी आपल्याला आठवण देतो. गंगा कावेरी योजनेला त्या काळामध्ये प्राधान्य मिळाले नाही. ते प्राधान्य आपण दिले असते तर महाराष्ट्रात वैनगंगेला पाणी आले असते इतकेच नाही तर काश्मिर पासून तामिळनाडूपर्यंत पाणी पोहोचले असते आणि करोडो एकर जमीन पाण्याखाली आली असती. ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ...... 4यू 1 ..

श्री. नितीनगडकरी...

जमीन पाण्याखाली आली असती तर ते चित्र किती बदलले असते.परंतु आपण त्यासाठी पैसा खर्च केला नाही. गावामध्ये रस्ते करण्यासाठी पैसा खर्च केला नाही, गावामध्ये चांगल्या शाळा व्हाव्यात यासाठी पैसा खर्च केला नाहीतर फाईव्ह स्टार हॉटेल बांधण्यासाठी, आयटीडीसीचे हॉटेल बांधण्यासाठी पैसा खर्च केला. आपल्या चुकीच्या नियोजनाचा हा परिणाम आहे. ग्रामपंचायत तुमची, जिल्हा परिषद तुमची, पंचायत समिती तुमची, नगरपालिका तुमच्या, महानगरपालिका तुमच्या, मुंबईमध्ये राज्य तुमचे व दिल्लीमध्येही राज्य तुमचेच. 58 वर्षापैकी 5-6 वर्षे सोडली तर 52 वर्षे तुम्ही राज्य केले. तुम्ही जनतेला गरिबी हटावचा नारा दिला. गरिबी कुणाची हटली? दलितांची हटली? आदिवासींची गरिबी हटली? नाही फक्त कॉंग्रेसच्या नेत्यांची हटली. त्यांनी इंजिनिअरींग व मेडिकल कॉलेजची दुकाने सुरु केली. कालपरवापर्यंत रस्त्यावर फिरणारे लोक 300-300 कोटींचे मालक झाले. शिक्षण सम्राट झाले, दूध सम्राट झाले, साखर सम्राट झाले आणि आता शेण सम्राट होत आहेत. साखर खाल्ली, दूध खाल्ले, शिक्षण खाल्ले आणि आता शेण खाल्ले. काहीही खायचे सोडत नाही. सभापती महोदय, या आत्महत्त्या कां होत आहेत याचे माननीय सहकार मंत्र्यांनी उत्तर द्यावे? बिहार राज्यामध्ये शेतकऱ्याला 8 टक्के दराने कर्ज मिळते. महाराष्ट्रामध्ये 14 टक्के दराने कर्ज मिळते. कारण त्याठिकाणी राष्ट्रीयीकृत बँका कर्जपुरवठा करतात. तुम्ही 5 टक्के व्याजाने नाबार्डकडून कर्ज घेता, 3 टक्के राज्य सहकारी बँकचें, 3 टक्के जिल्हा सहकारी बँकेचे व 3 टक्के सेवा सहकारी सोसायटीचे असे मिळून 13 ते 14 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देता. तुमचा स्वाहाकार आणि शेतकऱ्यांना खड्डयात नेणारा सहकार. ही सहकार चळवळ आहे? तुम्ही एकीकडे घाण करुन ठेवली. नांदेडची बँक 250 कोटींनी घाटयात, नागपूरची जिल्हा बँक 150 कोटींनी घाटयात, उस्मानाबादची बँक 275 कोटींनी घाटयात, वर्ध्याची बँक घाटयात. अशाप्रकारे तुम्ही सहकाराच्या नावाखाली माल खायचा, लक्ष्मी दर्शन घ्यायचे. तुमचे 800 ते 1000 कोटी रुपये डुबले 3 टक्के व्याजाने तुमची राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँक, शेतकऱ्याच्या अंगात नसलेले रक्त शोषून त्याच्याकडून 13 ते 14 टक्के दराने व्याज घेऊन या बँका जगवायच्या, हा कोणता सहकार आहे? तात्यासाहेब कोरे, विखे पाटील, वसंतदादा पाटील यांचा हा सहकार नाही. सहकार चळवळ चांगली आहे. पुन्हा यावर्षी 900 कोटी देणार आहात. माननीय सदस्य डॉ. हिराणी याबाबत योग्य बोलले. तुम्ही नितीन गडकरी यांना पैसे देणार नाही, भाऊसाहेब फुंडकर, दिवाकर रावते यांना पैसे देणार नाही. ज्यांना मंत्रिमंडळामध्ये मंत्रीपद मिळाले नाही, महामंडळ मिळाले नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

त्यांना आपण हे पैसे वाटणार. तुमचे पैसे वाटण्याचे निकष ठरलेले आहेत. आमच्याकडे माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे होते, आम्ही मूर्ख म्हणून आमच्या काळातील पैसे त्यांनाच वाटले. त्यावेळी आमचे सहकार मंत्री होते, त्यांना हे भेटायला जायचे. त्यामध्ये काय रहस्य होते मला माहीत नाही. आता तुम्ही हे पैसे सूतगिरण्यांना कसे वाटता याच्या अनेक चित्तरकथा मला माहीत आहेत त्यामध्ये मी जात नाही. आमचे लक्ष्मीदर्शन स्पेशलाईज बरेच मंत्री मंत्रिमंडळात असल्यामुळे त्यांना याची योग्य माहिती आहे. आपल्या सूतगिरणीला भांडवल मिळावे म्हणून मंत्र्यांनी मंत्र्यांकडे पैसे मागितले. यामध्ये समाजवादी दृष्टीकोन आहे हे मला मान्य आहे. केवळ भाजप, शिवसेना असो, विरोधी पक्षाचा असो, कोणत्याही जाती-पंथाचा असो, स्त्री-पुरुष असो, मंत्री असो जो येईल त्याला विदाऊट लक्ष्मीदर्शन नो एंट्री. ठीक आहे, हरकत नाही. केवळ विरोधकांकडून पैसे घेतात अशी मी तक्रार करु शकत नाही. आपल्या सहकाऱ्यांकडूनही घेतात. सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, या सहकारी चळवळीची निकोप वाढ झाली पाहिजे. राष्ट्रीयीकृत बँक 8 टक्के व्याजाने कर्ज देते. माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने 1 कोटी शेतकऱ्यांना 8 ते साडे आठ टक्के दराने किसान क्रेडिट कार्ड दिले तर महाराष्ट्रामध्ये थ्री टायर कमिशन देणारी सिस्टीम कां आहे?.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

या कोणाच्या ताब्यात बँका आहेत. महाराष्ट्र सरकारची भूविकास बँक, भूविकास बँक आहे की, शेतकऱ्यांचा सत्यानाश करणारी बँक आहे हे माहीत नाही. मला सांगताना लाज वाटते की, 10 हजाराच्या कर्जावर दोन-दोन लाख रुपयाची वसुली ? सन्माननीय श्री.शिंगणे साहेब हे बरोबर आहे काय ? त्यांचे वडील विदर्भातील सहकारामधील उत्तम कार्यकर्ते होते, तेही चांगले कार्यकर्ते आहेत. त्यांची बँकच बरखास्त केली. सन्माननीय श्री.शिंगणे साहेबांच्या बँकेची काँग्रेसच्या सहकार मंत्र्यांनी वाट लावली. त्यांचे वडील चांगले होते. थोड्या फार इर्रेग्युरीलिटीज होत असतात. तुम्ही मनाचे मोठे आहात, त्याबद्दल मी बोलत नाही. परंतु तुम्हाला लंबा करण्याचे काम यांनी केले. आता यांना विचारा की, भूविकास बँक, जिल्हा सहकारी बँक यांचा व्याजाचा दर बरोबर आहे काय ? परवा श्री.बबन चौधरी यांना तुम्ही साखर कारखान्याकरिता 17 टक्के आणि 18 टक्के व्याजाचे कर्ज दिले. ते जगतील काय ? तुम्ही 18 टक्के व्याजाने पैसे दिले तरी, त्याबद्दल आभार. परंतु इडस्ट्री कशा जगणार ? व्याजाचा दर वाढवून पठाणी वसुली करणारे सावकार कोण आहेत ? भू विकास बँक कोणाची, जिल्हा सहकारी बँक कोणाची, सेवा सहकारी सोसायटी कोणाची ? राज्य सहकारी बँक कोणाची ? या सगळ्या बँका कोणाच्या ? दोन चेहरे समोर येतात. मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र सरकार, मुख्य सचिव आणि हे यांच्या मालकीच्या आहेत. फटाफट बँका बरखास्त करतात, नियुक्त्या करतात. तुला खासदारकीचे तिकीट दिले नाही तू एमएस बँकेमध्ये जा.मागे मी एकदा ट्रेनमध्ये बसून येत होतो, त्यावेळेला सन्माननीय शिंगणे साहेब,आम्ही आमदार अे.सी. टू टायरमध्ये आणि एमएस सहकारी बँकेचा डायरेक्टर अे.सी. फस्ट क्लासमध्ये. भाऊसाहेब बरोबर आहे ना, सन्माननीय विरोधी पक्ष नेते हे डायरेक्टर होते. डायरेक्टर हे अे.सी. फस्ट क्लासमध्ये बसत असे आणि आमदार अे.सी. टू टायरमध्ये बसत आहेत. राज्य सहकारी बँकेचा नागपूरहून मुंबईला मिटिंगसाठी येणाऱ्या डायरेक्टरचा एका मिटिंगचा भत्ता सात ते आठ हजार रुपये होता. घेऊन जातो. त्याची चांदी होती. त्यामुळे ते मिटिंग लावा असे म्हणतात. सब कमिट्या करा, मिटिंग लावा. त्यातील काही लोक अजून जिवंत आहेत. ते आता महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर,शाहू महाराजांच्या राज्यामध्ये...अशा गोष्टी करतात. सभापती महोदय, सहकार चळवळ वाढली पाहिजे. दांडेगांवकर साहेब, मी सहकाराला विरोध करत नाही. ती निकोप असली पाहिजे. सन्माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांचा कारखाना आहे, पश्चिम महाराष्ट्रात चांगले कारखाने आहेत. आम्ही विदर्भातील लोकांनी शिकले पाहिजे. सन्माननीय बाळासाहेब थोरात

23-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4V-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

यांच्याही कारखान्याचे चांगले काम आहे. त्यांच्या जिल्ह्यामध्ये दुधाच्याबाबतीत जी प्रगती झाली, ती पाहून मी माझ्या मुलाला श्री.थोरात यांच्याकडे पाठविले. शिकले पाहिजे. चांगल्या गाई त्यांच्याकडे आहेत. जे चांगले आहे, ते चांगले आहे. पण स्वाहाकाराच्या नावाने जे काही सुरु आहे हे चांगले नाही. मर्सीडीस गाडी विकत घ्यावयाची असेल तर सहा टक्के, साडे सहा टक्के व्याज. मुंबईमध्ये घर घ्यावयाचे असेल तर 7 टक्के व्याज आणि कापूस, ज्वारी, धान लावायचे असेल तर 13 टक्के व्याज. हा कोणता न्याय आहे ? जाणता राजा काय करतो आहे हो ? "शेतकऱ्यांचा मसीहा, जाणता राजा " अशी पोस्टर्स लावलेली आहेत. सन्माननीय श्री. मेटे साहेब, तुम्ही जाणता राजा म्हणून जिकडे तिकडे खूप फोटो लावता. 14 टक्के व्याजाने कर्ज घे. जाणता राजा, जाणता राजा..... कुठे आले, काय आले, काय बोलले, हे सांगण्यासाठी मला वेळ नाही. तुमच्या एकाही घोषणेची अंमलबजावणी नाही. तुमच्या पॅकेजबद्दल सांगतो. ते आमचेच पैसे. परंतु ते पैसे वाटणार हेच. पण सन्मानीय श्री.हर्षवर्धन पाटील सांगतात की, सरकारतर्फे 350 कोटी रुपयाचे वाटप करणार. तुमचे त्यामध्ये काय आहे ? आमचे पैसे 1972 पासून 1985 पर्यन्त घेतले. कापसाचे तीन टक्के चढउतार निधी म्हणून पैसे कापून घेतले. आमच्या त्या पैशातून यांचे कारखाने झाले. म्हणजे आमचे तीन टक्के पैसे कापले आणि शेअर कोणाचे घ्यायचे ? यांना येथून परवानगी मिळणार ते आमचे शेअर घेणार. माल आमचा, काम आमचे ,मात्र मजा यांची. ठीक आहे. श्री.हिराणी साहेब बरोबर बोलले, आर्थिक धोरण ठरविण्यासाठी धैर्य लागते. मी जेव्हा टोल ठरविला तेव्हा माझ्या पार्टीचे आणि शिवसेनेचे सन्माननीय सदस्य माझ्या विरोधात उतरले. हे नाही, हे भलतेच काम आहे. त्यावर मी म्हटले नाही, हे असे आहे, हे केले पाहिजे तर हे होईल, नाही तर होणार नाही. हे बंद करणार आहात काय तुम्ही ? शेतकऱ्याला 7 टक्क्यांनी कर्ज कसे द्याल ? 1 टक्का हे सेवा सहकारी सोसायटी, अर्धा टक्के जिल्हा बँक आणि अर्धा टक्के एमएस बँक, असे आम्ही देणार. असे 7 टक्के सांगून उपयोग काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सेवा सहकारी सोसायटीतून मिळणाऱ्या कर्जावर 7 टक्के व्याजाचा दर लागणार आहे काय ? सभापती महोदय, आपल्या प्रत्येक कृषी विद्यापीठाकडे दहा दहा, बारा बारा हजार एकर जमीन पडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. हिराणी हे फार चांगले बोलले. तुम्ही आम्हाला चांगले सीड द्या, स्वस्त सीड द्या. बीटी कॉटनच्या बाबतीत अनेक वाद आहेत. बीटी कॉटन बियाणे इरिगेटेड क्षेत्रामध्येच लावले पाहिजे. बीटी कॉटन असावे की, नाही याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब बोलले. माझे मत त्यांच्यापेक्षा थोडे वेगळे आहे. ते बियाणे असले पाहिजे. त्याबाबतीत देशामध्ये चर्चा सुरु आहे. त्याच्या वादामध्ये मी जाऊ इच्छित नाही. पण बीटी कॉटनमुळे कापसाचे उत्पादन वाढले आहे. महाराष्ट्रातील कापसाचे उत्पादन वाढले याचे बीटी कॉटन देखील एक कारण आहे. कारण बीटी कॉटनवर बोंडअळी येत नाही आणि बोंडअळी येत नसल्यामुळे उत्पादन वाढते. त्याचे काही चांगले परिणाम आहेत तर काही दुष्परिणाम आहेत. मी एक प्रश्न विचारतो. डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे एवढी जमीन आहे. तुम्ही आम्हाला स्वस्त दरात चांगले उत्तम सीड देण्याचे काम करा. ते आपण का करीत नाही ? नाही तर मी अनेकवेळा बोललो आहे की, विद्यापीठाला बेस्ट कंपनीशी जॉइन्ट व्हेंचर करावयास लावा आणि जॉइन्ट व्हेंचर करुन चांगले सीड तयार करा. विदर्भातील शेतकऱ्यांना उत्तम उत्पादनाचे, बोंडअळीपासून मुक्त असणारे चांगले सीड कमी पैशात उपलब्ध करुन द्या. बाहेर 1800 रुपये भाव असेल तर तुम्ही 500 रुपये दरामध्ये सीड द्या. तुम्ही ते करु शकता. हे पांढरे हत्ती कशासाठी पाळले आहेत ? त्याचे सगळे अधिकारी आणि एक्झिक्युटीव काऊंसिल नुसते ए.सी. हॉलमध्ये रिसर्च करतात. त्यांना आपण कोट्यवधी रुपयांची ग्रँट आणि सरकारी जमीन देऊनही ते विद्यापीठे फायद्यामध्ये चालवत नाहीत. कमीत कमी आपला खर्चही ते काढत नाहीत आणि आम्हाला ज्ञान शिकवतात. एकवेळ त्यांच्या पैशाचे ऑडीट करुन नका पण त्यांच्या परफॉर्मन्सचे ऑडीट करा. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण आम्हाला स्वस्त दरात सीड द्यावे. तुमच्या पॅकेजमध्ये एक चांगली गोष्ट आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे ही चांगली बाब आहे. ते सोपी आहे. प्रत्येक शेतकऱ्याने सेंद्रिय खत, गांडूळ खत वापरणे सुरु केलेच पाहिजे. ही फार चांगली योजना आहे. आपण जर रासायनिक खत विकत घेण्याचे थांबविले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

तर to save money, is to earn money. सेंद्रिय खताकरिता ताबडतोब स्कीम द्यावी. त्या पॅकेजमधील सेंद्रिय खताचे कलम चांगले आहे. तिसरे कलम संयुक्त शेतीचे आहे. त्यांनी शब्द बरोबर वापरला आहे. बऱ्याचदा माननीय श्री. पवार साहेब आणि माझे विचार जुळतात. त्यामुळे कधी कधी ते अडचणीत येतात तसेच मी सुध्दा अडचणीत येतो. कॉन्ट्रॅक्ट फार्मीन्ग हा शब्द बरोबर नाही. आपल्याकडे एक फॅशन चालते. मी समाजवादी आहे, मी कम्युनिस्ट आहे, मी असा आहे, मी तसा आहे असे सांगण्याची फॅशन आहे. प्रत्यक्षात काहीच नसते परंतु हे लोक उगाचच नुसते फिरतात. प्रत्यक्षात ग्राऊंड रिॲलिटी काय आहे ते बघा. महात्मा गांधी, दिनदयाल उपाध्याय, मार्क्स, लेनिन, लोहिया ही सगळी मोठी माणसे होती. त्याचे विचार मोठे होते. त्यांचा उद्देश मोठा होता. त्यांचे स्पिरिट चांगले होते. परंतु एकविसाव्या शतकातील अर्थकारणामध्ये कोणत्याही जुन्या फिलॉसॉफिस्टच्या, इकॉनॉमिस्टच्या पुस्तकातून वाचून सरकारी धोरणे ठरविता येत नाहीत. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेबांनी जे ठरविले, श्री. नरसिंहराव साहेबांनी जे ठरविले, श्री. अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी जे ठरविले, बाय ॲट लार्ज ती आर्थिक धोरणे सरकारच्या उपयोगाची आहेत. काल मी एका सेमिनारमध्ये गेलो होतो. सोलर एनर्जी, को-जनरेशनमध्ये पॉवर, बायोमास चा वापर करुन गॅसिफिकेशन आणि बायो फ्युएल याच्यामध्ये डिझेल-पेट्रोल आहे. खरे म्हणजे diversification of agriculture towards energy and power sector याची गरज आहे. मी माननीय कृषी मंत्र्यांना सांगू इच्छितो की, माझा 27 मेगावॅटचा प्रकल्प तयार झाला आहे. तुम्ही माझ्याकडे या. आमच्या सभोवती सगळे कॉटनचे क्षेत्र आहे. वर्धा जिल्हा आहे, नागपूर जिल्हा आहे. तेथील लोक कापूस काढल्यावर पऱ्हाट्या पेटवून टाकतात. त्याची कॅलरिक व्हॅल्यू 6200 आहे. मी त्या सगळ्या पऱ्हाट्या विकत घेऊन कारखान्यावर आणून बॉयलरमध्ये विजेसाठी वापरण्याचा प्रयत्न करीत आहे. आपल्याकडे धानाचे जे वेस्ट असेल, ॲग्रीकल्चरल वेस्ट असेल ते बायोमास म्हणून वापरण्याची योजना केली तर पाच दहा लाख लोकांना ताबडतोब रोजगार मिळेल. खेड्यापाड्यामध्ये एक एक, दीड दीड मेगावॅटचे प्रोजेक्ट्स टाकावेत. बायोटेक्नॉलॉजीचा वापर करुन आपण लाकूड जनरेट करु शकतो. सभापती महोदय, प्रत्येकाने आपल्या घरावर सोलर

...3...

RDB/ MHM/ SBT/

श्री. नितीन गडकरी ......

वॉटर हिटर लावलाच पाहिजे. सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते. मी मलबार हिलवर राहात होतो. मंत्रालयामध्ये हे कोणी करत नाही. मुंबईतील सर्व सरकारी गाड्या सीएनजीमध्ये कन्हर्ट केल्या तर आता तुमचे 25-30 कोटी रुपये वाचतील. दुसरे म्हणजे ज्या ज्या मोठमोठ्या इमारती आहेत त्या ठिकाणी पाण्याचे रिसायकलींग करा. संडासचे जे पाणी आहे ते साफ करुन पुन्हा संडाससाठी वापरावे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 20:25

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

राष्ट्रवादीचे खासदार श्री.श्रीनिवास पाटील हे एनआयटीचे चेअरमन होते. त्यांनी फार चांगले काम केले. नाग नदीवर साडेतीन लाखाचे रिसायक्लींगचे यंत्र बसवून पाणी शुध्द करुन दिले. आपण शौचालयासाठी फिल्ट्रेड पाणी कशासाठी वापरतो ? एक माणूस जळतो त्यावेळी एक झाड जळते. आपण पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून शेतक-यांसाठी काही धोरण ठरविले पाहिजे असे मला वाटते. हळूहळू यातून शेतक-याला मदत होईल. स्वामीनाथन कमिटीबाबत मी बोलत नाही. या सरकारने कापसला 2700 रुपये भाव का जाहीर केला ? या विषयावर आताचे महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब हे विरोधी पक्षनेते असताना बोलले आहेत. त्यावेळी एक हसतमुख आणि एक देशमुख या दोघांनी देशाची वाट लावून टाकली आणि त्यांच्या बरोबर श्री. नारायण राणेसाहेब हे जाऊन बसलेले आहेत. माजी मुख्यमंत्री श्री. सुशीरकुमार शिंदे हे खरे बोलतात. मोफत वीज देण्याची केलेली घोषणा हा राजकीय स्टण्ट होता असे त्यांनी खरे सांगितले. ते याबाबतीत कधी सिरियस नव्हते, पण ते चांगले गृहस्थ आहेत. आताचे माननीय मुख्यमंत्री हे हतबल झालेले आहेत. श्री.नारायण राणसाहेब हे जर तीन दिवस दिल्लीला गेले तर मुख्यमंत्र्यांचे ब्लडप्रेशर वाढते...(अडथळा).. मी श्री. नारायण राणे साहेबांना सांगू इच्छितो की, ते जेव्हा इकडया बाजूला होते तेव्हा वेगळे बोलायचे आता सत्ताधारी पक्षामध्ये गेल्यामुळे ते त्यांची बाजू मांडतात. श्री.नारायण राणसाहेब हे माझे मित्र आहेत. आम्ही दोघांनी मिळून काम केलेले आहे. मी त्यांचा द्वेष करणार नाही. परंतु ते आम्हाला सोडून काँग्रेस पक्षात गेल्याचे दु:ख मला आहे.

सभापती महोदय, शेतक-यांना मोफत वीज देऊ नका. परंतु यवतमाळ जिल्ह्यातील शेतक-यांची जेवढी वेटींग लिस्टवरती वीज कनेक्शन्स आहेत तेवढी तरी वीज कनेक्शन्स त्या शेतक-यांना द्या. माझ्या माहिती प्रमाणे साडेसात लाख वीज पंपांचे कनेक्शन्स ही वेटिंग लिस्टवर आहेत. माझ्या शेतातील संत्र्यांची एक हजार झाडे मी उपटून टाकली. त्या संत्र्यांच्या झाडांना पाणी देण्यासाठी वीज नव्हती. नागपूर मधील संत्रा बागायतदारांची अक्षरश: वाट लागली आहे. तुम्ही आम्हाला कमीत कमी 8 तास तरी वीज द्या. माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांनीही सांगितले की, 8-10 तास वेळेवर वीज द्या. ज्यांची कनेक्शन्स वेटिंग लिस्टवर ठेवलेली आहेत त्यांना कनेक्शन्स द्या. यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्प जरी पूर्ण केला तरी शेतक-यांच्या आत्महत्या कमी होतील. तुम्ही आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या बाबतीत खोटे पंचनामे केलेले आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी ...)

माननीय उपमुख्यमंत्री यांना बोलका बाहुला म्हटल्यामुळे त्यांना राग आला. दैनिक लोकसत्तामध्ये त्याबाबतीत एक लेख छापून आलेला आहे. शेतक-यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे असे शासन सांगते. अध्यक्ष महाराज, मानसिक संतुलन शेतक-यांचे बिघडलेले नसून ते या सरकारचे बिघडलेले आहे. तुम्ही खोटे पंचनामे केलेले आहेत हे टाटा इन्स्टिट्यू ऑफ सोशल सायन्सने सांगितलेले आहे. 1042 शेतक-यांनी नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या आहेत. मानसिक संतुलन बिघडले म्हणून दारु पिऊन त्यांनी आत्महत्या केलेल्या नाहीत. हिरामण पाटीलच्या केसमध्ये हायकोर्टाने याला मदत का दिली नाही अशी विचारणा केल्यावर असे सांगण्यात आले की, त्याची पत्नी मेल्यामुळे त्याला फार दु:ख झाले आणि म्हणून त्याने आत्महत्या केली. परंतु जेव्हा रेकॉर्ड तपासला गेला त्यावेळी त्याची पत्नी 15 वर्षापूर्वीच मेली असल्याचे समजले. ज्या माणसाची पत्नी 15 वर्षापूर्वी मेली आहे असा माणूस 15 वर्षानंतर आत्महत्या करील काय ? हिरामण पाटीलची केस ही अशी आहे. तेव्हा मला हे सांगायचे आहे की, शेतक-यांचे मानसिक संतुलन बिघडलेले नसून ते या सरकारचे बिघडलेले आहे. माझी शासनाला एकच विनंती आहे की, याबाबतीत स्वामीनाथम समितीचा रिपोर्ट आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचा रिपोर्ट आहे, इंदिरा गांधी इन्स्टीटयूटचा रिपोर्ट आहे. या रिपोर्टसबाबत महाराष्ट्र शासनाचा काहीच निर्णय झाला नाही.

...नंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. शिगम 20:30

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, अमरावती विभागामध्ये वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन सुरु केले. त्यासाठी अप्पर मुख्य सचिव दर्जाचा अधिकारी नेमला. सुपर टाईम स्केल दिले. त्याला एक गाडी त्याला अधिकारी आणि कर्मचारी आयुक्त अमरावती हे देणार. शासन निर्णय क्रमांक एसबीआय-1205,दिनांक 16.12.2005 रोजी जीआर निघाला. 4 महिन्यात काय झाले ? तो अधिकारी येतच नाही. कुठे जीएडी खाते आणि कुठे तरी वित्त विभाग हे सगळे अडकवून टाकते. त्या मंत्रालयातील शुक्राचार्य एवढे मोठे आहेत की ते काही केल्या काम करीत नाहीत. अजून कशाचाही पत्ता नाही. माझी तुम्हांला विनंती आहे की, तीन प्रकारच्या सिस्टीम राबवा. एक ताबडतोब काय करता येईल ते बघा. दुसरी मिडटर्म काय करता येईल ते करा. लॉंग टर्ममध्ये बेसिक कामे शोधून काढा. एकाधिकार खरेदी योजनेने महाराष्ट्राची वाट लावली. महाराष्ट्र स्टेट कॉटन फेडरेशनचा जो कापूस आहे त्याची बाजारात इतकी वाईट इज्जत आहे की यांनी एक्सपोर्ट करण्यासाठी जो कापूस पाठविला त्यामध्ये प्लॅस्टीकचे जोडे निघाले. डॉ. हिराणी सांगत आहेत की महिलांचे केस त्यामध्ये आले नाही म्हणजे झाले. डॉ. हिराणी ज्या संस्थेचे अध्यक्ष आहेत त्यांच्या संस्थेने कापसातून प्लॅस्टीकचे जोडे पाठविले. हे आयएएस ऑफीसरचे काम आहे काय ? काही झाले की एक आयएएस ऑफीसर नेमला. त्याला त्यातील ज्ञान आहे किंवा नाही हे पहात नाही. कापूस माहीत नाही. शेती माहित नाही. कमीत कमी चांगला कापूस झाला त्याची तरी विल्हेवाट लावा. यवतमाळ जिल्हयात ऑरगॅनिक कॉटन तयार होतो. शेतकऱ्यांनी तयार केला. तो जर्मनीत पाहिजे. शासनाने अशा लोकांना मदत करावी. कापसाची संयुक्त शेती करावयाला योजना जाहीर करा. त्याला खताच्या बाबतीत,बियाण्याच्या बाबतीत सवलत द्या. व्याजाचा दर खरोखर 7 टक्के ठेवा. कोणत्या तारखेला हे सुरु होणार आहे ते सांगा. सहकारी क्षेत्रातील कृषी संस्था,सहकारी संस्थास आणि शेतकरी यांनी दिलेल्या कर्जाचे वनटाईम सेटलमेंट करा. कमिटी नेमा. काही करा ऑर्डर काढा. समितीची बैठक झाली काय ? सहकारी संस्थांना आणि शेतकऱ्यांना या जाचातून मुक्त करा. घ्या निर्णय. संस्थांचे काय होईल याचा विचार करु नका पहिल्यांदा गरीब माणसाला वाचवा. तो निर्णय ताबडतोब जाहीर करा. कर्जाचा भार कमी करा आणि 7 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करुन द्या.बियाण्यांची किंमती कमी करा. ऑरगॅनिक फर्टीलायझरला एनकरेज करा. याच्या परचेसिंगची व्यवस्था करायला योजना तयार करा. एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वात नाही. निर्णय करायला

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिंमत लागते. दोन वर्षे झाली गैरकायदेशीर योजना चालू आहे. कुठे आहेत श्री. हर्षवर्धन पाटील तेही डॉ. पतंगराव कदमांचे भाऊ आहेत. त्यांना इंटरेस्ट नाही. राज्य भाजप सेनेचे होवो अथवा कॉंग्रेसचे होवो हे मंत्री होणारच. कापूस उत्पादक शेतकऱ्यांशी देणेघेणे नाही. बारामतीजवळ दोन कारखाने आहेत. तिकडे पवार साहेब इकडे हे. योजना चालू आहे किंवा बंद आहे किंवा काय हे माहीत नाही. परवा उपमुख्यमंत्र्यांनी चमत्कारिक उत्तर दिले. योजना चालू आहे पण त्याला कायदेशीर मान्यता नाही. मी विचारले कोणत्या कायद्याने चालू आहे ते म्हणाले तपासून बघू. या सभागृहात तपासून बघू या शब्दाने वाट लावली. काही निर्णय घ्या. विदर्भात कॉटन प्रोसेसिंग इंडस्ट्रीयन पॉलिसी डिक्लेअर करा. बाहेरच्या येवो जगातील येवो अथवा देशातील येवो जो जो कॉटन निर्यात करेल त्याला प्रोत्साहन द्या. फुकट जमीन द्या,पाणी द्या.वीज सवलत द्या. एक्समशन द्या. 10 कंपन्या चांगल्या सुरु झाल्या तर आमच्या कापसाला किंमत येईल. आपोआप कापूस विकत घेतला जाईल. कॉटन प्रोसेसिंग इंडस्ट्रीयल पॉलिसी राज्याची जाहीर करा. धोरणे चांगली राबवा. लगेच त्याला सहकार शब्द. म्हणजे प्रमोद शेंडेंची गिरणी चालले पैसे. केदारांची त्याला पैसे. कापसाच्या नावावर पैसे काढायचे आणि ते इचलकरंजीत प्रकाश आवाडेंना द्यायचे. म्हणजे कापूस शिंगणेंचा आणि कारखाना प्रकाश आवाडेंचा. ही इंडस्ट्री आहे तिला प्रोत्साहन द्या. प्रायव्हेट इंडस्ट्रीला प्रोत्साहन द्या. त्याचा परिणाम कापसाला चांगला भाव मिळेल. कापसाचे एक्सपोर्ट होईल,सुताचे एक्सपोर्ट होईल आणि सुतापासून तयार झालेल्या कपडयांना देखील चांगले मार्केट मिळेल. जगात ते मार्केट आहे. पण मिक्सींग होते कापूस क्वॉलिटी चांगली रहात नाही म्हणून कापसाच्या बाबतीत महाराष्ट्र बदनाम झालेला आहे. जे लॉंगटर्म प्लॅनिंग आहे त्याचा विचार करुन घोषणा करा आणि कधीतरी मूलभूत विषयाला हात घाला. एरिगेशनचे कृषी पंप आहे ते मान्य करुन विशेषतः ज्या भागात आत्महत्या झाल्या आहेत त्या जिल्हयात जास्तीत जास्त निधी वाटून द्या. आपल्याच जिल्हयात निधीची हेराफेरी करु नका. जिल्हयात पाण्याकरिता पैसे द्या. शासनाच्या मनात असेल तर तुम्ही खरोखर करु शकता. प्रश्न आहे की तुम्ही खरोखर किती करणार आहात? तरी तुम्ही करावे एवढीच विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री. खर्चे पी.

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांच्या अवस्थेबद्दल सरकारला, विरोधी पक्षाला आणि अपक्ष लोकप्रतिनिधीसह सर्वांना जाणीव आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश या भागामध्ये सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शिवसेना-भाजप युती शासनाच्या काळापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येला प्रारंभ झाला. त्यापूर्वी शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असतील. परंतु, ही भीषणता युती शासनाच्या काळापासून सुरू झालेली आहे. अत्यंत विदारक आणि बेसूर चित्र त्यामुळे राज्यात निर्माण झाले आहे. त्यामुळे आपण सर्वजण चिंताग्रस्त आहात. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर राजकारण न करता शेतकऱ्यांना आत्महत्येपासून प्रवृत्त कसे करता येईल, त्यांना मानसिक आधार कसा देता येईल या गोष्टीकडे पाहणे आज अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. शेतकऱ्यांची आत्महत्या रोखण्यासाठी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी उपाययोजना देखील सुचविली आहे. इतकेच नव्हे तर, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, डॉ.एन.पी.हिराणी यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर पोटतिडकीने देखील आपले विचार मांडले आहेत. आमची शेती ही पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असते. आमच्या शेतकऱ्यांवर आस्मानी आणि सुलतानी संकट असते हे देखील नाकारता येत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल टाटा सोशन सायन्स, इंदिरा गांधी इन्स्टीटयूट यांनी सर्व्हे केला. त्यावेळी शेतकऱ्यांचे आत्महत्येचे कारण कर्जबाजारीपणा आहे हे लक्षात आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 20:40

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी जे विचार मांडले ते बरोबर आहेत. वर्तमानपत्रामध्ये मोटार-सायकल किंवा मोटार खरेदी करण्यासंदर्भात "शून्य" टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल अशा जाहिराती डिलरकडून दिल्या जातात. तुम्ही-आम्ही सर्वच या जाहिराती वर्तमानपत्रांतून वाचतो. परंतु ज्याला आपण अन्नदाता म्हणतो त्या बळीराजाला मात्र 13-14 टक्के दराने कर्ज घ्यावे लागते. शेतकरी जो कर्ज घेतो ते कर्ज फेडण्याची त्याची तयारीही असते. परंतु कधी पावसाच्या लहरीपणामुळे, कधी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निघून जातो. काल-परवा अकाली पाऊस पडून, गारपीट झाली. त्यात विदर्भातील संत्री उत्पादक शेतकरी हातातोंडाशी आलेले पीक गमावून बसला. अशा अनेक संकटांमध्ये आज हा शेतकरी सापडलेला आहे. त्यामुळे त्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी ज्या काही उपाययोजना करणे शक्य असतील त्या उपाययोजना करण्याचे धाडस आणि धोरण आमच्या पुरोगामी सरकारने स्वीकारले पाहिजे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमुळे राज्याला जो कलंक लागला आहे तो पुसण्याचे काम शासनासह आमच्या सर्व मित्रांनी एकमेकांच्या सहकार्याने करणे गरजेचे आहे, असे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांनी या चर्चेच्या माध्यमातून अत्यंत उत्कृष्ट अशा प्रकारची वक्तव्ये केलेली आहेत. आत्महत्येच्या संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना बाहेर कसे काढता येईल या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे मुद्दे त्यांनी सुचविले. त्यामुळे त्या मुद्यांची शासनाने दखल घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, त्यांचे होणारे शोषण, त्यांची होणारी अडवणूक थांबली पाहिजे. आज शेतकरी मोठया प्रमाणावर नागावला जात आहे. ही फसवणूक कोणकोणत्या प्रकारे होते हे सन्माननीय सदस्य डॉ.हिराणी यांनी नमूद केले. त्यांनी सदनाच्या निदर्शनास आणून दिले की, आज राज्यात सर्रास होणारी बोगस बियाणांची विक्री, रासायनिक खतांचे वाढते भाव, विजेची टंचाई, पाण्याची टंचाई, सिंचनाची सोय नसणे इ. अनेक गोष्टींच्या अभावामुळे या आत्महत्या घडत आहेत. त्यांनी बोगस बियाणांच्या बाबतीत महत्वाचे मुद्दे मांडले. शेतकऱ्यांच्या हवालदिल अवस्थेचा गैरफायदा घेऊन बोगस बियाणे विकणारी कृषी केंद्रेच आज तयार झाली आहेत. शेतकरी विश्वासने ती बियाणे त्यांच्याकडून खरेदी करतो आणि शेतात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

पेरतो. परंतु त्या बियाण्यांमध्ये उगवण शक्तीच नसते. सर्वसाधारण म्हटले जाते की, "जसे पेराल तसे उगवते." परंतु ही बनावट बियाणे पेरल्यानंतर मात्र काहीही उगवत नाही अशी अवस्था या बियांण्यामुळे झालेली आहे. कर्जबाजारीपणा हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे आज प्रमुख कारण आहे. परंतु हा शेतकरी कर्जबाजारी का झाला ? दिवसेंदिवस कर्जबाजारी का होतो आहे ? हे देखील शासनाने पाहिले पाहिजे. या शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून बाहेर कसे काढता येईल याबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे. माझी या चर्चेच्या माध्यमातून सरकारला एवढीच विनंती आहे की, सरकारने या संदर्भात तातडीची उपाययोजना, मध्यमकालीन उपाययोजना आणि दीर्घकालीन उपाययोजना करुन, शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावयास पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना एक-एक लाख रुपये आर्थिक मदत दिली पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सभापती महोदय, नागपूरमध्ये झालेल्या आढावा बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्रीसाहेब तसेच सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी सर्वांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या परिवाराला एक लाख रुपये, दोन लाख रुपये अशी मदत देण्यात आली पाहिजे. सभापती महोदय, शेतकरी मेल्यानंतर त्याच्या परिवाराला आपण आत्महत्या केली म्हणून एक लाख रुपये, दोन लाख रुपये मदत देतो. परंतु ते शेतकरी जीवंत असतांना त्यांना कोणत्याही प्रकारची मदत करण्याची मानसिकता सरकारची नसते. सभापती महोदय, हे कोणत्या तत्वज्ञानात बसणारे आहे, याचा देखील जरुर विचार केला पाहिजे. सभापती महोदय, आपण अशी परिस्थिती निर्माण करा की, शेतक-यांना परत आत्महत्या कराव्या लागणार नाहीत. या संदर्भात सरकारने हमी दिली पाहिजे. सरकारने शेतकऱ्यांना ठामपणे सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांनो, तुमच्या बळावर या देशाची अर्थव्यवस्था आहे, तुमच्यावर कोणतेही संकट आले तरी घाबरण्याचे कारण नाही, मग ते अस्मानी संकट असो वा सुल्तानी संकट असो. आम्ही खंबीरपणे आम्ही आपल्या पाठीशी आहोत. अशाप्रकारे ठाम विश्वास शेतकऱ्यांच्या अंत:करणात निर्माण करणे ही आज काळाची गरज झालेली आहे. तरी, या दृष्टीकोनातूनही निश्चितपणे सरकारने कार्यवाही करावी. सभापती महोदय, काल दिल्लीमध्ये विदर्भातील सगळे लोकप्रतिनिधी, खासदार व आमदार आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंगजी यांना भेटलो व कलम 371 (2) या अंतर्गत विदर्भात निर्माण झालेला सिंचनाचा व विकासाचा अनुशेष तसेच शेतकरी करत असलेल्या आत्महत्यांची भीषणता त्यांच्या निदर्शनास आणून दिली. आपल्या देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहन सिंगजी यांनी अत्यंत अंत:करणपूर्वक विदर्भाच्या समस्या ऐकून घेतल्याबद्दल मी त्यांचे धन्यवाद मानतो. अनुशेषाच्या संदर्भात त्यांनी सांगितले की, आम्ही या ठिकाणी लवकरच एक कमिटी तयार करुन हा अनुशेष कसा लवकरात लवकर दूर करता येईल या दृष्टीने निश्चितपणे कारवाई करु. या संदर्भात केंद्र सरकारने करावयाची मदत केंद्र सरकारने केलीच पाहिजे. शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी तसेच त्यांना सन्मानपूर्वक जगविण्यासाठी जी काही उपाययोजना केंद्र सरकारने करावयाची आहे ती त्यांच्याकडून करुन घेण्याचा प्रयत्न राज्य शासनाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

केला पाहिजे. राज्य शासनाने अत्यंत प्रामाणिकपणे, कोणत्याही प्रकारची चालढकल न करता, कोणत्याही प्रकारची कारणे न सांगता मग ते विजेचे कारण असो वा पैसे नसल्याचे कारण असो अशाप्रकारे कारणे न सांगता शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सर्व सन्माननीय सदस्य मित्रांनी येथे ज्या काही मौलिक सूचना केल्या आहेत, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. तसेच सभापती महोदय, आपण मला येथे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपलेही धन्यवाद ! जयभीम !

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी येथे भाषण करणार होते. परंतु आता वेळ कमी असल्यामुळे मी माझे विचार एका कवितेमध्येच सभागृहामध्ये मांडणार आहे.

आघाडी सरकारच्या राज्यात
बळीराजाच्या आत्महत्येंचा सुकाळ,
हजारो कुटुंबावर कोसळले आभाळ !
एक नाही दोन नाही
हजारावर आकडा गेला
कारण स्पष्ट करताना
शासनाने कळस केला !

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ SBT/ प्रथम श्री. कांबळे.. 20:50

श्रीमती कांता नलावडे...

नापिकी कर्जबाजारी
आणि व्यसनाधिनता
याचसाठी शेतकरी
करताय आत्महत्या ।

शिस्तबंध्द रीतीने
पंचनामे केले खोटे
मदत करणे दूरच
शासनाने फोडले फाटे ।

हिवाळी अधिवेशनातले
पॅकेज ठरले मायाजाल
जादूगारावही मात
करण्यात शासनाने
केली कमाल ।

सावकार, बँकाची घरावर जप्ती
सरकारी धोरण हीच
बळीराजाची आपत्ती ।

उत्पादनाचे मूल्य ठरवायचे
स्वातंत्र्य उत्पादकाला
उफराटा न्याय मात्र
शेकऱ्याच्या पिकाला ।

सुक्या ओल्या दुष्काळाने
शेतकरी होई बेजार
महागडी किटकनाशके
पिकांवरचा आजार ।

कोरडवाहू शेतकऱ्यांवर तर
असंख्य अडचणींचा भार ।

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

लोडशेडिंगने मोटर बंद
तरी विजबिलाचा भरमार
मुलांचे शिक्षण, लग्न मुलींचे।

कर्जाचा तगादा लावतो
व्यसन दारुचे ।

खोटया प्रतिष्ठेपायी
नामुष्कीची टांगती तलवार
जवळच असतो मग
किटकनाशकाचाच आधार ।

आघाडी सरकारा
बळीराजाला वाचव,
जलसंवर्धनाचे कारंजे
शेतामध्ये नाचव,

शेती विकासासाठी
पन्नास टक्के साठव
जोडधंदा देऊन
संसार त्याचा थाटव ।

संवेदनशिलता बोथट
का हो तुमची ?
लज्जा वाटावी अशी
आत्महत्त्या भूमिपुत्रांची ।

आक्रोश ऐका
काळया आईचा
बळीराजांचे
जीव वाचवून

सन्मान करा नाळेचा ।
सन्मान करा नाळेचा ।

एवढे बोलून मी माझे भाषण संपविते, धन्यवाद..

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री ) : महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्रमांक 97 अन्वये या ठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेची सुरुवात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केलेली आहे. मी या चर्चेला उत्तर देत असतांना सुरुवातील या प्रस्तावामध्ये जे वाक्य टाकलेले आहे ते नियमाला धरुन नाही. ते वाक्य असे आहे की, " पॅकेजही पोकळ असल्याची शेतकऱ्यांची खात्री झालेली आहे", हे वाक्य हेत्वारोप करणारे आहे व महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्रमांक 23/2(ब) प्रमाणे ते या प्रस्तावात बसत नाही, एवढेच मला नमूद करावयाचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रस्तावामध्ये काय टाकावे, प्रस्तावाची भाषा कशी असावी, सरकारवर आरोप करण्याचा आमचा अधिकार आहे, सभागृहामध्ये लोकशाहीचे स्वातंत्र्य आहे, त्यामुळे आम्ही तो उल्लेख केलेला आहे. आम्ही काय बोलावे हे आपण आम्हाला सांगू शकत नाही, आम्ही आपली स्तुतीसुमने उधळावी काय ? आम्ही जे म्हटले आहे त्याला हेत्वारोप म्हणणे योग्य होणार नाही, नियमाप्रमाणेच आम्ही ते सर्व केलेले आहे, नियमाप्रमाणेच ते शब्द मान्य आहेत, त्याबाबत आपण आपली भूमिका मांडावी.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, विधानमंडळाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षामध्ये मी हे गोष्ट आणून दिलेली आहे ते मी आपल्याला सांगितले आहे. सभापती महोदय, राज्यातील एका ज्वलंत विषयाकडे लक्ष वेधण्याचे काम या विषयातून करण्यात आलेले आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, माननीय विरोधीपक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी, सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. प्रा. जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी आपले विचार मांडलेले आहे. या विषयावर बोलतांना मान्यवर सदस्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे अभ्यासपूर्ण व मार्गदर्शक स्वरुपाचे विचार मांडलेले आहेत. याबाबत मी सर्व सदस्यांना धन्यवाद देतो. या राज्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे, यामध्ये राजकारण न करता सरकारला कोणत्या बाबतीत मार्गदर्शन करावे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले....

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ...

पुरोगामी राज्यामध्ये आत्महत्या हा कलंक आहे. हेच वक्तव्य माननीय केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी केले आहे. या संदर्भात केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्याशी आणि सन्माननीय सदस्याच्या मतांशी मी सहमत आहे. शेतक-यांच्या आत्महत्या ही बाब राज्यासाठी कलंक असली तरी याबाबत आपली सुध्दा जबाबदारी आहे. राज्यामधून आत्महत्या हा विषय कायमचा सोडवण्यासाठी आपण सर्वांनी मिळून कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता प्रयत्नशील असणे, हे आपणा सर्वांचे काम आहे. मागील अधिवेशनाच्या वेळी हाच विषय चर्चेला आला होता. त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी, गेल्या वर्षी शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या नाहीत, याच वर्षी जास्त आत्महत्या झाल्याचे सांगितले होते. पंरतु सध्याच्या काळातच शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत असे नाही, सन 1996 च्या पूर्वीपासूनच आत्महत्या होत आहेत. मी यापूर्वी युतीच्या काळात राज्याचा महसूल मंत्री म्हणून कार्यरत असताना स्वत: यवतमाळ येथे जाऊन आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून एक लाख -एक लाख रुपयांचे चेक दिलेले आहेत. अशाप्रकारे आत्महत्या हा विषय अतिशय जुना आहे. परंतु आज मात्र आत्महत्येच्या संख्येमध्ये मात्र वाढ झालेली आहे, यामध्ये कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. गेल्या वर्षी यवतमाळ येथे 26 आत्महत्या झाल्या होत्या आता मात्र ही संख्या 140 पर्यंत गेलेली आहे. महाराष्ट्र शासनाने शेतक-यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करुन त्यामध्ये 19 निर्णय घेतले होते. हे पॅकेज दिल्यानंतर सुध्दा मागील वर्षी याबाबत सदनामध्ये चर्चा करण्यात आली होती. या पॅकेजची अंमलबजावणी करीत असताना, लोकांपर्यंत विविध प्रकारची मदत केली जात होती. यामुळे आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल असे शासनाला वाटले होते. परंतु असे न होता शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. ही सर्व माहिती मी सभागृहासमोर ठेवत आहे, मी ही माहिती आपल्या पासून दडवू इच्छित नाही, ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्याबाबत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत, कारण ते विदर्भातील आहेत, तेथील शेतकरी कसे जीवन जगतात, किती कष्ट सहन करतात, ते आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त का होतात याबाबत त्यांना चांगली माहिती आहे. या संदर्भात नक्की काय करणे आवश्यक आहे, केवळ आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना एक - एक लाख रुपये मदत देऊन व प्रति एकरी 1000 रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 20:55

श्री.नारायण राणे ...

नुकसानभरपाई देऊन हा प्रश्न सुटणार नाही, यासाठी या प्रश्नाच्या मूळाशी जाण्याची आवश्यकता आहे. शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त का होतो ? महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असताना व विदर्भात 6 जिल्हे शेतीप्रधान आहेत, त्या जिल्हयांमध्ये प्रामुख्याने कापसाचे पीक घेतले जाते. यापैकी यवतमाळ जिल्हयात होल्डींग 7 एकरी आहे. यवतमाळमध्ये मोठया प्रमाणावर कापसाचे पीक घेतले जाते. कापसाच्या उत्पन्नासाठी मोठया प्रमाणात खर्च होऊन त्यापेक्षा कमी उत्पन्न येत असल्यामुळे शेतक-याला आपल्या कुटुंबाच्या प्राथमिक गरजा भागवणे शक्य होत नाही. ही विषमता गेल्या 1-2 वर्षांची नसून गेल्या 58 वर्षांपासूनची आहे. त्यामुळे तेव्हा पासून आतापर्यंत जे जे सरकार सत्तेवर असेल ते या सर्व गोष्टींसाठी कारणीभूत आहेत असे म्हटल्यास ते चूकीचे होणार नाही असे मला वाटते.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

 श्री. सांगळे नंतर --- 21:00

श्री. राणे ....

हे आदेश काढण्यापेक्षा या आत्महत्या बंद व्हावयाच्या असतील तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे, त्यांच्या ज्या गरजा आहेत त्या भागविण्यासाठी त्यांना मदतीची रक्कम देण्यापेक्षाही त्यांचे मूळ उत्पन्न वाढले पाहिजे. मी मुद्दाम या संदर्भात आकडेवारी आणली आहे. आमच्या या सहा जिल्ह्यात दरडाई सरासरी उत्पन्न काय आहे हे पाहिल्यास आपल्याला असे दिसून येईल की, हे दरडोई उत्पन्न हे सरासरी 11 हजार आहे. यामध्ये अमरावती 12 हजार, यवतमाळ 10 हजार, वर्धा 13 हजार, बुलढाणा 9868 असे दरडोई उत्पन्न आहे आणि महाराष्ट्रातील एकंदर दरडाई सरासरी उत्पन्न हे 26 हजार आहे. त्यामध्ये पुण्याचे 25057, मुंबईचे 29602 आहे. तेव्हा यामध्ये हा फरक मोठा आहे. गडचिरोलीचे दरडोई उत्पन्न हे यापेक्षाही खूप कमी म्हणजे 7023 आहे. परंतु त्या जिल्ह्यात आत्महत्या झालेल्या नाहीत. तेव्हा या जिल्ह्यांना इतर जिल्ह्यांबरोबर आणावयाचे असेल तर त्यांचे एकरी आणि दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारने काही उपाय योजना करणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीकोनातून सरकार जरूर प्रयत्न करीत आहे. आज आपला प्रस्ताव मी वाचला आणि त्यावर उत्तर देण्यापूर्वी मी माननीय मुख्यमंत्री तसेच संबंधित सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांना भेटलो. मी त्यांना सांगितले की, नुसते पॅकेज आहे त्यावर मी बोलणार नाही. मुळात आपण हे देणार आहोत की नाही, हे आत्महत्यांचे प्रकार कायमचे बंद करण्याच्या दृष्टीने काय करता येईल याची मला माहिती द्या. शेतीचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी आपल्याला काय करता येईल हे मला सांगा. आता या ठिकाणी बीटी कॉटनचे उदाहरण देण्यात आले. हे बियाणे जेथे जेथे पेरले तेथे आत्महत्या झालेल्या आहेत. 17.74 टक्के बीटी कॉटनची पेरण झाली होती आणि बीटी कॉटन जेथे नाही तेथेही आत्महत्या झालेल्या आहेत. तेथे काही ठिकाणी बियाणे बोगस दिले गेले. अर्थात ते देण्यास सरकार सांगत नाही. त्यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे या मताशी मी देखील सहमत आहे. हे बोगस बियाणे पुरविणाऱ्यांवर कडक कारवाई व्हायला पाहिजे याबद्दल दुमत नाही. 1954 च्या भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये त्या दृष्टीने आपण सुधारणा आणीत आहोत. अशा लोकांना दंड, शिक्षा जास्त व्हायला पाहिजे. या अधिवेशनामध्येच हे विधेयक आम्ही आणीत आहोत. तेव्हा एका बाजूला उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत आणि हे प्रयत्न करीत असताना शेतकऱ्यांचे नुकसान झाले, तेथे 2 क्विंटल देखील कापूस पिकला नाही ही गोष्ट खरी आहे. ते मी अमान्य करीत नाही. यावर ज्या उपाय योजना सुचविण्यात आल्या, सन्माननीय विरोधी

..... 5इ 2 ..

श्री. राणे ....

पक्षनेते श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य डॉ.हिराणी, श्री. गडकरी, श्री. रावते यांनी जे काही उपाय सुचविले आहेत आणि सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी तर कवितेच्या माध्यमातून बोचरी टीका केली आणि महाराष्ट्राचे चित्र आपल्या डोळ्यासमोर आणून ठेवले. आपण टीका केली असली तरी हे सरकार संवेदनशील असल्याने टीकेतून अर्थ काढून, यातूनमार्ग काढला पाहिजे या दृष्टीनेच या टीकेकडे पाहिले जाईल. आम्ही सत्तेवर आहोत म्हणून आपण टीका करीत नाही तर महाराष्ट्राला या आत्महत्या भूषणावह नाही, त्या बंद व्हायला पाहिजेत. यामुळे राज्याला जो कलंक लागला आहे तो लागू नये, तो कलंक पुसला गेला पाहिजे याच एका पोटतिडकीतून आपण हे बोलला आहात असा माझा समज आहे. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी बोललो. आपण अनेक समित्या यासाठी नेमल्या. टाटा इन्स्टिटय़ूट, इंदिरा गांधी इन्स्टिटय़ूट असो वा स्वामीनाथन समिती असो, या समित्यांनी याबाबत अभ्यास केला आहे. सभापती महोदय, या आत्महत्या होऊ नयेत म्हणून तज्ज्ञ लोकांची एक समिती आपल्याला नियुक्त करता येईल आणि वाटल्यास, त्यामध्ये विधीमंडळाच्या सदस्यांना देखील घेता येईल आणि ही समिती अभ्यास करून जो कार्यक्रम देईल त्याची अमलबजावणी युद्ध पातळीवर होणे आवश्यक आहे. भविष्यातील बजेटमध्ये त्या दृष्टीने तरतूद करून अमलबजावणी झाली तर हा प्रश्न सुटेल आणि त्यामध्ये सिंचन हा एक प्रमुख प्रश्न आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे .... 5एफ 1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे..

त्या भागामध्ये मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प झाले नाहीत. त्यामुळे त्याच्या कोरडवाहू शेतीला पाणी मिळाले नाही. प्रामुख्याने निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे कापसासारखे पिक सुध्दा पावसाच्या लहरीपणामुळे हाताशी येत नाही. आज शेतकऱ्याजवळ 10 ते 15 एकर शेती असली तरी त्याला 5 ते 10 हजार रुपये उत्पन्न मिळत नाही. त्याच्या घरामध्ये दहा ते बारा माणसे असतात. वयामध्ये आलेल्या मुलीचे लग्न तो करु शकत नाही. अशा अनेक कारणांमुळे तो आत्महत्त्या करतो. ही परिस्थिती आपल्याला कायमची बंद करावयाची असेल, टाळावयाची असेल तर शेतकऱ्याचें एकरी उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या सिंचनाला प्राधान्य दिले पाहिजे. हे सांगत असतांना आपण सिंचनाच्या अनुशेषाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. याबाबत मी खालच्या सभागृहामध्ये बोललो त्यापेक्षा वेगळे बोलेन अशी अपेक्षा करु नका. विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेश हा भाग सिंचनाच्या बाबतीत मागे आहे. त्याला महाराष्ट्राबरोबर आणण्यासाठी माननीय राज्यपालांनी घटनेतील कलम 371(2) अन्वये केलेल्या तरतूदीप्रमाणे निधी दिला पाहिजे. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. आणि म्हणून पाणी व वीजेचा प्रश्न आपल्यासमोर आहे. लोड शेडींगचा प्रश्न आहे, शेतकऱ्याला चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे मिळाले पाहिजे याकडे सुध्दा लक्ष देणे सरकारचे काम आहे. त्यामुळे सरकार त्याकडे बारकाईने लक्ष देईल. आपण सांगितल्याप्रमाणे त्यासाठी समिती नियुक्त करु. आणि त्याचबरोबर सिंचन, बियाणे, वीज हे प्रश्न सोडविण्यासाठी समितीच्या माध्यमातून ज्या सूचना शासनाकडे येतील त्यासंबंधी विचार करुन या आत्महत्त्या होऊ नयेत यासाठी शासन एक धोरण ठरवून तसे पॅकेज निर्माण करील. त्याप्रमाणे शेतीच्या पाण्यासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, बियाण्यांसाठी, जोड धंद्यासाठी ज्या सूचना येतील त्यांची अंमलबजावणी पुढील पाच वर्षाच्या काळात केली तर त्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्टया सक्षम होण्यासाठी मदत होईल. त्यामुळे आर्थिक कारणामुळे, कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्त्या करतात ते प्रमाण कमी होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, सावकाराकडून कर्ज घेतल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. त्या सावकारांवर कारवाई करण्यासंबंधी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केली तरी अजूनपर्यंत कारवाई झाली नाही असे त्यांनी सांगितले. मी त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, जवळपास 940 सावकारांवर केसेस घातल्या आहेत. यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचे काम होणार नाही. पूर्वी खाजगी सावकारी हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे..

सामाजिक व्यवस्थेतील एक भाग होता. त्यावेळी सहकारी क्षेत्र निर्माण झाले नव्हते, सहकारी बँकींग अस्तित्वात नव्हती. आणि त्यामुळे अनेक वर्षापासून प्रथा परंपरेनुसार सावकारी चालत आली होती. ही प्रथा केवळ विदर्भ, मराठवाडा किंवा कोकणामध्ये नाही तर राज्याच्या सर्व भागामध्ये चालू असून त्यांच्याकडून शेतकऱ्यांची पिळवणूक, शोषण होत आहे ते थांबले पाहिजे. त्या करीता शासनाकडून पर्यायी व्यवस्था झाली पाहिजे. यासाठी केंद्र सरकारने 7 टक्के आणि राज्य सरकारने 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याचे ठरविले आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी म्हणाल्याप्रमाणे शेतकऱ्यांना डायरेक्ट 6 टक्के दराने कर्ज मिळेल अशाप्रकारचा निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही घेऊ. हे कर्ज कोणत्या मार्गाने द्यावयाचे याबाबतचा निर्णय त्यावेळी घेऊ. कारण त्यामध्ये जिल्हा बँक किंवा पतसंस्था यांना सामील करुन घेतले तर पुन्हा अर्धा टक्का कमिशन वाढेल...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासन जर शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज देणार असेल व ते देण्याचे काम एखाद्या संस्थेकडे सोपविले तर ती यंत्रणा आपले कमिशन लावणार. आणि मग व्याजाचे प्रमाण 12 टक्क्यापर्यंत जाईल. त्यामुळे त्यांना कमिशन न देता फक्त शेतकऱ्याला 6 टक्के दराने कर्ज मिळेल अशी व्यवस्था कायम राहिली पाहिजे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी तेच म्हणालो होतो. नाहीतर मला तसे बोलण्याची गरज नव्हती.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी)** : शेतकऱ्यांपर्यंत 6 टक्के व्याज दराने कर्ज पोहोचेल अशी व्यवस्था शासन करील.

श्री. नारायण राणे : येणाऱ्या खरीप हंगामापासून आम्ही हे वाटप सुरु करणार आहोत. नापिकीमुळे, कर्जबाजारीपणामुळे, कर्जाची थकबाकी मागण्याचा तगादा अशा विविध कारणांमुळे आत्महत्त्या होतात यासंबंधी अनेक माननीय सदस्यांनी आपली मते मांडली. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या भाषणामध्ये आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला मदत देण्याचा मुद्दा मांडण्यात आला.

(यांनंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (पुढे सुरु..

त्यामध्ये जी काही तपासणी करण्यात आली त्यामध्ये दोष असल्याचे सांगण्यात आले. मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देईन की, मी अधिकाऱ्यांची बाजू घेत नाही, 100 टक्के अधिकारी चुकले, असेही मी म्हणत नाही. त्याचबरोबर 100 टक्के त्यांचे बरोबर आहे, असेही मी म्हणत नाही. मी स्वत: या विभागाचा मंत्री असल्यामुळे मी त्यामध्ये लक्ष घालेन. यापूर्वी मी महसूल मंत्री असतांना अनेक जिल्ह्यांमध्ये अशा घटना घडलेल्या होत्या. त्यावेळेस मी आत्महत्या केलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या घरामध्ये जाऊन भेटी दिलेल्या आहेत. अनेक प्रकरणे तपासलेली आहेत. त्याबाबत मी आता सभागृहामध्ये सांगितले तर मृत पावलेल्या शेतकऱ्यांवर अन्याय करतो आहोत, असे होईल, म्हणून मला ती माहिती द्यावयाची नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयाची मदत दिली जाते. तशी प्रकरणे तयार केली जातात. ती पाच दहा टक्क्यापेक्षा जास्त नसतील. म्हणून 1042 ही संख्या सांगितली...

श्री.नितीन गडकरी : टाटा इन्स्टीट्यूट आफॅ सोशल सायन्सचा रिपोर्ट काय आहे ?

श्री.नारायण राणे : टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सचा रिपोर्ट सबमिट झालेला आहे. जिल्हा पातळीवर कमिटी केलेली आहे. त्यांना एक महिन्याच्या आत प्रकरण तपासून पाठविण्याबाबत आदेश दिले जातील. त्यामध्ये काही दोष असला तर त्या संबंधीचा निर्णय मी स्वत: घेईन. मागच्या वेळेला महसूल मंत्री असतांना त्यावेळचे मुख्यमंत्री आणि मी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन 1 लाख रुपये दिलेले आहेत. शेतकऱ्याचे घर उघड्यावर पडले असताना 1 लाख रुपयाची मदत करणे गरजेचे आहे. त्याची शेती नापीक झाली, तो कर्जबाजारी झाला म्हणून ही एक प्रकारची मदत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी आणेवारीचा मुद्दा उपस्थित केला. या सहा जिल्ह्यामध्ये आणेवारी 51 टक्के, 52 टक्के दाखविण्यात आलेली आहे ती संशयास्पद आहे, असे सांगण्यात आले. परंतु सरकार काही याबाबत आदेश देत नाही. कदाचित अधिकारी तसे करु शकतात. याबाबतीत मी सहाही जिल्ह्याच्या कलेक्टरांना त्याबाबतीत सांगेन. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब, या संबंधीचे पॅकेज जाहीर झाल्यानंतर सहाही कलेक्टरशी सातत्याने संपर्क साधत असून त्या पॅकेजच्या संबंधातील अंमलबजावणी झालेली आहे. आतापर्यन्त 600 कोटी रुपये दिलेले आहेत. मार्च अखेरपर्यन्त 350 कोटी रुपये दिले जाणार आहेत. या सगळया योजनेची अंमलबजावणी 100 टक्के केली जाईल आणि शेतकऱ्यांना पूर्ण मदत दिली जाईल. त्याचबरोबर जोड धंद्यासाठी आर्थिक मदत मिळेल या दृष्टीने माझा प्रयत्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.नारायण राणे (पुढे सुरु....

आहे. याबाबत मी स्वत: लक्ष ठेवून आहे. या सहा जिल्ह्याची आणवारी मी स्वत: तपासून घेईन. मला त्यामध्ये शेतकऱ्यांचा फायदा होईल असे वाटले तर माझ्या अधिकारामध्ये मी सुधारणा करण्याचा प्रयत्न करेन. या ठिकाणी राजकारणाचा विषय नाही. एकमेकांवर टीका करुन उपयोग नाही. उत्तराला उत्तर देऊन चालणार नाही अनेक कारणांममुळे आत्महत्या केली जात आहे याबाबत सरकारने काय करावे याबाबत मी अधिकाऱ्यांशी र्चा केली, त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांच्याही सूचना आलेल्या आहेत. आत्महत्या कशा बंद होतील, या दृष्टीने दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची कमिटी नियुक्त करण्याचे ठरविलेले आहे. तज्ज्ञ सदस्य घ्यावेत असाही विचार केला जाईल. आत्महत्या बंद करण्याच्या दृष्टीने सरकार युध्द पातळीवर उपाययोजना करेल, त्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, निधीची चणचण भासणार नाहदी. विदर्भ महाराष्ट्रामध्ये आहे त्या विभागाला समान न्याय, समान विकास झाला पाहिजे या मताचा मी आहे. अनुशेषाबाबत सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा विचार करत असतांना त्याचा पाठपुरावा करुन आमच्या विदर्भातील शेतकऱ्यांना कसा फायदा मिळेल हे पाहिले जाईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ...

विदर्भातील शेतकरी पश्चिम महाराष्ट्राच्या शेतकऱ्याच्या बरोबरीत कसा येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. परंतु या चर्चेला उत्तर देत असताना मी एवढेच सांगेन की, पॅकेजची पूर्ण अंमलबजावणी होईल आणि आत्महत्या कायमस्वरुपी बंद होण्याकरिता उपाययोजना करण्यासाठी एक समिती नियुक्त केली जाईल. आपण जे मार्गदर्शन केले त्या मार्गदर्शनाचा उपयोग करुन शासन उपाययोजना करील एवढेच आजच्या प्रसंगी या ठिकाणी सांगतो. आपण दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

---

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री आणि सहकार मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी सविस्तर उत्तर दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : माननीय सहकार मंत्री जे ओटीएस करणार आहेत त्यासंदर्भात त्यांनी आमची एक कमिटी तयार केली आहे. त्या कमिटीमध्ये मी सुध्दा सदस्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेब त्यामध्ये सदस्य आहेत. त्याबाबत काय झाले हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले पाहिजे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार, पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्र्यांनी अत्यंत विस्ताराने उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी कमिटीच्या बाबतीत विचारले. कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याच्या बाबतीत कमिटीच्या दोन बैठका झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब कमिटीचे सदस्य आहेत. आपण दोन वेळा बैठका घेतलेल्या आहेत. पुन्हा एकदा बसून अंतिम रिपोर्ट आपण देऊ. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना 6 टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याचे ठरत आहे. खरीप हंगामापासून तो पुरवठा केला जाईल एवढे सांगू इच्छितो. या ठिकाणी सहकाराच्या संदर्भात अनेक मुद्यांवर चर्चा झाली. सहकाराच्या माध्यमातून कर्जपुरवठा करण्याच्या संदर्भातील गेल्या चार पाच वर्षाची पाच जिल्हा बँकांची आकडेवारी माझ्याकडे आहे. पॅकेजमध्ये 6 जिल्हे असले तरी त्या ठिकाणी 5 जिल्हा बँका आहेत. त्या बँकांची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये त्या ठिकाणी जरुर थोडा कमी फायनान्स झालेला आहे. सन 2002 मध्ये महाराष्ट्रात शेती फायनान्स राज्य सहकारी बँकेकडून 2860 कोटी रुपयांचा झालेला आहे तर विदर्भामध्ये हा आकडा 349 कोटी रुपयांचा आहे. सन 2005-06 मध्ये महाराष्ट्राचा कृषी फायनान्स 3303 कोटी रुपयांचा आहे आणि त्यापैकी विदर्भाचा कृषी फायनान्स 624 कोटी रुपयांचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, त्या ठिकाणी 8 टक्के कर्ज पुरवठा आहे. पण तशी परिस्थिती नाही. मी हे मान्य करतो की, विदर्भ आणि मराठवाड्यातील आपण सर्वजण याला जबाबदार आहोत. काम करण्याची सरकारची जबाबदारी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ....

जरुर आहे परंतु सर्व पक्षाचे नेते, सर्व कार्यकर्ते, सर्व जनता काही प्रमाणात याला जबाबदार आहोत. आपल्या सगळ्या सहकारी संस्था आहेत, खरेदीविक्री संघ आहेत, कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. शेवटी थोडेथोडे पैसे देऊन हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत त्यांचे उत्पन्न वाढणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये रस्ते बांधण्यासाठी 280 कोटी रुपये दिले. मला त्याचा आनंद झाला. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी गडचिरोली जिल्हाचा परकॅपिटा इन्कम 7 हजार रुपये आहे असे सांगितले.

श्री. नितीन गडकरी : पर कॅपिटा इन्कम आणि जीडीपीचा संबंध तेथील उत्पन्नाशी असतो. रस्ते केल्यामुळे उत्पन्न वाढणार नाही असे म्हणू नका.

श्री. नारायण राणे : रस्ते केल्यामुळे जीडीपी वाढतो.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : माझे तज्ज्ञांना या निमित्ताने आवाहन आहे. ज्यावेळी 16 टक्के व्याज आणि 5 टक्के शेअर असे 21 टक्के कापत होतो त्यावेळी आत्महत्या कमी होत होत्या. व्याजाचा दर जरुर कमी झाला पाहिजे याबद्दल आमचे दुमत नाही. त्यावेळी हायब्रिड व्हेरायटीज नव्हत्या. त्यावेळी  बगडा कापूस होता आणि एक दोन क्विंटलचे उत्पादन येत होते. ज्वारीचेही एक दोन क्विंटल उत्पादन येत होते. त्यावेळी आत्महत्येचे प्रमाण कमी होते. आज नवीन तत्रज्ञान आणि विज्ञानाची झालेली प्रगती, भौतिक आणि ऐहिक सुख याबाबत शेतकरी सुध्दा शहरी माणसांचे फॉलोअर्स व्हावयास लागले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे आणि हेही त्यातील एक कारण आहे. कर्ज, व्याज ही प्रमुख कारणे आहेत पण हेही त्यातील एक कारण आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. शिगम ...

(श्री.जयप्रकाश दांडेगावकर..)

सन्मानीय महसूल मंत्री श्री. राणे साहेब यांनी जे सांगितले त्यासंदर्भात मला एवढेच सांगायचे आहे की, याबाबतीत एक व्यवहार्य उपाययोजना सुचविणारी एक तज्ज्ञांची समिती करावी आणि या क्षेत्रामध्ये सर्वांकडून सुधारणा होत रहावी, अशी मी एक प्रतिनिधी म्हणून अपेक्षा व्यक्त करतो. याबाबतीत सरकार म्हणून सहकार खाते प्रयत्न करीत आहे. सरकारचे संपूर्ण लक्ष विदर्भाकडे आहे. विदर्भाला सरकारचे सहकार्य राहील एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भातय नियम 97अन्वये याठिकाणी चर्चा उपसिथत करण्यात आली. त्यामध्ये दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन अत्यंत चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बीटी बियाणाचा मुद्दा याठिकाणी मांडला. हे बीटी येते कसे अशी त्यांनी विचारणा केली. याबाबतीत केन्द्र सरकारच्या पर्यावरण विभागामार्फत निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणे बियाणे आल्यानंतर ते राज्यात प्रसृत केले जाते हे मी काल सविस्तरपणे सांगितलेले आहे. बोंड अळी आली नाही तर कापसाचे उत्पादन वाढते आणि त्यामुळे शेतकरी साहजिकच बीटी बियाणे घेण्याकडे आकृष्ट होतो. पर्यावरणाच्या दृष्टीने अनधिकृत बीटी बियाणे वापरता कामा नये. याबाबतीतही मी सांगेन की, बीटीच्या बेसिक व्हरायटीमध्ये बीटी जीनचा अंतर्भाव केला जातो. शेतक-याने अनधिकृत बीटी बियाणे वापरले तर त्याचा फटका शेतक-याला बसतो आणि त्याबाबतीत कोणावरही केस दाखल करता येत नाही. बीटी बियाणे वापरले तर जास्त उत्पादन येईल या भावनेने शेतकरी अनधिकृत बियाणे विकत घेत होता. त्याला रोखण्याचा प्रयत्न आम्ही केला. जिथे सिंचनाची सोय आहे त्याठिकाणी बीटी बियाणे फायदेशीर होऊ शकते. केवळ पावसावरच अवलंबून असलेल्या शेतीला बीटी बियाणे फायदेशीर ठरु शकत नाही. मी माननीय सदस्यांना सांगेन की, आम्ही राज्यामध्ये महापीक अभियान घेतले. हे काम आम्ही वर्षभर करीत आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी 6 विभागामध्ये ज्या खरीपाच्या बैठका घेतल्या त्यामध्ये महापीक अभियानाचे महत्व सांगण्याचा आम्ही प्रयत्न केला. सदनातील माननीय सदस्यांनी देखील हे महापीक अभियान समजून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उत्पादन खर्च कमी करण्याची सूचना केली. याबाबतीत शासनाचे जे जे काही रिसोर्सेस आहेत त्यांचा उपयोग करण्यात येत आहे. सेन्द्रीय खताचा तसेच गांडूळ आणि शेणखताचा वापर करुन जमिनीचा पोत सुधारणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे कीड व्यवस्थापनाचाही उपयोग करणे गरजेचे आहे. ह्या सर्व गोष्टी केल्या तर बीटी हे महाग बियाणे लावण्याची आवश्यकता नाही हे देखील आम्ही आत्मविश्वासाने महापीक अभियानाच्या माध्यमातून सांगितलेले आहे. बिजोत्पादनाचा कार्यक्रम देखील महापीक अभियानामध्ये आम्ही घेतलेला आहे. हे काम करीत असताना मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे पैसे वाटण्याचे, धानादेश वाटण्याचे काम

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात...)

आम्हाला करावे लागत आहे. असे असतानाही बिजोत्पादनाच्या कार्यक्रमाद्वारे 5 लाख क्विंटल पेक्षा अधिक बीज शेतक-यांसाठी निर्माण केलेले आहे. शेतक-याचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न आम्ही करीत आहोत.

...नंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

या सगळया सहा जिल्हयांमधील परिस्थिती पाहता एक गोष्ट लक्षात येते की, या भागामध्ये सिंचनाचा अभाव आहे हेही एक महत्वाचे कारण आहे. त्याचप्रमाणे सिंचनाची टक्केवारी अत्यंत कमी आहे. मोठी धरणे बांधून काही भागाला सिंचन होईल परंतु काही भाग पावसावर अवलंबून राहणार आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे हा प्रश्न निर्माण होत आहे. आज 900 किंवा 1000 मिमि शाश्वत पाऊस पडणाऱ्या भागात पाणी आहे. जलसंधारण कार्यक्रमांतर्गत पाणी अडवून एखादा भाग तरी शाश्वत पाण्याचा उपलब्ध झाला पाहिजे. म्हणून जलसंधारण कार्यक्रमांना प्राधान्य देणे तसेच पाणलोट क्षेत्रस विकासाचा कार्यक्रम प्राधान्याने राबविणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी स्वत: 1/2 पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम घ्यावेत. पाणलोट क्षेत्र विकसित केले तर फार चांगले काम होईल. शेवटी हे मूलभूत काम आहे. म्हणून विदर्भात पाणलोट मिशन हा कार्यक्रम या पॅकेजमधून देण्यात आलेला आहे. जास्तीत जास्त जलसंधारणाची कामे करण्याचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी निरनिराळी कारणे आहेत या सगळया कारणांच्या मुळाशी जाऊन जलसंधारण कार्यक्रम राबविणे अत्यंत महत्वाचे काम आहे. तसेच विदर्भात शेतकऱ्यांना कोणताही जोडधंदा नाही हेही एक कारण आत्महत्येसाठी आहे. यासाठी शेतकऱ्यांना जोडधंदा निर्माण करण्याचे काम करावे लागेल. पश्चिम महाराष्ट्रात दुधाचा जोडधंदा असल्यामुळे तेथील शेतकऱ्याला मोठा फायदा झाला. एवढेच नाही तर शेतमजूर आणि भूमिहीन यांनाही दूध धंद्यामुळे चांगले जीवन जगता येऊ लागले. विदर्भाकरिता मिल्क आणि सिल्क म्हणजे रेशीमउद्योगामधून रोजगार निर्माण करण्याची ताकद आहे. म्हणून या उद्योगांकडे लक्ष देणे आवश्यक आहे अशी सूचना मी या निमित्ताने सगळयांना करणार आहे. असा जोडधंदा करु शकलो आणि पाण्याची निर्मिती करु शकलो तसेच शाश्वत पाणी देऊ शकलो आणि उत्पादन खर्च कमी करुन जोडधंदा केला तसेच 6 टक्के व्याजाचे कर्ज मिळाले तर सगळे वातावरण बदलून जाईल त्यादृष्टीने कृषी विभाग प्रयत्नशील आहे एवढीच ग्वाही मी या निमित्ताने देऊ इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आता चांगली बातमी सांगितली की बीटी कॉटन हे बियाणे ज्या भागात पाऊस पडतो तेथेच त्याची लागवड होऊ शकते. विदर्भ आणि मराठवाडयात पाऊस कमीच आहे. पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहे. तेव्हा या बियाण्यावर बंदी घालता येईल.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : असे म्हणता येणार नाही.

**तालिका सभापती** ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी ) : सभागृहाने या प्रस्तावावर जवळजवळ साडेतीन तास चर्चा केलेली आहे.अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार दिनांक 24 मार्च, 2006 रोजी सकाळी 10.ते 11.30 या वेळात अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल आणि त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वा. पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 28 मिनिटांनी शुक्रवार,दिनांक 24 मार्च,2006 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही